
# अलौकिक गुरुदेव

## अलौकिकत्वाचे आविष्कार

पुष्प एकोणतिसावे



प.पू. सदगुरू श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराज

श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज सभागृह
(चैतन्य विद्यालय –नीरानृसिंहपूर)
येथे विराजमान असलेले श्रीगुरुदेव



।। श्रीगणेशदत्त गुरुभ्यो नमः ।।



भक्तांच्या हृदयसिंहासनावर सदैव विराजमान असलेले

# अलौकिक गुरुदेव

(प. पू. सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज)

## (अलौकिकत्वाचे आविष्कार)

◆ संकलक–संपादक ◆

प्रा. भालचंद्र दत्तात्रेय राव

प्रा. डॉ. रोहिणी अय्यर

सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर महाराज सेवा प्रतिष्ठान, पुणे चे

सत्संग प्रकाशन, पुणे

प्रकाशन क्र. २९

अलौकिक गुरुदेव (अलौकिकत्वाचे आविष्कार)


◆ **प्रकाशक**
**सत्संग प्रकाशन**
द्वारा श्री. प्रकाश पिले
सुमीत सह. गृहरचना सं. म.
फ्लॅट नं. ४०२, स्वानंद सोसा.
लेन नं. १, सहकार नगर नं. २
पुणे ४११ ००९
भ्रमणध्वनी : ९७६५४०८५५६

◆ **प्रकाशन क्र. २९**

◆ **प्रथमावृत्ती**
श्रीदत्तात्रेयजयंती, १३ डिसें. २०१६

◆ **द्वितीयावृत्ती**
श्रीगुरुदेव जयंती, १८ फेब्रु. २०१८

◆ **पुनर्मुद्रण**
श्रीदत्तात्रेयजयंती, २२ डिसें. २०१८
श्रीगुरुपौर्णिमा, १६ जुलै २०१९

◆ **मुद्रण व ग्रंथबांधणी**
न्यू भारत प्रिंटर्स – बाईंडर्स
५२०, नारायण पेठ, पुणे ३०.

◆ **अपेक्षा :**
**श्रीगुरुभक्ती**
ऐच्छिक देणगी

◆ **पत्रव्यवहारासाठी संपर्क**

● **प्रा. डॉ. रोहिणी अय्यर**
बी–१२३, अजय अपार्टमेंट, सहकार नगर नं. २, पुणे ४११ ००९
भ्रमणध्वनी : ९८८१०१९६७४

● **श्री. भा. द. राव**
१०, पानमळा, राऊत बिल्डिंग
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी:(०२०) २४३२१५७३,
भ्रमणध्वनी : ९४०३६९९६४५

◆ **प्रकाशन समिती**
प्रा. डॉ. रोहिणी अय्यर
प्रा. डॉ. एस्. एम्. कुलकर्णी
प्रा. डॉ. शशिकला गांगल


---

## ❋ वाचकांच्या माहितीसाठी ❋

'अलौकिक गुरूदेव', 'श्रीगुरुदेवांच्या आठवणी' हे ग्रंथ सत्संग प्रकाशनातर्फे प्रकाशित होत असतात. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी भाषांतूनही या ग्रंथांचे प्रकाशन झालेले आहे व होत आहे. श्रीगुरुमहिमा मोठ्या प्रमाणावर विविध भाषिक वाचकांपर्यंत पोहोचवणे, हा या प्रकाशनांचा हेतू असून त्यासाठी या ग्रंथांच्या प्रती प्रसादभेट म्हणून दिल्या जातात. अर्थप्राप्ती हा या प्रकाशनांचा हेतू नसल्याने त्यावर किंमत छापली जात नाही व किंमत आकारलीही जात नाही. ग्रंथ प्रकाशनखर्चासाठी साहाय्य करण्याच्या उद्देशाने ज्यांना यथाशक्ती जी रक्कम स्वेच्छेने द्यावीशी वाटते त्यांच्याकडून मिळणारी रक्कम त्यांची ऐच्छिक देणगी म्हणून स्वीकारली जाते व ती 'सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज सेवा प्रतिष्ठान' या धर्मादाय आयुक्त कचेरीत नोंदणी झालेल्या ट्रस्टच्या कॅनरा बँक–सदाशिव पेठ शाखा, पुणे येथील 0260101020439 क्रमांकाच्या बचतखात्यात जमा होत असते.

गुरुभक्तांनी आपल्या वैयक्तिक वा कौटुंबिक आनंदाच्या प्रसंगी या ग्रंथांच्या प्रती भेट दिल्यास श्रीगुरुमहिमाप्रसारास मोठेच साहाय्य होईल.

## ◆ अनुक्रमणिका ◆


| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीगुरुदेवांचे जीवनकार्य : अल्प परिचय | | ५ |
| २. | श्रीगुरुदेवांच्या विभूतिमत्त्वाचे विविध पैलू | ❒ प्रा. डॉ. रोहिणी अय्यर | ८ |
| ३. | श्रीगुरुदेवांची शुचिर्भूतता व प्रज्ञाजागृती | ❒ श्री. चंद्रशेखर कुलकर्णी | २२ |
| ४. | देहत्यागानंतरही श्रीगुरुदेवांचे अस्तित्वदर्शन | ❒ श्री. प्रकाश पिले | २६ |
| ५. | देहातून नीलकिरणांचे प्रक्षेपण (विश्वचैतन्याचा अलौकिक आविष्कार) | ❒ डॉ. र. ना. शुक्ल | ३५ |
| ६. | सद्‌गुरूंचे देवाशी संवाद | ❒ प्रा. डॉ. शशिकला गांगल | ३७ |
| ७. | चराचराला ओढ लावणारे श्रीगुरुदेव | ❒ श्री. अ. वि. भागवत | ३९ |
| ८. | श्रीगुरुदेवांनी घडविलेले दिव्य दर्शन | ❒ श्री. सुधीर कुलकर्णी | ४२ |
| ९. | दिव्य अनुभूती देणारे श्रीगुरुदेव | ❒ श्री. अनिल वासुदेव पाटणकर | ५२ |
| १०. | श्रीगुरुदेवांचे छायाचित्र अनुभूतींचे अधिष्ठान | ❒ श्री. सयाजी निकम | ६५ |
| ११. | स्त्रीभक्तांचे कैवारी श्रीगुरुदेव | ❒ सौ. स्मिता प्रकाश पिले | ७३ |
| १२. | श्रीगुरुदेवांकडून भक्तांचे व्याधीनिवारण | ❒ श्रीमती मंदाकिनी जोशी | ८३ |
| १३. | श्रीसद्‌गुरूंच्या स्वप्नलीला | ❒ सौ. दीपाली प्रमोद पवार | ९८ |
| १४. | श्रीगुरुदेवांशी गैरवर्तन करणाऱ्यांची देवाने घेतलेली दखल | ❒ श्री. राजेंद्र थोरवे | १०८ |
| १५. | सद्‌गुरू श्री. रामकृष्ण परमहंस आणि सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज | ❒ प्रा. डॉ. एस्. एम्. कुलकर्णी | ११३ |
| १६. | उच्च नीच भेदभाव मानसी न आणितो... | ❒ श्री. महेश कुलबर्गे | ११५ |
| १७. | साक्षात्कार घडवणारे गुरुदेव | ❒ प्रा. अरुण केसकर | ११७ |
| १८. | आगळेवेगळे सद्‌गुरू | ❒ डॉ. विकास मांडके | १२० |
| १९. | श्रीगुरूंची विदेही शिक्षणपद्धती | ❒ श्री. सुभाष अवसरे | १२६ |
| २०. | श्रीसद्‌गुरूंचे शब्दसामर्थ्य | ❒ श्री. भा. द. राव | १३० |
| २१. | श्रीगुरुदेवांचे मार्गदर्शन | ❒ प्रा. डॉ. सतीश कुलकर्णी | १३९ |
| २२. | इच्छापूर्ती करणारे श्रीगुरू | ❒ श्रीमती अनुराधा कुलकर्णी | १४२ |

## ◆ संकलकांचे मनोगत ◆

सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज हे एक विलक्षण अलौकिक व बहुआयामी विभूतिमत्व होते. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून ते दूर राहिल्यामुळे त्यांचा महिमा जनसामान्यांपर्यंत मोठ्या प्रमाणात पोहोचू शकला नाही. म्हणून ''सगुण चरित्रे, परमपवित्रे सादर वर्णावी'' या भावनेने आणि गुरुमहिमा सर्वत्र पोहोचवावा, या कर्तव्यबुद्धीने हा संग्रह प्रकाशित करीत आहोत.

दिव्यत्वाच्या ध्यासाने भारलेल्या या मानवदेहधारी जीवात्म्याने परमात्म्याशी एकरूपत्व कसे साधले; देवघरात शांतपणे तेवत राहणाऱ्या नंदादीपाप्रमाणे स्वतः जळत राहून, संपर्कात येणाऱ्यांना कसे उजळून टाकले आणि त्यांच्या जीवनात अक्षय आनंदाची फुलबाग कशी फुलवली; त्याचप्रमाणे तपश्चर्येच्या तेजाने देहातून ओसंडून वाहणाऱ्या नीलप्रभेने पाहणाऱ्यांना व परिसराला कसे प्रभावित केले– याचा वेध घेण्याचा हा संग्रह एक नम्र प्रयत्न आहे. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर राहून लोककल्याणाचे भरीव कार्य करणाऱ्या अनासक्त, शुद्ध ज्ञानसंपन्न सत्पुरुषांची परंपरा त्यांनी समृद्ध केली. अशा या बहुआयामी विभूतिमत्वातील अलौकिकत्वाचे दर्शन घेण्याचा व जिज्ञासूंना ते घडविण्याचा हा एक अवघड प्रयास आहे.

हे विभूतिमत्व आभाळाएवढे विराट आणि त्या आभाळात क्षणभरच तळपणाऱ्या विजेप्रमाणे तेजःपुंज आहे; इतके की ते पाहणाऱ्यांचे डोळे दिपून जातात. त्यांच्या विचारांचा व जीवनकार्याचा आवाका मोठा व त्यांची व्याप्तीही इतकी मोठी आहे की तिला न्याय देण्यासाठी अनेक खंड प्रकाशित करावे लागतील; परंतु ते होईपर्यंत, या मानवदेहधारी दिव्यत्वाच्या दर्शनासाठी उत्सुक परंतु (सध्याच्या गतिमान जीवनशैलीमुळे) त्यासाठी उभे राहण्यासाठी क्षणभराचीच सवड असलेल्यांना, त्या विभूतिमत्वातील अलौकिकत्वाचे ओझरते तरी दर्शन घडवता यावे, या माफक उद्देशाने हा संग्रह तयार करण्यात आला आहे. त्यातील उणीवांची आम्हाला जाणीव आहे; पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे तसे घडले आहे. नेहमीप्रमाणे वाचक या संग्रहाचे स्वागत करतील, असा विश्वास वाटतो.

**प्रा. डॉ. रोहिणी अय्यर** **प्रा. भालचंद्र दत्तात्रेय राव**



# १.
# श्रीगुरुदेवांचे जीवनकार्य : अल्प परिचय

२०व्या शतकातील एक श्रेष्ठ साक्षात्कारी सत्पुरुष प. पू. रामकृष्ण क्षीरसागर महाराज ह्यांचा जन्म महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील रायतळे या छोट्याशा गावात झाला. लहानपणीच त्यांच्यावरील पितृछत्र हरपले, त्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती हलाखीची झाली. म्हणून त्यांच्या कुटुंबाने अहमदनगरला स्थलांतर केले व तेच त्यांचे पुढील काळात वास्तव्यस्थान व धर्मकार्यक्षेत्र ठरले.

वयाच्या ७व्या वर्षी त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला व श्रीक्षेत्र गाणगापूरला येण्याचा त्यांना आदेश मिळाला. तेथे त्यांना भगवान श्रीदत्तात्रेयांचे द्वितीय अवतार प. पू. श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी त्यांना प्रत्यक्ष अनुग्रह व शिष्यत्व दिले. तसेच पुढील २५ वर्षे अज्ञातवासात साधकावस्थेत राहून खडतर तपश्चर्या करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी श्रीगुरुदेवांच्या आदेशानुसार तपश्चर्या केली. त्यानंतर त्यांच्यातील दैवी शक्तीची प्रचीती त्यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना येत गेली आणि प्रापंचिक समस्यांचे निवारण, परमार्थसाधनेतील मार्गदर्शन अशा विविध हेतूंनी त्यांच्याकडे येणाऱ्यांची संख्या वाढत गेली. 'दर्शनमात्रे मनःकामनापूर्ती' असा अनुभव येऊ लागल्याने, देशापरदेशातून अनेक जण श्रीगुरुदर्शनासाठी येऊ लागले आणि अनुभव घेऊन श्रीगुरूंच्या भक्तपरिवारात दाखल होत गेले. त्यातील अनेक व्यक्ती चांगल्या सुशिक्षित आहेत. त्यातील काहीजण तर विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, शिक्षण अशा क्षेत्रात अत्युच्च पदवी संपादन केलेले व त्या त्या क्षेत्रात अध्यापन, संशोधन करणारे आहेत. मानवी बुद्धीच्या क्षमता व मर्यादा ह्यांची त्यांना उत्तम जाण आहे. अशा व्यक्तींनाही, औपचारिक शिक्षणाच्या वाटेला व वाटेने फारसे न गेलेल्या श्रीगुरुंनी दिलेल्या अलौकिक अनुभवांनी

प्रभावित केले– तेही अंगारे, गंडेदोरे देणे, हवेतून अंगठ्या काढणे यांसारखे कोणतेही चमत्कारिक प्रकार न करता!

संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या अंतरंगात कल्याणकारक परिवर्तन घडवून त्यांना सन्मार्गाला लावणे, हाच मोठा चमत्कार आहे असे ते म्हणत आणि विशेष असे की असे परिवर्तन केवळ त्यांच्या दर्शनाने होत असे. व्यसनी व्यक्ती निर्व्यसनी, नास्तिक व्यक्ती आस्तिक व आस्तिक व्यक्ती साधक होत असे.

दर्शनेच्छूंच्या वाढत्या संख्येमुळे मोठ्या जागेची जरूरी भासू लागल्याने १९७४ मध्ये श्रीगुरुंनी एका खोलीच्या निवासस्थानातून सावेडी रस्त्यावरील 'श्रीदत्तात्रेय निवास' ह्या देवस्थानात स्थलांतर करून तेथेच शेवटपर्यंत वास्तव्य केले. तपश्चर्यापूर्तीनंतर श्रीगुरुंना त्यांच्या गुरुदेवांनी वेदविद्यासंवर्धनाचे कार्य सोपविले. त्यासाठी श्रीगुरुंनी वेदान्त विद्यापीठाची स्थापना केली. त्यासाठी भव्य वास्तू उभारली व चारही मुख्य वेदशाखांचे विनाशुल्क अध्यापन करण्याची उत्तम सोय केली. तसेच वेदाध्ययन करू इच्छिणाऱ्या १०० विद्यार्थ्यांच्या निवासभोजन इ. ची विनाशुल्क सोय केलेली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घेऊन वेदाध्ययन केले आहे व त्यापैकी काहींनी वेदपाठशाळा सुरु करून वेदसंवर्धनाचे कार्य अनेक ठिकाणी सुरु केले आहे. श्रीगुरुंचे वेदविद्याविषयक हे कार्य लक्षात घेऊन अहमदनगर नगरपरिषदेने ह्या परिसरास वेदान्तनगर असे नाव दिले आहे.

श्रीगुरुंनी त्यानंतर श्रीदत्तक्षेत्र उभारणीचा प्रकल्प हाती घेतला; त्याअंतर्गत भारतातील सर्वात मोठ्या श्रीदत्तदेवस्थानाची उभारणी करून भक्तांच्या पारमार्थिक वाटचालीतील मार्गदर्शनाची कायमची उत्तम सोय करून ठेवली आहे. शृंगेरी पीठाधीश जगद्‌गुरु शंकराचार्य श्री. भारतीतीर्थ स्वामींच्या हस्ते त्याची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. या श्रीदत्तक्षेत्राची उभारणी गुरुभक्तांनी दारोदारी भिक्षा मागून जमविलेल्या निधीतून झाली आहे.

श्रीगुरुंनी केलेले धर्मरक्षण, त्यांनी सांभाळलेले पावित्र्य, त्यांची उत्कट गुरुभक्ती व गुरुसेवा आणि त्यांनी केलेले भक्तांचे प्रबोधन ह्यामुळे प्रसन्न झालेल्या श्रीनृसिंह–सरस्वती स्वामी महाराजांनी, श्रीदत्तात्रेय निवासात स्वयंस्फूर्त रीतीने उमटलेल्या त्यांच्या प्रसादपादुकांच्या रूपाने वास्तव्य केलेले आहे. तसेच शृंगेरी पीठाधीश जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य स्वामीमहाराजांनी ह्या स्थानात वास्तव्य करून संतोष व्यक्त केला आहे. श्रीगुरुंनी श्रीदत्तक्षेत्रात लावलेल्या एकाच लहानशा रोपाच्या मुळीतून औदुंबर, वड आणि पिंपळ अशा तीन विशाल देववृक्षांचा विस्तार झालेला आहे.

श्रीगुरूंनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनपर वचनांचे संग्रह– गुरूवाणी, अमृतकलश, धर्मदर्शन, सद्‌गुरुसंवाद अशा ग्रंथांतून उपलब्ध असून श्रीगुरुदेवांच्या दिव्यशक्तीचे अनुभव, श्रीगुरुदेवांच्या आठवणी, आपले अलौकिक गुरुदेव ह्या ग्रंथांतून जिज्ञासूंना वाचता येतील. श्रीगुरूंच्या तपश्चर्येतून निर्माण झालेल्या त्यांच्या विविध प्रकारच्या कार्याचा कारभार सांभाळण्यासाठी श्रीगुरूंनी श्रीदत्तदेवस्थान ट्रस्ट (अहमदनगर) ची स्थापना केलेली आहे. (संपर्क – फोन (०२४१) २४२४७८५) तसेच श्रीगुरुकार्याच्या प्रसारासाठी विविध ठिकाणी भक्तांच्या सत्संग मंडळांचीही स्थापना केलेली आहे. धर्मरक्षणासाठी, गुरुभक्तीचा व गुरुसेवेचा आदर्श प्रस्थापित करण्यासाठी आणि भक्तांच्या उद्धारासाठी ते आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा विनियोग करीत. अत्यंत तृप्त, शांत, कृतार्थ स्थितीत श्रीगुरूंनी दि. ८ सप्टेंबर १९९९ ला देहत्याग केलेला असला तरी त्यांची शक्ती, भक्तांचे रक्षण व शिक्षण करीत असल्याचा अनुभव देशविदेशातील भक्तांना आजही येत असतो.

श्रीदत्तक्षेत्रापासून सुमारे ५ किमी. अंतरावरील तपोवनाच्या जागेत देवस्थानाची गोशाळा असून, त्याच परिसरात श्रीगुरूंचे समाधीमंदिर बांधून पूर्ण झाले आहे व त्यात श्रीगुरूंच्या पादुकांची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे.

* * *

**श्रीगुरुदेव म्हणाले होते...**

- आपण जातीने हलके आहोत, असं जे स्वतःला समजतात ते मूर्खच! तुम्हीही कोणाला कमी, हलके लेखायचं नाही; कारण हे विष्णुमय जगत्‌ आहे. ही देवभूमी आहे. येथे सर्व एकच आहेत. श्रीगुरुचरित्राच्या २७व्या अध्यायात वर्णिलेली व्यक्ती त्या जन्मी मातंग असली तरी सात जन्मांपूर्वी ती ब्राह्मण होती; ह्याचा विचार करून त्याच्यावर विभूती टाकून त्या जन्माचे स्मरण करवून देऊन, त्याच्याकडून गर्विष्ठ वैदिकांशी चर्चा करवून घेऊन त्यांनी हरविले, हे काय सांगते? सर्वच वर्णातील लोक आपले बांधव आहेत. कोणत्या ना कोणत्या जन्मात ते ब्राह्मण होते. निरनिराळ्या कर्मांनुसार मग त्यांचं विविध वर्णांत विभाजन झाले एवढेच!



# २.
# श्रीगुरुदेवांच्या विभूतिमत्त्वाचे विविध पैलू

**प्रा. डॉ. रोहिणी अय्यर**
एम.एस्सी., पीएच. डी
पदार्थविज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

**⁕ जीवनाचे प्रयोजन, प्रेरणास्थान आणि पद्धती –** याबाबत सर्वसामान्य माणूस आणि आध्यात्मिक अधिकारसंपन्न सत्पुरुष यांच्या जीवनशैलीत खूपच वेगळेपण असते. ''माती असशी मातीत मिळशी'' अशी सर्वसामान्य विकारवश माणसाची गत असते तर सत्पुरुषांचा देह जरी मानवी असला तरी जन्मतःच लाभलेली दैवी गुणसंपदा, तपश्चर्याजन्य तेजस्विता, ईश्वरी शक्तीशी असलेली एकरूपता, लोककल्याणाची विलक्षण तळमळ, ऐहिकाबद्दलची अनासक्ती अशा ठळक वैशिष्ट्यांमुळे त्यांचे विभूतिमत्त्व अलौकिक झालेले जाणवते, अगदी 'अलौकिक नोव्हावे लोकांप्रती'' असे सांगणाऱ्या श्रीज्ञानेश्वर माऊलींचेही! स्थूलमानाने भारतातील श्रीगुरुनानकदेव – तुलसीदास – चैतन्य महाप्रभू, शंकरदेव; सूरदास – ज्ञानदेव – तुकाराम – रामदास – नामदेव – एकनाथ, पुरंदरदास – कनकदास – अक्कम्मा महादेवी – त्यागराज – रमण महर्षी – रामकृष्ण परमहंस अशा असंख्य सत्पुरुषांच्या बाबतीत असे म्हणता आले तरी त्या त्या विभूतींच्या स्थळ–काळ–परिस्थितीनुसार त्यातही वैशिष्ट्यपूर्ण विविधता दिसते. त्या प्रत्येकाचे विभूतिमत्त्व एका विशेष प्रकारच्या तेजाच्या विविध रंगछटांनी नटलेले दिसते. गेल्या शतकाच्या अखेरीस देहत्याग केलेल्या व प्रसिद्धीच्या झोतात न वावरल्यामुळे महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरील जनसामान्यांना अपरिचित राहिलेल्या सद्‌गुरू श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी

महाराजांच्या विभूतिमत्त्वातील पुढील काही वैशिष्ट्यपूर्ण पैलू, त्यांच्यातील अलौकिकत्वाचा परिचय करून घेऊ इच्छिणाऱ्या जिज्ञासूंना उपयुक्त वाटतील–

⁕ महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील रायतळे या खेडेगावी, एका अत्यंत गरीब शिक्षकपित्याच्या पोटी जन्मलेल्या या आठव्या अपत्याचे पितृछत्र बालपणीच हरपले. चरितार्थसाधनाच्या शोधात त्यांच्या कुटुंबास अहमदनगर या जिल्ह्याच्या ठिकाणी स्थलांतर करावे लागले, तरी आर्थिक स्थिती हलाखीचीच राहिली व त्याचे चटके या बालकासही सोसावे लागले.

⁕ वयाच्या ७ व्या वर्षी ह्या बालकास ईश्वरी साक्षात्कार झाला. आकाशातून एक तेजस्वी व्यक्ती त्याच्याकडे पाहत होती. त्या क्षणापासून ह्या बालकास जीवनाची कृतार्थता कशात आहे, याची कल्पना आली; परमगुरूंनी त्यास (भगवान श्रीदत्तात्रेयांचे मानवी रुपातील द्वितीय अवतार श्रीमन्नृसिंह सरस्वतींचे स्थान असलेल्या कर्नाटकातील) ''श्रीक्षेत्र गाणगापूरला ये'' असा आदेश दिला. हे बालक त्या आदेशानुसार तेथे गेले. तेथे श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी त्याला **दर्शन, शिष्यत्व व तपश्चर्या** करण्याचे आदेश दिले.

⁕ अहमदनगरला घरी परतल्यावर, **या बालकाने** आईला सर्व वृत्तांत सांगितला व श्रीगुरुंच्या आदेशानुसार **तपश्चर्या करण्याचा निर्धार व्यक्त केला.** इतर बालके ज्या वयात औपचारिक शिक्षणासाठी शाळेकडे वाटचाल करीत, त्या वयात हे बालक घराच्या एका भागात गुरुआज्ञेनुसार तपश्चर्या करू लागले; मात्र सर्व कुटुंबीयांचा याला तीव्र विरोध झाला. कुटुंबीयांच्या दडपणामुळे या बालकाला काही काळ शाळेत जावे लागले तरी **शालेय शिक्षणात त्याला मुळीच रस वाटत नसे.** एका परीक्षेच्या वेळी त्यांनी पेपरात 'श्रीराम जयराम जयजयराम' लिहून ठेवले होते. त्यांच्या वर्गात श्री. एम. टी. कुलकर्णी नावाचे एक सहाध्यायी होते. त्यांच्यापुढे या बालकाचा नंबर परीक्षास्थळी बसण्यासाठी असायचा. हे बालक पेपर लिहित नसूनही त्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे– याचे त्यांना खूप आश्चर्य वाटे. एकदा या बालकाच्या पेपरची कॉपी करावी म्हणून त्यांचा पेपर पाहिला तर तो कोरा होता. कोरा पेपर देऊनही याला गुरुजी एवढे मार्क्स कसे देतात, हे कुलकर्णी ह्यांना समजेना.

⁕ एकदा **वर्गात** शिक्षकांनी अंकलिपीसंबंधी माहिती सांगितल्यावर या बालकाला शून्याची माहिती सांग, असा प्रश्न विचारताच **त्याने पार विश्वाची व्युत्पत्ती सांगायला सुरुवात केली.** ते सर्व शिक्षकांच्या डोक्यावरून गेले. ते थक्क झाले. त्यांनी या बालकाच्या आईला येऊन सांगितले, ''ह्याला शाळेतील शिक्षणाची आवश्यकता

नाही, कारण तो काय बोलतो, ते आम्हालाही कळत नाही. ह्याला शाळेत पाठवू नका.'' तेव्हापासून या बालकाने शाळा तर सोडलीच पण **शिवलेले कपडेही घालायचे सोडून दिले.** पंचा आणि काषाय वस्त्र ते वापरू लागले.

❋ **''बालपणीच सर्वज्ञता तया वरी''** असा अनुभव त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांना येऊ लागला. उत्तरायुष्यात अनेक उच्चशिक्षित जिज्ञासूंचे पूर्ण समाधान करू शकणारे व खवचटपणे ''परीक्षा'' पाहण्याच्या उद्देशाने प्रश्न विचारणाऱ्यांना निरुत्तर करणारे शुद्ध ज्ञान त्यांच्या देहाच्या आश्रयाला आल्याचा अनुभव, अनेकांना अनेकदा आला आणि अनेक नामवंत विद्यापीठांच्या कुलगुरूंनाही, त्यांच्या दर्शनासाठी येऊन त्यांच्यापुढे नतमस्तक व्हावेसे वाटले.

❋ षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळ्यात बोलतांना श्रीगुरूंनी या संदर्भात प्रथमच व्यक्त केलेल्या मनोगतात ते म्हणाले, ''अत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाल्यामुळे सगळ्यांच्या अपेक्षा खूप वाढल्या. ह्यांना आता देव प्रसन्न झालेला आहे आणि आता आपल्याला खूप श्रीमंती येईल असे कुटुंबीयांना वाटू लागले; पण श्रीमंती तर आली नाहीच पण ज्यांना ज्यांना हे कळालं त्या प्रत्येकाची माझ्याकडे पाहण्याची दृष्टी बदलली. लहान वयात, **ह्या मुलाला हे ज्ञान कसे काय झाले असेल– असा संशय घ्यायला त्यांनी सुरुवात केली.''**

❋ त्या परिसरातील लोकांनाही वाटू लागले की, या लहान मुलाला असा अनुभव येईलच कसा? त्याला तपश्चर्या करावी लागते, बरेच काही करावे लागते असा संशय घ्यायला सुरुवात केली. त्यात घरातल्या लोकांनी जास्त प्रमाणात संशय घेतला. ''पण गुरूंची आज्ञा झालेली होती, ती मी शांतपणे ऐकली'' व त्याप्रमाणे तपाचरण सुरू ठेवले.

❋ साधारणपणे मनुष्याचा स्वभाव असा असतो की– ''तुम्हाला ते दिसलं ना ते आम्हाला दाखवा'' अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो. पण तसे करणे शक्य नव्हते. ''त्यातून निंदा व्हायला लागली, चेष्टा–कुचेष्टा होऊ लागली. ज्याला **छळ म्हणतात– तो होऊ लागला.** त्यातल्या त्यात माझे बोलणे कमी, निवांत राहणे, ईश्वरचिंतन करणे हे पाहून लोकांना जास्तच चेव आला व जो तो उठून माझी निंदा करू लागला. **पण गुरूआज्ञा होती. शांत राहिलो.** पोलीस कस्टडी मिळाल्यावर निरपराध माणसाला कसे होते, तशी परिस्थिती माझी झाली होती.'' निंदा, अवहेलना, उपेक्षा, अपमान या सर्वांचे कडू घोट ह्या बालकाला केवळ गिळायला लागले नाहीत तर ते शांतपणे पचवावेही लागले.

⁕ कालांतराने जसजशी या **बालकातील ईश्वरी शक्तीची अनुभूती व प्रचीती** कुटुंबीयांना व परिसरातील **लोकांना येऊ लागली** तसतशी या छळाची तीव्रता कमी होऊ लागली आणि प्रापंचिक समस्यांच्या निवारणासाठी, **साहाय्याच्या अपेक्षेने येणाऱ्या आपद्ग्रस्तांची संख्या वाढू लागली.** कोमल अंतःकरणाच्या या बालकाकडून त्यांच्याविषयीच्या करुणेपोटी त्यांना मार्गदर्शन व साहाय्य होऊ लागले. **या बालकाच्या ज्ञानाची व शक्तीची माहिती परिसरात पसरू लागली.**

⁕ परमगुरू श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी गाणगापूरला दिलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करीत, श्रीगुरूंनी बालवयात तपाचरणाला प्रारंभ केला. **त्यांना आधी साक्षात्कार झाला आणि मग त्यांच्या तपश्चर्येला सुरुवात झाली.** श्रीगुरुचरित्र पठण व त्याची पारायणे, नामस्मरण, ध्यानधारणा, ॐकार जप, व्रतवैकल्ये, देवपूजा अशा अनेक रीतींनी, अत्यंत समर्पित वृत्तीने त्यांची साधना सुरू झाली. त्यासाठी यमनियमांचे काटेकोर रीतीने ते पालन करीत. त्या काळात **त्यांना अनेक देवतांची दर्शने झाली. सालंकृत स्वरूपात श्रीविठ्ठलांनी त्यांना दर्शन दिले–** तेही पहाटे दोन वाजता! तोपावेतो त्यांनी पंढरपूर पाहिले देखील नव्हते. त्यानंतर हा दैनिक उपासनाप्रारंभकाळाचा संकेत आहे असे समजून त्यांनी **रोज पहाटे दोन वाजता उठून उपासना करणे सुरू केले.** तसेच प्रतिवर्षी पंढरपूरला जाऊन श्रीविठ्ठलमूर्तीचे दर्शन, महापूजा करणे असा प्रघात सुरू केला.

⁕ एकदा त्यांना स्वप्नात देवीचा दृष्टांत झाला की– ''केडगावला एका लिंबाच्या झाडाखाली मी आहे. मला घेऊन चल. माझी स्थापना कर.'' पाच सवाष्णींसह मला रस्त्यात न बोलता घरी आणायचं, अशी आज्ञा होती. वडीलबंधू दादा देवीला आणायला गेले. तो तांदळा लहानसा होता. दादा म्हणाले ''आपण नेऊ की सहज! त्यात काय मोठेसे?'' त्यांनी तो देवीचा तांदळा घेतला पण ते पाच पावलेही चालू शकले नाहीत. तो तांदळा इतका जड झाला की दादांना घाम फुटला. मग दादांना सुचवण्यात आले– ''क्षमा मागा त्यांची.'' मग दादांनी नमस्कार केला; क्षमायाचना केली व ती मूर्ती हलकी झाली. मग ती मूर्ती घरी आणली. श्रीगुरूंनी स्वतः तिची पूजा करून स्थापना केली. त्यानंतर **त्यांनी परान्न सोडले.** कोणाकडे जावे लागले तर तेथे ते दूध घेत.

⁕ एका संध्याकाळी ते दूध घेऊन येत असतांना त्यांच्या **पायाला नाग चावला.** ते तसेच घरी आले; कुटुंबीयांना त्याबाबत सांगितले व म्हणाले ''मला दवाखान्यात नेऊ नका. माझ्या शरीरावर लिंबाचा पाला खालीवर पसरा. तीन दिवस

देह हलवू नका. मी बेशुद्ध पडेन. माझा वर्ण काळपट होईल.'' एवढे बोलून ते बेशुद्ध झाले. सर्व कुटुंबीय त्यांच्या उशाशी ३ दिवस बसून राहिले. डॉक्टरांना न बोलावण्याची त्यांनी सक्त सूचना दिली होती. चौथ्या दिवशी गावात जे दत्तमंदिर होते तेथून ३ पितळी बादल्यांइतके दुधासारखे पांढरे तीर्थ वाहू लागले. ते तीर्थ वाहण्याचं जेव्हा पूर्ण बंद झालं त्यावेळी श्रीगुरूंना शुद्ध आली. **त्यांचा वर्ण काळपट श्यामल झाला तो या नागदंशामुळे.**

* कुटुंबीयांना वाटायचं की त्यांनी अर्थार्जन करावे. घरी खूप गरिबी होती. थोरल्या बंधूंनी त्यांना आयुर्वेदिक औषधे तयार करणाऱ्या एका कारखान्यात काम मिळवून दिले. पण तेथे ते आठच दिवस टिकले. एका सायंकाळी आसवं तयार केलेल्या पिंपात सापाने गरळ ओकली. ते दृष्य त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आणि आता हे औषध विषारी झाले म्हणून त्यांनी ते औषधाने भरलेले पिंप ओतून टाकलं. ते मालकाने पाहिले. त्याला खूप राग आला व त्याने या बालकाला कामावरून काढून टाकले. **या प्रकारानंतर महाराजांनी कोणाकडेही नोकरी केली नाही.** फक्त श्रीहरदास यांच्याकडे ते देवपूजा करण्यासाठी जात. तेथेही एकदा ते प्रत्यक्ष जाऊ शकले नाही तरी **त्यांच्या रूपाने कोणीतरी** जाऊन त्या घरची देवपूजा केली. याचा अर्थ **एकापेक्षा अधिक रूपे ते धारण करू शकत.**

* दर्शनार्थी, मार्गदर्शनार्थी आणि व्यावहारिकदृष्ट्या लाभार्थी भक्तांची संख्या वाढू लागल्याने १९७४ साली त्यांनी श्रीदत्तात्रेय निवासात स्थलांतर करून तेथेच कायमचे वास्तव्य केले. त्यापूर्वी खडतर तपश्चर्येचा, निंदा-चेष्टा, टिंगल-टवाळी शांतपणे सोसण्याचा २५ वर्षांचा काळ लोटल्यावर त्यांना **पुन्हा त्यांच्या गुरूंचे दर्शन झाले** व त्यांनी सांगितले की, ''मला **तुझ्याकडून वेदांचे कार्य करून घ्यायचं आहे.** तू आता वेदकार्याला लाग.'' त्यानुसार त्यांनी खूप परिश्रम करून गुर्वाज्ञेचे पालन केले. देशभरातील नामवंत वेदमूर्तींना नगरला पाचारण करून प्रतिवर्षी ५ जणांचे भव्य सत्कारसमारंभ आयोजित केले. त्यानिमित्त त्यांच्याशी वेदविद्यासंवर्धन कार्याविषयी विचारविनिमय करता आला आणि वेदान्त विद्यापीठाची योजना तयार करता आली. त्याचा एक भाग म्हणून त्यांनी वेदपाठशाळा सुरू केली. चारही वेदशाखांच्या अध्यापनासाठी योग्य त्या अध्यापकांची नियुक्ती केली. या कार्यासाठी एक भव्य वास्तू उभारली. त्या वेदविद्या अध्ययन करू इच्छिणाऱ्या १०० विद्यार्थ्यांच्या निवास-भोजन इ. ची निःशुल्क व्यवस्था केली. या कार्यासाठी लागणारा निधी उभारण्यासाठी श्रीगुरूंनी भक्तांना धर्मभिक्षा मागण्यासाठी घरोघर जाण्याचा आदेश

दिला व पूर्णतः लोकाश्रयावर हे कार्य संपन्न करून आपल्या गुरुदेवांच्या आदेशाचे पालन केले.

* हळूहळू लोकांना त्यांच्या ठायी असलेल्या ईश्वरी शक्तीचा प्रत्यक्ष अनुभव यायला लागला. लोक दर्शनाला येऊ लागले. त्यांना पूजनीय मानू लागले. दिव्याने दिवा लागावा तशी त्यांची ख्याती अनुभव घेणाऱ्यांकडून पसरू लागली. येणाऱ्यांची संख्या वाढू लागली. त्यात आर्त, अर्थार्थी, कर्तबगार, बुद्धिनिष्ठ, हुषार असे सगळ्या प्रकारचे लोक असत. यथावकाश अनेक उच्चशिक्षित व्यक्तीही त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागल्या. त्यातील काहीजण तर विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, शिक्षण अशा क्षेत्रात अत्युच्च पदवी संपादन केलेले व त्या त्या क्षेत्रात अध्यापन, संशोधन करणारे होते. मानवी बुद्धीच्या क्षमता व मर्यादा ह्यांची त्यांना उत्तम जाण होती. असा व्यक्तींनाही औपचारिक शिक्षणाच्या वाटेला व वाटेने फारसे न गेलेल्या श्रीगुरुदेवांनी दिलेल्या **अलौकिक अनुभवांनी प्रभावित केले– तेही अंगारे, गंडेदोरे देणे, हवेतून अंगठ्या इ. वस्तू काढून दाखवणे ह्यासारखे कोणतेही प्रकार न करता.** संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या अंतरंगात कल्याणकारक परिवर्तन घडवून त्यांना सन्मार्गाला लावणे, हाच मोठा चमत्कार आहे असे ते म्हणत आणि विशेष हे की **असे परिवर्तन केवळ त्यांच्या दर्शनाने होत असे.**

* एकदा पंढरपुरात श्रीगुरुदेवांचा सत्कार करण्याचा प्रस्ताव काही मंडळींकडून आला तेव्हा त्याला नकार देतांना ते म्हणाले, ''मी 'त्या'च्यासमोर 'त्या'च्या क्षेत्रात स्वतःचा सत्कार कसा करून घेऊ? मी **'त्या'चा दास आहे.** मी काही त्याच्यासमोर शाल घालून घेणार नाही.''

* श्रीगुरुदेव दरमहा स्वतःचा भोजनखर्च म्हणून रु. ५००/– देवस्थानच्या पेटीत टाकत. हे पैसे त्यांच्यासमोर त्यांच्या भक्तांनी 'गुरुदक्षिणा' म्हणून ठेवलेल्या रकमेतून टाकत. ह्याशिवाय धार्मिक विधी करणाऱ्या ब्राह्मणांना दक्षिणा देण्यासाठीही अशा रकमेचा ते विनियोग करीत. कारण ट्रस्टमधून नियमानुसारच पैसे काढता येत. त्यापेक्षा अधिक किंवा इतर कोणाला दान द्यावे, असे वाटल्यासही श्रीगुरुदेव त्या 'गुरुदक्षिणे'चा विनियोग करीत.

* श्रीगुरुदेवांना ज्योतिषशास्त्राचं **उपजतच ज्ञान होतं.** त्यामुळे पत्रिकेत, कोणता ग्रह कोठे आहे हे ते चटकन सांगत. व्यक्तीचं बोलणं, दर्जा, व्यक्तिमत्त्व, उठणं–बसणं, आवाज, उच्चार, बुद्धिमत्ता यावरून तिचं 'लग्न' काय असेल त्याचा दर्जा काय असेल, हे श्रीगुरुदेव पत्रिका न बघताही सांगत. अनेकदा ती व्यक्ती

मागच्या जन्मात कोण असावी, हेही ते सांगून जात आणि तिच्या आयुष्याच्या भावी काळातील घटनांचे सूचक संकेत देत.

* एका भक्ताने परमगुरूंच्या पादुकांना हार घातला व दुसरा हार अर्पण करण्यासाठी तो श्रीगुरुदेवांकडे गेला तेव्हा श्रीगुरुदेव त्याला म्हणाले, ''दोन्ही हार त्यांनाच घाल. **त्यांच्यात मला पहा,** माझ्यात त्यांना पाहू नका.''

* श्रीगुरुदेवांची **जागृत प्रज्ञा, वैराग्य आणि निष्कलंक ब्रह्मचर्य** याबाबत सर्वसामान्य भक्तांना आश्चर्ययुक्त भक्तीभाव वाटत असे; पण पीठाधीश जगद्‌गुरू श्रीशंकराचार्यांसारख्या श्रेष्ठ संन्यासी यतीवरांनाही त्याबद्दल आपुलकीयुक्त आदरभाव वाटत असे. शृंगेरी पीठाधीश शंकराचार्य तर त्यांचा उल्लेख 'ब्रह्मचारी महाराज' असाच करीत व अद्यापही करतात.

* श्रीगुरूंची **निःस्पृहता** वाखाणण्यासारखी होती. एकदा एका भक्ताने त्यांना सोन्याचा एक अलंकार देऊ केला व तो म्हणाला, ''रात्री मला स्वप्नदृष्टांत झाला की हा अलंकार क्षीरसागर महाराजांना दे'' श्रीगुरू त्याला म्हणाले, ''मला तसा दृष्टांत झालेला नाही. त्यामुळे तो होईपर्यंत हा अलंकार तुझ्याकडेच ठेव.'' दिल्लीचे एक मोठे उद्योगपती श्रीगुरूंच्या दर्शनास आले होते. त्यावेळी देवस्थानात वास्तूचे बांधकाम सुरू होते. निधीची निकड होती. त्या उद्योगपतींनी श्रीगुरूंसमोर सही केलेला एक कोरा चेक ठेवला व 'त्यावर हवी तेवढी रक्कम लिहून तो स्वीकारावा' अशी विनंती केली. ती श्रीगुरूंनी नाकारली. 'तुम्हाला स्वखुषीने व कर्तव्यबुद्धीने जे द्यावेसे वाटेल ते तुम्हीच त्यावर लिहून त्यावर ट्रस्टचे नाव लिहा व तो ट्रस्टच्या ऑफिसात देऊन त्या देणगीची पावती घ्या. मी असे वस्त्र धारण करतो की ज्याला खिसाच नाही' असे त्यांना सांगितले.

* **वक्तशीरपणा** हा श्रीगुरूंचा एक अनुकरणीय गुणविशेष होता. साधनेची, देवपूजेची, बैठकीची, आरतीची, फिरायला जाण्याची वेळ ठरलेली असे व ती अगदी काटेकोरपणे पाळली जात असे. प्रसिद्ध बासरीवादक श्री. केशव गिंडे ह्यांनी श्रीगुरूंशी बोलण्यासाठी एक तास मिळावा, अशी प्रार्थना केली. ती मान्य करून श्रीगुरू त्यांच्याशी बोलत राहिले. दोघांतील बोलणे संपताच तास संपल्याचा घड्याळातील टोल पडला.

* श्रीगुरुदेव हे भगवान **श्रीकृष्णाप्रमाणे जन्माने आठवे** व त्यांचा **जन्मही रात्री १२ वाजताचा!** विशालकाय देह, श्यामवर्ण, पाठीवर रुळणाऱ्या घनदाट जटा, शुभ्र दंतपंक्ती, दोन्ही हातांच्या आकारात व रंगात किंचितसा फरक, हातांचे तळवे आरक्त व त्या हातांवर **अनेक शुभचिन्हे** असे त्यांचे बाह्यरूप होते. त्यांच्या **पायावरही**

**शुभचिन्हे** होती. सोमनाथच्या मुक्कामात श्री. अशोक काळे व श्री. अनिल पाटणकर ह्या भक्तांना त्यांनी आपले पाय दाखवले व म्हणाले, 'पायाची बोटं नीट बघा. माझ्या दहाही बोटांवर चक्र आहेत.. माझ्या एका पायावर त्रिशूल आहे. दुसऱ्या पायावर चक्र आहे.'' ते दोघे ती शुभचिन्हे पाहून गुरुचरणांवर नतमस्तक झाले. त्या शुभंकर गुरुचरणांवर अनेक आर्तजनांनी अश्रूंचा अभिषेक केलेला आहे व मनाला शांतता अनुभवलेली आहे. सगळे दुःख त्या चरणांवर अश्रूरूपात अर्पण केले की तापदायक विषय मिटला, असा त्यांना अनुभव येई.

❋ त्यांची चर्या हसरी होती. **स्वतः हसत व इतरांनाही हसवत.** ते हसत तेव्हा त्यांच्या हास्याचा आवाज मोठ्या दरीतून वाहणाऱ्या मंजुळ झऱ्याच्या आवाजासारखा वाटे. ते म्हणत, ''मनुष्याच्या मनोवृत्तीत शुद्धता आल्याशिवाय तो मनमोकळेपणाने हसू शकत नाही.'' ते हसण्याच्या अनेक बऱ्यावाईट प्रकारांची व त्यांच्या प्रभावाची माहिती देत असत.

❋ त्यांना **विनोद प्रिय असे.** दर्शनास येणाऱ्या भक्तांना ते, अनपेक्षितपणे विनोद करून हसवीत. हास्यरसाचे कारंजे उंच उडवीत. त्यामुळे खिन्न मनोवृत्ती असलेल्या भक्तांच्या मनातील खिन्नता नाहीशी होऊन तिची जागा प्रसन्नता घेत असे. आलेल्या प्रत्येकाच्या मनातील मोगऱ्याच्या कळीची प्रत्येक पाकळी पूर्णपणे उमलत असे आणि 'कळी खुलणे' या मराठी वाक्प्रचाराचा सुखद अनुभव त्यांना येत असे.

❋ वैदिकांचा, विद्वानांचा सत्कार करतांना, कलावंतांचे, गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना, निरनिराळ्या उत्तम कार्य करणाऱ्या सामाजिक/शैक्षणिक संस्थांना साहाय्य करतांना, दुष्काळपीडित, पूरग्रस्त, भूकंपग्रस्त अशा नैसर्गिक आपत्तींनी पीडितांना साहाय्य करतांना **त्यांचे दातृत्व व मनाची विशालता** प्रत्ययास येई. त्यांच्या हस्ते देणगीचा कृपाप्रसाद स्वीकारण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री नामदार श्री. शंकररावजी चव्हाण, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. गुप्ते ह्यांच्यासारखे मान्यवर त्यांच्याकडे आले होते. भागवत सप्ताहाची दक्षिणा, महावस्त्र व सुवर्णदान पाहून श्री. डोंगरेशास्त्री म्हणाले, ''मी एवढं दातृत्व अन्यत्र कुठेच अनुभवलं नाही.''

❋ स्वतःचे निवासस्थान सोडून सभा–समारंभ, चर्चासत्रे, उत्सव असलेल्या ठिकाणी ते सहसा जात नसत. पण **तेथे घडणाऱ्या घटना ते पाहू शकत. ऐकूही शकत.** एकदा त्यांनी पं. नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर, स. का. पाटील ह्यांच्या व्याख्यानांचे व बोलतांना ते करीत असलेले हावभाव, त्यांच्या लकबी ह्यांचे वर्णन

ऐकवले होते– प्रत्यक्ष त्या जागी गेले नसतानाही!

* प. पू. सद्‌गुरूंना पाहिल्यावर अनेक भक्तांच्या मनात उच्च भाव येत. काहींना रडूही येई. एकदा एक स्त्रीभक्त आल्या व प.पू. सद्‌गुरूंना पाहून खूप रडू लागल्या. प.पू. सद्‌गुरूंनी आशीर्वाद दिले आणि त्या बाई गेल्या. प. पू. सद्‌गुरू आमच्याकडे पाहून हसले व म्हणाले, ''हे नाटक होते. अहो मी इथे बसलोय पण मी तुमचे अनेक जन्म पाहिलेत. तुम्ही मला आताच पाहाताय, **मला सगळ्यांचा भूतकाळ माहीत असतो. वर्तमानकाळही मी पाहत असतो व भविष्य घडवत असतो.** मी एक देणार, त्याचे अधिक १०० करायचे की उणे १०० करायचे हे तुमच्या हातात. त्यामुळे ह्यांचं पुढे काय होणार हे मला माहीत असते. गुरूंच्यासमोर नाटके नकोत. निर्लज्ज होऊन राहा. काही भक्तांना मला पाहिल्यावर इतका भाव येतो की ते निःशब्द होतात. त्यांच्या ओठांच्या, डोळ्यांच्या व गळ्याच्या शिरा बोलतात. काही भक्तांना गत आयुष्यातील कुकर्म बोलू देत नाहीत. भाव उत्कट असतो. पण पश्चात्तापात जळत असतात. त्यामुळे नेमके शब्द सुचत नाहीत. काही मोकळ्या भांड्यात नाणे टाकून वाजविले की कसा आवाज होतो– तसे बडबडत असतात. त्यांचा असा समज असतो की सद्‌गुरू मला आताच ऐकतात, पाहतात! काही नुसते रडतात पण आतून ओलावा नसतो. जेव्हा खरा भाव उत्पन्न होतो, रडू येते तेव्हा डोळ्यांतून तर पाणी येतेच पण नाकातूनही येते. त्याला कसलेच भान राहत नाही की किती पाणी गळतंय, हृदय फुटत असते. त्यामुळे आतूनही हुंदके बाहेर येऊन मोठे आवाज येतात. मी आणि तो एवढेच भान असते. त्याला इतरांची जाणीवही राहात नाही. तेव्हा नकळत आम्हीही भारावतो. आम्ही भक्तांच्या अवस्था बरोबर जाणतो. आम्ही असा वेष घेऊन येथे बसतो तर भक्तांना वाटते– हे येथे बसलेत, ह्यांना बाहेरचे काय समजतेय? पण **आमच्या शक्तीची ताकद तुम्ही ओळखू शकत नाही.** तुम्ही दर्शनासाठी येता तेव्हा तुमच्या सगळ्या बारीक हालचालींकडे माझे लक्ष असते. तुम्ही **काय बोलणार हेही आम्हाला समजते.** कोणाला बोलू द्यायचे, बोलू द्यायचे नाही हे आमच्या हातात असते. तेव्हा तुम्हाला सगळे समजते असे नाटक करू नये.'' पुढे सद्‌गुरूंनी असे सांगितले की ''काही भक्तांना कधीतरी आम्ही शब्द दिलेला असतो. त्यासाठी आम्हाला त्यांच्याकडे लक्ष द्यावेच लागते. आम्ही जे आशीर्वाद देतो ते या जन्मीच काय अनेक जन्मी तुम्हाला साहाय्य करतात. काही लोकांना असेही वाटते की अमूक एक व्यक्ती चोर आहे. राजकारणी आहे, दुराचारी आहे पण ती येथे दर्शनाला कशी? पण मी सर्वांचा आहे. सात्विक लोकांपेक्षा अशा इतर

अवगुणी लोकांना दर्शनाची जास्त आवश्यकता असते आणि कधीतरी दिलेला शब्द पाळून मी त्यांचे वागणे सहन करीत असतो.''

* ''भगवंताच्या दारात सर्व प्राणीमात्रांना प्रवेश आहे... आम्ही अशा लोकांना ओळखतो. त्यांना जवळ बसवून का ठेवतो तर इतर लोकांपेक्षा त्यांनाच ह्या चरणांची गरज आहे म्हणून! **आमच्या सहवासाने त्या व्यक्तीत बदल होतोच** आणि समाजात जाऊन त्याने इतर उद्योग करण्यापेक्षा येथे त्यांच्या पापग्रहाला मी रोखून ठेवतो. अशाच लोकांना बांधून ठेवण्याची गरज असते. त्यांच्यावाचून माझे काही अडत नाही पण त्यांच्यामुळे तुमचे अडू नये ही चिंता असते एवढेच!'' केवढा मोठा अर्थ आहे त्यांच्या या सांगण्यामध्ये. म्हणजे समाजातील दुष्ट प्रवृत्तींना रोखून धरावे लागते. तेव्हा कोठे सत्प्रवृत्त माणसांचे रक्षण होते हे त्यांना सुचवायचे होते.

* श्रीगुरुदेवांनी भक्तांसमोर **गुरूभक्ती** कशी करावी, **गुरूसेवा** कशी करावी, **भगवत्‌भक्ती** कशी करावी याचे उत्तुंग **आदर्श** उभे केले आहेत. ते दरवर्षी कार्तिक महिन्यात श्रीगाणगापूरला त्यांच्या श्रीगुरुंच्या दर्शनासाठी व सेवेसाठी जात असत. तेथे ७ दिवस वास्तव्य करून समर्पित वृत्तीने श्रीगुरुचरणाचे दास म्हणून सेवा करीत. मोठी गुरुदक्षिणा अर्पण करून सेवा करीत. शिवाय, तेथील पुजारी, सेवेकरी, ब्रह्मवृंद या सर्वांचा सत्कार करून त्यांना दक्षिणा देत.

* अशीच **सेवा** ते प्रतिवर्षी तुळजापूरची भवानीदेवी, कोल्हापूरची महालक्ष्मी, पंढरपूरला श्रीविठ्ठल-रुक्मिणी, नृसिंहवाडीच्या या दैवतांची करीत असत.

* प्रत्येक भक्तातील **चांगल्या गुणांचे ते कौतुक करीत** व त्यांचा देवस्थानच्या कार्यासाठी उपयोग करून घेत. मात्र, भक्तांनी देवस्थानातील सर्व कामे शिस्तीत, नियम न मोडता करावीत यावर त्यांचा कटाक्ष असे. व ही **शिस्त** ते स्वतःही पाळत. त्यांचे **व्यवस्थापनकौशल्य** अनुकरणीय व प्रशंसा करण्यासारखे होते.

* त्यांनी देवस्थानात लावलेल्या **एका मुळीतून** वड, पिंपळ व औदुंबर हे तीन वृक्ष वाढले असून तो देववृक्ष भक्तांसाठी **कल्पवृक्षच** ठरला आहे. तसेच श्रीगुरूंची साधना, त्यांची गुरुभक्ती, गुरुसेवा यांवर प्रसन्न होऊन, त्यांचे दत्तावतार सद्‌गुरू श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी, त्यांच्या **आपोआप उमटलेल्या चिंतामणी पादुकांच्या रूपाने,** देवस्थानात वास्तव्य केले आहे. शृंगेरी पीठाधीश जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य स्वामी महाराजांनी या देवस्थानास भेट देऊन उमटलेल्या पादुकांचे दर्शन घेऊन, श्रीगुरुदेवांचा सत्कार व गौरव केला आहे. रामेश्वरच्या शिव मंदिराच्या गाभाऱ्यात, पुजारी, पीठाधीश श्रीशंकराचार्य यांनाच प्रवेश असतो. श्रीगुरुदेवांचा

आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकार लक्षात घेऊन शृंगेरी पीठाधीश श्रीशंकराचार्यांनी गुरुदेवांना स्वतःबरोबर गाभाऱ्यात नेऊन त्यांच्याविषयीचा आपुलकीयुक्त आदर व्यक्त केला.

**श्री. दशरथ मुरलीधर गुंजाळ** (सेवानिवृत्त अधिकारी, व्होल्टास कंपनी, ठाणे) ह्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या श्रीगुरुदेवांच्या विभूतिमत्त्वातील एका वैशिष्ट्याबद्दल कळविले आहे ते असे– ''१९९९ साली श्रीगुरूदेव विश्रांतीसाठी तीन महिने श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथे आयोना बंगल्यात होते. त्यावेळी ठाणे सत्संग मंडळातर्फे श्रीगुरुसेवेसाठी गेलो होतो. श्रीगुरुदेव रोज संध्याकाळी पाच वाजता फिरण्यासाठी जात असत व त्यावेळी आम्हालाही त्यांच्याबरोबर जाण्याची संधी मिळे. आम्हाला एका जागी श्रीगुरुदेवांनी त्यांच्या देहाची सावली पडत नव्हती, हे दाखविले. संध्याकाळी सहाची वेळ असेल. त्यांच्याबरोबरच्या आम्हां सर्वांच्या सावल्या पडल्या होत्या परंतु श्रीगुरुदेवांची सावली पडत नव्हती. ह्याचा अर्थ माझ्या मते, त्यांच्या देहातून बाहेर पडणारे तेज हे सूर्याच्या तेजात विलीन होत असेल, म्हणून त्यांची सावली पडत नसेल व ते त्यांचे तेज, आपल्याला वेगळी दृष्टी नसल्याने ते आपण बघू शकत नाही, असे मला वाटले.''

सद्गुरूंच्या दूर (दिव्य) दृष्टीचा अनुभव अनेक भक्तांनी घेतला आहे. एक भक्त नगरला दर्शनासाठी गेला. सोमवार होता म्हणून त्याच्या मनात विचार आला की आज सोमवार आहे, तेव्हा श्रीगुरूंसमोरील पादुकांवर बेल अर्पण करावा. मंदिराच्या आवारात बेलाचे झाड आहे. त्या भक्ताने मंदिरातील सेवेकऱ्याकडून त्या बेलाचे पान मिळवले व वरच्या मजल्यावर आसनस्थ असलेल्या सद्गुरूंच्या दर्शनासाठी तो गेला व त्यांच्या समोरच्या पादुकांवर बेल अर्पण केला. त्यावेळी पादुकांवर फुले, हार वगैरे काहीच नव्हते. त्या भक्ताने बेल अर्पण केल्यावर सद्गुरू म्हणाले, ''मंदिरातीलच बेलफुले देवाला अर्पण होतात.'' या अनुभवावरून श्रीगुरूंकडे दिव्यदृष्टी असल्याची प्रचीती त्या भक्ताला आली व त्याला जाणीव झाली की श्रीगुरू जरी मानवी देहात दिसत असले तरी ते प्रत्यक्ष ईश्वर–अवतारी पुरुष आहेत. त्यामुळे ते सर्व विश्व पाहू शकतात. भक्तांना पाहू शकतात; संकटसमयी ते त्यांना साहाय्य करतात. ते सर्वज्ञ, सर्वशक्तीमान आहेत.

* अध्यात्ममार्ग हा केवळ शुष्क पांडित्यपूर्ण चर्चा, कोरडे निरूपण वा कर्मकांड ह्यांचा मार्ग नाही. तो प्रत्यक्ष ईश्वरी शक्तीचा अनुभव घेण्याचा व त्यासाठी लागणारी पात्रता प्रयत्नपूर्वक संपादन करण्याचा मार्ग आहे. ज्यांनी त्या मार्गाने वाटचाल करण्याची

तयारी दर्शवली त्यांना श्रीगुरुदेवांनी सर्व प्रकारचा आधार देऊन प्रगतीपथावर सतत पुढे नेले आणि त्यांचे जीवन सुखीसमाधानी व खऱ्या अर्थाने संपन्न व कृतार्थ केले. **''जो मोकळ्या मनाने दर्शनाला येईल, येथे स्थिर होईल त्या प्रत्येकाला अनुभव येईल,''** असे ते म्हणत. आपुलकीने जवळ केलेल्या भक्तांवर श्रीगुरुदेवांनी निःस्वार्थ प्रेमाचा, अविस्मरणीय आनंदाचा व असीम कृपेचा वर्षाव केला आणि त्यासंबंधीचे, तसेच भक्तरक्षकाची व भक्तशिक्षकाची भूमिका करतांनाच्या अनुभवांचे त्यांनी भक्तांना मोठेच पसायदान दिलेले आहे.

⁕ **देहत्यागानंतरही** (१९९९ नंतर) श्रीगुरुदेवांनी अनेक भक्तांना **विशिष्ट रूप धारण** करून किंवा अदृष्य चैतन्य रूपात, त्यांच्या अस्तित्वाची, त्या त्या स्थळातील उपस्थितीची आणि विश्वव्यापकतेची जाणीव, त्यांना विलक्षण आश्चर्यकारक अनुभव देऊन, करून दिली आहे. पूर्वी भक्तांना दिलेला शब्दही त्यांनी देहत्यागानंतर पाळला आहे.

⁕ सद्‌गुरूंचे **देवाशी** अनेकदा **संवाद** होत असत.

⁕ सद्‌गुरूंनी **अनेक भक्तांना दिव्य** अनुभूती, साक्षात्कार यांचा अनुभव दिला आहे. तसेच **स्वास्थ्यरक्षणासाठी** व **व्याधी निवारणासाठी** साधेसोपे उपाय व उपचारही सुचविले आहेत. स्वप्नदृष्टांताच्या माध्यमातून त्यांनी भक्तांना बहुमोल मार्गदर्शनही केलेले आहे.

⁕ **भक्तांचे रक्षणकर्ते** व शिक्षणकर्ते/संस्कारकर्ते या नात्याने त्यांनी असंख्य भक्तांना उपकृत केलेले आहे.

⁕ अन्य धर्मांचे अनुयायीही श्रीगुरुदेवांच्या दर्शनासाठी व त्यांचा आशीर्वाद लाभावा यासाठी, देवस्थानात येत असत. अशा अन्य धर्मीयांबाबत श्रीगुरुदेवांचे धोरण अत्यंत उदात्त होते. ख्रिस्ती, मुस्लिम, जैन, शीख या धर्मपंथाच्या अनुयायांना श्रीगुरुदेवांविषयी आदर व भक्ती वाटत असे. त्याबाबत श्रीगुरुदेव म्हणत, **''येथे दर्शनासाठी कोणीही येऊ शकतो व त्यासाठी मध्यस्थाची व परवानगीची आवश्यकता नाही.''** त्या संदर्भातील एका मुस्लिम गुरुभक्ताचा अनुभव श्री. महेश कलबुर्गे यांनी लिहिला आहे.

⁕ **शब्द, मौन, स्पर्श, दृष्टिक्षेप, प्रसाद, स्वप्नदृष्टांत** अशा विविध माध्यमांद्वारे भक्तांना हे अनुभव श्रीगुरुदेवांकडून मिळत असत व त्या अनुभवांचा लाभार्थी भक्तांवर मोठाच प्रभाव पडत असे. त्या अनुभवांवरून श्रीगुरूंचे दैवी गुणविशेषच कळत होते असे नसून त्यांचे भक्तांवरील निःस्वार्थी, निरपेक्ष प्रेम, दुःखी-कष्टी जीवांविषयी

वाटणारी करुणा, भक्तांच्या उद्धाराविषयी वाटणारा कळवळा तसेच चराचर सृष्टीवरील त्यांचा अधिकारही लक्षात येत असे. **श्रीगुरुकृपेने अशक्य गोष्टी शक्य होतात आणि अवघड समस्याही सोप्या होतात,** असाही भक्तांना अनुभव येत असे.

✻ श्रीगुरुपौर्णिमा, श्रीदत्तात्रेयजयंती या उत्सवप्रसंगी जमणाऱ्या भक्तांच्या मेळाव्यास आशीर्वाद देतांना ते ह्या दिलेल्या अनुभवांच्या पसायदानाची जाणीव करून देत असत. ''**या देहातील ईश्वरी शक्तीने तुमच्यापैकी प्रत्येकाला अनुभव दिलेला आहे.** ज्याला अद्याप अनुभव आला नसेल त्याने सरळ हात वर करावा– न घाबरता!'' असेही वस्तुस्थिती सांगतांना ते आवाहन करीत असत. विशेष म्हणजे ते ऐकणाऱ्या शेकडो श्रोत्यांमधून एकही हात वर होत नसे; कारण प्रत्येकाला त्याच्या आवश्यकतेनुसार व पात्रतेनुसार अनुभव आलेला असेच. आलेल्या अनुभवांमुळे भक्तांची श्रीगुरुचरणांवरील श्रद्धा विशेष दृढ तर होत असेच पण श्रीगुरूंना अभिप्रेत असलेल्या भगवत्‌भक्तीच्या मार्गावरील त्याची वाटचालही अधिक उत्साहाने होत असे.

✻ **अनुभवांचे हे पसायदान** श्रीगुरू भक्तांना कशासाठी देत होते? तर भक्तांत **हितकारक परिवर्तन घडविण्यासाठी!** त्या अनुभवांमुळेच विकारी व्यक्ती हळूहळू विचार करू लागे. हितकारक विचार प्रबळ झाल्यावर तिच्या आचारात व उच्चारातही अनुकूल सुधारणा होत असे. व्यसनी व्यक्ती निर्व्यसनी, नास्तिक व्यक्ती आस्तिक व आस्तिक व्यक्ती साधक होतांना दिसत असे. हे क्रांतिकारक परिवर्तन आश्चर्यकारक असे (आणि विशेष असे की **देहत्याग केल्यानंतरही त्यांच्याकडून मिळणाऱ्या अनुभूतीचा लाभ अद्यापही अनन्यशरण भक्तांना होत असतो.**) अशा आश्चर्यकारक अनुभव घेतलेल्या काही मान्यवर व्यक्तींचे अनुभव या संग्रहात समाविष्ट केले आहेत. त्यावरूनही श्रीगुरूंच्या अलौकिक अधिकाराचे व शक्तीचे दर्शन वाचकांना घडेल.

✻ या अनुभवांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की अनुभव घेतलेली व्यक्ती, त्यांच्या दर्शनाच्या वा अन्य निमित्ताने प्रत्यक्ष संपर्कात आलेली असेच असेही नाही. अलिकडेच श्रीगुरूंच्या भक्तपरिवारात दाखल झालेल्या असंख्य भक्तांना त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा योग कधीच आला नव्हता. तरीही त्यांना **स्वप्नदर्शनाच्या वा अन्य माध्यमांद्वारे** या अलौकिक शक्तीचे अनुभव येत आहेत.

✻ श्रीगुरुदेवांना ६६ वर्षांचे आयुष्य लाभले. आयुष्याच्या शेवटच्या दशकात, त्यांच्या देहात तपस्येचे तेज मावेनासे झाले. ते ओसंडून बाहेर पडू लागल्याने त्यांचा

देह आतून-बाहेरून प्रकाशमान झाला होता. निळ्या रंगाचे प्रकाशकिरण त्यांच्या देहातून बाहेर पडत. त्यांचा सर्व देह या **नीलकांतीने** उजळून निघे. तसेच त्यांची **सर्व खोली या निळ्या रंगाने भरून जाई.** हा अनुभव गुरुदेवांचे अत्यंत अद्‌भुत आणि अलौकिक स्वरूप दर्शवणारा असे. अनेक गुरुभक्तांनी व अधिकारी शास्त्रज्ञांनी हा भारावून टाकणारा नीलकांतीचा अद्‌भुत अनुभव घेतला आहे. त्यांच्या देहाचे देहपण संपून त्याला देवपण आले आहे, अशी प्रत्यक्षदर्शी भक्तांची भावना होत असे. असा अद्‌भुत अनुभव अन्य कोणा सत्पुरुषाच्या जीवनात आलेला आढळत नाही.

❋ श्रीगुरुदेवांनी ८ सप्टेंबर १९९९ ला श्रावण कृष्ण चतुर्दशीस संध्याकाळी ७.३४ ला आपले अवतारकार्य संपवले व ते अनंतात विलीन झाले. त्यांची अंत्ययात्रा १० सप्टेंबरला माध्यान्हसमयी निघाली व तपोवनात अंत्यसंस्कारासाठी दोन-अडीच तासांनी पोहोचली. शेकडो शोकाकुल गुरुभक्त त्या यात्रेत सहभागी झाले होते. **माथ्यावर असलेल्या सूर्याच्या भोवती कंकणाकृती इंद्रधनुष्य** सर्वांनी पाहिले. इंद्रधनुष्य माथ्यावर सहसा दिसत नाही. ते सामान्यतः अर्धगोल आकारात क्षितिजावर दिसते व ते सूर्याभोवती नसते. भगवंताच्या लाडक्या भक्ताला निर्गुण निराकार परमेश्वराने वाहिलेली ती श्रद्धांजली होती, असा भाव गुरुभक्तांच्या अंतःकरणात निर्माण झाला. हा योगायोग होता का? नव्हता. कारण १२ तारखेला जेव्हा त्यांच्या अस्थी गोळा करण्याचे काम सुरू होते, तेव्हाही मागीलप्रमाणे माथ्यावर सूर्याच्या भोवती पुन्हा कंकणाकृती इंद्रधनुष्य दिसले. हे योगायोगाने घडणे अशक्य आहे. एका अलौकिक विभूतीचे समर्पित लौकिक जीवन संपले. त्या जीवनाला वाहिलेली ही दैवी श्रद्धांजलीच म्हटली पाहिजे.

❋ श्रीगुरुदेवांच्या मानवी देहरूपातील अस्तित्व दृष्टीआड झाले तरी **अदृश्य चैतन्यरूपातील त्यांचे अस्तित्व** त्यांच्या भक्तांना सतत जाणवत असते. मानवी देहरूपातील गुरुदेवांकडून भक्तांना ज्या स्वरूपाचे अनुभव येत असत, जवळपास त्याच स्वरूपाचे अनुभव या अदृश्य चैतन्यरूपातील सद्‌गुरुंच्या शक्तीकडून भक्तांना येत असतात. त्यात स्वप्नदर्शनापासून प्रत्यक्ष दर्शनापर्यंत, तसेच भक्तरक्षणापासून भक्तशिक्षणापर्यंत अनेक प्रकारचे अनुभव भक्तांना येत असतात. त्यामुळे श्रीगुरुदेवांच्या अव्यक्त-अदृश्य चैतन्यरूपातील अलौकिक विभूतिमत्त्वाच्या कृपाछत्राखाली असल्याचा त्यांना विश्वास वाटतो व ते कृतज्ञतेने श्रीगुरुचरणी नतमस्तक होतात.

❋ ❋ ❋



# ३.
# श्रीगुरुदेवांची शुचिर्भूतता व प्रज्ञाजागृती

**श्री. चंद्रशेखर कुलकर्णी**
निवृत्त अभियंता, (ऑईल कंपनी, बहारीन) पुणे

अंतर्बाह्य शुचिर्भूतता हा श्रीगुरुदेवांच्या विभूतिमत्वाचा एक विलक्षण पैलू आहे. देहात व देवस्थानात प्रकट झालेली ईश्वरी शक्ती टिकावी यासाठी आवश्यक ते पावित्र्य व मांगल्य जपण्यासाठी विशेष अशी शुचिर्भूतता राखणे आवश्यक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. त्यासाठी त्यांनी आपल्या आचार–व्यवहाराचे कडक नियम ठरविले व ते शेवटपर्यंत पाळले. पहाटे, दुपारी व सायंकाळी ते स्नान करीत. निवडक सेवेकऱ्यांशिवाय अन्य कोणालाही त्यांचा देहस्पर्श लाभत नसे. प्रकृतीस्वास्थ्य होते तोपर्यंत ते स्वतः दर्शनास येणाऱ्यांना प्रसाद देत असत. परंतु तो घेणाऱ्याच्या ओंजळीत वरून दिला जाई. पुरुषभक्तांना श्रीगुरूपौर्णिमेस त्यांचा चरणस्पर्श लाभत असे, परंतु त्यासाठी भक्तांना अंगातील शर्ट–बनियन काढावे लागत. स्त्रीभक्तांना तर लांबूनच दर्शन घ्यावे लागे. श्रीगुरुदेवांच्या अज्ञातवासातील तपश्चर्येच्या काळात तर स्त्रीभक्तांना हातातील बांगड्यांचा आवाज होणार नाही याचीही काळजी घ्यावी लागत असे. भक्तांना दर्शनासाठी येण्यापूर्वी हात–पाय–तोंड धुवून यावे लागे. पुरुषभक्तांना कंबरेचा चामड्याचा पट्टा बाहेर काढून ठेवावा लागे. जेव्हा एखाद्या भक्ताच्या घरी जाण्याचा श्रीगुरुदेवांचा कार्यक्रम असे त्यावेळी त्या भक्ताला श्रीगुरुदेवांच्या शुचिर्भूततेला बाधा येऊ नये, यासाठी खूपच काळजी घ्यावी लागे. तापवलेल्या दुधावरील साय दूर करण्यासाठी दुधावर फुंकर न मारता चमच्याचा

वापर त्यासाठी करावा लागे. श्रीगुरुदेवांचे बसण्याचे आसन घेऊन एक सेवेकरी तेथे येत असे व त्या आसनाला अन्य कोणी स्पर्श करू नये, असा नियम असे व तो भक्तांच्याही हिताचा असे. अनवधनाने किंवा अज्ञानाने तो नियम पाळला न गेल्यास मोठा अनवस्थाप्रसंग ओढवत असे. त्याबाबतीतील एक आठवण श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील **वे.मू. श्री. किशोरशास्त्री पाटणकर** ह्यांनी सांगितली.

श्रीगुरुदेव त्यांच्याकडे ३ दिवस वास्तव्यासाठी होते. त्याकाळात गुरुदर्शनासाठी येणाऱ्यांसाठी त्यांच्या दिवाणखान्यात सोय करण्यात आली होती. सेवेकऱ्याने श्रीगुरुदेवांचे आसन दिवाणखान्यात ठेवले व तो गुरुदेवांना आणण्यासाठी बाहेर गेला. श्री. पाटणकर गुरूजींचे काका त्यावेळी त्या दिवाणखान्यात होते. त्यांना वाटले की प. पू. महाराजांचे हे आसन एका बाजूला ठेवले गेलेले आहे ते आपण उचलून दिवाणखान्याच्या मध्यभागी ठेवू; म्हणजे सर्वांना प. पू. महाराजांचे मुखदर्शन चांगल्याप्रकारे होऊ शकेल. पण सेवेकरी बाहेर जातांना सांगून गेला होता की, ''मी येईपर्यंत ह्या आसनाला कोणी हात लावू नका. मी परत येऊन आसन उचलून ठेवीन व मग प. पू. महाराज त्यावर बसतील.'' पण वे.मू. पाटणकरशास्त्रींचे काका म्हणाले, ''ते आसन असे मध्येच येत आहे, तर आपण ते आधीच उचलून ठेवू या मधोमध.'' आणि काका ते आसन उचलायला गेले तर त्यांना प्रचंड शॉक बसला. हा प्रकार वे.मू. पाटणकर शास्त्रींनी स्वतः पाहिला. त्या आसनात श्रीगुरुदेवांची शक्ती उतरली होती.

धर्माविषयी आस्था असणारी, उपासना करणारी, धार्मिक विधी करणारी, धार्मिक ग्रंथांचे पारायण करणारी, धर्मोपदेश करणारी प्रत्येक व्यक्ती शुद्ध आचारसंपन्न असलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. ते स्वतः तर शुद्ध, आचारसंपन्न होतेच पण त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने आचारविचारांच्या, आहारविहाराच्या बाबतीत जास्तीत जास्त शुद्ध-पवित्र राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांना वाटे व आपल्या भक्तांना ते तसा उपदेशही करीत. भक्तांनी दररोज सूर्योदयापूर्वी एकदा व सायंकाळी एकदा स्नान करावे. धार्मिक विधी-पूजाविधीच्या वेळी धूतवस्त्र नेसावे, सात्विक मिताहार करावा, निर्व्यसनी असावे, चित्तशुद्धीसाठी सतत नामस्मरण करावे, अशा त्यांच्या भक्तांकडून अपेक्षा असत. कधी सौम्य भाषेत ते भक्तांना समजावून सांगत, कधी स्वतःचा आदर्श भक्तांपुढे ठेवून त्यांना प्रेरित करीत असत. पण अनेकदा सुचवूनही भक्ताच्या आचरणात विशेष फरक पडत नाही असे दिसल्यास त्याला योग्य ते शासनही ते करीत.

यासंबंधीचा स्वतःचा अनुभव सांगतांना पुण्यातील गुरुभक्त **श्री. अरविंद निरगुडकर** (निवृत्त एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर) म्हणाले–

''एके दिवशी सकाळी मी देवपूजा करण्यासाठी सोवळे नेसून तयार झालो. मी देवघराच्या कट्ट्यावर पाय ठेवणार इतक्यात कोणीतरी मला ढकलून दिल्याप्रमाणे मी तेथून फेकला गेलो व सुमारे तीन फूट उंचीवरून जमिनीवर उताणा पडलो. माझी पाठ, मणका वगैरे सडकून निघाला. माझ्या कुटुंबीयांनी व शेजाऱ्यांनी मला तेथून जवळच असलेल्या डॉ. मराठे ह्यांच्याकडे नेले. तेथे माझा एक्सरे काढून डॉक्टरांनी उपचार केले. कमरेचा पट्टा बांधावयास सांगितले. माकडहाडावर पडल्याने मला प्रचंड वेदना होत होत्या. त्यानंतर जवळजवळ दोन ते तीन आठवडे मी बिछान्यावर पडून होतो. मी पडलो त्यावेळी फरशीवर पाणी असणे, खुर्चीचा पाय निसटणे, विजेचे खराब झालेले उपकरण जवळ असणे असा काही प्रकार नव्हता. त्यानंतर बरेच दिवस, आपण का पडलो व आपल्याला कोणी ढकलले याचा विचार करीत असता, माझ्या असे लक्षात आले की मी पडलो त्याच्या आदल्या दिवशी घरी वडिलांचे श्राद्ध होते व त्या श्राद्धाच्या वेळी जे सोवळे मी नेसलो होतो– तेच सोवळे न धुता मी पूजेसाठी नेसलो होतो. घरी सद्गुरुंचे अधिष्ठान असल्याने त्यांना अपेक्षित शुचिर्भूतता पाळणे आवश्यक होते व ती मी पाळली नसल्याने मी फेकला गेलो.''

## श्रीगुरुदेवांची प्रज्ञाजागृती

'मुख्य सद्गुरूचे लक्षण, आधी पाहिजे विमल ज्ञान' हे समर्थ श्रीरामदास स्वामींनी सांगितलेले लक्षण श्रीगुरुदेवांच्या ठायी असल्याचे, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना सतत जाणवत असे. बालपणीच परमगुरू श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या कृपादृष्टीमुळे त्यांच्यातील ज्ञानज्योत प्रज्ज्वलित व प्रकाशमान झाली व ती शेवटपर्यंत सतत प्रकाशमानच होत राहिली. ''बालपणीच सर्वज्ञता तया वरी'' असा श्रेष्ठ सत्पुरुषांच्या बाबतीत येणारा, ज्ञानेश्वर माऊलीने सांगितलेला अनुभव त्यांच्याही बाबतीत अनुभवास येत गेला. ब्रह्मांडातील अंतरिक्षापासून मानवाच्या अंतर्मनापर्यंत आणि चराचर सृष्टीपासून विदेही स्थितीतील अनुभवांपर्यंतच्या कोणत्याही विषयाशी संबंधित प्रश्नाला त्यांच्याकडून जिज्ञासूंना समर्पक व समाधानकारक उत्तर तात्काळ मिळत असे. त्यासाठी त्यांना कोणत्याही संदर्भग्रंथाच्या वाचनाचीही कधी गरज पडत नसे. ''तुमचा प्रश्न पूर्ण होण्याच्या आत माझे उत्तर तयार असते. तुम्ही काय विचारणार हेही मला ठाऊक असते.'' असे ते म्हणत. हे कशामुळे शक्य होत

असे? असा प्रश्न जर कोणी विचारला तर ''गुरुदेवांच्या प्रज्ञाजागृतीमुळे असे विलक्षण सामर्थ्य त्यांना लाभले आहे,'' असेच उत्तर द्यावे लागत असे. पू. गुरुदेव अनेकदा रात्रभर जागे असत. उठून बसत. प्रज्ञाजागृतीमुळे त्यांना झोप येत नसे. उत्तमोत्तम विचार बाहेर पडू पाहत. विचारांचे कल्लोळ उचंबळून येत. विचारांचा वेग इतका असायचा की त्यांची नोंद करणे अशक्य असे. सागराला भरती आली की लाटांची जशी स्थिती असते तशी स्थिती या विचारप्रवाहामुळे त्यांची होत असे. यामध्ये कोणी अडथळा आणला तर रागवारागवी होई. ते म्हणत, ''मला या देहातून साऱ्या सृष्टीचा अनुभव मिळतो; व त्यामुळेच मी सृष्टीरचनेची उकल करून सांगू शकतो.'' रात्री ऐकणारा कोणी नसे. त्यामुळे माशासारखी तळमळ होत असे. या लहरी सुरू झाल्या की मनाचा व देहाचा पूर्ण विसर पडे. हा आवेग साधारण तीन तास असे. ते भक्तांना म्हणत, ''या प्रज्ञाजागृतीतून रत्ने बाहेर पडू लागतात. तुम्ही ती खणून काढत जा. जसे ताकाच्या मंथनातून लोण्याचा गोळा बाहेर पडतो तसाच हा प्रकार आहे. विश्रांती न झाल्याने माझा देह थकतो; पण मनाला आनंद मिळतो.''

औपचारिक शालेय शिक्षणाच्या वाटेने व वाटेला फारसे न जाताही, त्यांच्या देहाच्या ठायी जे शुद्ध ज्ञान आश्रयाला आले होते, त्याच्यापुढे नामवंत विद्यापीठांचे कुलगुरू, संशोधक, शास्त्रज्ञ, व्यासंगी प्राध्यापक, जिज्ञासू साधक अशा सगळ्यांना नतमस्तक व्हावेसे वाटत होते. स्थलमर्यादा असल्याने अशा लाभधारकांपैकी फक्त एकाच्या अनुभवाचा उल्लेख केला आहे.

अहमदनगरचे व्यासंगी, संशोधक प्राध्यापक डॉ. श्री. बोपर्डीकर ''अगस्ती ऋषींविषयी संशोधन–लेखन करीत होते. त्यासाठी त्यांनी अनेक संदर्भग्रंथ वाचले. त्यात त्यांना 'कुंभोद्‌भव' असा अगस्तीऋषींसंबंधीचा उल्लेख आढळला. त्या ऋषींचा जन्म मडक्यातून झाला, अशी जनसामान्यात समजूत प्रचलित असल्याचेही त्यांना आढळले. पण ह्याबाबत पटण्यासारखे स्पष्टीकरण त्यांना मिळत नव्हते. शेवटी याबाबतीत श्रीगुरुदेवांना प्रश्न विचारला असता ते तात्काळ म्हणाले, ''**कुंभोद्‌भव' म्हणजे कुंभ राशीत सूर्य जेव्हा प्रवेश करतो, त्यावेळी ज्यांचा जन्म झाला तो. मडक्यातून जन्म झालेला नव्हे.**'' पटण्यासारखे हे स्पष्टीकरण सर्वांनाच वेगळे समाधान देऊन गेले आणि श्रीगुरुदेवांच्या प्रज्ञाजागृतीची प्रचीतीही!

* * *



# ४.
# देहत्यागानंतरही श्रीगुरुदेवांचे अस्तित्वदर्शन

**श्री. प्रकाश पिले,** बी.कॉम्.

विश्वस्त–कोषाध्यक्ष, सद्‌गुरू श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज सेवा प्रतिष्ठान, पुणे

श्रीगुरुदेवांनी, देहत्याग केल्यानंतर (१९९९ नंतर) अनेक भक्तांना, अदृष्य चैतन्यरूपातील त्यांच्या अस्तित्वाची, त्या त्या स्थळातील उपस्थितीची आणि विश्वव्यापकतेची जाणीव, विलक्षण आश्चर्यकारक अनुभव देऊन, त्यांना करून दिली आहे. त्यातील काही अनुभव–

१) औरंगाबाद येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ **डॉ. सौ. शैलजा वांगीकर** ह्यांनी ५ जून ते ३० जून २००२ या काळात कैलास–मानससरोवर यात्रा केली. त्या काळात त्यांना विशिष्ट रूपातील एका सत्पुरुषाचे अनेकदा दर्शन घडले व ते सत्पुरूष कैलास परिक्रमेत त्यांच्यासोबत होते. त्याच रूपात १९९७ पूर्वीच्या श्रीगुरुपौर्णिमेस अहमदनगरला त्यांना त्या सत्पुरुषाचे दर्शन घडले होते (श्रीगुरूंनी १९९७ मध्येच, पुढे ह्याच रूपात मी दर्शन देईन; ह्याची जाणीव डॉ. सौ. वांगीकरांना करून दिली होती.) दि. ३० ऑगस्ट २००८ रोजी त्यांचा धाकटा मुलगा चैतन्य ह्यास सद्‌गुरूंनी स्वप्नदर्शन देऊन सांगितले की, 'कैलास मानससरोवर यात्रेत मीच आईबरोबर चालत होतो.'

२) **डॉ. सौ. सुनीती देशपांडे** (कन्सल्टिंग फिजिशिअन–कार्डिऑलॉजिस्ट, संचालक, साईधन हॉस्पिटल, मुलुंड, मुंबई) ह्यांचे परिचित श्री. मुलाणे २००४ साली कैलास मानससरोवर यात्रेस जाणार होते. डॉ. सौ. देशपांडे ह्यांनी त्यांना

सांगितले की ‘माझे गुरू मानससरोवर परिसरात आहेत.’ श्रीगुरूंचा फोटोही त्यांना दाखवला. ‘‘त्यांना ही खडीसाखर अर्पण करा.’’ श्री. मुलाणे यात्रा करून परत आले तेव्हा त्यांनी सांगितले की त्यांना ‘मानससरोवर मुक्कामी सद्‌गुरूंचे दर्शन झाले. प्रथम बालरूपात, नंतर तरूण रूपात, नंतर दाखवलेल्या फोटोत जसे दिसत होते त्याप्रमाणे.’ त्यानंतर सद्‌गुरूंनी तेथे निर्देश केल्याप्रमाणे, तेथून एक प्रसादचिन्ह ते डॉ. देशपांडे ह्यांच्यासाठी घेऊन आले. देशपांडे कुटुंबासाठी श्रीगुरूंनी देहत्यागानंतर पाठवलेले ते प्रसादचिन्ह, हा भक्तांसाठी निरंतर मौल्यवान ठेवा ठरला आहे. त्यांच्या देवघरात ठेवलेल्या त्या प्रसादचिन्हाचे अनेक गुरुभक्तांनी दर्शन घेतले आहे.

## देहत्यागानंतरचे अस्तित्वदर्शन

**संतोष वि. म्हैसाळकर**, मुंबई

प. पू. गुरुदेवांच्या महानिर्वाणानंतर गुरुदेव सर्वव्यापी झाल्याची प्रचीती इतर भक्तांप्रमाणे मलादेखील आली. अनेक भक्तांना त्यांचे स्वप्नदर्शन झाले. काही भक्तांच्या घरी गुरुदेवांच्या फोटोला घातलेले हार आकाराने वाढले. असाच एक विलक्षण अनुभव मला आला. आम्ही दर गुरुवारी गुरुदेवांची आरती करण्यापूर्वी त्यांच्या फोटोला (शक्यतो चाफा, मोगरा अशा) सुवासिक फुलांचा हार घालतो. प. पू. गुरुदेवांच्या महानिर्वाणानंतर दर गुरुवारी घातलेला हार आकाराने वाढत असे व फोटोला कधी नीलकांती दिसत असे. बरेचवेळा असे घडल्यानंतर मी मनातच एका गुरुवारी हार घालतांना प. पू. गुरुदेवांना विनंती केली– ‘‘गुरुदेव आपले अस्तित्व आमच्या घरी आहे याची आम्हाला जाणीव आहे. आम्ही सर्व कुटुंबीय आपल्या चरणांशी स्थिर आहोत. तेव्हा दर गुरुवारी हार वाढवून आपण प्रचीती दिली नाही तरी चालेल.’’ त्यानंतर हार वाढल्याचे थांबले. परंतु हार वाढलेला बघण्याची उत्सुकता असल्यामुळे व सवय झाल्यामुळे माझ्या पत्नीच्या मनात आले व ती मला म्हणाली, ‘‘तुम्ही उगाचच गुरुदेवांना विनंती केली, त्यामुळे गुरुदेव प्रचीती द्यायचे, ते थांबले.’’ माझ्या मनात आले की आपण चूक तर केली नाही ना? पण माझ्या मनाने कौल दिला की आपण योग्य तेच केले. गुरुदेवांना प्रचीती देण्यासाठी त्रास देणे योग्य नाही.

या गोष्टीला २–३ महिने झाले असतील. एका गुरुवारी मी गुरुदेवांचा फोटो वस्त्राने पुसत होतो. आमच्या घरी गुरुदेवांचा हसतमुख चेहरा असलेला (पुणे जिल्ह्यातील आंदगावला काढलेला पद्मासनात बसलेला व समोर त्यांच्या खडावा असलेला) मोठा फोटो आहे. माझे जेव्हा त्यातील खडावांकडे लक्ष गेले तेव्हा मी

आश्चर्यचकित झालो. प. पू. गुरुदेवांच्या खडावांचे प्रसादपाऊलांमध्ये रूपांतर झालेले दिसले. अंगठा, पायाची बोटे, तळपायाचा फुगीर भाग सर्व दिसून आले व ते मी पत्नीला दाखविले. प. पू. गुरुदेवांनी आपली कायमस्वरुपी प्रचीती देऊन आपल्या अस्तित्वाची पुन्हा जाणीव करून दिली. त्याची फेड अनेक जन्म सेवा करूनही पूर्ण होणार नाही, याची मला जाणीव आहे.

## अस्तित्व अनुभव

**सौ. सिमरन आशिष पेंडसे**

बी. कॉम्., डी.बी.एम्., एम्.एम्.एस्. पुणे

साधारण २००१ साल असेल. दिवाळीचे दिवस होते. भाऊबीजेला संध्याकाळी ५ वाजता आम्हाला सगळ्यांना बाहेर जायचे असल्याने घराला कुलूप लावून बाहेर पडलो व रात्री ९ च्या सुमारास घरी आलो. मी दाराचे कुलूप काढून घरात पाऊल टाकताक्षणी मला उदबत्तीचा प्रचंड घमघमाट सुटल्याचे जाणवले; जशा काही कोणी एकाचवेळी १००–१५० उदबत्त्या लावल्या आहेत. लाईट लावून मी घरभर फिरले. देवघरापाशी जाऊन पाहिले; पण एकही उदबत्ती लावलेली नव्हती. कारण मी संध्याकाळी ५ वाजताच बाहेर पडले होते. मग हा वास कोठून येत होता? मला प्रश्न पडला. थोड्या वेळाने सुगंधी वास येण्याचे थांबले. आम्ही जेवण करून झोपून गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी माझे यजमान पूजेला बसले असताना त्यांनी मला हाक मारली व विचारले– ''मला जे दिसत आहे, जाणवत आहे तेच तुला दिसत आहे का?'' मी पाहिले तर त्यांच्या हातात आमच्या देवघरातील गुरुदेवांचा फोटो होता. पूजेसाठी त्यांनी तो हातात घेतला होता. फोटोमधल्या सद्‌गुरूंच्या आशीर्वादाच्या उजव्या हातावर ते अत्तर लावत होते; तेव्हा त्यांच्या दृष्टीस त्या हातावर ॐ उमटलेला दिसला व खात्री करून घेण्यासाठी त्यांनी मला हाक मारली होती. ते पाहून आम्हाला अतिशय आनंद झाला व आदल्या दिवशी येणाऱ्या सुगंधी सुवासाचे कोडेही उलगडले. ती देवाच्या अस्तित्वाची खूण होती, जी आम्हाला हातावरील ॐ बघून पटली. माझ्या मनाची खात्री पटली. माझ्या घरात सदगुरूंचे अधिष्ठान आहे, सद्‌गुरूंचा वास आहे. आजही सद्‌गुरूंच्या त्या आशीर्वादाच्या हातावर तो ॐ आम्हाला दिसतो. हा सर्व माझ्या गुरूंचा महिमा आहे. तो वर्णन करायला मला खरोखरच शब्द सुचत नाहीत.

# कर्ते-करविते सद्‌गुरूच!

**श्री. सुभाष अवसरे**
बी.टेक् (आर्किटेक्ट, मुंबई)

पहाटे ६.४० वाजता वर्तीकाका आरे कॉलनीच्या प्रवेशद्वारात भेटले व प्रवास सुरू झाला. सद्‌गुरूंनी देह सोडल्यानंतरचा काळ. विषय सर्व गुरुभक्तांच्या जिव्हाळ्याचा– ''सद्‌गुरू खरंच गेले का?'' गुरुदेव नेहमी सांगत– ''गुरू ही व्यक्ती नाही, शक्ती आहे. ही शक्ती काहीही करू शकते. शंका नाही आली तर!'' गुरुदेवांनी भक्तांना अनेकदा अविस्मरणीय अनुभवही दिले आहेत. ''आम्ही स्मर्तृगामी आहोत.'' या त्यांच्या वाक्याचा अर्थ– 'आपण आमचं मनःपूर्वक स्मरण करा. आम्ही तात्काळ हजर होतो. असा त्याचा अर्थ!' फक्त या गुरुवाक्यावर निःसंशय श्रद्धा हवी. सद्‌गुरू कोठेही गेलेले नाहीत, यावर नितांत श्रद्धा असली तर खरोखर **सद्‌गुरू आपल्या अस्तित्वाचा प्रत्यय देतात.** हीच गोष्ट वर्तीकाका व मी एकमेकांना निरनिराळ्या शब्दात व निरनिराळी उदाहरणे देऊ पटवून देत होतो.

एक्सप्रेसवेचे काम लोणावळा सोडल्यास पूर्ण झाले होते. लोणावळ्याला ट्रॅफिक जाम असतांनाही आमची गाडी कुठेही न थांबता जात होती. सद्‌गुरूंचा विषय चालू होता. गाडी सहज चालली होती. आम्ही एक्स्प्रेसवे सोडून पौड रोडला वळलो व घरून बांधून आणलेला नाश्ता खाण्यासाठी थांबलो. तेव्हा फक्त ८.१५ वाजले होते. आम्हाला पावणे दोन तासात गोरेगावहून पुण्याला सद्‌गुरू घेऊन आले होते. **त्यांनी आपल्या अस्तित्वाचा पुन्हा प्रत्यय दिला होता.** अर्थात कामही त्यांनीच सांगितले होते. तपोवनात गुरुदेवांच्या समाधीस्थानाचे बांधकाम सुरू व्हायचे होते व त्याबाबतीत गुरुदेवांना काय अभिप्रेत होते ते ट्रस्टींच्या कानावर घालण्याचे काम गुरुदेवांनी सांगितले होते.

त्याचे काय झाले. दहा–बारा दिवसांआधी मी तपोवनात गेलो असतांना तेव्हाचे एक ट्रस्टी श्री. राजाभाऊ भागवत समाधीस्थानात काही सेवा करीत होते. मी आर्किटेक्ट आहे ही गोष्ट फारशा लोकांना माहीत नसल्याने व मंदिराच्या आर्किटेक्चरचा मला फारसा अनुभव नसल्याने राजाभाऊंच्या प्रश्नाने मी प्रथम गांगरलोच. ''अहो तुम्ही आर्किटेक्ट ना? मग सांगा या समाधीमंदिराला काळा पत्थर वापरावा की गुलाबी?'' मी काहीच उत्तर देऊ शकलो नाही. राजाभाऊ आणखी काय बोलताहेत

ते ऐकण्यासाठी थोडा पुढे झालो **तर गुरुदेवांचे शब्द स्पष्ट ऐकू आले–** ''त्यांना विचार हे जे बनवले आहे त्याचा आराखडा कोणी काढला होता?'' मी फक्त निरोप्या होऊन तो प्रश्न राजाभाऊंना विचारला. तेव्हा राजाभाऊ म्हणाले, ''अहो आम्ही खणत गेलो व हा आकार तयार झाला. पूर्ण वर्तुळाकार दोन फूट खोल! दोरी किंवा टेप लावून काहीच आखणी केली नव्हती. गाईच्या शेणाने जमीन सारवली होती. परंतु येथे ही जागा अशी आहे की जिच्यावर शेणाने सारवता येत नाही. हा दोन फूट लांब व नऊ इंच रुंद पावलाचा आकार आहे. आता पादुका ठेवल्या आहेत त्याच्या मागे उजवीकडे.'' गुरुदेव सांगत होते. राजाभाऊही तेच सांगत होते. गुरुदेवांचे बोलणे नीट लक्ष देऊन ऐकत मी हळूहळू परत निघालो होतो.

''हे आमचं आत्मलिंग आहे म्हणून ते निर्लेप आहे. येथे आम्ही आमचा देह अग्नितत्त्वात विलीन केला. त्यावर गाईच्या शेणानेच सारवा. त्यावर संगमरवर लावून त्याचं थडगं बनवू नका.'' गुरुदेव सांगत होते व मी ते ऐकून सर्द झालो होतो. ''आमच्यासारखे सत्पुरुष आपला देह पंचमहाभूतांपैकी एका तत्त्वात विलीन करतात. आदी शंकराचार्य व तुकाराम महाराज यांनी आपला देह आकाशतत्वात विलीन केला, मुक्ताईने तेजतत्त्वात तर श्रीपाद श्रीवल्लभ व टेंबे स्वामी यांनी जलतत्त्वात काया विलीन केली. आम्ही अग्नितत्त्वात विलीन केली. ज्यावेळी आमच्या देहाची मिरवणूक काढून, **आमच्या देहावर अग्निसंस्कार केले जात होते तेव्हा आम्ही पूर्ण जिवंत होतो.''** माझ्या छातीत धस्स झालं. तरीच संपूर्ण मिरवणूकभर सतत वाटत होते की गुरुदेव चटकन उठून बसतील. देहत्यागानंतरच्या दिवशी चेहऱ्यावर स्मित हास्य व तेज कायम होते. ''आम्ही हे केले नसते तर भक्तांनी व पोलिसांनी आम्हाला चितेवर चढून अग्निसमाधी घेऊ दिली असती का? ही आमची अग्निसमाधी आहे. ती अशीच गाईच्या शेणाने सारवून ठेवायला हवी. आत काही फरक न करता बाहेरून बांधकाम करावे. वरचे छप्पर पारदर्शक हवे. त्यात लाल पिवळे दिवे लावले की दुरून अग्नि पेटल्याचा भास होईल. त्या ट्रस्टींना लिहून कळव, हे एवढेच तुझे काम.''

मी हे सर्व लिहून ठेवलं; पण तेवढ्याने गप्प बसण्याची गुरुदेवांची पद्धत नाही. त्यानंतर काही दिवसांनी त्यावेळचे केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश यांचे इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअयर्सतर्फे मुंबईत हाजी अलीला भाषण होते. त्यावेळी वहीत टिपणे काढतांना माझ्या नकळत बाजूच्या पानावर एक चित्र रेखाटण्यात नव्हे तर रेघोटण्यात आले. नंतर नीट पाहिल्यावर ते अग्निसमाधीचे चित्र होते, असे लक्षात आले. प्रथम

आम्ही श्री. रावसरांकडे गेलो. त्या काळात ट्रस्टींमध्ये सतत होणाऱ्या बदलांमुळे कोणाला गुरुदेवांचा निरोप द्यावा हा प्रश्न होता. श्री. रावसरांनी तोडगा सुचविला की, श्री. राजाभाऊंना गुरुदेवांनी यात योजिले आहे. तेव्हा त्यांच्याकडे ते पत्र द्यावे. राजाभाऊ घरी नव्हते. शेवटी संध्याकाळी परत जाऊन त्यांचेकडे ते पत्र सुपूर्त केले. त्या दिवशी गाडीही गुरुदेवांनी चालविली. स्पष्ट शब्दात सूचना दिल्या. मग आपण का म्हणत राहतो, ''हे मी केले ते मी केले'', कर्ते–करविते सद्‌गुरू असतांना?

## देहत्यागानंतरही इच्छा पूर्ण केल्या

**(कै.) डॉ. विकास मांडके**

(निवृत्त) डेप्युटी डायरेक्टर, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च, मुंबई

श्रीगुरुदेवांनी माझ्या घरी यावे असे मला सारखे वाटत आले आहे. एकदा मी श्रीगुरुदेवांना विचारले, ''श्रीगुरुदेव, मुंबईच्या आपल्या पुढील वास्तव्यात आपण माझ्या घरी येणार का?'' त्यावर ते म्हणाले, ''मांडके, मला प्रकृती साथ देत नाही, त्यामुळे मी कोणाकडेच जाणार नाही.'' मला वाईट वाटले. पण मी ते स्वीकारले. त्यानंतर ते मुंबईला कधीही आले नाहीत. आले ते नोव्हेंबर १९९८ ला लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यासाठीच! दिवसांमागून दिवस गेले आणि ८ सप्टेंबर १९९९ रोजी सद्‌गुरू ब्रह्मरूपी विलीन झाले. त्यानंतर श्री. विश्वासराव बापट, या जुन्या गुरुभक्ताशी माझा परिचय झाला.

ते म्हणाले, ''मांडके, श्रीगुरुदेवांनी मला पादुका दिल्या आहेत, त्या मी तुझ्या घरी आणतो.'' मग आम्ही एक दिवस ठरविला व त्याप्रमाणे ते पादुका घेऊन माझ्या घरी आले. मी ६०–७० लोकांना दर्शनासाठी बोलावले होते. विश्वासरावांनी पादुकांची पूजा केली व अत्तर लावले. दुपारी साडेबारा वाजेपर्यंत ६०–७० लोकांनी पादुकांचे दर्शन घेतले. आम्ही वीसएक लोक मागे राहिलो होतो. त्यावेळी विश्वासराव म्हणाले, ''मला तुम्हा लोकांची भक्ती बघून फार बरे वाटले. मला तुमच्याशी हितगुज करण्याची इच्छा आहे.''

विश्वासराव म्हणाले, ''**श्रीगुरुदेव ही एक प्रचंड शक्ती आहे.** तिचं मोजमाप शक्य नाही.'' असे श्रीगुरुदेवांच्या शक्तीवरच ते बोलत होते. एवढ्यात एक प्रचंड मोठा आवाज झाला. कुठला आवाज झाला याची शोधाशोध सुरू झाली. तेव्हा असे दिसले की श्रीगुरुदेवांना अर्पण केलेल्या एका नारळाला आपोआप तड गेलेली आहे. असे बसल्याजागी नारळ आपोआप फुटलेला पूर्वी कधीही पाहिले नव्हते. एक नारळ

फुटला असे ध्यानात आल्यावर, नंतर विश्वासराव पुढे बोलू लागले. पाच मिनिटांनी दुसरा नारळ तसाच फुटला. आता वेळ न दवडता विश्वासराव पुढे बोलू लागले. आणखी पाच मिनिटांनी तिसरा नारळ आपोआपच फुटला. अशा रीतीने पादुकारूपी श्रीगुरुदेव माझ्या घरी आले. स्वतःच्या शक्तीचे रूप दाखवून ते जणू मला सांगत होते, ''मी स्मरण ठेवून तुझ्या घरी आलो बरं का?''

## देहत्यागानंतरही उपासना दिली

**सौ. स्नेहल चंद्रात्रे,** एम्.एस्सी. नाशिक

आम्ही सर्वजण सद्‌गुरूंच्या सेवेत आहोत. सतत आध्यात्मिक वाचन चालू असते. नामस्मरण, उपासनाही चालू आहे. दोनच महिन्यांपूर्वी सद्‌गुरूंनी मला (देह ठेवल्यानंतर) स्वप्नात उपासना दिली. अनेक दिवसांपासून मनात द्वंद्व असायचे– आपण करतो ती उपासना योग्य आहे की नाही. सद्‌गुरू सदेह रूपात असते तर आपण त्यांना विचारले असते; पण आता काय करायचे? कुणाला विचारायचे? तेव्हा अचानक एके दिवशी स्वप्नदर्शनातून उपासना मिळाली–

सद्‌गुरू आमच्या घरी यायचे होते. सर्व तयारी झालेली होती. सडा, रांगोळ्या, फुले, सनईचा आवाज सर्व तयारी होती. सद्‌गुरू घरात आले; त्यांना बसायला आसन दिले व औक्षणासाठी मी पुढे गेले. कुंकवाने भरलेले बोट त्यांच्या भालप्रदेशावर लावणार तोच मनात विचार आला– सद्‌गुरूंना आपला स्पर्श कसा चालेल? पुन्हा हात मागे घेतला. तेव्हा सद्‌गुरूंनी स्वतःच्या मुखाने मला 'औक्षण कर, कुंकू लाव' अशी आज्ञा केली व माझ्याकडून औक्षण करवून घेतले. माझ्या मनात नेहमी यायचे की, आपण पुरुष असतो तर गुरुपौर्णिमेला आपल्यालाही चरणस्पर्श मिळाला असता. माझी ही खंत सद्‌गुरूंनी माझ्याकडून औक्षण करून पूर्ण करून घेतली. बघा, सद्‌गुरू किती बारीक बारीक इच्छा पूर्ण करतात. आपण फक्त श्रीगुरूचरणी श्रद्धा ठेवावी म्हणजे सर्व काही होते.

## देहत्यागानंतरही पित्याचे प्रेम दिले!

**श्री. अंबर अशोक कुलकर्णी**

बी.कॉम., एम्.बी.ए. नाशिक

मी मूळचा नाशिकचा! मला श्रीगुरुदेवांच्या चरणी येण्याचा योग अगदी जन्मापासूनच लाभला; त्यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो.

माझे वडील श्री. अशोक पुरुषोत्तम कुलकर्णी, ३ नोव्हेंबर २००५ रोजी कैलासवासी झाले. त्यावेळी माझे वय फक्त २० वर्षे होते. शिक्षण चालू होते. मला भाऊ व बहीण कोणीही नाही. अचानक आलेल्या या घरच्या जबाबदारीमुळे गोंधळल्यासारखे झाले.

काही महिन्यांनंतर आम्ही श्रीगुरुदेवांच्या आशीर्वादाने घरी सत्संग घेण्याचे योजिले. श्रीगुरूंनी सत्संग अगदी व्यवस्थित करवून घेतला. त्या रात्री मी झोपलो व त्याच पहाटे मला श्रीगुरूंनी दृष्टांत दिला. थोडाथोडका नाही तर जवळपास ४०-४५ मिनिटे! तो असा-

श्रीदत्तदेवस्थानात श्रीमहालक्ष्मी सभामंडपावरील मजल्यावर (जेथे गुरुदेव भक्तांना मार्गदर्शन करत होते.) मी दर्शनास गेलो होतो. भक्तांची बरीच गर्दी होती. श्रीगुरूंचे लक्ष सर्व भक्तांप्रमाणे माझ्यावरही होते. त्यांचे दर्शन घेण्याची वेळ संपली व सर्व भक्त खाली उतरावयाला लागले. मीही जागेवरून उठलो. पण श्रीगुरूंनी मला थांबायला सांगितले; तेव्हा तेथे फक्त मी व श्रीगुरुदेवच होतो. (सेवेकरीदेखील नव्हते.)

मला सद्गुरूंनी सर्वप्रथम खूप धीर दिला. मला समजेल अशी उदाहरणे देऊन माझ्यावर कोणती जबाबदारी आली आहे व अशावेळी कसे वागावे हे शिकवले.

''लोक, तू कसलाही वागलास तरी काहीना काही बोलणारच; पण तू जर प्रामाणिकपणे व नीतीला धरून चाललास तर तुला कोणाचीच काळजी करण्याचे कारण नाही,'' असे मार्गदर्शन केले.

हे सर्व सांगत असतांनाच, आश्चर्य म्हणजे श्रीगुरूंनी मला त्यांच्या अगदी शेजारी जवळ बसविले. एक कागद व पेन हातात घेतला व काहीतरी लिहायला लागले. (ते गणित स्वरूपात होते.) मला कळाले की माझ्या वडिलांच्या कंपनीमधला त्यांचा शेवटचा हिशोब ते तपासत आहेत. त्यावेळेस ते उद्गारले- ''हे कॅल्क्युलेशन थोडेसे चुकतच आहे.' याचा अर्थ त्यावेळी मला कळाला नाही. त्यानंतर श्रीगुरूंची विश्रांतीची वेळ झाली व मी खाली उतरलो. स्वप्न येथेच संपले व मला जाग आली.

पुढे जवळपास १० ते १५ दिवसात मला (MICO) कंपनीमधून फोन आला व असे कळविले गेले की, एका लोनची रक्कम त्यांच्याकडून हिशोबात घेण्याचे राहून गेले होते. ती चूक कुणाच्याही लक्षात येण्याअगोदर श्रीगुरूंच्या लक्षात आली होती. एवढेच नाही तर लोनची रक्कम परत करण्याची व्यवस्थाही श्रीगुरूंनी त्या १०-१५ दिवसात केलेली होती.

पुढे दोन वर्षांत माझे बी.कॉम् पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले व एम.बी.ए.

करण्याचे माझ्या मनात होते. मला लगेचच एम्.बी.ए. च्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश तर मिळालाच, शिवाय फ्री सीटही श्रीगुरुदेवांच्या कृपेने मिळाली. पहिल्या वर्षी मला एकही पैसा देणगीसाठी द्यावा लागला नाही. दोन वर्षानंतर एम्.बी.ए. (फायनान्स) हे शिक्षण पूर्ण होता होता मंदीचा काळ पुढे सरसावला. पाहिजे तशी नोकरी मिळणे अशक्य होते. पण श्रीगुरूंच्या आशीर्वादाने मला एका बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये चांगली नोकरीही मिळाली.

या आनंदात भर म्हणजे दि. ४ ऑगस्ट २००९ रोजी पुन्हा पहाटे पावणेपाच ते पाचच्या दरम्यान श्रीगुरुदेवांनी स्वप्नदृष्टांत देऊन 'चरणस्पर्शाचा' लाभ दिला. एवढेच नाही तर त्यांच्या चरणाजवळ बसवून प्रेमाने माझ्या खांद्यावर हात ठेवून (गळ्यात हात टाकून) माझी विचारपूस केली. हा लाभ कमी होता की काय म्हणून त्यांच्या आसनावरून उठून सेवेकऱ्यांना सांगून माझ्यासाठी पुरणपोळीच्या प्रसादाचे ताट मागविले व तेथेच त्यांच्यासमोर प्रसाद घेण्यास सांगितले. माझ्याबरोबर ज्या ७–८ व्यक्ती होत्या त्यांनाही त्यांनी स्वतः प्रसाद दिला.

या सर्व अनुभवातून मला एक सांगावेसे वाटते, की लहान वयात वडिलांची छत्रछाया आपल्या डोक्यावरून गेली असे वाटत असतांना माझ्या वैयक्तिक, शैक्षणिक व इतर सर्व गोष्टींकडे अदृश्यरुपाने लक्ष देऊन ते माझ्या पाठीशी उभे राहिले व कोणत्याही बाबतीत माझ्या वडिलांची कमतरता मला जाणवू दिली नाही; आणि हे सर्व काही त्यांनी केले ते देह ठेवल्यानंतर!

* * *

## गुरुभक्तांची परीक्षा

दि. १ जून १९९४ रोजी श्रीगुरुदेव सकाळच्या बैठकीत श्रोत्यांतील प्रत्येक भक्ताला एकच प्रश्न विचारत होते. प्रश्न होता– ''तुम्ही देव पाहिला आहे का?'' प्रत्येकाचे उत्तर नकारार्थी येत होते. श्रीगुरूदेव शांत राहिले. रात्रीच्या बैठकीत ते म्हणाले, ''सकाळी मी थोडा कस लावून पाहिला. पण सर्वच्या सर्व नापास झाले.'' काही क्षण थांबून ते म्हणाले, ''आम्हाला आमचा देव गुरूस्वरूपातच दिसतो. तुम्हाला मात्र....!'' पुढे जरी ते स्पष्टपणे बोलले नसले तरी त्यांना जे अभिप्रेत होते, ते त्यांनी सूचित केले होते. पण भक्त जरी त्यांचा उल्लेख 'गुरुदेव' असा करीत असले तरी गुरू आणि देव ह्यांच्यात भिन्नत्व आहे, असा त्यांच्या मनात भाव असल्याने त्या प्रत्येकाने नकारार्थी उत्तर दिले असावे. शेवटी श्रीगुरूंनाच त्यांची दया आली असावी, म्हणून सूचक पद्धतीने त्यांनी त्या प्रश्नाच्या उत्तराबाबत मार्गदर्शन केले. समर्थ श्रीरामदास स्वामींनी स्पष्टपणे दासबोधात सांगून ठेवले आहे की–

सद्‌गुरूहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।।



# ५.

# देहातून नीलकिरणांचे प्रक्षेपण
## (विश्वचैतन्याचा अलौकिक आविष्कार)

**डॉ. र. ना. शुक्ल**

पीएच्. डी., डी. एस सी. डी. लिट्

(निवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे)

बऱ्याच दिवसांपूर्वी प्रत्यक्ष चक्षुर्वैसत्य पाहिले. उत्तुंग अध्यात्म चैतन्याचा आविष्कार स्व. प. पू. क्षीरसागर महाराजांनी अहमदनगर येथील आश्रमात भक्तगणास करून दाखविला होता. तथाकथित तत्त्वचिंतक शास्त्रज्ञ अशा पुणेरी मित्रांसह आम्ही स्वामींच्या दर्शनास हॉलमध्ये बसलो होतो. ओळख करून दिल्यावर, 'मानवी शरीरात परमेश्वरदत्त तीन लाख बेचाळीस हजार दोनशे सोळा ऊर्जा केंद्रे, केसाच्या टोकापासून पायाच्या नखापर्यंत प्रत्येक सजीव मानवाला निसर्गतः निर्मित असतात. (आजच्या भाषेत ॲक्युपंक्चर, ॲक्युप्रेशर सेन्टर्स); ती कंट्रोल करण्यास मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, सहस्त्रार अशी सप्तचक्रेही ईश्वरप्रदान असतात. ब्रह्मांडातील पंचमूलतत्त्वे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश हीही प्रत्येक मानवी सजीव पिंडात असतात. म्हणून ''पिंडी ते ब्रह्मांडी'' असा वाक्यप्रयोग अभिप्रेत असून सप्तचक्रेही पंचतत्त्वात्मक कार्यरत असतात. मूलाधार हे पृथ्वीतत्व! अशा प्रकारे आप, तेज, वायू, आकाश तत्त्वे क्रमाने वर चढत असणाऱ्या मनुष्यदेहात असतात. अध्यात्मउन्नत जीवात्म्याच्या भ्रूमध्य बिंदूतून जांभळ्या–निळ्या रंगाचे तेजोगोल आत्मज्योत प्रकटते, असे भारतीय प्राचीन योग वाङ्मयातून वर्णन केलेले आहे. अध्यात्म प्रगतीचे हे द्योतक समजतात;'' अशी चर्चा झाली.

वरील चर्चेच्या भरात भक्तगणात बसलेल्या, दर्शनास आलेल्या एका अतिजिज्ञासू

सज्जनाने स्व. क्षीरसागर महाराजांना ''वरील तत्त्वात सत्य आहे का व त्याचे प्रात्यक्षिक आता अनुभवता येईल का?'' असा बिकट प्रश्न जरा आव्हानात्मक परिभाषेत केला. महाराज हसले. ''प्रयत्न करू. गुरुकृपा व ईश्वरी आशीर्वाद मिळाल्यास व श्रीगुरुंनी परवानगी दिल्यास कदाचित ह्याच प्रसंगी हा साक्षात्कार घडेलही.'' असे सांगून हॉलमधील प्रकाशदिवे बंद करायला– अंधार करायला सांगितले. आणि अभूतपूर्व अवर्णनीय सकृत्दर्शनी **अशक्यप्राय वाटणारा, साक्षात् प्रचीतीचा, आध्यात्मिक चैतन्यप्रकाश महाराजांच्या भ्रूमध्यातून (गर्द निळ्या–जांभळ्या रंगाच्या तेजोवलयांनी निर्मित असा) सर्व हॉलमध्ये क्षणात पसरला. एका अचाट, भेदनशील, निळ्या–जांभळ्या प्रकाशाने हॉल गच्च भरला; कानाकोपऱ्यात, अध्यात्मओजाने ओतप्रोत प्रकाशमान झाला.** काही भक्तांच्या डोळ्यांतून अश्रुधारा पाझरू लागल्या. काहींची शरीरे हलकी–फुलकी झालेली जाणवली. अमाप ऊर्जा उत्स्फूर्तपणे शरीरात आपोआप प्रविष्ट झालेली जाणवली. काही क्षण स्वर्गसुख काय असते ते भक्तांनी अनुभवले. विश्वसत्य प्रत्यक्षात आले.

भारतीय प्राचीन ऋषी–मुनींनी, महर्षींनी पिंड–ब्रह्मांडाचे नाते तपश्चर्येतून प्राप्त करून घेऊन दिव्य वैश्विक शक्तींचा आत्मोद्धारासाठी सदुपयोग करून घेतला. मानवी चैतन्यातून विश्वचैतन्य मिळवले. भारतीय प्राचीन मंदिरे, मठ–मठाधिपती ही ऊर्जाकेंद्रे आहेत. परकाया प्रवेश, विभूती काढणे, वस्तू निर्मिती, दूरवरचे संभाषण ज्ञान, अनेक ठिकाणी एकाच क्षणी दर्शन मिळणे ह्या व अशा सिद्धींचा अनुभव ह्या केंद्रातून संवेदनशील व्यक्तींना मिळतो.

या सर्व गोष्टींची **विशेष जाणीव** स्व. **क्षीरसागर महाराजांनी घडवलेल्या अलौकिक चैतन्याच्या आविष्काराने उपस्थितांना** झाली आणि ती **अनुभूती** विशेष संस्मरणीय ठरली आहे.

***

## शास्त्रज्ञांना उकल झाली

दक्षिण ध्रुवावर भारतीय शास्त्रज्ञांची एक मोहीम गेली होती. त्या तुकडीतील एक शास्त्रज्ञ श्रीगुरुदेवांकडे आले होते. ते येथे आल्यावर बैठकीत श्रीगुरुंनी दक्षिण ध्रुवावर काय परिस्थिती आहे, काय होणार आहे याचे संपूर्ण वर्णन केले होते; तेव्हा ते शास्त्रज्ञ म्हणाले, ''खूप प्रश्नांची उकल आम्हाला झाली नव्हती, ती येथे येऊन झाली.''



# ६.
# सद्गुरूंचे देवाशी संवाद

**प्रा. डॉ. शशिकला गांगल**
एम्.एस्सी., पीएच्. डी
इलेक्ट्रॉनिक्स विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

श्रीगुरुदेवांवर देवाचे त्यांच्या लहान वयापासूनच लक्ष होते; सांगितलेले नियम पाळून हा बालक तपश्चर्या करतो की नाही हे पाहिले जात असे. वेळोवेळी आज्ञाही दिल्या जात; त्याप्रमाणे न वागल्यास वा चुका केल्यास शासनही केले जात असे. साधनेत प्रगती झाल्यानंतर त्यांच्यात संवादही होत असे (सर्वसामान्य व्यक्तीस न कळणाऱ्या भाषेत). भक्तांनी आपल्या समस्या श्रीगुरुदेवांना निवेदन केल्या तर काहीवेळा ते 'मी देवाच्या कानावर घालतो' असेही म्हणत. कालांतराने त्या दोघांत एकरूपत्व निर्माण झाल्यावर श्रीगुरूंपुढे निवेदन केलेल्या समस्यांची देवाकडून दखल घेतली जाई व समस्यांचे निवारण झाल्याचा भक्तांना अनुभव येई. त्यासंबंधीचे काही अनुभव–

❋ लहानपणी एकदा त्यांना जेवतांना वरण आवडले नाही म्हणून त्यांनी ताट भिरकावून दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांचा गाल सुजला होता. आईने विचारले, ''काय झाले?'' तेव्हा ते म्हणाले, ''काल मी ताट भिरकावून दिले, त्याबद्दल देवाने मला मारले.'' तेव्हापासून आईला त्रास देणे त्यांनी बंद केले.

❋ एकदा ते आईला म्हणाले, ''मला गुरुचरित्र वाचायची आज्ञा झाली आहे; मला त्यांनी सांगितले आहे की काहीही खायचे नाही. मी आठ दिवस काही खाणार नाही.'' आई म्हणाल्या, ''अरे रामराया, गुरुचरित्र वाचायला कठीण आहे. शिवाय त्याचे नियम कठीण आहेत; तू इतका लहान आहेस; ते फार अवघड आहे.'' त्यावर

ते इतकेच म्हणाले, ''आज्ञा झालीय.''

गुरुचरित्र पारायणाला प्रारंभ झाला. दिवसभर वाचन झाल्यावर आई म्हणाल्या, ''दुधातले गाकर करते. ते खा.'' आईने खूप आग्रह केला. आईची आज्ञा मोडायची नाही म्हणून त्यांनी गाकर खाल्ले. दुसऱ्या दिवशी त्यांचे डोळे सुजले. आई म्हणाल्या, ''बघ, मी तुला सांगितले होते की तुला ते वाचायला जमणार नाही. तुझे डोळे सुजले. आता वाचन पुरे कसे करणार?'' तर ते म्हणाले, ''देवाची आज्ञा मी मोडली. काही खायचे नाही म्हणून त्यांनी मला सांगितले होते आणि तू मला खायला दिलेस, **आता उरलेल्या दिवसात मी काहीही खाणार नाही.**'' आणि अशा स्थितीत ते कठीण पारायण त्यांच्याकडून पूर्ण झाले.

* श्री. का. भा. आपटे (कुलकर्णी) (निवृत्त शाखाधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे) ह्यांनी १९५५ पूर्वीची घटना सांगितली आहे. ''त्यावेळी मी रिकामा होतो, म्हणून रोज दुपारी तीन ते सहा श्रीगुरूंच्या घरी जात असे. त्यांच्यासोबत मी एकटाच असे. त्यावेळी प.पू. महाराज देवघराजवळ बसलेले असायचे व काहीतरी बोलायचे; एकदा दार उघडेच असल्याने मी ते दारातून ऐकले व त्यांना अडथळा नको म्हणून मी हलकेच आत गेलो– आणि त्यांच्यापासून ५–६ फूटांवर उभा राहिलो. ते काहीतरी बोलत होते; त्यांची जी भाषा होती ती मराठी नव्हती; संस्कृतही नव्हती; अगदी वेगळी अपरिचित भाषा होती. **त्या वेगळ्या भाषेत ते देवाशी बोलायचे!** थोडा वेळ गेल्यावर त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. ते म्हणाले, ''तू कधी आलास?'' मी म्हणालो, ''बराच वेळ झाला.'' ते हसले व गप्प बसले. नंतर मी त्यांना विचारले, ''तुमचा देवाशी एवढा सुसंवाद चालला होता, तर मला काहीतरी प्रचीती द्या. काहीतरी अनुभूती द्या, जेणेकरून तुम्हाला जसा आनंद मिळतो तसा मलाही मिळू द्या.'' ''देईन, पण एका अटीवर.'' ती अट मान्य केल्यावर ते म्हणाले, ''देतो. खाली बस.'' मी बसलो. त्यांनी नुसते ''अहः'' केले तर शरीरातून बारीक लिंग बाहेर आले. ते लिंग त्यांनी माझ्या हातात दिले. काही वेळाने त्यांनी ते परत घेऊन तोंडात घातले व गिळून टाकले. ते पुढे म्हणाले, ''तुला अनुभूती द्यायची इच्छा झाली म्हणून मी हे काढले; नाहीतर मी हे कधी काढत नाही. हे लिंग महादेवाचे आहे; त्याला **आत्मलिंग** म्हणतात.'' असे अनुभव अन्य कोणाच्याही बाबतीत घडलेले, ऐकलेले वा वाचलेले नाही. मला मात्र ते पहायला मिळाले.''

* * *



# ७.
# चराचराला ओढ लावणारे श्रीगुरुदेव

**श्री. अ. वि. (राजाभाऊ) भागवत**

(श्रीगुरूंचे ज्येष्ठ सेवेकरी व संचालक, रामराय इलेव्हेटर्स, पुणे)

सद्‌गुरूंबाबत असे पाहावयास मिळते की केवळ मानवांनाच नव्हे तर पशुपक्ष्यांना, पंचमहाभूतांना, चराचरालाच त्यांची ओढ होती– त्यांना स्पर्श करण्याची, त्यांच्याशी संवाद करण्याची त्या सर्वांची धडपड चालू असे. गुरुसेवेच्या काळात केलेल्या व नोंदून ठेवलेल्या याबाबतीतील तपशीलवार नोंदींचा हा सूत्ररूप सारांश–

प्रकृतीस्वास्थ्य होते तोपर्यंत सद्‌गुरू रोज किमान २५–३० कि.मी. अंतरापर्यंत रपेट करून येत. त्यामुळे एवढ्या मोठ्या २५ कि.मी. च्या त्रिज्येच्या परिसरावर त्याचा विशेष परिणाम प्रत्यक्ष दिसू लागला. नगरचे पाऊसमान हळूहळू वाढू लागलं. त्यामुळे भूजलसाठा वाढला. हिरवाई वाढली.

तपोवनाची व परिसरातील जमीन अगदी रखरखीत होती. पाणी धरून ठेवणारी नव्हती. त्यामुळे साधी रोपटी किंवा बाभळीसुद्धा फारशा दृष्टीस पडत नसत. तपोवनाच्या जागेची स्थितीही अशीच होती. पण त्या जागेच्या मालकाने ती जमीन सद्‌गुरूंना अर्पण केली आणि त्या जागेत देवस्थानातील पूजेसाठी आवश्यक त्या तुळशी, बेल, फुले इ. ची. जोपासना करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानिमित्ताने सद्‌गुरूंचे त्या भागात येणेजाणे सुरू झाले. त्यामुळे त्या परिसरात आमूलाग्र बदल झाला असून तेथे हिरवाई दिसू लागली व या भागात वस्ती दाटू लागली आहे.

१९७७–७८ च्या सुमारास सद्‌गुरू उरणला गुरुभक्त **श्री. मांगीलाल शेठ** यांच्याकडे गेले होते. तेथील गुरुभक्तांनी सद्‌गुरूंसाठी समुद्रसहलीचा कार्यक्रम आखला व सर्वजण लाँचमधून निघाले. पण काही वेळाने समुद्र एवढ्या मोठ्या उसळ्या मारू

लागला की लाँच हेलकावे खाऊ लागली. भक्तवर्ग धास्तावला पण सद्गुरू निवांत होते कारण त्यांना पाहून समुद्राला 'श्री'प्रेमाचे जणू भरतं आलं होतं. समुद्र यापेक्षा आणखी वेगळी सेवा काय करू शकत होता? प्रेम व्यक्त करायला तोच एक मार्ग होता.

नैष्ठिक ब्रह्मचर्यामुळे सद्गुरूंची प्रकृती उष्ण होती. त्यामुळे त्यांना गारव्याची, वाऱ्याची आवश्यकता असे. पण त्याचबरोबर असे पहायला मिळे की वाऱ्यालासुद्धा त्यांना पाहून जोर येई. तो इतक्या जोराने वाही की वस्तू, कागदपत्रे, इ. उडत, खिडक्या, दारे आपटत. अशावेळी सद्गुरू नकळत म्हणत, ''अरे, अरे होऽ होऽ'' त्यात वायूशी संवाद साधण्याची भावना असे.

देवस्थानची गोशाळा तपोवनात सुरू झाल्यावर श्रीगुरू आठवड्यातून एकदा तेथे जात व गायींना बटाटे खायला देत. ते तपोवनाच्या जवळ आल्याचे गायींना आधीच जाणवत असे आणि त्या जोरजोरात हंबरायला लागत. सद्गुरू सर्व गायींवर सारखीच माया करीत. ते जेथे जात तेथील प्राण्यांनासुद्धा त्यांच्या विशेषत्वाची जणू जाणीव होत असे. एकदा ते 'डाकोरजी'ला गेले होते. त्या देवस्थानाने तेथे अनेक गायींना पोसले आहे. एका मोठ्या मैदानाला कुंपण घालून त्यात गायींना सोडले असून त्या जागेतच त्यांच्या चाऱ्यापाण्याची व्यवस्था केलेली आहे. तेथे बसायला पारासारखी एक जागा होती. देवदर्शन झाल्यावर सद्गुरू त्या पारावर जाऊन बसले. थोड्याच वेळात अनेक गायी आपणहून त्यांच्याजवळ येऊन निवांत उभ्या राहिल्या. अगदी गर्दी करून एकमेकींना खेटून उभ्या होत्या. असे वाटे की, खूप दिवसांनी ओळखीचा माणूस भेटला अशी भावनाच जणू त्या व्यक्त करीत होत्या. भगवान श्रीकृष्णाचे गुणवर्णन ऐकतांना त्यांच्याभोवती गायी आणि बालगोपाळ असायचे असे वर्णन ऐकतो; अगदी तशीच भावना याप्रसंगी जो फोटो काढला गेला आहे तो पाहून होते. जणू गोपालकृष्णच गायींमध्ये बसलेत असे वाटते.

श्रीदत्तात्रेय निवासात सद्गुरू वास्तव्यासाठी आले तेव्हा त्या भागात वस्ती अगदी विरळ होती; म्हणून संरक्षणाच्या हेतूने त्यांनी एक कुत्रा सांभाळला होता. १९९२-९३ च्या सुमारास एका भक्ताने एक छोटी कुत्री अर्पण केली होती. तिचे 'राणी' नाव होते. विशेष म्हणजे ती जर्मन शेफर्ड जातीची असूनही पूर्ण शाकाहारी होती. तिच्या जोडीला आणखी एक त्याच जातीचा एक कुत्रा थोड्या दिवसांसाठी देवस्थानात होता. सद्गुरूंचा त्या दोघांनाही खूप लळा होता. श्रींनी देह ठेवल्यानंतर ३-४ महिन्यांत ते दोघेही मरण पावले. महाराजांचा विरह त्या दोघांनाही सहन झाला

नाही, असेच म्हणावेसे वाटते. या मुक्या प्राण्यांनाही देवाच्या अस्तित्वाचे कसे 'ज्ञान' असते याचा सद्‌गुरूंनी जणू पाठच घडवला; तसाच प्रकार देवस्थानात काही दिवसांसाठी राहिलेल्या 'सीता' या हरिणीचाही!

सद्‌गुरूंनी श्रीदत्तात्रेय निवासाच्या दारात दोन्ही बाजूंना नारळ, सुरू आणि अशोक असे प्रत्येकी एक झाड लावले होते. सर्व झाडे एकाच वेळी लावली व लावतांना ती साधारणपणे एकाच वयाची होती. काही वर्षांनी असे लक्षात आले की, सद्‌गुरू ज्या एका खोलीत राहात त्या खोलीजवळची झाडे किमान दीडपट मोठी, जास्त जोमदार व मोठी झाली. सर्व झाडांना समप्रमाणातच पाणी दिले जात असूनही असे घडले, हा सद्‌गुरुसान्निध्याचा परिणाम होता.

या झाडांवर रोज संध्याकाळी चिमण्यांची शाळा भरे. त्यांचा किलबिलाट एवढा मोठा असे की माणसांचे बोलणे एकमेकांना स्पष्ट ऐकू येत नसे. विशेष म्हणजे ही शाळा फक्त सद्‌गुरूंच्या खोलीसमोरच भरे, अन्यत्र नाही. कालांतराने 'वेदान्त' इमारत बांधण्यासाठी ही झाडे तोडली गेली व किलबिलाट कमी झाला.

काहीवेळा कावळेसुद्धा विशिष्ट आवाज करीत; असे वाटे की ते सद्‌गुरूंना काहीतरी सांगताहेत. त्यांच्या नेहमीच्या कावऽकाव व्यतिरिक्त वेगळा आवाज ते काढायचे. सद्‌गुरूंच्या ते लक्षात यायचे. ते म्हणायचे– ''बघा, काय आगाव आहे, कसा आवाज काढतोय.'' पाठोपाठ कावळा पुन्हा तसाच वेगळा आवाज काढायचा. सद्‌गुरू म्हणायचे, ''बघा, आहे?'' आणि असं म्हणून हसायचे. पारवे, पोपटही देवस्थानात होते. सद्‌गुरू समाधिस्थ झाल्यापासून बरेच वेळा भारद्वाज पक्षी तपोवनात वस्तीला असतात.

एका भक्ताने गुरुदेवांना एक स्वयंभू शिवलिंग दिले होते; ते त्यांनी पहिले दोन दिवस गंगाजलात भिजत ठेवले होते. या काळात एक नाग गुरुदेवांच्या खोलीच्या खिडकीत येत असे. शेवटी गुरुदेव त्याला म्हणाले, ''तुझे काम आता झाले ना? मग आता जा'' असे म्हटल्यावर तो नाग तेथून निघून गेला. त्याने कोणाही सेवेकऱ्याला वा भक्ताला त्रास दिला नाही.

वृक्षवल्ली, पशुपक्षी या मानवेतर सजीवांनाही श्रीगुरूंचा जो लळा लागला होता, हे पाहिल्यावर सद्‌गुरू किती श्रेष्ठ आहेत हे संवेदनशील अंतःकरण असणाऱ्यांना उत्कटतेने जाणवते.

* * *



# ८.
# श्रीगुरुदेवांनी घडविलेले दिव्य दर्शन

**श्री. सुधीर कुलकर्णी,** बी.ई.,
(निवृत्त अधिकारी), ओएन्‌जीसी, वाशी (नवी मुंबई)

चार तपांहून अधिक काळ केलेल्या तपश्चर्येमुळे श्रीगुरूंची काया अंतर्बाह्य तेजाने उजळून निघाली होती. एकदा ते म्हणाले होते– ''आम्ही डोळे झाकले तरी वा उघडे ठेवले तरी तेजोमय प्रकाश दिसतो. आत व बाहेर असं काही राहिलेलंच नाही. जर एकट्या मानवी देहाभोवती एवढं तेजोमय वलय आहे तर संपूर्ण विश्वात 'त्या'चा केवढा तेजोमय पसारा असेल ह्याचा विचार करा.'' त्यानंतर एका भक्ताला ते म्हणाले, ''ज्या डब्यातली साखर मी खाल्ली आहे, त्याच डब्यातली साखर मी तुम्हाला देणार आहे.'' या वाक्याचा गर्भितार्थ जरी त्यावेळी त्या भक्ताला समजला नाही तरी श्रीगुरूंनी त्याला वा अन्य भक्तांना घडवलेल्या दिव्यत्वाच्या दर्शनानंतर त्या विधानाचा अर्थ ध्यानात आला; अशा काही भाग्यवान गुरुभक्तांचे हे प्रचीतीचे अनुभवकथन–

**श्री. दशरथ मुरलीधर गुंजाळ** (सेवानिवृत्त अधिकारी, व्होल्टास कंपनी ठाणे) लिहितात– मला प. पू. गुरुदेवांनी १९८३ साली उपासना दिल्यानंतर एक महिन्याच्या आत मला सद्‌गुरुकृपेने **प. पू. सद्‌गुरूंचे दिव्य स्वरूपात दर्शन झाले.** पहाटेची वेळ होती. आकाशामध्ये मला प. पू. गुरुदेव दिसत होते. त्यांच्या देहातून प्रकाशकिरणांचे झोत बाहेर पडत होते. माझे डोळे त्यांच्याकडे पाहिले की, दिपून जात होते. त्यामुळे मी त्यांना ओळखू शकत नव्हतो; मी तसाच त्यांच्याकडे पाहत होतो. असे पाहत असतांना मला त्यांचे मुखकमल दिसले व माझ्या लक्षात आले की, हे आपले

सद्‌गुरू आहेत. मी त्यांचे दर्शन घेण्यासाठी जवळ जाऊ लागलो तर ते मागे मागे जाऊ लागले. त्यानंतर मी एका जागी स्थिर उभा राहिलो; ते पण मग स्थिर झाले. नंतर माझ्या लक्षात आले की प. पू. गुरुदेवांना स्पर्श करायचा नसतो. म्हणून ते मागे मागे जात होते. मी प. पू. गुरुदेवांचे दर्शन घेतल्यानंतर माझ्या अंतःकरणात असा दृढ भाव व विश्वास निर्माण झाला की आपले सद्‌गुरू हे जरी मानवी देहात असले तरी ते प्रत्यक्ष ईश्वरच आहेत. या दृष्टांतानंतर माझे मन त्यांच्या चरणी स्थिर झाले. माझी अशी भावना आहे की जसे (गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे) भगवान श्रीकृष्णाचे दिव्य स्वरूपातील दर्शन अर्जुनाला भगवंताने दिव्यदृष्टी दिल्यावरच दिसू शकले, त्याचप्रमाणे मीसुद्धा श्रीगुरुदेवांचे दिव्य स्वरूप केवळ त्यांच्या कृपेनेच पाहू शकलो. हा अनुभव मी श्रीगुरुदेवांना सांगितल्यावर ते म्हणाले, ''तुमचा अनुभव चांगला आहे.''

१८–२–९० रोजी मला स्वप्नामध्ये– माझ्या देवघरात श्रीगुरूंचा आशीर्वाद देतांनाचा जो फोटो आहे, तो आला व त्यात त्यांच्या छातीवर व चेहऱ्यावर प्रकाश दिसू लागला. त्यांच्या देहात मला प्रकाशाचे दर्शन झाले. हा अनुभव सांगितल्यावर प. पू. सद्‌गुरू मला म्हणाले की, ''ज्याची दृढ भक्ती असेल त्यालाच असे दर्शन होते.''

१७–९–९२ ला चातुर्मासाच्या काळात गुरुवारी भाद्रपद कृष्ण ५ ला पहाटे चार वाजता मला सदगुरूंचे पद्मासन घातलेल्या स्थितीत दर्शन झाले, त्यावेळी त्यांचा सर्व देह प्रकाशमान दिसत होता.

१९९२ सालच्या चातुर्मासात माझे चातुर्मासाचे व्रत व ज्ञानेश्वरीचे पारायण चालू होते. २–१०–९२ रोजी मला सदगुरूंचे दर्शन झाले. सद्‌गुरू कृष्णरूप झाले आहेत व मी अर्जुन झालो आहे व ते माझे अज्ञान घालवत आहेत, असे ते दर्शन झाले.

१९९२ साली श्रीगुरुदेवांची तब्येत ठीक नसल्यामुळे ते नेहमीप्रमाणे श्रीगाणगापूर यात्रेस जाणार नव्हते. त्यावेळी मी श्रीगुरुदेवांचे आशीर्वाद घेऊन गाणगापूर यात्रेला गेलो होतो. माझ्याबरोबर काही गुरुभक्तही होते. गाणगापूरला जाण्याच्या अगोदर पंढरपूर व तुळजापूर येथे आम्ही गेलो होतो. २३–१२–९२ रोजी पंढरपूरला रात्री १० वाजता श्रीपांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गेलो. त्यावेळी श्रीपांडुरंगाचे सालंकृत दर्शन झाले. भगवंताच्या मूर्तीला सर्व अलंकार व निळा पीतांबर घालून सजवले होते. मूर्ती अतिशय तेजस्वी दिसत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ

वाजता मी मंदिरात पुन्हा दर्शनाला गेलो. मूर्तीपासून १० फूट अंतरावर रांगेत उभा असतांना, श्रीपांडुरंगाच्या उजव्या डोळ्यातून प्रकाश बाहेर पडत आहे, असा मला भास होत होता व तो माझ्याकडे पहात आहे असे वाटत होते. भगवंताच्या मूर्तीजवळ गेल्यावर प्रकाश दिसण्याचे बंद झाले. खात्री करण्यासाठी मी पुन्हा रांगेत उभा राहिलो, तर पुन्हा तोच अनुभव ! मी श्रीगुरुदेवांना जेव्हा हा अनुभव सांगितला तेव्हा ते फक्त हसले. नंतर मनामध्ये यायचे, की आपल्याला श्रीपांडुरंगाने एक डोळा उघडा करून खरेच दर्शन दिले असेल का? वारकरी भक्त मंडळी अनेक वर्षे वारीमध्ये पंढरपूरला जातात, त्यांनासुद्धा तो डोळे उघडून दर्शन देत नाही. तशी माझी तर काहीच पात्रता नाही.

नंतर दुसऱ्या वर्षी श्रीगुरुदेव नेहमीप्रमाणे पंढरपूरला पूजेसाठी गेले होते. त्यावेळी आम्ही भक्त मंडळीही त्यांच्याबरोबर होतो. त्यावेळी श्रीगुरुदेव पांडुरंगाची पूजा करत असतांना **पांडुरंगाने एक डोळा उघडा करून श्रीगुरुदेवांना दर्शन दिले. त्या घटनेचा फोटो काढला गेला आहे.** तो फोटो श्रीगुरुदेवांकडे नगरला आला होता. नंतर मी नगरला दर्शनासाठी गेलो असताना संध्याकाळच्या बैठकीत मुंबईचे चारपाच भक्त व मी होतो; त्यावेळी श्रीगुरुदेवांनी तो फोटो आम्हा सर्व भक्तांच्या हातात देऊन तो बघायला सांगितले. त्यावेळी श्रीगुरुदेव मला म्हणाले, ''गुंजाळ, तुम्हीही फोटो हातात घ्या व बघा; डोळा उघडला की नाही ते नीट बघा.'' त्या क्षणी मला मागच्या वर्षाच्या अनुभवाची आठवण झाली. म्हणजे मला आलेला अनुभव खरा आहे, हे माझ्या मनाला पटले व मनातील रुखरुख बंद झाली व हाही अनुभव श्रीगुरुदेवांनीच घडवला होता, ह्याची जाणीव झाली.

१९९३ साली माझ्या वतीने श्रीगाणगापूरला परमगुरू श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची पाद्यपूजा श्रीगुरुदेवांच्या हस्ते व्हावी, अशी माझी इच्छा होती. पण श्रीगुरुदेवांचे तेथील वास्तव्य अचानक अल्पकालीन ठरल्याने माझी तेथील पूजा रहित झाली. १ महिन्यानंतर मी नगरला गेलो असता श्रीगुरूंना प्रार्थना केली की, ''माझी गाणगापूरला नियोजित पूजा आपल्या हस्ते आपण नगरला करून घ्यावी. माझ्या मते श्रीगाणगापूर व नगर एकच आहेत. येथेही त्यांच्या चिंतामणी पादुका उमटलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे येथेही अधिष्ठान आहे.'' श्रीगुरूदेव मला म्हणाले, ''गुंजाळ, तुम्ही कधीही या व पाद्यपूजा करा. तुम्हाला माझी परवानगी आहे.'' त्या दर्शनाच्या वेळी मी एकटाच होतो; त्यावेळी **श्रीगुरुदेवांनी विराट रूप धारण केले होते. ते हनुमानासारखे दिसत होते.** ते दर्शन मला जवळजवळ १५

मिनिटे (बाहेर पडेपर्यंत) होत होते. नंतर मी नगरला पाद्यपूजा केली. त्यावेळी मला श्रीगुरुदेवांकडून चांदीच्या पादुका प्रसाद म्हणून मिळाल्या; त्या माझ्या घरी देव्हाऱ्यात पूजेमध्ये आहेत.

**सौ. कमल बबन गुंजाळ** (शिक्षिका, आळेफाटा)– गुरुवारचा दिवस होता. पहाटेची वेळ होती. मी अवतरणिका वाचत होते. वाचत असतांनाच **श्रीदत्तगुरूंचे बालरूपात मला दर्शन झाले.** समोर पांढरा शुभ्र प्रकाश दिसू लागला. श्रीदत्तात्रेयांचे ते तेजोमय रूप खूप सुंदर होते. अंगावर रोमांच उभे राहिले. क्षणभर विश्वासच बसत नव्हता. पण नंतर लक्षात आले की, आपण अवतरणिका वाचत आहोत.

काही दिवसांनी नगरला दर्शनाला गेलो. मला झालेल्या दत्तात्रेय–दर्शनाचा अनुभव सद्‌गुरूंना सांगितला. त्यावेळी सद्‌गुरू म्हणाले, ''ही अवतरणिका सिद्ध माला । श्रीगुरू भेटती जपे त्याला । जैसा भावार्थ असे आपुला । तैसी कार्ये साधती ।।'' हे ऐकून मनाला खूप आनंद झाला. ती सद्‌गुरूंच्या मुखातून निघालेली 'अमृतवाणी' म्हणजे **माझ्या जीवनातील आनंदाचा तो एक परमोच्च क्षण** म्हणावा लागेल.

असाच एक, श्रीसद्‌गुरूंच्या आशीर्वादाचा आलेला अनुभव असा की, जुलै १९९२ ला मला **पंढरपूरला आषाढी वारीला पायी जाण्याची** इच्छा होती. मी मनाची तयारी केली व सद्‌गुरूंचे आशीर्वाद घेऊन पायी वारीला जाण्यासाठी निघाले. आमच्या गावापासून पंढरपूरचे अंतर ४९२ किमी. व १६ दिवसांचा पायी प्रवास ! नोकरीमुळे कधी एवढे पायी चालण्याची सवय नव्हती; पण मनाची तीव्र इच्छा, भगवंताच्या दर्शनाची खरोखरच तळमळ असेल तर त्यासाठी कितीही अडचणी आल्या तरी त्या आपोआप दूर होतात.

वारीच्या प्रवासाला सुरुवात झाली. माझी मुलगी दुसरीला होती. तिला सासुबाईंकडे ठेवले. पहिल्या दिवसाचा प्रवास छान झाला. २–३ दिवसांनी पायाला फोड येऊ लागले. चालता येईनासे झाले. संध्याकाळी केव्हा एकदा झोपू असे वाटायचे; परंतु वारीचा नियम असा की, जेवणानंतर कीर्तन झाल्याशिवाय कोणालाही झोपता येत नव्हते. सोबतीला जवळचे असे कोणीच नव्हते. परंतु सद्‌गुरु माऊलींच्या कृपेने अनेक जीव लावणारे सोबती भेटले. त्यांनी अगदी मुलीप्रमाणे जपले. रात्रीचे बाहेर झोपण्याची सवय नव्हती. पण आईसारख्या दोघी–तिघी माऊल्या भेटल्या. पंढरपूरचा पायी प्रवास सोळाव्या दिवशी म्हणजे आषाढी एकादशीच्या अगोदर संपला. एकादशीच्या आदल्या दिवशीचा वाखरीतील तो रिंगणसोहळा पाहून मनाचे व डोळ्यांचे पारणेच फिटले. 'आनंदाच्या डोही आनंद तरंग' असे वाटू लागले. त्याचवेळी शारीरिक

थकवा कुठल्या कुठे गेला हे कळलेसुद्धा नाही.

आता दुसऱ्या दिवशी एकादशी ! पांडुरंगाचे दर्शन तर झाले पाहिजे. कारण त्याच्या दर्शनासाठीच तर पायी प्रवास केला आहे. नेहमी वारीला येणाऱ्या अनेक वारकऱ्यांनी सांगितले की, ''एकादशीच्या दिवशी तुमचे दर्शन होणार नाही. तुम्हाला दोन दिवस रांगेत उभे रहावे लागेल.'' परंतु सद्‌गुरूंच्या कृपेने आणि मनाच्या निश्चयाने एकादशीला पहाटेच चंद्रभागेत स्नान केले; खोलीवर जाऊन आवरून आलो; विठ्ठलदर्शनासाठी रांग लावायला निघालो. दर्शन झाल्याशिवाय खोलीवर यायचेच नाही अशा निश्चयाने निघालो; आणि काय आश्चर्य! मंदिराच्या जवळच दुकान असलेली एक माऊली आम्हाला भेटली. तिने आमची सगळी विचारपूस केली आणि म्हणाली ''थांबा व चहा तरी पिऊन जा.'' आम्ही चहा घेतला. तेवढ्यात तेथे दोघे पोलीस आले. त्यांना त्या माऊलीने सांगितले की, ''माझ्या मावसबहिणी आहेत. त्यांना दर्शनबारीसाठी लाईनमध्ये लावून द्या. ते ''५-१० मिनिटे थांबा'' म्हणाले आणि त्यानंतर समोर असलेल्या रांगेमध्ये त्यांनी आम्हाला उभे केले. आश्चर्य असे की, **दोन दिवस लागण्याऐवजी आम्ही २ ते २।। तासातच प्रत्यक्ष पांडुरंगांचे चरणदर्शन घेऊन बाहेर आलो. प. पू. सद्‌गुरूंचे आशीर्वाद व भगवंताच्या दर्शनाची तीव्र ओढ ह्यामुळेच हे घडले.**

**प्रा. सौ. मंगला गांधलीकर** (अहमदनगर) ह्यांनी नोंदविलेला अनुभव असा-

कोल्हापूरची महालक्ष्मी हे प. पू. सद्‌गुरूंचे कुलदैवत! आईसाहेबांच्या पूजेचा थाट वेगळाच होता. प. पू. गुरूदेव १०८ लिटर दुधाने अंबाबाईवर अभिषेक करीत होते. आम्ही सगळे आनंदयात्री तो सोहळा पाहत होतो. अचानक मला मूर्तीच्या जागी ब्रह्मा-विष्णू-महेश दिसले आणि नंतर प. पू. सद्‌गुरूच दिसू लागले. या दर्शनाने तर मी अगदी भारावून गेले. नंतर प. पू. गुरुदेवांनी विचारले- ''काय गांधलीकर, दर्शन झाले का?'' मला अगदी रडूच कोसळले; म्हणजे प्रत्यक्ष सद्‌गुरूंनीच आम्हाला ते दर्शन दिले होते. ''मीच कसा सगळीकडे आहे, म्हणजे माझे स्वरूप ते हेच आहे'' हेच प. पू. सद्‌गुरूंनी आम्हाला दाखवून दिले.

**श्री. मारूतराव जाधव** (निवृत्त अधिकारी, महानगरपालिका अहमदनगर) ह्यांनी नोंदवलेले निरीक्षण असे- ''महाराज जेव्हा बाहेरून फिरून यायचे तेव्हा आत जाण्यापूर्वी पायांवर पाणी घ्यायचे. एकदा, त्या पाण्यामध्ये मला ॐकार अगदी स्पष्टपणे दिसला. मी दादांना बोलावलं. ''दादा, लवकर इकडे या. पहा काय दिसतंय.'' ते पाहून भारावलेल्या स्थितीत आम्ही श्रीगुरुदेवचरणी नतमस्तक झालो.

**श्री. विश्वनाथ कालेकर** (मुंबई) ह्या कन्नडभाषिक गृहस्थांना १६ एप्रिल १९९७ ला श्रीगुरूंचे प्रथम प्रत्यक्ष दर्शन घडले. त्यानंतरच्या जेमतेम २ वर्षांच्या कालावधीत त्यांना काही थोड्या वेळा प्रत्यक्ष गुरुदर्शनाचा योग आला; पण श्रीगुरूंनी त्यांना असंख्य वेळा श्रेष्ठ प्रतीचे आध्यात्मिक अनुभव दिले आहेत. निरनिराळ्या तीर्थक्षेत्री, निरनिराळ्या दैवतांच्या दर्शनाच्या वेळी, अगदी कैलास–मानससरोवर यात्रांतही त्यांना सद्गुरूंनी विलक्षण प्रकारच्या दिव्य दर्शनाचे अनुभव दिले आहेत. त्या असंख्य अनुभवातला हा एक अनुभव–

''जून–जुलै १९९९ च्या (मुंबईतील) सत्संग मंडळाच्या बैठकीत श्रीगुरुदेवांच्या आरोग्यासाठी मृत्युंजय जप करावा, असे सर्व गुरुभक्तांना आवाहन करण्यात आले. त्याप्रमाणे मी जप करायला सुरुवात केली. रोज देवपूजेनंतर आणि दुपारी १२ च्या आधी काहीही न खाता जप करीत असे. त्याचा एकमेव उद्देश होता की ''हे ईश्वरा, माझ्या गुरुदेवांचे आरोग्य सुधार आणि त्यांच्या दर्शनाचा लाभ सर्वांना होऊ दे.'' ह्याप्रमाणे सतत ३ महिने (७ सप्टेंबर १९९९ पर्यंत) गुरुदेवांनी माझ्याकडून जप करवून घेतला. ८ सप्टेंबरला गुरुदेव ब्रह्मलीन झाले, त्या दिवशी माझ्या दुर्दैवाने रोजचा जप खंडित झाला, कारण मी सोरटी सोमनाथ ते मुंबई असा रेल्वेप्रवास करीत होतो व गाडी मुंबईस संध्याकाळी ४ वाजता पोहोचली. नंतर मला कळले की त्याच दिवशी गुरुदेवांनी देह ठेवला.

माझ्यासारख्या सामान्य माणसाला गुरुदेवांनी किती सहज मृत्युंजय जपाचे महत्त्व दाखविले. हा जप सुरू असतांना त्यांनी देह ठेवला नाही आणि सप्टेंबर १९९९ मध्ये एका अद्भुत अनुभवाने दाखवून दिले– एक दिवस नेहमीप्रमाणे मी ठरलेल्या वेळी देवपूजा करून मृत्युंजय जप करू लागलो. जप संपल्यावर आरतीच्या वेळी अचानक सर्व देवात– पूजेतील प्रत्येक मूर्तीत दिव्य प्रकाश दिसला व ते एकच शक्तीरूप आहे, असे वाटले. मी डोळे बंद करून परत डोळे उघडून पाहिले तरी दिव्य प्रकाश दिसतच होता. त्या अनुभवाने मी सद्गदित झालो. माझ्या तोंडून शब्द निघाले– ''धन्य झालो, धन्य झालो. माझ्यासारख्या पापी माणसाला तू दर्शन दिलेस.'' असे म्हणत उभा राहून नाचायलाच सुरुवात केली. डोळे भरून येऊन अश्रुधारा वाहू लागल्या.

**कै. श्री. वसंत मार्डीकर** (एम.एस्सी., निवृत्त वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सैन्य विस्फोटक नियंत्रणालय, पुणे) यांना २०१० मध्ये श्रीकैलास मानस यात्रेचा योग श्रीगुरूकृपेने आला. त्यांच्यासोबत सौ. मार्डीकर, गुरूबंधू श्री. भा. द. राव आणि

स्नेही श्री. व सौ. गरवारे होते. त्या यात्रेतील अविस्मरणीय अनुभवांविषयी ते लिहितात– ''कैलासशेजारच्या डोंगरावर असलेले शिवलिंगाकार पाहायला मिळाले. त्याचे फोटो काढले. दिरापुकच्या मुक्कामात मिळालेल्या खोलीच्या खिडकीतून तेजाने तळपणाऱ्या कैलासाचे नयनरम्य दर्शन रात्रभर होत होते. श्री. राव ह्यांना कैलासाच्या बर्फात शिवाच्या, शिवगणांच्या, अन्य देवतांच्या, ॐकाररूपी गणेशाच्या वेगवेगळ्या रूपातील दर्शने झाली. मला महालातील कमानींच्या गवाक्षात श्रीॐकार स्वरूप उजव्या सोंडेच्या गणेशाचे दर्शन झाले व त्याचे फोटो काढल्यावर तेसुद्धा फोटोत आले. **एका फोटोत श्रीसद्‌गुरूंचा पूर्ण चेहरा चष्मा–दाढीसह आला.** दयाळू श्रीसद्‌गुरूंनी माझी ती इच्छा निर्गुण स्वरूपात दर्शन देऊन पूर्ण केली.''

**डॉ. सौ. शैलजा विलास वांगीकर** (एम्.डी.डी.जी.ओ., स्त्रीरोगतज्ज्ञ), औरंगाबाद– ह्यांनी जून २००२ मध्ये श्रीकैलासमानससरोवराची यात्रा केली. त्या काळात सद्‌गुरूंनी त्यांना सतत सोबत केली– वेगळ्या वेषात. कैलास प्रदक्षिणेच्या पहिल्या दिवशी त्यांना 'कर्पूरगौर शिवाच्या मुखाचे दर्शन झाले व दुसऱ्या दिवशीही त्यांना श्रीशिवाच्या मुखाचे दर्शन होऊन जटांतून तेजस्वी रूपात गंगा नदी वाहतेय, असे दृष्य दिसले. तिसऱ्या दिवशी मुक्कामावर पोहोचल्यावर सौरऊर्जेवर चालणाऱ्या फोनने त्यांनी घरी संभाषण केले व ''माझी कैलासाची प्रदक्षिणा झाली व मला दोन वेळा शिवाचे दर्शन झाले'' असे सांगितले. तेव्हा घरून त्यांच्या यजमानांनी, त्यांना सत्संग बैठकीत ठेवलेल्या प. पू. सद्‌गुरूंच्या फोटोत त्यांना श्रीनृसिंहअवताराचे दर्शन झाले, असे सांगितले. (त्या दिवशी त्या बुद्धीला मुक्कामाला होत्या व सद्‌गुरूंनी असे सूचित केले की ''मी नृसिंहासारखा तुझ्या पत्नीच्या पाठीशी आहे.'' असा त्या दर्शनाचा अर्थ त्यांनी काढला.)

**(कै.) श्रीमती निर्मला गोळे (मुंबई)** – ''प. पू. गुरुदेव आमच्याकडे आले की श्री. गोळेसाहेब त्यांना सकाळी ७ ते ९ बाहेर नेऊन आणत. त्यावेळी घरात मी व एक सेवेकरी दोघेच असू. माहीमची गोष्ट– सकाळी आठ–साडेआठचा सुमार होता. मी स्वयंपाकाच्या गडबडीत होते व घरी असलेला सेवेकरी महाराजांची वस्त्रे धूत होता. मला एकदम हसण्याचा आवाज आला; खिदळण्याचा, धावाधाव केल्याचा आवाज आला. मी चकित झाले. घरात अन्य कोणीच नाही, मग आवाज कोठून येतो ते कळेना. म्हणून मी हळूच आमच्या स्वयंपाकघराचे जे दुसरे दार होते, त्या दुसऱ्या दारातून महाराजांच्या खोलीत डोकावून पाहिले; तेव्हा तेथे १२ ते १४ वर्षांची तीन मुले एकमेकांशी दंगामस्ती करतांना, खेळतांना दिसली. ते तिघे सोवळे नेसलेले

होते; दिसायला देखणे होते. लख्ख गोरे होते. त्यांचे केस मानेपर्यंत आलेले होते. मी त्यांच्याकडे पाहत आहे, हे लक्षात आल्यावर ते अदृश्य झाले; म्हणजे हॉलच्या खिडकीतून बाहेर निघून गेले. मी महाराजांना हा अनुभव सांगितला. तेव्हा ते म्हणाले, ''आम्ही आलो की आमच्याबरोबर हे येतातच.'' महाराज नेहमी म्हणत, **''आम्ही आलो की आमच्याबरोबर आमचे गुरू आणि परात्पर गुरूही येतात.''** ते त्यांनी मला दाखवून दिलं.

**श्री. राजेंद्र गोडबोले,** ॲडव्होकेट, हायकोर्ट औरंगाबाद (महाराष्ट्र राज्यपालांचे कायदेविषयक सल्लागार) – ''मला जो अनुभव सांगायचा आहे, तो महत्त्वाचा आहे. तो गुरुदेवांमुळे मिळाला. तो अनुभव जरी चमत्कार स्वरूपात मोडणारा असला तरी पण आपण मनाने जो विचार करतो, ते गुरुदेव त्यांच्या शक्तीने कसे तुमच्यासमोर उभे करतात, ह्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. धनंजय देशपांडे ह्यांनी, मला देवीला कुंकुमार्चन करायला सांगितले. मंत्रही दिले होते; नवरात्रात करायला सांगितले. आमच्यासारख्या २०–२२ जणांनी संकल्प केला. कुंकुमार्चनाचा मीही संकल्प केला; नवरात्रात ९ दिवस आपण देवीला कुंकू वाहू या! हे सगळं सोपं वाटलं. मंत्र म्हणायचे; कुंकू वहायचे त्या पाटावर. पण असे करण्यापेक्षा देवाचा टाकच विकत घेऊया व त्यावर कुंकू वाहू असे वाटले. तेवढ्यात सोलापूरच्या, देवीच्या एक मोठ्या उपासक आल्या होत्या सिडकोला. माझा मित्र म्हणाला, ''आपण जाऊ या देवीच्या दर्शनाला.'' आम्ही सगळे निघालो. आम्ही तेथे गेल्यावर त्या साध्वी म्हणाल्या, ''अहो, तुम्हाला एकाला देवी निश्चित दर्शन देणार आहे.'' आमच्यातली बरीच मंडळी धार्मिक होती. मी तसाही कर्मकांड करणारा माणूस नव्हतो. मी चेष्टेने मित्राला म्हटले, ''तुझ्याकडे देवी आली तर आम्हाला बोलाव बाबा दर्शनाला !'' अशी चेष्टा करीतच आम्ही परतलो.

मला आठवतं, तो अष्टमीचा दिवस होता. श्रीदत्तमहाराजांचे जे पुजारी होते, ते कामानिमित्त औरंगाबादला आले होते. त्यांची केस आमच्याकडे होती. ते ऑफिसमध्ये बसले होते आणि माझे देवीला कुंकुमार्चन चालू होतं. साधारण ७।।–८ ची वेळ होती. ते पुजारी भेटायला आले आहेत हे मलाही माहीत नव्हतं. माझ्या ज्युनिअरला मी सांगून ठेवलं होतं की ''मी पूजा करीत असतांना आतमध्ये कोणाला पाठवू नकोस.'' आणि अचानक जोरात पाऊस सुरू झाला. ८।।–९ ला लाईट गेले. आणि समईच्या प्रकाशात माझे कुंकुमार्चन चालू होते. समोर गुडघाभर पाणी

साठण्याइतका पाऊस जोरात सुरू झाला. मोठा आवाज येत होता. लखलख प्रकाशामध्ये कुंकुमार्चनाचा संकल्प माझ्याकडून देव पुरा करून घेत होता. एकेक कुंकूमार्चन वाहत असतांना शेवटचे आवर्तन झाले. डोकं खाली टेकले. समोरच्या ताटात कुंकवाचा पिरॅमिडसारखा डोंगर तयार झाला होता. डोकं टेकवल्यानंतर मोठा कडकड आवाज आला. जवळच वीज पडली असावी, असे वाटले. घरातली जमीन हादरली. प्रचंड मोठा धक्का बसला. खिडकीची तावदानंसुद्धा वाजली. डोके वर करून पाहतो तो ताटातील जो **कोरडा कुंकवाचा डोंगर होता तो ढासळला व कोरल्यासारखी देवीची मूर्ती बाहेर आली होती. आशीर्वाद देणारी मूर्ती, वैष्णोदेवीसारखी दिसणारी मूर्ती, महालक्ष्मीच्या स्वरूपातली मूर्ती प्रकट झालेली होती.** मी क्षणभर अवाक् झालो. मी म्हटलं हा भास आहे का प्रत्यक्ष मला दिसतंय आणि मी तसाच त्या मूर्तीला नमस्कार केला. दिव्य प्रकाशात ती मूर्ती, तो टोप, त्या गळ्यातल्या माळा– जसे मूर्तीकाराने दगडात मूर्ती कोरावी असं ते चित्र होते. Three Dimensional ! **केवळ तो भास नव्हता.** मूर्तीमधून नको तो कुंकवाचा भाग बाजूला पडून मूर्ती बाहेर यावी अशा पद्धतीची ती मूर्ती होती. एकदम माझं भान हरपल्यासारखं झालं. डोकं ठेवलं. डोळ्यातून पाणी यायला लागलं; आईवडिलांना बोलावून आणलं हा अनुभव सांगण्यासाठी! तसे माझे वडील अशा गोष्टीला न मानणारे होते. आई म्हणाली, ''हे काहीतरी वेगळेच दिसते. राजा, हे काहीतरी अघटित आहे.'' अघटित घटना तव शरणम् ।। हा चमत्कार मानावा, का देवाची, तुला जी मूर्ती अपेक्षित आहे ते परमेश्वराचे रूप तू पाहतो आहेस; ते तुझ्यासमोर ठेवतो आहे, ह्याचे ते प्रत्यंतर होते. देव आहे की नाही हे दाखवण्याची ती खूण होती. ती मूर्ती २–२ ।। पर्यंत होती. फक्त १८ लोकांनाच ती मूर्ती पाहता आली. नंतर एक संन्यस्त वृत्तीचा माणूस तेथे आला व म्हणाला, ''कृपया ह्याचा बाजार मांडू नका. कृपया ह्याचे फोटो काढू नका.'' माझ्या व्यवहारी मनात ह्याचे फोटो काढून घ्यावेत, असा भाव होता. मी दर्शन घेतलं. मला आठवतं २ –२ ।। वाजता ती मूर्ती, ते कुंकू पुन्हा खाली यायला लागलं. कुंकू पुसलं गेले. आणि **जे कोरडं कुंकू होतं, त्यात देवीने मला प्रत्यक्ष दर्शन दिले. हा माझ्या आयुष्यातला परमश्रेष्ठ दृष्टांताचा सगळ्यात मोठा अनुभव होता. हा अनुभव मी लगेच गुरुदेवांच्या कानावर घातला.** न्यायमूर्ती धनंजय देशपांडे म्हणाले, ''मी मुंबईत आहे, नाहीतर तात्काळ आलो असतो.'' मुखवटा दिसतो पण प्रत्यक्ष मूर्ती दिसणे हा एक मोठाच अनुभव आहे. लगेचच त्या धनलक्ष्मीने मला एवढी मोठी केस दिली की जवळजवळ ३५० डॉक्टरांची केस

माझ्याकडे आली. लक्ष्मी मला पैसा देऊन गेली. त्यामुळे माझा प्लॉट झाला, ही व्यावहारिक बाजू झाली. प्रत्यक्ष माझे अस्तित्व ''देव आहे की नाही, याची माझ्या मनात कुठेतरी शंका होती, पण ''तो आहे, फक्त विश्वास ठेव'' हे भाव पक्का करण्यासाठी हा सगळ्यात मोठा अनुभव मला मिळाला.

ह्याला तुम्ही चमत्कार म्हणा, काही म्हणा; मी एवढेच म्हणेन की परमेश्वराचे अस्तित्व आहे का, तर ते अस्तित्व महाराजांनी त्यांच्या कृतीतून माझ्यासारख्या विज्ञानवादी दृष्टिकोन असलेल्या माणसाला दाखविले; व शिकवले की प्रत्येक घटनेकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहू नकोस. **तुमचे विज्ञान जेथे संपते तेथे आमचे कार्य सुरू होते.** माझी इच्छा त्यांच्या कृपेने पूर्ण झाली.''

* * *

## सद्‌गुरूंकडे काय मागावे?

**श्री. गोविंद भीमाशंकर कुकडे,** अहमदनगर

सद्‌गुरूंचे चरण माझ्या घराला तीन वेळा लागले. १९९२ साली तिसऱ्या वेळी ते माझ्या घरी आले, त्यावेळी पाद्यपूजा झाली. सद्‌गुरूंनी आशीर्वाद दिला. त्यानंतर त्यांनी विचारले, ''काय मागायचे तुला?'' मी म्हणालो, ''सद्‌गुरू मला आपले आशीर्वाद असावेत.'' ते म्हणाले, ''तुमच्या पुढच्या सात जन्मांचे आशीर्वाद मी दिलेले आहेत.'' मी म्हणालो, ''कृपादृष्टी असावी.'' ते म्हणाले, ''कृपादृष्टी असल्याशिवाय हे दिसते काय, असे नाही मागायचे गोविंदा!'' मी म्हणालो, ''काय मागायचे हे मला समजत नाही. काय मागतात हे मला कळत नाही.'' मी थोडा भावनाविवश झालो. सद्‌गुरू म्हणाले, ''वेड्या, वर बघ! म्हण, 'माझी आठवण ठेवा;'' त्यावेळेस असे वाटले की सद्‌गुरूंनी आपली आठवण ठेवावी असे आपण काय करू शकू? काहीही करू शकत नाही; हे विचारांचे द्वंद्व मनात चालू होते. डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहत होत्या. गुरुदेव दुसऱ्या वेळेस पुन्हा म्हणाले, ''म्हण, माझी आठवण ठेवा.'' तरीही माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. तिसऱ्या वेळेस दरडावून त्यांनी मला मोठ्याने सांगितले; मग मी कातर आवाजात सद्‌गुरूंना ''माझी आठवण ठेवा.'' असे म्हटले. ते म्हणाले, ''येथून पुढे काय मागायचे? असे मागायचे. तुम्ही तर माझी आठवण ठेवणारच. पण मला तुमची आठवण झाली पाहिजे.'' त्याही वेळेस परत सद्‌गुरूंना विचारावेसे वाटले की, ''महाराज आम्ही काय करू शकू तुमच्यासाठी?'' पण नाही विचारले. त्यांना जे काही अभिप्रेत असेल ते त्यांनाच माहीत. आपण त्यांनी दिलेले जे कार्य आहे ते करून त्यांची आठवण जागृत ठेवावी म्हणजे त्यांना आपली आठवण राहील, असे मनोमन मला वाटते आणि तेच सत्य आहे.



# ९.
# दिव्य अनुभूती देणारे श्रीगुरुदेव

**श्री. अनिल वासुदेव पाटणकर**

बी. ई. (वास्तुबांधकाम सल्लागार,

निवृत्त अध्यक्ष सत्संग मंडळ, ठाणे)

श्रीगुरुदेवांच्या अंगी असलेल्या ईश्वरी शक्तीची प्रचीती असंख्य भक्तांना अनेकदा आलेली आहे. भक्तरक्षणापासून भक्तांच्या शिक्षणापर्यंत आणि स्वप्नदर्शनापासून प्रत्यक्ष दर्शनापर्यंत विविध प्रकारचे विशेष स्वरूपाचे अनुभव त्यांच्याकडून भक्तांना लाभले आहेत. भक्ताची पात्रता, त्याची विशिष्ट परिस्थितीतील आवश्यकता व त्याची आर्तता लक्षात घेऊन सद्‌गुरु त्याला विशेष स्वरूपाच्या अनुभवाद्वारे साहाय्य व मार्गदर्शन करीत असत. त्यामुळे भक्तांची श्रद्धा दृढ होत असे व त्यांचा परमार्थ मार्गावरील वाटचाल करण्याचा उत्साहही वाढत असे. जवळजवळ प्रत्येक भक्तालाच त्यांच्याकडून 'अनुभवांचा' लाभ झाला असून देहत्यागानंतरही सद्‌गुरुंकडून भक्तांना सतत अनुभवप्राप्ती होत असते. त्या सर्वांच्या सर्व 'अनुभवांची' नोंद करणेही अशक्य आहे; परंतु प्रातिनिधिक स्वरूपात त्यातील काही भक्तांना लाभलेल्या गुरुकृपेच्या अनुभवांचा येथे उल्लेख करता येईल.–

## निसर्गही आमच्या मदतीला धावून आला

**अनिल वासुदेव पाटणकर**

सद्‌गुरूंचा ५९ वा वर्धापन दिन श्रीद्वारकाक्षेत्री साजरा करण्यासाठी आमच्या सत्संग मंडळाचे सर्व कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले. उत्सवापूर्वीचे सबंध वर्ष त्या विचारांत, कृतीत आम्ही मग्न होतो. प्रत्येक घरी उत्सवाचाच विषय प्रमुख होता, इतर अन्य विषय दुय्यम होते. सर्वजण भारावून गेलो होतो. त्या अत्युच्च क्षणाची

आतुरतेने वाट पाहात होतो. परप्रांतात जाऊन उत्सवाचे आयोजन करणे एरवी किती अवघड आहे, परंतु सद्गुरुकृपेने सर्व अडथळे दूर होत गेले. श्रीद्वारकेतील रहिवासी, पुजारी, धार्मिक संस्थांचे, धर्मशाळांचे अधिकारी यांचे साहाय्य होऊ लागले. एवढेच काय पण **निसर्गही आमच्या मदतीला धावून आला.** आम्ही प्रथम जून महिन्यात द्वारकेस गेलो. त्यावेळेस असे कळले की येथे पाण्याचे दुर्भिक्ष्य असते. गेल्या ३ वर्षांत केवळ २।। इंच पाऊस झाला. त्यामुळे पाण्यातील क्षारही वाढले. तसेच वीजपुरवठाही सतत खंडित होतो. मोठाच अवघड प्रश्न होता. ८००–१००० भक्त या उत्सवास येणार आणि पाणीपुरवठा अत्यंत अपुरा असल्यास सर्वांनाच त्रास होईल. परंतु सद्गुरूंचा उत्सव योग्यरीतीनेच साजरा होणार, हा ईश्वरी संकेतच आहे आणि या विश्वासाने तेथील रहिवाशांना सहज बोलून गेलो की, आमच्या सद्गुरूंचा जन्मोत्सव साजरा होणार आहे, म्हणजे यावर्षी निश्चितच पाऊस चांगला होणार. आणि काय आाश्चर्य सद्गुरूकृपेने खरोखरच **त्यावर्षी तब्बल २५ इंच पाऊस झाला.** म्हणजे ३ वर्षांत केवळ एकूण २।। इंच पाऊस, आणि यावर्षी २५ इंच! श्रीगुरूमहिमा अगाध आहे हेच खरे! यावर आणखी कळस म्हणजे उत्सवाची सांगता झाली व सद्गुरूंचे प्रयाण झाल्यावर दुपारनंतर वादळी वारे वाहू लागले. आकाशात ढग जमा झाले आणि चक्क फेब्रुवारी महिन्यातील त्या दिवशी चांगलाच पाऊस पडला. दुसऱ्या दिवशी सकाळीही पुन्हा आम्ही मागे राहिलेले कार्यकर्ते परतत असतांना पाऊस झाला. द्वारकेतील रहिवासी म्हणाले की, ''यापूर्वी या काळात कधीही पाऊस झाला नाही, हे सर्व काही तुमच्या गुरुदेवांच्या कृपेनेच झाले.'' नंतर उत्सव संपल्यावर सर्व आवराआवरी करून आमच्यापैकी काही मंडळी नगरला गुरुदेवांच्या दर्शनासाठी गेली. त्यावेळी सद्गुरूंनी विचारले की, ''मी निघाल्यानंतर द्वारकेत पाऊस झाला का?'' तेव्हा ही मंडळी अचंबित होऊन 'हो' म्हणाली. तेव्हा प. पू. गुरुदेव म्हणाले, ''तुम्ही आमच्या कार्यक्रमपत्रिकेत उल्लेख केला होता की द्वारकेत पाणी कमी असल्याने पाण्याचा वापर जपून करावा. तेव्हा आपण वापरलेले पाणी त्यांना पुन्हा परत केले.'' सर्वजण हे ऐकून नतमस्तक झाले. हे भगवंता, तुझा महिमा अगाध आहे. या उत्सवाच्या आयोजनाबद्दल सद्गुरूंनी समाधान व्यक्त केले आणि आमच्या मंडळातील कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचे सार्थक झाले.

**श्रीमती सिंधूताई क्षीरसागर,** अहमदनगर ह्यांनी प्रा. डॉ. रोहिणी अय्यर ह्यांना सांगितले की, – ''एकदा श्रीगुरुदेवांच्या आईसाहेब आणि हरदासांच्या वहिनी बोलत होत्या– ''आम्हाला कुठे जाता येत नाही, वयाच्या मानाने! गंगास्नानाला

जायचंय, पण आम्ही घरीच बसलोय.'' महाराज म्हणाले, ''तुम्हाला गंगास्नानाला जायचंय? चला, एक पातेलं आणा. त्यांच्यासमोर पातेलं ठेवलं, खळखळा पाणी वाहू लागलं. महाराज म्हणाले, ''करा, किती अंघोळ करायची ती.'' त्यानंतर मात्र ते पाणी एक छोट्या डबीत गेलं; हे मी प्रत्यक्ष पाहिलं.

एकदा संध्याकाळी पूजेच्या वेळी समईत घालायला तेल नव्हतं. श्रीगुरूंनी पाणी ओतलं समईत आणि समई तेल घातल्यासारखी तेवली. हेही मी प्रत्यक्ष पाहिलं आहे.

**श्रीमती उज्ज्वला केशव पोथरकर** (अहमदनगर) ह्यांनी नोंदविलेला अनुभव असा–

प. पू. गुरुदेवांचं महानिर्वाण झालं. त्यावर्षी दत्तजयंतीच्या उत्सवाची तयारी सुरू झाली. आमची नेहमीप्रमाणे धान्य निवडण्याची सेवा सुरू झाली. त्यावर्षी वास्तूच्या गच्चीवर धान्य निवडणे चालू होते. दुपारी ३ ।।–४ ची वेळ! आम्ही ठरविले, वेदान्त वास्तूचे चार जिने, लक्ष्मी मंडपाचे दोन जिने चढण्याउतरण्यात वेळ घालवण्यापेक्षा घरी जातानाच दर्शन घेऊ; पण चारच्या सुमारास अचानक (श्रीगुरुदेवांच्या खोलीत गेल्यावर जो विशेष प्रकारचा सुगंध यायचा) तो सुगंध यायला लागला. गच्चीवर खूप वारा होता. एवढ्या उंचीवर हा सुगंध कसा काय येतो, म्हणून आम्ही एकमेकींना विचारायला लागलो. प्रत्येकीला गुरुदेव जिने चढून आल्याचा भास होत होता. असे १० मिनिटे झाले. गुरुदेवांची दर्शनाची वेळ संपली. ते फिरायला जायची वेळ झाली व मग सुगंध कमी होत गेला. प्रत्यक्ष गुरुदेवच दर्शन द्यायला वर आले होते, आम्हाला जिने चढण्याउतरण्याचा त्रास नको म्हणून! आमची ती भारावलेली अवस्था संपली. आमची चूक आमच्या लक्षात आली. सगळ्यांनी श्रीगुरुदेवांची क्षमा मागितली व परत नेहमीप्रमाणे दर्शनाच्या वेळेस खाली उतरू लागलो. प्रत्येकाच्या दर्शनाच्या वेळेस गुरुदेव त्या त्या भक्ताची वाट पाहत असत. एखादेवेळी त्या वेळी गेलो नाही तर चौकशी करीत.

**(कै.) डॉ. भिकुअण्णा खासनीस ह्यांनी १९५४ च्या सुमारास लिहिलेल्या 'श्रीरामरायमाहात्म्य' ग्रंथात लिहिलेला एक अनुभव**

अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा तालुक्यात मांडवगणला सिद्धेवर हे अतिप्राचीन शिवमंदिर आहे. या मांडवगणला प्रतिकाशी असे म्हटले जाते. तेथे दर बारा वर्षांनी श्रावणमासात स्वाहाकारसोहळा होत असे. त्या तीन दिवसात अखंड जलधारेने रुद्राभिषेक केला जातो. या सोहळ्यास मोठ्या यात्रेचे स्वरुप प्राप्त होई. नगरचे अनेक

भाविक भल्या पहाटेच त्यासाठी तेथे जात. एकदा अनेक भाविक तेथे गेले पण काहींना आर्थिक अडचणीमुले तेथे जाता आले नाही. त्या दिवशी, रामरायाने पूजा झाल्यावर दर्शनासाठी आलेल्या भक्तांना विचारले, ''तुम्ही मांडवगणाला का नाही गेलात?'' त्यावर काहीजण म्हणाले, ''कसं जाणार महाराज? पैसा तर हवा ना येण्याजाण्याला?'' त्यावर रामरायाने विचारले, ''कोण कोण गेले आहेत तेथे?'' उत्सवास गेलेल्यांची नावे सांगितली गेली. रामरायाने स्मितहास्य करून, समोर बसलेल्या भक्तांना विचारले, ''तुम्हाला देखील त्या उत्सवाचे दर्शन घ्यायचे आहे का?'' आश्चर्यचकित झालेल्या भक्तांनी उत्तर दिले– ''हो.'' ''पण ते कसं शक्य आहे?'' रामरायाने सर्वांना म्हटलं, ''चला तर बसा. नीट डोळे बंद करा व मी सांगतो ते ऐका. जे ऐकाल ते तुम्हाला दिसेल. तेथील उत्सवाचे वर्णन मी येथे बसून सांगतो. ते ऐका व नीट बघा.'' आश्चर्य म्हणजे प्रत्येकाला मांडवगण सिद्धेवर मंदिर दिसू लागले. सकाळी नगरहून तेथे गेलेले भाविक दिसू लागले. तेथील सोहळा जसाचा तसा सर्वांनी पाहिला. भक्तांनी डोळे उघडले. त्यांना विशेष प्रकारचा आनंद झाला होता. संध्याकाळी मांडवगणहून परत आलेल्या भक्तांना विचारले तेव्हा त्यांनी केलेले वर्णन आणि रामरायाने घडविलेले दर्शन यांत काहीच फरक नव्हता. घरी बसून मांडवगणच्या सिद्धेश्वराचे दर्शन भक्तांना घडवले रामरायाने!

**(कै.) डॉ. विकास मांडके** (निवृत्त डे. डायरेक्टर इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च) मुंबई

बोरीवलीच्या सौ. राजश्री देशपांडे ह्या गुरुदेवांच्या भक्त आहेत. त्यांच्या घराजवळ महाराजांचे दुसरे भक्त कै. श्री. सुधीर आचरेकर रहात असत. सौ. देशपांडे एकदा दुपारी आपल्या घरी देवासमोर श्रीगुरुचरित्राची अवतरणिका वाचत बसल्या होत्या. वाचता वाचता त्यांना अवतरणिकेमध्ये श्रीगुरुदेव दिसायला लागले. ते म्हणाले, ''ऊठ, वाचत काय बसलीस? आचरेकर गेले आहेत, त्यांच्या तोंडात तीर्थ घाल.'' हे ऐकताच त्यांनी ताबडतोब आचरेकरांच्या घरी फोन केला तेव्हा आचरेकर कॉटवर पडले होते व त्यांची पत्नी देवासमोर नामस्मरण करीत बसली होती. सौ. देशपांडे ह्यांनी यावेळी दुपारी कसा फोन केला, ह्याचे सौ. आचरेकरांनी आश्चर्य व्यक्त केल्यावर सौ. देशपांडे ह्यांनी ह्यावेळी ही हकिगत त्यांना सांगितली. तेव्हा त्या तीर्थ घेऊन श्री. आचरेकरांजवळ गेल्या. आचरेकरांचे सर्वांग थंडगार पडले होते. हाक मारता त्यांना कुठलाच प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी श्री. आचरेकरांच्या तोंडात तीर्थ टाकले. काही वेळाने श्री. आचरेकर थोडा प्रतिसाद देत

शुद्धीवर आले.

**श्रीमती सत्यभामाबाई राजाराम खोले,** (चिंचवड, पुणे)

चैत्र वद्य एकादशी शके १९०६. ब्रह्मायोग बव करण इंग्रजी दिनांक २६–५–१९८४ या दिवशी प. पू. गुरुदेव घरी आले. त्यांना बसायला फुलांचे आसन केले. पाय ठेवायला छोटा नवा पाट मांडला. त्यावर रेशमी कापड घातले. पाटही आमच्या भावाकडून आणला होता, नवा होता म्हणून! प. पू. गुरूदेव आले. आसनावर बसले. निघतांना त्यांना चहा दिला. तो त्यांनी थोडाच घेतला व बाकीचा प्रसाद म्हणून मुलाला दिला आणि जातांना सांगितले की ''तुला काय द्यायचे ते दिले आहे.'' त्या दिवशी आम्ही प. पू. सद्‌गुरूंचे अधिष्ठान तसेच ठेवले. **दुसऱ्या दिवशी आवरतांना पाटावरती सद्‌गुरूंची पावले उमटलेली होती.** मग आठवले की प. पू. गुरुदेवांचे शब्द की ''तुला काय द्यायचे ते दिले आहे.'' प. पू. गुरुदेवांना ही गोष्ट सांगितली. त्यांनीच तो प्रसाद दिला. माझी मुले त्या पादुकांची व्यवस्थित सेवा करतात. त्या रूपाने प. पू. गुरुदेव आमच्या घरी निवास करताहेत. माझ्या मुलांच्या भावना इतक्या तरल आहेत की सकाळी चहापासून प. पू. सद्‌गुरूंना नैवेद्य दाखविला जातो. त्यासाठी मधल्या मुलाने चांदीची कपबशी आणली आहे. हे गुरुसेवेचे व्रत वंशपरंपरी सांभाळले जावे हीच इच्छा आहे. आज माझे वय ९२ इतके आहे. तरीही मी कोठेही गेले तरी चिंचवडला घरी परत जाते. माझ्या लेकी–सुना मला बोलावितात, पण माझे मन कुठेही रमत नाही. मी लगेचच चिंचवडला परत येते. **कारण तेथे प. पू. गुरूदेव आहेत.**

**सौ. लीला हर्डीकर,** पुणे – एके दिवशी रात्री झोपल्यानंतर साधारण तीनच्या सुमारास मला जाग आली. सतत प. पू. श्रीगुरूंचे स्मरण व दर्शन घडावे या हेतूने त्यांचा फोटो माझ्या उशाच्या भिंतीवर व झोपूनही दिसेल अशा रीतीने लावला आहे. बाजूच्या भिंतीवर प. पू. गुरुदेवांचे फोटो लावले आहेत. दिव्याच्या मंद प्रकाशात मी अगदी पूर्णपणे जागी असतांना माझे फोटोकडे लक्ष गेले आणि काजव्यासारखा असा निळ्या प्रकाशाचा पुंजका तिथून सरकून माझ्या शेजारी निजलेल्या डॉ. हर्डीकरांच्या सर्व अंगभर फिरत आहे असे दिसले. नंतर तो निळा प्रकाश पुंजका खिडकीच्या दिशेने आपोआप विरून गेला. हे सर्व मी पाहात होते. एअर कंडिशनर चालू असल्याने सर्व खिडक्या व दारे बंद होती. मग हे कसे घडले? हे काय होते? आम्ही उभयतांनी शाश्वत पूजा केली असल्याने माझ्या मनात आले की डॉक्टरांभोवती प. पू. सद्‌गुरूंचे संरक्षक कवच आहे हे नक्की! संकटातून ते आपले रक्षण करत आहेत. मी भक्तीभावाने

हात जोडले. नगरला जाऊन घडला प्रकार प. पू. श्रीगुरूंच्या कानावर घातला. ते काय असावे असे विचारले असता, ''तो शक्तीचाच पुंजका होता व तो सदैव तुमचे रक्षणच करील,'' असा त्यांनी शुभाशीर्वाद दिला. खरोखर पुढे जी जीवघेण्या भयानक मोटार अपघाताची घटना घडली, त्यातून डॉक्टर सहीसलामत व सुखरूप बाहेर कसे पडले त्याचे रहस्य आता उलगडले. प. पू. स्वामींच्या शक्तीचे कवच भेदण्याची त्या कळीकाळालाही हिंमत होणार नाही, याची खात्री पटली.

## आयुष्यभर पुरणारी पुरणाची आठवण

**श्रीमती मंगला साठे**
(केटरिंग कॉन्ट्रॅक्टर व
संचालिका 'विजय स्टोअर्स', विलेपार्ले, मुंबई)

गुरुपौर्णिमेचा उत्सव होता. दोन दिवस आधीच आम्ही नगरला गेलो होतो. एवढ्या मोठ्या उत्सवाला येणाऱ्या सर्वांसाठी पुरणपोळ्या करायच्या होत्या. सगळ्या गोष्टी जुळवून आणणं कठीण होतं. (पोळ्या करणाऱ्या बाईची 'अडचण' नसणं, बाई ब्राह्मण असणं इ.) पण स्वामींनी ते व्यवस्थित करून घेतले. आमच्या दुकानात जोशीबाई आहेत. त्या पुरणपोळ्या करून देतात. त्यांना आम्ही विचारले. हो नाही, करता शेवटी त्या तयार झाल्या. त्या, त्यांचे यजमान व मुलगी अशा सगळ्यांना घेऊन आम्ही नगरला आलो. आधल्या दिवशीच पोळ्यांना सुरुवात केली; कारण एवढ्या पोळ्या एका दिवसात झाल्या नसत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ–साडेआठला परत पुरणपोळ्या करायला सुरुवात केली.

जेवायच्या पंगती सुरू झाल्या. लोक जेवायला बसले. ''एवढ्या पोळ्या पुरतील का?'' भाऊसाहेब गोळे आत येऊन विचारत होते. ''लोक चार–चार–पाच पोळ्या खात आहेत. साठे, पोळ्या पुरतील का?'' तर साठे म्हणाले, ''स्वामींनी सांगितले आहे, एवढी डाळ लावा. मी काही परत डाळ लावणार नाही; आहे त्यातच बघू या.''

सकाळी **साडेआठला** जेव्हा आम्ही पोळ्यांना सुरुवात केली त्यावेळेस मोठी परात भरून पुरण होते. सगळेजण पोळ्या लाटत होते. **साडेअकरा, पावणेबाराला** लक्षात आले की **एवढ्या पोळ्या आपण सकाळपासून केल्या पण पुरण संपतच नाही.** नंतर पंगती सुरू झाल्या. खूप माणसे जेवायची होती. त्यामुळे आम्ही फारसे लक्ष दिले नाही; पण दोन वाजल्यानंतरही **परातीतील पुरण कमी होतच नव्हते.** जेवढे सकाळी होते तेवढेच दिसत होते. त्या बाईंची मुलगी म्हणाली, ''अहो वहिनी,

तुमच्या लक्षात आले का? **पुरण संपतच नाही आपलं! आपण एवढ्या पोळ्या सकाळपासून करत आहोत तरीही!**'' मग मी मनाशी म्हणाले, ''स्वामी आता पुरे. आम्ही दमलो पोळ्या करून!'' पण परत वाटले आपण चुकलो की काय? मग मी साठ्यांना म्हटले की, ''आपण वर जाऊन स्वामींच्या कानावर घालूया की असे असे आहे.'' कारण अडीच वाजले होते. जेवणे पण होत आली होती. आम्ही वरती गेलो. **गुरुदेवांना नमस्कार केला आणि म्हणालो, ''स्वामी पुरण संपतच नाहीये. सकाळपासून आम्ही एवढ्या पोळ्या करत आहोत, वाढत आहोत पण परातीतील पुरणाचा गोळा जेवढा आहे तेवढाच आहे. पुरण संपतच नाही.'' स्वामी हसले व म्हणाले, ''गुरुचरित्र घडलंय.''** एवढं आम्हाला भरून आलं की केवढा अनुभव होता तो! तुम्हाला सांगते, विषय निघाला की अजून माझ्या डोळ्यासमोर तो अनुभव येतो की सर्वजण पोळ्या लाटताय, पुरण भरलं आहे; ते दृश्य दिसते. **साधारणपणे ५००० लोक होते.** सगळ्यांनी भरपूर पोळ्या खाऊनही मी नगरला पोळ्या वाटल्या. काही पोळ्या मी मुंबईला घेऊन आले. मला जेथे जेथे प्रसाद पाठवता आला तेथे मी पाठवला. निघतांना सगळ्यांना प्रसाद दिला. अहो, केवढ्या पोळ्या होत्या त्या...! ज्यांना काही माहिती नव्हती त्यांनी पण प्रसाद खाल्ला. गणतीच नाही. खरोखरीच अगणित!

महाराजांकडे ज्या वेळेस सुरुवातीला आम्ही गेलो होतो त्यावेळेस महाराजांनी एक गोणी डाळ लावायला सांगितली होती. वरती एक दाणा पण जास्त लावायचा नाही. आधीच महाराजांना सगळे विचारूनच पुरण लावले. गोळे साहेब पंगती सुरू असताना कितीतरी वेळा येऊन विचारून गेले– ''साठे, पोळ्या पुरतील ना? लोक चार–चार पोळ्या खात आहेत.'' हे म्हणाले, ''पुरतील हो, महाराजांनी सांगितले ना! आणखीन डाळ शिजत लावायची नाही.''

हा फार मोठा अनुभव आठवून माझ्या डोळ्यात पाणी येते व रोमांच उभे राहतात. नंतर स्वामींनी आमचा सत्कार केला. मला स्वामींच्या हातून साडी मिळाली. स्वामींनी स्वतः मला ती दिली. मी ती जपून ठेवली आहे. एक–दोनदाच ती नेसली. सुनेला पण सांगून ठेवले आहे. ती साडी मी तुला देईन. तू ती कपाटात जपून ठेव प्रसाद म्हणून. श्रीगुरुदेवांनी ह्यांना देवस्थानाचे नाव लिहिलेले उपरणं, श्रीफळ आणि सोन्याचे गुरुचरण दिले. सोन्याचे गुरुचरण पूजेत ठेवले आहेत. पूजा करतांना 'त्या' प्रसंगाची व श्रीगुरुकृपेची उत्कटतेने आठवण होते आणि मन प्रसन्नतेने व कृतार्थतेने भरून जाते.

# गुरुवाणी आणि आकाशवाणी

**प्रा. अ. म. सुरू**
(निवृत्त प्राचार्य, नौरोसजी वाडिया कॉलेज, पुणे)

दि. २२ मार्च १९७९ ची ही घटना! दुपारी दीडच्या सुमारास आकाशवाणीने सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसेनानी व लोकनेते श्री. जयप्रकाश नारायण ह्यांचे मुंबईत निधन झाल्याचे वृत्त प्रसारित केले. त्यावेळी श्री. जयप्रकाशजी मुंबईत जसलोक रुग्णालयात उपचार घेत होते. आकाशवाणीने दिलेल्या बातमीनंतर त्यावेळचे पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनीही संसदेत श्री. जयप्रकाशजींना श्रद्धांजली वाहिली.

त्या दिवशी दुपारी ४ च्या सुमारास श्री. मधुकर पवार हे गुरुभक्त नगरला श्रीगुरुदेवांच्या दर्शनासाठी गेले व त्यांनी श्रीगुरुदेवांना श्री. जयप्रकाशजी गेल्याची आकाशवाणीने सांगितलेली बातमी सांगितली. ती ऐकताच **श्रीगुरुदेव उद्गारले, ''शक्य नाही.''** ते ऐकून श्री. पवार व इतर उपस्थित गुरुभक्त आश्चर्यचकित झाले. श्रीगुरुदेवांचे बोलणे ऐकून त्यांना सर्वांना विस्मय वाटला. नंतर बातमी आली की **आकाशवाणीने श्री. जयप्रकाशजींच्या निधनाचे वृत्त चुकीने दिले होते.**

ह्याच धर्तीवर आणखी एक प्रसंग उल्लेखनीय आहे. श्रीक्षेत्रनृसिंहवाडी येथे श्रीगुरुंचे वास्तव्य असतांना एका सकाळी ते गुरुभक्त श्री. मांगीलाल शेठ ह्यांच्याशी बोलत होते. अचानक ते श्री. मांगीलालना म्हणाले, ''तुम्ही जरा बाहेर बसा. मला जरा निवांत बसू द्या.'' तेव्हा श्री. मांगीलालजींनी त्यांना विचारले, ''गुरुदेव आपली प्रकृती ठीक नाही का?'' तेव्हा श्रीगुरुदेव म्हणाले, ''तसं नाही. एक फार मोठी श्रीधरस्वामी नावाची शक्ती – आज सकाळी अनंतात विलीन होणार आहे. म्हणून मला त्यांना अभिवादन करायचे आहे.''

संध्याकाळी एक आमदार श्रीगुरुदर्शनाला आले व ते म्हणाले, ''आताच **संध्याकाळी** आकाशवाणीने प्रादेशिक बातम्यांत, प. पू. श्रीधरस्वामींनी देह ठेवल्याचे सांगितले.''

हे वृत्त तर श्रीगुरुदेवांनी **सकाळीच जाणले व सांगितले होते.**

# श्रीगुरुदेवांना झालेला सर्पदंश

## (भगवान श्रीदत्तात्रेयांशी असलेल्या एकरूपत्वाचा अद्‌भुत अनुभव)

**श्री. चंद्रकांत नरहरपंत देशपांडे,**
निवृत्त रेल्वे अधिकारी, पुणे

श्रीगुरुदेवांच्या बालपणी त्यांना जे विलक्षण अनुभव आले, त्यांच्या आयुष्यात ज्या अत्यंत आश्चर्यकारक घटना घडल्या, त्यापैकी त्यांना झालेल्या विषारी सर्पदंशाची घटना अत्यंत अद्‌भुत घटना आहे. त्या घटनेविषयीची माहिती मिळविण्यासाठी श्रीगुरुदेवांचे ज्येष्ठ बंधु (कै.) विनायकराव उर्फ दादासाहेब क्षीरसागर ह्यांना ते हयात असताना भेटून त्यांची मुलाखत घेतली गेली. (ती ध्वनिमुद्रित केली आहे). कै. दादासाहेब त्या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार होते, इतकेच नाही तर (श्रीगुरुदेवांनी आधीच देऊन ठेवलेल्या सूचनांनुसार) उपाययोजना करण्यात ते सहभागी होते. त्यांनी त्याबाबत सांगितलेली माहिती अशी–

महाराज रोज दूध आणायला जात असत. एकदा संध्याकाळी साधारण ७.३० वाजायच्या सुमारास मी महाराजांना दूध आणायला सांगितलं. त्यांनी दूध घेतलं व येतांना बोळात त्यांच्या पायाला नाग चावला; अंगठा व बोटाच्या मध्ये. त्यांना ते कळेपर्यंत वेळ लागला. तसेच घरी आले व त्यांनी आम्हाला सगळे सांगितले आणि मग एकच सांगितले, ''मला दवाखान्यात नेऊ नका; फक्त तुम्हाला माझ्याजवळ ३ दिवस बसायला लागेल. लिंबाचा पाला माझ्या शरीरावर खालीवर पसरा. मला खूप काळपटपणा येईल. मी बेशुद्ध पडेन.'' एवढं बोलून ते बेशुद्ध पडले. आम्ही त्यांच्या उशाशी ३ दिवस बसून राहिलो. बाहेरच्या लोकांनी आम्हाला वेड्यात काढलं, पण महाराजांचा शब्द आम्हाला प्रमाण होता. त्यांनी डॉक्टरांना न आणण्यास सांगितलं होतं. चौथ्या दिवशी गावात जे दत्ताचं देऊळ होतं तेथून ३ पितळी बादल्या दुधासारखं पांढरं तीर्थ वाहायला लागलं; ते पाहणाऱ्या प्रत्येकाने तीर्थ वाटी वाटी प्राशन केले. ज्यावेळी हे तीर्थ वाहण्याचं पूर्ण बंद झालं त्यावेळी महाराजांना शुद्ध आली. महाराज उठून बसले. त्यांच्या त्वचेवर जो काळपटपणा आला तो ह्याचमुळे.

ही माहिती ऐकल्यावर जे स्पष्टपणे जाणवले ते असे–

(१) श्रीगुरुदेवांना त्या बालपणीही जी सर्वज्ञता श्रीगुरुकृपेने लाभली होती, तिच्यात भविष्यकाळात घडणाऱ्या घटनांचे, विशेषतः आपत्तींचे ज्ञान तर होतेच, शिवाय येणाऱ्या आपत्तीच्या निवारणासाठी करावयाच्या उपाययोजनांचेही ज्ञान होते. येणाऱ्या आपत्तीची माहिती त्यांनी आपल्या कुटुंबीयांना आधीच देऊन ठेवली होती.

इतकेच नाही तर करावयाची उपाययोजनाही सांगून ठेवली होती. सर्व कुटुंबीयांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली हेही विशेषच होते, कारण ती कार्यवाही जनरीतीला धरून नव्हती.

(२) इतिहासकाळात संत मीराबाई या राजस्थानातील श्रीकृष्णभक्त संतमहिलेवर झालेल्या विषप्राशनाचा, तिच्या कुटुंबीयांकडूनच झालेल्या सक्तीच्या घटनेचा उल्लेख तिच्या चरित्रात वाचायला मिळतो. मीराबाईने ते विष प्राशन केले परंतु तिच्यावर त्या विषाचा काहीच परिणाम झाला नाही. मात्र तिच्याजवळ सतत असणाऱ्या भगवान श्रीकृष्णाच्या मूर्तीवर तो झाला. ती मूर्ती काळीनिळी झाली. मीराबाई श्रीकृष्णाशी किती एकरूप झाल्या होत्या ह्याचेच ते दर्शन होते.

श्रीगुरूदेवांवर सर्पदंशामुळे झालेल्या विषप्रयोगाचे संत मीराबाईंवरील विषप्रयोगाशी या बाबतीत साधर्म्य दिसते. श्रीगुरूदेवांवरही सर्पदंशाच्या विषाचा विपरीत परिणाम झाला नाही. (फक्त त्वचेचा रंग बदलला, तो 'श्यामवर्ण' झाला. जसा समुद्रमंथनात वर आलेले हालाहल विष प्राशन करणाऱ्या भगवान शिवशंकरांचा फक्त कंठ निळा झाला.) भाविक भक्तांनी तीर्थ समजून त्याचे प्राशन केले म्हणजे विष हे अमृत झाले. ज्या क्षणी मूर्तीतून येणारा तो प्रवाह थांबला, त्या क्षणी बाल गुरुदेव शुद्धीवर आले.

शरीरावर विषाचा परिणाम न होणे, श्रीदत्तमूर्तीतून धवल दुग्धप्रवाह वाहणे व तो प्रवाह थांबताच श्रीगुरुदेवांना शुद्ध येणे या घटनांचा परस्परांशी संबंध असल्याचे स्पष्ट होते व श्रीगुरुदेव आणि भगवान श्रीदत्तात्रेय किती एकरूप होते, याचे दर्शन घडते.

## देहातीत स्थितीतही व्याकुळता संपवली

**कै. श्री. वसंत दत्तात्रेय मार्डीकर,** एम्.एस्सी.

(निवृत्त वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, सैन्य विस्फोटक नियंत्रणालय, पुणे)

एकदा प. पू. महाराजांच्या दर्शनासाठी नगरला गेलो असता, माझ्या पत्नीने त्यांना प्रश्न विचारला की, ''शनीच्या साडेसातीवर उपाय काय?'' तेव्हा क्षणाचाही विलंब न करता सद्‌गुरू म्हणाले, ''नामस्मरण.''

सद्‌गुरूंच्या महानिर्वाणानंतर माझ्या राशीला शनी महाराज आले. सद्‌गुरूंच्या वर्धापनदिनी नगरला व्याख्यानरूपाने सेवा करण्याची संधी मला नाकारण्यात आली. ही गोष्ट माझ्या मनास लागून राहिली की सद्‌गुरूंच्या सेवेची संधी शनीच्या साडेसातीच्या प्रभावामुळे माझ्याकडून हिरावली गेली.

नीलांजनं समाभासं रविपुत्रं यमाग्रजं ।
छायामार्तंड संभूतं तं नमामि शनैश्चरम् ।।

सूर्याची उपासना मी बालपणापासून करीत असून सद्‌गुरूंना श्रीक्षेत्र गाणगापूरला, मुखोद्‌गत असलेले 'सौर सूक्त' गोविंदभटजींच्या जागेमध्ये म्हणून दाखवले होते व त्यांच्याच आदेशावरून ते मी नित्यपठणातही ठेवले आहे.

सद्‌गुरू उपासना व सूर्योपासना असूनसुद्धा शनीदेवाने मला सद्‌गुरू सेवेपासून का वंचित ठेवले हा विचार मला अस्वस्थ करीत होता. सद्‌गुरूंचे आपल्यावरील प्रेम कमी झाल्याची भावनासुद्धा होती. सद्‌गुरू विश्वात्मक झालेले होते. ध्यानात मन लागेना की नित्याच्या उपासनेत मन लागेना. ॐकार साधनेत, पहिल्या प्रणवातच डोळे पाण्याने भरून येत व हुंदक्यांनी गळा दाटून अवरूद्ध होई आणि प्रणवसाधना जमेना. असा प्रकार जवळपास एक आठवडा चाललेला होता.

एके दिवशी असाच ॐकारसाधनेचा प्रयत्न करून पहाटे मी झोपलो. सकाळी चारच्या सुमारास मला स्वप्न पडलं. त्या स्वप्नात– गाणगापूर येथे संगमावर अमरजा नदीच्या बाजूने वाळवंटात मी जात होतो. प्रखर ऊन पडले होते. संगमावर कोणीही नव्हते. मागून मला कोणीतरी हाक मारल्याचा आवाज आला– ''मार्डीकर – मार्डीकर..'' इथं नावाने फार कोणी मला ओळखत नसतांना कोण हाक मारतंय म्हणून मी वळून मागे पाहिले. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेली कोणी व्यक्ती! त्यांचे धोतर पांढरे, शर्ट पांढरा व फेटाही पांढरा! ते नदीकडे तोंड करून उभे होते. त्यांचं अंग मात्र काळेशार होते. उन्हातल्या सावलीसारखं. मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांचे काळेशार हात त्यांनी डोळ्यावर धरून डोळे झाकलेले होते. हे कोण गृहस्थ आहेत ते पाहण्यासाठी त्यांचे हात दूर करण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. माझ्यावर दृष्टी पडू नये हा त्यांचा आटोकाट प्रयत्न होता. ते म्हणाले–

''मला तुम्हाला असं सांगायची आज्ञा झाली आहे की माझे तुमच्यावर पूर्वीइतकेच प्रेम आहे.''

स्वप्न संपले. झोप संपली होती आणि व्याकूळताही संपली होती. छाया मार्तंड सूर्य–पुत्र शनीमहाराजांच्या मुखातून प. पू. सद्‌गुरू महाराजांची आज्ञा आणि आशीर्वचन यांचा लाभ झाला. देहातीत प्रेममय संबंधाचा प्रत्यय सद्‌गुरूंनी शनीमुखातून वदवून मला त्यांच्या त्रैलोक्यावरील अधिकाराचा अनुभव दिला होता. सूर्यपुत्र असल्याने पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलेले व छायास्वरूप असल्याने त्यांचा काळा वर्ण, डोळे झाकून दृष्टी गुरुभक्तावर पडू न देण्याची पराकाष्ठा साऱ्यासाऱ्यांचा उलगडा होत होता.

देहातीत स्थितीतही सद्गुरूंनी प्रेममय कृपादृष्टीचा अनुभव दिला आणि माझी व्याकुळता संपवली.

## श्रीगुरुदेवांचे संरक्षक कवच

**डॉ. प्रकाश शहा**
एम्. डी., डी.सी.एच्. टी.डी.डी.
(संचालक, वर्धमान हॉस्पिटल, भांडूप–मुंबई)

गुरुदेवांचा एकदा अनुग्रह झाला तर त्यांचे संरक्षक कवच आपल्याभोवती सतत राहते, याचा जिवंत अनुभव गुरुदेव लीलावती हॉस्पिटलमध्ये होते त्यावेळी आला. माझी मुलगी डॉ. सुनीता (ती अमेरिकेत असते) हिचा फोन त्या दरम्यान आला. तिला तिच्या वर्धा मेडिकल कॉलेजचे काही डॉक्युमेंटस त्वरित पाहिजे होते. महत्त्वाच्या मुलाखतीसाठी तिला ते अमेरिकेत द्यावयाचे होते. त्यामुळे मी त्वरित वर्ध्याला जायच्या तयारीला लागलो. डायलीसीस संपवून गुरुदेव रूममध्ये गेले होते. विश्रांती घेत होते. त्यांना उगाच त्रास नको म्हणून श्री. काळेंना सांगून मी घरी आलो. रेल्वे, विमान, बसच्या तिकिटासाठी प्रयत्न चालविला, पण कोठलीच तिकिटे मिळाली नाहीत. मन अस्वस्थ होत होते. वर्ध्याला लगेच जाणे भाग होते. म्हणून कुर्ल्याहून सुटणाऱ्या कलकत्ता मेलमध्ये तरी जागा मिळेल म्हणून पहिल्या वर्गाचे तिकीट काढून रिझर्व्हेशन नसताही डब्यात चढलो व मधल्या पॅसेजमध्ये उभा राहिलो. तेवढ्यात तिकीटचेकर आला, त्यांनी तिकीट मागितले; रिझर्व्हेशन नसल्याने खाली उतरायला सांगितले. कितीही विनवण्या केल्या तरी ते ऐकेनात. ''न उतराल तर चेन खेचेन.'' अशी त्याने तंबी दिली. गाडी सुटण्यास ३–४ मिनिटे बाकी होती. केवळ नाईलाजाने उतरून पळत पळत २ डबे मागे जाऊन एका डब्यात शिरलो. गाडी सुरू झाली होती. तेथील तिकीटचेकरला एकूण परिस्थिती समजावून सांगितली. गाडी सुटल्यामुळे व माझे वय आणि धावपळ पाहून त्यांनी मला एका बाजूला बसायला सांगितले व तो पुढे निघून गेला.

पहाटे सुमारे ५–५ ॥ च्या दरम्यान शिरसोली स्टेशनजवळ सर्व प्रवासी झोपेत असताना प्रचंड मोठा आवाज झाला. डंपर एक बाजूला कलंडला. बर्थवरचे प्रवासी खाली पडले. डब्यात अंधार झाला. बाहेर रडारडीचे व ओरडण्याचे आवाज येत होते. क्षणभर सर्वजण भांबावून गेले. मी सर्वांना ओरडून सांगितले की, ''जागीच बसा. हलू नका.'' उजाडल्यावर एकेक प्रवासी डब्यातून सावधपणे उतरला.

उतरल्यानंतरचे जे दृश्य दिसलं ते पाहिल्यानंतर एकदम भीतीने ते सर्व गारठले. गाडीचे पुढील सर्व डबे पूर्णपणे कलंडलेले होते. त्या डब्यातून किंकाळ्या ऐकू येत होत्या. कित्येक लोक जागच्या जागीच चिरडले गेले होते. कित्येक जखमी झाले होते. भुसावळहून मदतगाडी पोहोचली होती. डब्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात येत होते. मीही भीतीने थरथरत होतो. तसाच पुढे जात होतो. ज्या ड्ब्यातून मला उतरवले गेले होते तो डबा चेमटून गेला होता व संपूर्ण उलटा झाला होता. आतील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले जात होते. ते पाहून मी मोठ्याने किंचाळलो व कळवळलो. शेजारच्या प्रवाशांनी मला सावरले.

पुढच्या प्रवासासाठी पर्यायी व्यवस्था केली गेली. त्याने मी वर्ध्याला पोहोचलो. कॉलेज ऑफीस बंद झाले होते. तेथील सेवकांना एकूण परिस्थितीची कल्पना दिली. तसेच मला कोणते डॉक्युमेंट्स तातडीने पाहिजेत, ते सांगून ते देण्याची विनंती केली. सुदैवाने तेथील कर्मचाऱ्यांनी हवे असलेले डॉक्युमेंट्स मला देण्याची व्यवस्था केली. लगेच त्याच रात्री परतीचा प्रवास सुरू केला.

मन विषण्ण झाले होते. काही सुचत नव्हते. कसाबसा मुंबईला पोहोचलो व पोहोचल्यानंतर तडक लीलावती हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. गुरुदेवांची भेट घेतली. काय झाले असावे याची गुरुदेवांना कल्पना असणार; म्हणून गेल्या गेल्याच त्यांनी मला म्हटले, ''विचारल्याशिवाय का गेलास?'' ''आपणास विचारण्यासाठी मी येथे आलो होतो. आपण विश्रांती घेत असल्यामुळे, आपणास उगाच त्रास देऊ नये म्हणून श्री. काळे यांना सांगून गेलो.'' तेव्हा ते म्हणाले, ''येथून पुढे कोणतेही महत्त्वाचे काम कानावर घातल्याशिवाय करू नकोस.'' ते थोडे शांत झाल्यानंतर; स्वभावानुसार मी गुरुदेवांना विचारले, ''गुरुदेव, ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी मी झोपेत होतो; तुमचा धावा केला नसतांनाही या भयानक संकटातून कसा वाचलो?'' तेव्हा ते म्हणाले, ''अरे, एकदा अनुग्रह दिल्यावर आमचे संरक्षक कवच नेहमी तुमच्याभोवती असते.'' अशा तऱ्हेने ज्या तिकीटचेकरने मला डब्यातून उतरायला भाग पाडले, त्यांना मला डब्यातून हाकलावयाची बुद्धी देऊन माझी सुटका केली, याबद्दल मी गुरुदेवांचा कायम ऋणी आहे. मरेपर्यंत त्यांची सेवा सतत करीन असे मनोमन ठरविले आहे.

* * *



# १०.
# श्रीगुरुदेवांचे छायाचित्र - अनुभूतींचे अधिष्ठान

**श्री. सयाजी निकम, ठाणे**
बी.एस्सी.,
असोसिएट व्हाइस् प्रेसिडेंट ऑफ
इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंग, मुंबई

श्रीगुरुकृपेने व त्यांच्या परवानगीने श्रीगुरुदेवांची असंख्य छायाचित्रे काढण्याचे भाग्य मला लाभले आहे. अनेक प्रसंगी, विविध भावमुद्रा असलेली श्रीगुरुदेवांची छायाचित्रे काढता आली; त्यांना ती दाखवता आली आणि त्यासंबंधीच्या त्यांच्या पसंतीदर्शक प्रतिक्रिया ऐकतांना खूप आनंदाचा अनुभवही घेता आला. त्यांची छायाचित्रे जरी वेगवेगळ्या वेळी काढलेली व वेगवेगळ्या भावमुद्रा टिपणारी असली तरी त्या सर्वांत एक गोष्ट समान आहे– ती म्हणजे त्यांच्यात सामावलेली श्रीगुरूंची ईश्वरी शक्ती! इतर अनेक गुरुभक्तांप्रमाणे मीही ह्या शक्तीची प्रत्यक्ष अनुभूती घेतली आहे व सध्याही घेत आहे.

ज्या ज्या वेळी माझ्या हातून कळत नकळत एखादी चूक घडते त्यावेळी मला श्रीगुरूंच्या फोटोतील डोळ्यांतील थोड्या नाराजीची व बऱ्याचशा रागाची धग जाणवते व त्या डोळ्यांकडे पाहण्याचे धाडस होत नाही. अशा वेळी मी फक्त त्यांच्या चरणांचे दर्शन घेतो व मनोमन, हातून घडलेल्या चुकीची कबुली देत त्यांच्याकडे क्षमायाचना करतो.

त्यांच्या छायाचित्राच्या प्रभावाचा अगदी अलीकडे आलेला एक अनुभव सांगतो–

पुण्यातील माझ्या भावजयीस अनपेक्षितपणे बाहेरची 'बाधा' झाल्याचे तिच्या कुटुंबीयांच्या लक्षात आले. तिचे अत्यंत विचित्र व विक्षिप्त वर्णन तिच्या आतापर्यंतच्या सालस व सरळमार्गी वर्तनाशी विसंगत तर होतेच पण कुटुंबातल्या सर्वांना उपद्रवकारक व चिंताग्रस्त करणारे होते. हे वृत्त मला समजताच मी त्यांना श्रीगुरूदेवांचे छायाचित्र तिच्यासमोर ठेवावे व 'श्रीगुरुदत्त' असा नामजप सुरू ठेवावा, असे सुचवले. त्याप्रमाणे त्यांनी श्रीगुरुदेवांचे छायाचित्र घरात आणताच भावजयीचा आक्रस्ताळेपणा खूप वाढला व 'फोटोतल्याला बाहेर काढा' असा तिचा आरडाओरडा सुरू झाला. पण त्याकडे लक्ष न देता कुटुंबीयांनी मोठ्या धीराने व निग्रहाने गुरुदेवांचे ते छायाचित्र तिच्यासमोर ठेवले व नामजप सुरू केला. हळूहळू तिचा आक्रस्ताळेपणा, आरडाओरडा कमी होत गेला व ती अखेरीस शांत झाली. आता ती पूर्णपणे 'नॉर्मल' आहे. देहत्याग केल्यानंतर १७ वर्षे झाल्यानंतरही श्रीगुरुदेवांची शक्ती, त्यांच्या छायाचित्रातूनही कशी प्रभाव टाकते हे पाहून घरातील सर्वजण तर स्तिमित झालेच; पण ज्यांना हा प्रकार समजला त्या सर्वांना श्रीगुरुदेवांच्या अलौकिकत्वाची पुन्हा एकदा प्रत्यक्ष प्रचीती अनुभवता आली.

श्रीगुरुदेवांचे छायाचित्र प्रत्येक गुरुभक्ताच्या घरात मोठ्या सन्मानपूर्वक विराजमान झालेले असते. काहींच्या ते देवघरात असते, तर काहींच्या ते दिवाणखान्यात किंवा दोन्ही ठिकाणी असते. अनेकांच्या ते खिशात, पाकिटातही असते; पण सर्वांच्याच ते अंतःकरणात असते. श्रीगुरूंचे छायाचित्र त्यांच्या तेथील अस्तित्वाचे, उपस्थितीचे निदर्शक असते असा गुरूभक्तांचा दृढ विश्वास असतो व तो त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेला असतो. श्रीगुरूंच्या फोटोसमोर केलेली प्रार्थना त्यांच्यापर्यंत पोहोचते, असा अनेक गुरुभक्तांनी प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. त्यांच्या फोटोद्वारे सद्गुरू भक्तांना आपल्या तेथील उपस्थितीची जाणीव करून देतात किंवा फोटोच्या माध्यमातून काही भक्तांना तेजोदर्शनाचा वा इच्छापूर्तीचा अलौकिक आनंद श्रीगुरुदेव देतात; असाही भाग्यवान भक्तांचा अनुभव आहे. म्हणून सद्गुरूंचे छायाचित्र त्यांच्यातील ईश्वरी शक्तीची अनुभूती देणारे सहजसुलभ माध्यम आहे, अशी गुरुभक्तांची श्रद्धा आहे. अशा अनुभवसंपन्न भाविक भक्तांची संख्या प्रचंड मोठी असल्याने त्यांच्यापैकी काही मोजक्या भक्तांच्याच अनुभवांचा उल्लेख करणे शक्य आहे. तेही अनुभव पुरेसे प्रातिनिधिक व बोलके आहेत.–

**ॲड. श्री. राजेंद्र गोडबोले** (ॲडव्होकेट, हायकोर्ट, औरंगाबाद) – माझ्या वैयक्तिक आयुष्यात एक असं वादळ आलं की जे सार्वजनिक करण्यासारखं नव्हतं.

धर्मक्षेत्राच्या चौकटीत, कुरुक्षेत्राच्या चौकटीत ते उभं राहण्याची शक्यता होती. वैयक्तिक आयुष्यात अत्यंत वैयक्तिक स्वरूपाचा तो प्रश्न होता. मी म्हटलं, ''सगळे म्हणतात, गुरुदेव ही व्यक्ती नसून मोठी शक्ती आहे. ह्या शक्तीला विचारावं का?'' फोटो तर महाराजांचा आलेलाच होता घरी; तर मी फोटोपुढे म्हटलं की, ''हा माझा प्रॉब्लेम उद्या आठपर्यंत संपवला तर मी तुम्हाला गुरू मानेन.'' खरं पाहिलं तर त्यांनी मला शिष्य मानणं अपेक्षित होतं. फोटोसमोर मी हे बोललो होतो, तोपर्यंत शक्तीऐवजी व्यक्ती म्हणूनच मी त्यांच्याकडे पाहत होतो. पण, ''माझा प्रश्न सोडवला तर मी तुम्हाला गुरू मानेन'' असे म्हणालो. खरं तर गुरू–शिष्य परंपरेसाठी कदाचित हा प्रसंग माझ्या आयुष्यात आला असावा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सगळंच वातावरण सहज बदललं आणि जो अत्यंत अवघड, क्लिष्ट प्रश्न होता तो वेगाने सुटला व **त्याक्षणी श्रीगुरुदेवांना, ते माझे गुरूदेव आहे, हे मी मानले.** मला आठवतं, त्यानंतर नगरला जेव्हा मी पहिल्यांदा गेलो तेव्हा माझ्या गुरुदेवांना भेटायला मी जातो आहे, या भावनेने गेलो. ५ वाजता त्या छोट्याशा खोलीत गुरुदेवांनी नारळाचा प्रसाद दिला व 'गोडबोले स्थिर झाले' असा शब्दप्रयोग त्यांनी वापरला.

**डॉ. सौ. ऊर्मिला प्रवीण डहाके,** एम्.बी.बी.एस (मुंबई) लिहितात– श्रीगुरुदेवांचा फोटो जेथे असतो, तेथे भक्तिभावाने नमस्कार केल्यास नक्कीच आपणास श्रीगुरूदेवांचा आशीर्वाद, आधार मिळतो. कोणताही निर्णय घेण्यासाठी श्रीगुरुदेवांच्या फोटोसमोर तो सांगून श्रीगुरुदेवांशी हितगुज केल्यास आपणास नक्कीच योग्य मार्ग सापडतो. श्रीगुरुदेवांच्या फोटोमध्ये कार्यरत असलेल्या या शक्तीचा मला आलेला एक अनुभव सांगते–

दि. ३१ डिसेंबर २०११ ला मी मुलाला घेऊन मुंबईहून नगरला दर्शनास जाण्याचे योजले. त्याकरता बसचे बुकिंग केले. सर्व सामान भरून जाण्यास निघालो; परंतु नेहमी जवळ असलेला श्रीगुरुदेवांचा फोटो घेण्यास विसरून गेले होते. निघतेवेळी आईने श्रीगुरुदेवांचा फोटो असलेले 'श्रीगुरुदेवदत्त'चे ध्वनियंत्र दिले व सांगितले की ते बिघडले असून नगरच्या दुकानातून दुरुस्त करून आण. त्या ध्वनियंत्रात असलेला श्रीगुरुदेवांचा फोटो हे श्रीगुरुदेवांनी मला दिलेले सुरक्षाकवच होते– हे थोड्याच तासात लक्षात आले. ३१ डिसेंबरच्या नावाखाली ड्रायव्हर व कंडक्टर दोघांनी प्रवाशांच्या नकळत मद्यपान केले व आमच्या बसचा अपघात होता होता वाचला. ''आपल्या बसमध्ये कोणीतरी पुण्यवान व्यक्ती असेल; त्यांच्यामुळे आज आपण बचावलो,'' असे एक प्रवासी म्हणाला, तेव्हा श्रीगुरुदेवांचा फोटो आपल्यासोबत

असून त्यांनीच आपले रक्षण केले असे मनापासून वाटत होते. दुसऱ्या दिवशी नगर येथे श्रीगुरुदेवांचे ध्वनियंत्र दुरुस्तीसाठी घेऊन गेले असता त्या यंत्रात कुठलाही बिघाड नाही व यंत्र एकदम व्यवस्थित सुरू असल्याचे कळाले.

श्रीगुरुदेवांचा फोटो माझ्या प्रवासात रक्षण करण्यासाठी सोबत असावा म्हणून श्रीगुरुदेवांनीच त्यावेळी हे योजले असल्याचे माझ्या लक्षात आले. श्रीगुरुदेवांचे मनोमन आभार मानले व वेळकाळाचे भान न ठेवता लहान मुलास घेऊन एकटेच प्रवासास निघाल्याबद्दल श्रीगुरुदेवांची क्षमा मागितली. श्रीगुरुदेवांचा फोटो सोबत असला की, खूप सुरक्षित असल्यासरखे वाटते. मुंबईला नोकरी करीत असतांना मी दर आठवड्याला मुंबई ते नागपूर प्रवास करत होते; परंतु प्रवासात कधीही कुठल्याही प्रकारचा त्रास झाला नाही.

**श्रीमती राधाबाई चौहान** (मुंबई) – आपल्याला श्रीगुरुंचे दर्शन व्हावे, असे वाटू लागले. नगरला जाणे आर्थिक अडचणींमुळे आणि यजमानांच्या स्वभावामुळे शक्य नव्हते. त्यामुळे शेजारी श्री. पवारांच्या घरी जाऊन त्यांच्या देवघरात आम्ही श्रीगुरुदेवांच्या फोटोचे दर्शन घ्यायचो. यजमानांमुळे घरात श्रीगुरुंचा फोटो ठेवायचीसुद्धा बंदी होती. परंतु येथे नमूद करण्यासारखा मोठा अनुभव असा की, रोज असे दर्शन घेताघेता एक दिवस मला प. पू. गुरुदेवांचे स्वप्नदर्शन झाले ते असे–

श्री. पवारांच्या घरी आम्ही दर्शनाला गेलेलो असताना फोटोच्या ठिकाणी ते प्रत्यक्ष प्रकट झाले आणि नीलकांती असलेल्या तेजोमय स्वरूपात त्यांनी आम्हाला दर्शन दिले. हा अनुभव १९८५ साली आला.

**डॉ. सुचेता राठोड,** एम.बी.बी.एस. अहमदनगर – श्रीगुरुमाऊली भक्तांना स्वप्नात मार्गदर्शन करीत असते. ज्या भक्तांना श्रीगुरुदेव स्वप्नात दर्शन देतात, त्यांच्या मनोकामना श्रीगुरुदेवांनी पूर्ण केलेल्याच असतात. माझे पहिले स्वप्नदर्शन– मी चित्रपटगृहात बसले आहे एकटीच व समोर मोठा पडदा आहे. त्या पडद्यावर प्रथम मोठे गणपतीस्वरूप प्रकट झाले; व ते गुप्त होऊन त्या जागी श्रीगुरुदेव दिसू लागले. नंतर परत दत्तस्वरूप आले व मधल्या विष्णुदेवाच्या जागी आपल्या गुरूदेवांचे स्वरूप आले. ते पाहून मला खूप आनंदाश्रू येत होते. मी खूप रडत होते, तर तेथे साक्षात् श्रीगुरुदेव प्रकट होऊन माझ्याशी बोलू लागले. ते म्हणाले, ''मी तुझ्यासाठी किती रडलो व आज तू माझ्यासाठी किती रडलीस!'' त्यांच्या त्या प्रेमळ व मृदु शब्दांनी मला अजूनच भरून आले. श्रीगुरूदेवांनीच सांगितले आहे की, ''गुरू व शिष्य हे नाते जन्मोजन्मीचे असते व देवसुद्धा भक्ताची वाट पाहत असतात.'' एका

स्वप्नात श्रीगुरुदेवांनी मला उपासना दिली आहे.

**श्री. रवींद्र उपासनी,** सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, मुंबई – जून १९९६ नंतर नगरहून जळगावला बदली झाली. तेथून एक दिवस दर्शनाला आलो असता माझा कॅमेरा घेऊन आलो व प. पू. गुरुदेवांच्या परवानगीने देवस्थानचे फोटो काढले. रात्रीच्या बैठकीत हिंमत करून ''आपले फोटो काढू का?'' असे श्रीगुरुदेवांना विचारले. परवानगी मिळाली. मी बरेच फोटो काढले. जळगावला फोटो डेव्हलप केले तेव्हा नेहमीप्रमाणे फोटो आले. त्यातील एका फोटोच्या मागणीमुळे पुन्हा त्याच ठिकाणी निगेटिव्ह दिली व काही प्रती काढण्यास सांगितले. फोटो डेव्हलप करतांना त्यातून नीलकांती प्रकट होऊ लागली. फोटो प्रोसेसिंगमध्ये काही दोष निर्माण झाला का? असे वाटल्यामुळे त्यांनी मला बोलावले तेव्हा मी नीलकांतीचा खुलासा केला व जास्तीत जास्त फोटो छापून घेतले. १९९९ च्या श्रावणात याच फोटोचे ट्रान्सलाईट तयार करून घेतले. श्रीगुरुदेवांच्या महानिर्याणानंतर ते मिळाले आणि त्यातही नीलकांती स्पष्टपणे आली आहे.

**श्री. सुभाष काळे,** डोंबिवली ह्यांनी लिहिले आहे की– 'आमच्या घरी हॉलमध्ये श्रीसद्‌गुरुंचा मोठा फोटो लावलेला आहे. २१ एप्रिल २००२ ह्या रामनवमीच्या दिवशी, मी त्या फोटोला सुवासिक फुलांचा हार घातला. निरांजन, उदबत्ती लावून नमस्कार केला. दुसऱ्या दिवशी सकाळी नमस्कार करतांना पत्नीच्या लक्षात आले की, त्या हाराची लांबी साधारण १ ते १।।फूट वाढली होती व तो हार पूर्ण नीलकांतीमय झाला होता.' असाच अनुभव त्यांना पुन्हा श्रावण महिन्यातही आला.

**डॉ. विकास मांडके,** मुंबई लिहितात की, आमच्या घरी श्रीगुरुदेवांचा एक मोठा फोटो आहे. तो हॉलमध्ये लावलेला आहे. एके दिवशी, त्या फोटोकडे सहज बघत होतो तर विस्मयात टाकणारी गोष्ट मला दिसू लागली. **फोटोतील श्रीगुरुदेवांच्या अंगातून निळ्या लाटा वरून खाली येत होत्या.** त्या जिवंत होत्या. मला भास नक्कीच होत नव्हता. त्या काळसर निळ्या होत्या. म्हणजे त्या घननीळ होत्या. मी असे विचित्रपणे फोटोकडे बघत होतो, हे बघून माझी पत्नी म्हणाली, ''तुम्ही असे का बघता?'' फोटोवर केंद्रित केलेली दृष्टी न हलवता तिला मी म्हटलं, ''तू इकडे ये, फोटोकडे बघ, तुला काय दिसते ते सांग.'' ती म्हणाली, ''श्रीगुरुदेवांच्या अंगातून निळ्या लाटा येत आहेत.'' म्हणजे हा भास नक्कीच नव्हता. हा प्रकार जवळजवळ १० मिनिटे चालला होता. हा चमत्कार परत कधीही दिसला नाही. श्रीगुरुदेवांनी देहत्याग केल्यानंतरची ही गोष्ट आहे.

श्रीगुरुदेवांनी, नीलकांती बघायची त्यांच्या भक्तांची इच्छा पूर्ण करतांना त्याची झलक दाखवली होती.

कुछ देर के बाद सही । देर है पर अंधेर नही ।

**डॉ. रामचंद्र देखणे, पुणे –** साधारणपणे २००९ मध्ये अमेरिकेतील कॅलिफोर्निया इथे पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. त्या संमेलनासाठी संतसाहित्यावरील एका परिसंवादाचा अध्यक्ष आणि निमंत्रित साहित्यिक म्हणून मी उपस्थित राहिलो. त्याचवेळी अमेरिकेतील अनेक मराठी बांधवांशी माझा संपर्क झाला. त्यानंतर २०१० मध्ये अमेरिकेतील 'महाराष्ट्र मंडळ बे एरिया' यांनी महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करायचे ठरविले आणि प्रमुख पाहुणा म्हणून मला निमंत्रित केले आणि माझ्या काही व्याख्यानांचेही आयोजन केले. मुख्य कार्यक्रमात मी 'महाराष्ट्र : परंपरा आणि स्वरूप' मांडताना लोकसंस्कृतीच्या अंगाने काही सादरीकरण करावे, असेही सांगण्यात आले. मी वासुदेव आणि विंचू हे भारूड आणि महाराष्ट्राचा पोवाडा सादर करावा असे ठरले. माझ्या साथीसाठी तिथले काही कलावंत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. थोडीफार प्रॅक्टिस झाली. परंतु मुख्य कार्यक्रमाच्या दिवशी माझा घसा प्रचंड बसला. सारखा खोकलाही येऊ लागला. विमानाच्या दूरच्या प्रवासाने, त्यातील 'एसी'मुळे आणि अमेरिकेतील प्रचंड थंडीच्या वातावरणात माझ्या आवाजावर खूप परिणाम झाला. कार्यक्रमाच्या वेळी सभागृह रसिकांनी पूर्ण भरलेले. सर्वांना महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे आकर्षण. तिथल्या अनेक लहान मुलांनी वासुदेव कधीही न पाहिल्याने अनेकजण मुलांना घेऊन कार्यक्रमाला आलेले. कार्यक्रमाच्या वेळी मला अजिबात बोलता येईना. माझा आवाजच चालेना. खड्या आणि दमदार आवाजाशिवाय वासुदेव आणि पोवाडा सादर कसा करणार? मला काहीच सुचेना. खिशातली डायरी काढली. **त्यातील महाराजांचा फोटो पुढे धरून महाराजांनाच विचारले, 'मी आता काय करू?'** मी खूप अस्वस्थ होतो. तेवढ्यात एक मराठी दांपत्य पुढे आले. माझी अडचण त्यांच्या लक्षात आली. विश्व मराठी साहित्य संमेलनात त्यांची माझी ओळख झाली होती आणि तो गृहस्थ उत्तम कवी होता. मी पुन्हा **महाराजांच्या फोटोलाच नमस्कार केला** आणि तो कवी पुढे येऊन म्हणाला– 'माझं घर इथून २० ते २५ मिनिटांच्या अंतरावर आहे. मी घरी जाऊन काहीतरी औषध घेऊन येतो आणि थर्मासमध्ये गरम पाणी घेऊन येतो; त्याने आराम पडेल. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात तिथल्या स्थानिक कलावंतांचा कार्यक्रम होता. तोपर्यंत मला थोडा अवधी होता. तात्काळ त्याने घरी जाऊन माझ्या घशासाठी काही गोळ्या

आणि गरम पाणी आणले. पंधरा–वीस मिनिटात घसा मोकळा झाला. **महाराजांच्या फोटोला पुन्हा नमस्कार केला. जणू फोटोतले महाराज माझ्याकडे बघून हसत होते.** रंगमंचावर चढलो. प्रचंड टाळ्यांचा कडकडाट झाला. आणि आता सुंदर आवाज लागला. कार्यक्रमाने प्रचंड पकड घेतली आणि अमेरिकेतल्या मराठी बांधवांसाठी महाराष्ट्राची लोकसंस्कृती उभी करता आली. मी विचार करत होतो– एकदा कधीतरी भेटलेला तो कवी मित्र आज अचानक माझ्या मदतीसाठी कसा धावून आला? सद्गुरूंच्या कृपेचे वैभव काही आगळेच असते.

**सौ. अपर्णा अरविंद अग्निहोत्री,** निवृत्त विज्ञानशिक्षिका, अहमदाबाद यांनी लिहिले आहे की– माझ्यावरील दयेपोटी प. पू. गुरुमाऊलीने माझ्यावर केलेल्या कृपावर्षावाचे वर्णन करतांना मला अतिशय आनंद होत आहे. श्रीगुरुकृपेची विशेष उल्लेखनीय पहिली घटना २०१० एप्रिल मध्ये घडली. ती अशी–

ही अघटित घटना दि. १२ एप्रिल २०१० रोजी घडली. माझ्या किडनीच्या ऑपरेशननंतर नियमित, प्रथम दोन–तीन वर्षे, दर तीन किंवा सहा महिन्यांनी युरिन, ब्लड चेकिंग, सोनोग्राफी, एक्सरे वगैरे तपासण्या होत असत. दरवर्षी सीटीसी करावे लागे. आणि नेहमी रिपोर्ट चांगले येत असत. ही पण प. पू. गुरुदेवांचीच कृपा! गेल्या वर्षी फेब्रुवारी २००९ मध्ये लहानसे ऑपरेशन करावे लागले होते. पुन्हा चेकिंग हा क्रम चालूच होता. रुटीनप्रमाणे १२ एप्रिलला माझा चेकिंगचा दिवस होता. सर्व ठीक असले तरी तपासणीच्या दिवशी सकाळपासून मन अस्वस्थ होते.

प. पू. गुरुदेवांच्या फोटोला नमस्कार करून संध्याकाळी ६ वाजता डॉक्टरांकडे जायला निघाले आणि काय आश्चर्य! प. पू. महाराजांच्या फोटोवरून दृष्टी निघेचना! कारण **फोटोमध्ये प. पू. महाराजांचे 'नीलकांती' मध्ये दर्शन होत होते.** हा फोटो मी १९९९ मध्ये आणलेला आहे. कृतज्ञतापूर्वक नमस्कार केला आणि डॉक्टरांकडे जायला निघाले. चेकिंग पार पडले आणि रिपोर्ट ऐकून व डॉक्टरांची प्रतिक्रिया पाहून अत्यंत आनंद झाला. **श्रीगुरूमाऊलीने किती कृपा करावी** आणि माझ्यासारख्या पामर भक्ताची किती काळजी घ्यावी ह्याला **काही सीमाच नाही.** त्या दिवशी डॉ. श्रेणीकभाऊ पण विशेष खुशीत दिसले. शिवाय त्यांनी चेकिंगची अर्धी 'फी' माफ करून टाकली. हेही एक आश्चर्यच! घरी येऊन केव्हा एकदा गुरुदेवांच्या कानावर हे सगळे घालते असे झाले होते. सारखे प. पू. श्रीगुरुदेवांच्या फोटोकडे टक लावून पहावेसे वाटत होते. पूर्वी काही गुरुबंधूंच्या तोंडून प. पू. श्रीगुरुदेवांच्या 'नीलकांती' दर्शनाचे ऐकलेले वर्णन सारखे आठवत होते. तेव्हा असे वाटे किती भाग्यवान हे

गुरुभक्त की ज्यांना प. पू. श्रीगुरुदेवांनी ‘नीलकांती’मध्ये दर्शन दिले !

घरामध्ये सर्व जेवणखाण आटोपल्यावर न राहवून माझ्या मुलाला (चि. समीरला) ही घटना मी भीतभीत पण आनंदाने सांगितली आणि त्याला लॅपटॉपवरून उठवले. तोही अत्यंत श्रद्धावान व प. पू. श्रीगुरुदेवांचा परमभक्त आहे. तो ताडकन् उठला आणि ते भव्य उदात्त व हसतमुख असे प. पू. श्रीगुरुदेवांचे ‘नीलकांती’ दर्शन पाहून आनंदित झाला. लगेच त्याच्या मोबाईलमध्ये त्याने ते दृष्य टिपून ठेवले. घरातील सून, नातू हे सर्वजण प. पू. श्रीगुरुदेवांच्या ह्या दर्शनाने सुखावले.

२५ एप्रिल २०१० च्या सत्संग मंडळाच्या मासिक बैठकीत मी माझा हा ‘अविस्मरणीय’ अनुभव सांगितला व सर्वांनाच ह्या ‘नीलकांती’ दर्शनाचा लाभ घेण्याची विनंती केली. प. पू. श्रीगुरुदेवांच्या ह्या अघटित दर्शनाने **आम्ही सर्व गुरुबंधू–भगिनी कृतार्थ व तृप्त झालो. देवा, अशीच तुझी कृपा आम्हांवर सदैव राहो** आणि ह्या चरणांशी स्थिर राहण्याची व सेवा करण्याची वृत्ती वाढो, हीच प. पू. श्रीगुरुचरणी विनम्र प्रार्थना !

* * *

**श्री. श्रीपाद श्रीवल्लभस्वामी व**
**श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी**

सुमारे ६५० वर्षांपूर्वी भगवान श्रीदत्तात्रेयांचे प्रथम अवतार श्री श्रीपाद श्रीवल्लभस्वामी आणि प. पू. गुरूदेव या दोघांच्या अवतारसमाप्तीबाबत विलक्षण साम्य जाणवते ते असे–

आश्विन वद्य द्वादशीला (गुरूद्वादशीस) **मघा नक्षत्र व सिंह रास** असताना प. पू. श्रीपाद श्रीवल्लभस्वामी महाराजांनी अवतारसमाप्ती केली. प. पू. गुरुदेवांनी देहत्याग केला तो बुधवार दि. ८ सप्टेंबर १९९९ला**! तेव्हाही मघा नक्षत्रच होते व रास सिंहच होती;** तिथी चतुर्दशी होती, त्रयोदशीचा लोप होता.

या दोघातली ही एकात्मता विलक्षण भावते आणि गुरूपरंपरेची अखंडता स्पष्ट करते.

**–प्रा. सौ. मंगला गांधलीकर**



# ११.
# स्त्रीभक्तांचे कैवारी श्रीगुरुदेव

**सौ. स्मिता प्रकाश पिले**
बी.ए., डी.एड्. मुख्याध्यापिका, नूतन बालविकास मंदिर, पुणे

सुसंस्कृत समजुतदार स्त्री हाच सुखी प्रपंचाचा पाया आहे व तो जितका भक्कम असेल तितका तो प्रपंच परमार्थाला विशेष अनुकूल ठरतो, असे सद्‌गुरूंना वाटत असे. त्यामुळे स्त्रियांबाबतचे त्यांचे धोरण जसे संवेदनशील होते तसेच ते शिस्तपालनाची अपेक्षा करणारे होते. स्त्रियांमधील अंगभूत गुणांची व क्षमतांची त्यांना उत्तम पारख होती व त्यांना प्रोत्साहन देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. स्त्रियांमधील आत्मभान जागविण्याचा, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविण्याचा, अडचणीत–आपत्तीत सापडलेल्यांना साहाय्य करून त्यांचे रक्षण करण्याचा गुरुदेवांचा सतत प्रयत्न असे. गुरुदेवांनी अबलांना सबल होण्यासाठी त्यांना आत्मिक बळ दिले, त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी सतत उत्तेजन दिले, मातेची माया दिली व तशीच पित्याची शिस्त लावली. ते स्त्रियांचे रक्षणकर्ते तर होतेच पण शिक्षणकर्ते–संस्कारकर्तेही होते. त्यामुळे अनेक स्त्रियांना गुरुदेवांचे स्थान आपले 'माहेर' आहे असे वाटत असे.

**श्रीमती मंदाकिनी जोशी** लिहितात – ''मला लाभलेली गुरुमूर्ती केवळ अध्यात्माचं शिक्षण देणारी नाही, तर अध्यात्म आणि जीवन, अध्यात्म आणि प्रपंच, अध्यात्म आणि अनुभूती ह्यांच्या अनुभवांचं शिक्षण देणारी अशी आई होती. आईसारखी माया लावणारे, प्रसंगी आईसारखी शिक्षा करणारे गुरुदेव सर्वांनाच खूप काही शिकवीत.''

**सौ. शुभदा वायचळ (पुणे)** लिहितात – ''आम्हा संसारी स्त्रियांना नगर माहेरच वाटते, नव्हे ते आहेच. आमचे जे कोणी मायबाप, बंधुभगिनी, सगेसोयरे, ते

सारे गुरुदेवच!''

**श्रीमती उज्ज्वला पोथरकर,** गृहिणी (नगर) म्हणतात – ''त्यांनी आम्हाला मुलीसारखे मानले. पितृवत् माया केली. माझ्या चुका पोटात घातल्या. मला सतत आधार दिला. आजही मी नगरला एकटीच राहत असले तरी तपोवनातील त्यांचे अस्तित्व मला सतत धीर देत असते.''

**डॉ. सौ. सुनीती देशपांडे** ह्या (मुलुंड) मुंबईतील प्रसिद्ध साईधन हॉस्पिटलच्या संचालिका व प्रख्यात कन्सल्टिंग फिजिशियन, कार्डिओलॉजिस्ट आहेत. त्यांनी प्रांजळपणे मान्य केले आहे की– ''मी विज्ञानशाखेची विद्यार्थिनी असल्याने, प्रत्येक गोष्टीचा शास्त्रीय आधार शोधायची सवय होती. स्त्रियांनी केस कापले तर काय होते? 'चार दिवस' पाळण्याची जरूरी काय? इ. जेव्हा सद्‌गुरूंची 'गुरुवाणी' वाचनात आली तेव्हा काय करावे, काय करू नये? हे समजले व 'का?', 'कुठे?', 'कसे?' हे प्रश्न संपले व गुरुदेव सांगतील ते शिरोधार्य मानायची मनाला सवय लागली. त्यांची वत्सलता, ममता यांचा अनेकदा अनुभव घेतल्यामुळे 'नगर' हेच 'माहेर' वाटते.

सर्वसामान्य गृहिणींपासून उच्चशिक्षित प्राध्यापक–डॉक्टर–इंजिनिअर ह्यांसारख्या व्यावसायिकांपर्यंतच्या असंख्य महिलांमध्ये सद्‌गुरूंविषयी जो भावबंध निर्माण झाला, त्याला कारणीभूत असणारे आणखी काही महिलांचे अनुभव असे आहेत.–

महिलांच्या बाबतीत विवाह ही एक अत्यंत महत्त्वाची व क्रांतिकारक बदल घडवणारी घटना असते. अनेकदा तरूण मुली व पालक याबाबतीत योग्यवेळी योग्य निर्णय गंभीरपणे घेत नाहीत. त्यामुळे मुलींचे लग्नाचे वय वाढत जाते. त्यामुळे पुढे अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. या संदर्भातील एक शंका एका उपवर विद्यार्थिनीने, पुणे विद्यापीठातील पदार्थविज्ञान विषयाच्या प्राध्यापिका **डॉ. रोहिणी अय्यर** ह्यांना विचारली. तिचा 'कन्यादान' या विधीवर राग होता. ''मी काय एखादी वस्तु आहे काय म्हणून माझं आईवडिलांनी दान करावं?'' डॉ. अय्यरांकडे तिच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर नव्हतं. तिने केवळ या कारणासाठीच नोंदणी पद्धतीने विवाह करावा, हेही योग्य वाटत नव्हतं. म्हणून त्यांनी हा प्रश्न सद्‌गुरूंनाच विचारला. नेहमीप्रमाणे क्षणार्धात त्यांनी उत्तर दिलं, **''एक प्रकारे कन्या ही वस्तूच आहे. तिचे दान देऊन ती एकाचीच व्हावी, अनेकांची नाही.''** या एकाच वाक्याने या धार्मिक संस्कारामागे असलेली सामाजिक नीतीमत्ता त्यांनी समजावून सांगितली.

पुण्याच्या **सौ. मीना चिंतामणी देव** लिहितात– ''माझ्या धाकट्या मुलीचे शिक्षण (बी. कॉम् व फॅशन डिझायनिंग कोर्स वगैरे) पूर्ण झाल्यावर आम्ही तिच्या लग्नाचे बघू लागलो. अनेक प्रस्ताव समोर आले, पण तिची द्विधा अवस्था होत असे. आम्ही तिच्यावर बळजबरी करत नसू. अशा वेळेला ती. प. पू. गुरुदेवांच्या फोटोपुढे चिठ्ठ्या टाकत असे; हे आम्हालाही माहीत नव्हते. 'हो' किंवा 'नाही' जे काय उत्तर असेल त्याप्रमाणे ती आम्हाला सांगत असे. ३ डिसेंबर २००८ ला तिचे लग्न झाले. ह्या जावयांचे स्थळ आले तेव्हा श्रीगुरुदेवांनी स्वप्नात येऊन तिला खडसावले– ''आता चिठ्ठ्या टाकल्यास तर बघ. होकार दे. मी पाठीशी आहे.'' आणि खरोखरच जावई निर्व्यसनी, स्वभावाने अतिशय चांगले आहेत. अशाप्रकारे गुरुदेवांनीच तिला पाहिजे तशा स्थळाची योजना आखली होती.''

आत्मविश्वास वाढवणारा नगरच्या **सौ. शीतल प्रकाश डांगे** (निवृत्त स्टेट बँक अधिकारी) यांचा हा अनुभव – बसप्रवासातील अडचणी लक्षात घेऊन श्रीगुरुदेव मला म्हणाले, ''तू गाडी घे.'' मी म्हणाले, ''गुरुदेव मला गाडी चालवायची भीती वाटते.'' ते म्हणाले, ''अगं तुझ्यापेक्षा लहान लहान मुली गाडी चालवितात. तुला कशाची गं भीती वाटते?'' मी काहीच बोलले नाही. ''ह्यांचं काय, गुरुंची आज्ञा प्रमाण!'' ह्यांनी माझ्यासाठी लगेच गाडी घेतली. पण मी आठ दिवस बँकेत गाडी नेलीच नाही. शेवटी गुरुदेव म्हणाले, ''अगं गाडी अजून गॅरेजमध्येच आहे का? घरी आली नाही का?'' शेवटी एकदाची मी गाडी घेऊन दर्शनाला गेले तर गुरुदेवांनीच मला भरपूर पेढे दिले व म्हणाले, ''तू गाडी चालवतेस ह्याचा मला आनंद झाला, म्हणून पेढे घे. नाहीतरी बँकेत काय काम असते? दिवसभर बसून एकेक खा.'' ती गाडी घेतल्यामुळे पुढे मी सत्संग मंडळाची अकरा वर्षे पदाधिकारी म्हणून काम पाहिले. पुढे आम्ही तपोवनात राहायला गेलो. त्यावेळी मला गाडीचा खूप उपयोग झाला. अशी होती श्रीगुरुंची आधुनिकता आणि दूरदृष्टी.

''१९९६ साली माझी मुलगी पदवीधर झाली. म्हणून पेढे अर्पण करण्यासाठी आम्ही देवस्थानात गेलो होतो. प. पू. गुरुदेवांनी विचारले, ''पुढे काय करणार?'' मी सांगितले. ''एम्. ए.'' करणार. प. पू. गुरुदेव म्हणाले, ''लग्न कर.'' एकदम अनपेक्षित आज्ञा होती. पण त्यांची आज्ञा म्हणजे लक्ष्मणरेषा. ती पार करायची नाही असे आमचे धोरण असे. मुलगी २० वर्षांची होती. पण तरीही गुरुदेवांची ती केवळ आज्ञाच नव्हती. त्यांनी ते पक्केच केले होते. कारण तिच्यासाठी वरसंशोधन केलेली माझी मोठी बहीण गुरुदर्शनाला आली होती. ती बाहेर बसलेली होती. १८ जुलै

१९९६ ला आज्ञा झाली व ३० जुलै ९६ ला लग्नाची बैठकही झाली. मुलीच्या सासूबाई म्हणाल्या, ''मुलगा २८ वर्षांचा म्हणजे मोठा आहे व मुलगी २० वर्षांची म्हणजे लहान आहे.'' हीही शंका मी श्रीगुरूंना सांगितली. ते म्हणाले, ''तुला समजत नाही. मुलगा मोठाच हवा. वयातील एवढे अंतर रास्त आहे. कारण मुलीला समज लवकर येते, त्या मानाने मुलाला उशीरा येते. या वयात दोघांत सामंजस्य येते आणि संतती हुशार व निरोगी होते. श्रीराम व जानकी यांच्यात १४ वर्षांचे अंतर होते. आजकाल नवराबायको सारख्याच वयाचे असतात आणि दोघांची आर्थिक कमाई सारखीच असते. त्यामुळे एकमेकांविषयी बरोबरीची भावना येते. पुरुष मोठा असेल तर स्त्रीला त्याचा धाक वाटतो आणि स्त्री लहान असेल तर त्याच्या मनात तिच्याविषयी वात्सल्यभाव येतो, यामुळे त्यांचा संसार सुखाचा होतो. बरोबरीच्या भावनेत तो नवरा नसून पार्टनर असतो. त्याला 'अरे, तुरे' म्हटलं जातं. मुलांनाही त्याचा धाक त्यामुळे वाटत नाही. त्यामुळे कुटुंबाचा कणा मोडतो व संसार सुखाचा होत नाही. त्याने आरे केले तर ती कारे करते. त्यात मुलांची कुचंबणा होते. ती पार 'पुढे' जातात, कोणालाही भीत नाहीत असे अनेक वाईट परिणाम पाहायला मिळतात.'' माझ्या मुलीचा संसार सद्‌गुरूकृपेने व मार्गदर्शनामुळे सुखाचा चालला आहे.''

**सौ. आरती जोशी** (असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट, बिटवाईज सोल्यूशन्स प्रा. लि.,पुणे) लिहितात – माझे लग्न ठरल्यानंतर, 'तू मला माझ्या मुलीसारखी आहेस' असे सांगून सासरी जाणाऱ्या मुलीला आईवडील जसा उपदेश करतात, तसा उपदेश त्यांनी मला केला. त्यात त्यांनी विशेषत्वाने सांगितले की, ''तू तुझ्या सासूबाईंचा मान राख.'' त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मी वागण्याचा प्रयत्न केला. नुकतेच माझ्या सासूबाईंचे निधन झाले. त्यांचा तेरावा दिवस पार पडल्यानंतर मला प. पू. सद्‌गुरूंचे स्वप्नदर्शन झाले. माझ्या मनात असे येऊन गेले की त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागल्याची ती पावती होती.

नगरच्या **श्रीमती आशा कुकडे** लिहितात– ''माझे माहेर ऋग्वेदी व कुकडे यजुर्वेदी; म्हणून आमच्या लग्नाला घरातून विरोध होता. ते महाराजांना समजताच, ते त्यांच्या मोठ्या बंधूंना– दादांना म्हणाले, ''तुम्ही करा कन्यादान.'' विवाहानंतर मला लगेच दिवस गेले. त्या स्थितीत महाराजांनी अगदी वडिलांसारखी माझी काळजी घेतली. माहेरचे संबंध नाजूक असल्याने, महाराज त्यांच्या आईंना सांगायचे– ''तू तिच्यासाठी पेलाभर दूध घेऊन ये व तिला बोलावून दे.'' माझ्या दोन्ही मुलांच्या लग्नात त्यांनी मला केळवण केले. पंचपक्वान्नाचं जेवण केलं. आहेर केला. ते म्हणायचे,

''माझी लेकच आहे. मला हे करायलाच हवे.'' त्यांच्यामुळेच माझी मुलं मार्गी लागली. त्यांच्यामुळेच यजमान गेल्याचा आघात पचवायची शक्ती मिळाली.''

स्त्रियांच्या बाबतीत प. पू. सद्‌गुरूंचे धोरण अतिशय उदार व उदात्त होते. स्त्रियांनी घरात चांगले संस्कार स्वतः आचरावेत व मुलांनाही तशी शिकवण द्यावी. घराला 'घरपण' द्यावे असे त्यांना वाटे. मात्र महिलांनी मर्यादेत राहणे त्यांना आवडत असे. वेळप्रसंगी रूढीप्रथांना मुरड घालून स्त्रियांच्या व्यापक हितासाठी योग्य ते मार्गदर्शनही त्यांनी केले आहे. त्यासंबंधातील दोन उदाहरणे अशी–

गुरुदेवांच्या एका भक्ताच्या कन्येचा विवाह ठरला. मुहूर्त निश्चित झाला; खरेदी झाली; निमंत्रणपत्रिका वाटल्या गेल्या, मंगल कार्यालय ठरले. मुहूर्त चार दिवसांवर आला आणि त्यांचे अगदी जवळचे आप्त अचानक देवाघरी गेले. आता काय करायचं, असा प्रश्न निर्माण झाला. त्यांनी सद्‌गुरूंना मार्गदर्शनासाठी प्रार्थना केली. सद्‌गुरूंनी क्षणाचाही विलंब न लावता सांगितले, ''विवाह अनेक प्रयत्नांनंतर जुळून येतो. आता बाकी सगळ्या गोष्टी ठरल्या आहेत, तेव्हा मुलीला मामाच्या मांडीवर द्या आणि विवाह करून घ्या. आईवडिलांना सुतक असलं तरी या पद्धतीने विवाह करा. तोही ठरल्या दिवशी, ठरल्या ठिकाणी व ठरल्या मुहूर्तावर! तो पुढे ढकलू नका.'' हा खरोखरच ऐतिहासिक निर्णय ठरला. तो विवाह ठरल्याप्रमाणे पार पडलाही!

सद्‌गुरूंची एक स्त्रीभक्त. आईवडिलांनी तिचं १५–१६ व्या वर्षीच लग्न करून दिलं. दुर्दैवाने तिचे पती लग्नानंतर २ ।।–३ वर्षांत देवाघरी गेले. तिच्या पदरी एक मुलगा होता. त्याला घेऊन ती माहेरी आली. त्यांच्या घरच्या पद्धतीप्रमाणे पांढरी वस्त्रे वापरू लागली. अधूनमधून सद्‌गुरूंच्या दर्शनाला ती येऊ लागली. तिची ती वस्त्रे पाहून सद्‌गुरूंमधील पित्याची माया उफाळून आली. त्यांनी तिला सांगितले– ''अगदी लहान वयात दुर्दैवाने तुझ्यावर ही वेळ आली असली तरी तू पांढऱ्या साड्याच वापरायचं कारण नाही. तूही रंगीत साड्या नेसत जा.'' त्यांनी त्या स्त्रीभक्ताला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आत्मिक बळ दिले. आज तिचा मुलगाही अतिशय चांगल्या आर्थिक व सामाजिक स्थितीत आहे.

सध्याच्या काळात विधवा स्त्रियांना विभक्त कुटुंबपद्धतीमुळे आर्थिक स्वावलंबनासाठी नोकरी करावी लागते. अशावेळी केशवपन विचित्र दिसते. अशा स्त्रीला पूर्णपणे प्रवाहावेगळे राहणे अवघड असते हे जाणून सद्‌गुरूंनी अशा विधवा स्त्रियांना पित्याची माया दिली व शिस्तही लावली. त्यांना दर्शनाला मुभा दिली.

त्यांच्याकडून स्त्रियांना शक्य त्या श्रीदत्तदेवस्थानच्या सेवा करवून घेतल्या आणि उद्धाराचा मार्ग दाखवून दिला. त्या अबलांनाच नव्हे तर सर्वांना सबल होण्यासाठी आत्मिक बळ दिलं. त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांच्यातील आत्मविश्वास जागवला. अनेक महिलांकडून विविध प्रकारची व्रतवैकल्ये करवून घेतली. त्यांना आध्यात्मिक आचारविचारांची गोडी लावली.

**प्रा. सौ. मंगला गांधलीकर** (अहमदनगर) म्हणतात– ''१९७२ ते १९९९ या काळात गुरुदेवांच्या सहवासात संपूर्ण समर्पण भावनेने सेवा करता आली. उपासना म्हणजे काय, हे जाणून घेऊन आचरणात आणणे ह्यासारखा दुसरा आनंद नाही. त्यामुळे नित्य आचरणातील एखादी गोष्ट राहिली तरी चुकल्याचुकल्यासारखे होते. प. पू. गुरुदेवांना ज्या गोष्टी आवडत नाहीत, त्या गोष्टी सुटल्या. कांदा–लसूण वगैरे तामस आहार बंद झाला. परान्न घेणे वर्ज्य झाले. श्रीगुरुंचे नित्यदर्शन झाल्याशिवाय जेवायचे नाही, हा नियमच झाला. उपासना करतांना एकाग्रता साधू लागली. अन्यायाला वाचा फोडण्याचे धाडस आले व जे बुद्धीला पटलेले नाही, ते करायचे नाही असा निश्चयच झाला.''

महिलांमधील दिव्य शक्ती जागवण्याच्या अशा प्रयत्नांबरोबरच, ज्या महिलांवर अनपेक्षितपणे आपत्ती येऊन कोसळते त्यांना धीर व आधार देत त्यांच्या जीवनाची विस्कटलेली घडी बसवून देण्यासाठी तसेच आर्ततेने धावा करणाऱ्या द्रौपदीच्या लज्जारक्षणासाठी धावून येणाऱ्या भगवान श्रीकृष्णाप्रमाणे आपद्ग्रस्त भगिनींच्या रक्षणासाठी गुरुदेव सदैव तत्पर असत. त्यासंबंधीची काही भगिनींची ही मनोगते–

**श्रीमती राधाबाई चौहान,** गृहिणी मुंबई – ''माझा जन्म एका अतिशय साध्या, शेतकरी कुटुंबात औरंगाबादला झाला. १९६७ साली लग्न होऊन मुंबईस आम्ही राहायला आलो. १९६८ ते १९८० या काळात मला ५ मुली व १ मुलगा झाला. माझे यजमान १९७९ पासून व्यसनाधीन होत गेले. १९८० नंतर त्यांचे व्यसन वाढत जाऊन माझी अगतिकता वाढत गेली. बचत करून सचोटीने जीवन जगावे असे यजमानांना धोरणच नव्हते. आम्हाला कोणाचाही आधार नव्हता. वांद्रे (पूर्व) येथील आमच्या घराशेजारी श्री. मधुकर पवार १९७८–७९ त राहायला आले. त्यांच्यामार्फत हळूहळू श्रीगुरुचरणांपर्यंत पोहोचता आले. १९८७ मध्ये यजमानांचे निधन झाले. त्यामुळे घरातील एकुलता एक मिळवता सरकारी नोकर गेला. 'सरकारी घर रिकामे करा' अशा नोटिसा येऊ लागल्या. यजमानांच्या नोकरीचे उरलेले फक्त ६५,००० रुपये व एक तुटपुंजे पेन्शन मिळाले. त्यातून मुंबईत आम्हा ७ जणांचा

प्रपंच चालवायचा; शिवाय ६ अपत्यांचे शिक्षण करायचे! सर्वांनी व्यवस्थित शिकावे, अशी माझी धडपड! श्रीगुरुचरणी ही सर्व स्थिती वर्णन करून सांगितल्यावर त्यांच्या तोंडून अतिशय आधार देणारे असे आशीर्वाद बाहेर पडले की– ''**मी तुम्हाला शब्द देतो की तुमचे सर्व काही चांगले होईल.**'' याच आशीर्वादाची मधुर फळे आज आम्ही कुटुंबीय उपभोगीत आहोत. श्रीसद्गुरूंनी वेगवेगळ्या प्रकारे आमच्यावरील संकटे दूर केली. कधी स्वप्नात संकेत देऊन, कधी प्रत्यक्ष मार्गदर्शन करून, कधी योग्य व्यक्तींची भेट घडवून तर कधी परस्पर निराकरण करून आमच्या अडचणी दूर केल्या. **त्यांच्या कृपेने माझ्या पाच मुलींपैकी चार डॉक्टर आहेत, एक इंजिनिअरिंग कॉलेजात प्राध्यापिका आहे. मुलगा इंजिनिअर असून तो परदेशीही नोकरीनिमित्त जाऊन आला आहे. या सहाही जणांना त्यांचे जोडीदार डॉक्टर, इंजिनिअरच मिळाले. योग्यवेळी त्यांना अपत्यप्राप्तीही झाली. प्रत्येकाकडे राहण्यासाठी स्वतःचे घर आहे. घरामध्ये श्रीगुरुदेवांचे अधिष्ठान आहे. यापेक्षा एका आईसाठी अधिक सुखकर कुठलीच गोष्ट असू शकत नाही. श्रीगुरुदेवांनी न मागता या सर्व गोष्टी दिल्या, अजूनही ते देत आहेत व पुढेही देत राहतील यात शंका नाही.** श्रीगुरुदेव भेटले नसते तर आज नक्कीच गावाला कुठेतरी मजुरी करीत राहिलो असतो; कारण आमची स्वतःची शेती वगैरे असे काहीच नव्हते. लोखंडाला परिसाचा स्पर्श झालेला आहे. हे त्यांचे चरित्र आहे. मी आणि माझे कुटुंबीय फक्त निमित्त आहोत. **माझे अनुभव हे त्यांच्या चरित्रातील करोडो पानातील एक छोटेसे पान आहे.**''

**श्रीमती उषा वसंत मार्डीकर,** बी.ए. (गृहिणी, पुणे) – ''एकदा मी भंडाऱ्याहून अचलपूर येथे देवीच्या नवरात्रासाठी बसने सासरी जात होते. त्यावेळी वाईट दृष्टिकोन असलेले दोन पठाण माझ्या मागच्या सीटवर बसले व तेथून त्यांचे अचकटविचकट बोलणे सुरू झाले. बसमध्ये इतर सर्व पुरूष व मी एकटीच स्त्री होते. मी अजिबात लक्ष दिले नाही म्हणून की काय, तो मागचा पठाण माझ्या सीटशेजारी बसायला आला. तेव्हा 'श्रीसद्गुरू श्री. रामकृष्ण रामगुरू पाहि माम् । वन्दयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम्'' अशी प्रार्थना मी सुरू केली. कळकळीने हाक मारली. तो काय आश्चर्य! एकदम 'कडाडकाड' असा आवाज आला. पाहिले तर तो पठाण बसल्याबरोबर त्याच्या वजनाने बाकाची एक बाजू पूर्णपणे मोडून पडली व तो खाली पडला. नाइलाजाने खजील होऊन तो पुन्हा मागच्या सीटवर जाऊन बसला. बाकीचे लोक त्याची फजिती झालेली बघून हसू लागले. श्रीगुरूंना कळकळीने प्रार्थना केली

की ते धाव घेतात, संकटातून तारतात. संकटाची तीव्रता कमी करतात– या आईवडिलांच्या उपदेशाचा अनुभव मी प्रत्यक्ष घेतला. अजूनही तो प्रसंग आठवला की, अंगावर शहारे येतात पण श्रीगुरू आपल्या पाठीशी आहेत, ह्याचा प्रत्ययही येतो. अजूनही घराबाहेर कोठेही जाणे असो, 'सद्‌गुरू श्री. रामकृष्ण रामगुरू पाहि माम्'' असा माझ्या मनात सारखा जप सुरू असतो.

**श्रीमती माधवी राजीव साठे** (अधिकारी, बँक ऑफ इंडिया, मुंबई) – मला प. पू. गुरुदेवांचे प्रथम दर्शन १९८० साली झाले. परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास होता पण हे 'परमेश्वरी अवतारच' हे कळायला तीन वर्षे जावी लागली. अमेरिकेला १९८३ साली आम्ही गेलो असता, न्यूयॉर्कमध्ये काही निग्रो माणसांनी मला पकडले; पण प. पू. गुरुदेवांचे स्मरण करताच त्यांनी लगेच सोडून दिले. त्याचक्षणी प. पू. गुरुदेवांच्या ईश्वरी अवताराचे साक्षित्व मला पटले व ते उत्तरोत्तर वाढत गेले. त्यांचे साक्षित्व केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही असे अनुभवायास मिळाले.

**सौ. पुष्पलता दिवटे** (गृहिणी, अहमदनगर)– ''ह्यां''ना बढती मिळून ते नायब तहसीलदार झाले व 'ह्यां'ची बदली नाशिकला व नंतर येवला येथे झाली. श्रीगुरुदेवांनी दिलेल्या पूर्वसूचनेनुसार १८ एप्रिल २००० मध्ये आम्ही (मी व ह्यांनी) बिऱ्हाड केले. श्रीगुरुंचं वाक्य खरं ठरलं. आम्ही दोघे येवल्यास राहण्यास आलो.

''ह्यां''नी तेथे भाड्याने एक खोली घेतली; ती माडीवर होती. त्या एकाच खोलीवर पत्रा होता. खोली इतकी जुनी होती की सारखी माती पडायची. आम्ही बिऱ्हाड तर केलं; पण लगेच बदलणार कसे? पाणीसुद्धा खालून भरावं लागे. मी सर्व सामान लावले. श्रीगुरुदेवांचा फोटो लावायचा तर एकही कोनाडा चांगला नव्हता. सर्व ठिकाणी माती पडायची. शेवटी सर्व बाजूंनी कागद लावला व एका कोनाड्यात श्रीगुरुदेवांचा फोटो लावला. तेथे आठ–आठ तास विजेचे भारनियमन होते. लाईट जात असे. ते घर एका मारवाड्याचे होते. आम्हाला जागा घेऊन दोनच दिवस झाले असतील, तर तो घरमालक घरी येऊ लागला. 'हे' नसताना 'दूध पाहिजे का? किती आणू,' अशा चौकशा करू लागला. माझ्या अगदी जवळ येऊन उभा राहायचा. मला त्याची नजर 'बरी' वाटत नसे. 'ह्यांना' सांगावं तर हे रागीट! काय करावं? मी श्रीगुरुदेवांच्या फोटोजवळ तासन् तास बसे व म्हणत असे 'श्रीगुरुमाऊली, तुम्हीच मला यातून सोडवा.' सारखी श्रीगुरूदेवांचा धावा करीत असे. 'हे' कधी कधी रात्री उशीरा येत. मला फार भीती वाटत असे. मी आतापर्यंत कधीही एकटी राहिले नव्हते.

मला फार रडू यायचं. काय करावं काही सुचत नसे. आमच्यासमोर आमच्याच जातीचे श्री. पोंदे राहात होते. 'हे' ऑफिसला गेले की मी सर्व आवरून त्यांच्याकडे थोडा वेळ बसत असे. मी श्री. पोंदे ह्यांना म्हणाले, ''तुम्हाला माहीत आहे ना– आमचा घरमालक कसा आहे ते?''ते 'हो' म्हणाले. ''मग तुम्ही 'ह्यांना' का नाही सांगितले की 'ही जागा नको म्हणून?' तो किती विचित्र वागतो.'' माझे श्रीगुरुदेवांचा धावा करणं चालूच होतं. आम्हाला त्या जागेत येऊन फक्त सहाच दिवस झाले होते. 'हे' ऑफिसमधून आले व सांगू लागले की, ''आपल्याला नवी जागा मिळाली. श्री. मोहिनी ह्यांची जागा आहे. त्यांचं दत्तमंदिर आहे व जागा चांगली आहे. स्वतंत्र तीन खोल्या व सर्व सोयी घरातच! पिण्याचे पाणीही; खोल्या प्रशस्त आहेत.'' आम्ही लगेच ती जागा पाहून आलो. आम्हाला घरमालकाने त्या घराची किल्लीच हातात दिली व ''उद्यापासून तुम्ही ह्या घरात राहण्यास या, असे सांगितले. आमची त्यांची काही ओळख नव्हती. मला खूप आनंद झाला. ही सर्व श्रीगुरुदेवांची कृपा! मला माहीत होते, हे माझ्या श्रीगुरुदेवांनीच केले. मग आम्ही आमचे सर्व सामान तेथे आणले. अगदी बंगल्यासारखे ते घर होतं. समोर गणपती मंदिर होतं व त्याच्यापुढे घरमालक राहत होते. त्यांचं मोठं दत्तमंदिर आहे व पाठीमागे औदुंबराचं झाड आहे. मला खूप बरं वाटलं. बरं झालं! नगरला रोज श्रीदत्तदेवस्थानात जात होते. आता येथे पण श्रीदत्तप्रभूंचे दर्शन मिळेल, अशी देवाने सोय केली.

आम्ही नवीन घरात राहायला आलो. 'हे' दत्तमंदिरात दर्शनाला गेले व घरी आल्यावर मला सांगू लागले की, घरमालक श्री. मोहिनी सांगत होते की, ''आम्ही हे घर अजून कोणालाही भाड्याने दिलेले नाही. वास्तुशांती झाली तेव्हापासून ते बंदच आहे. नगरचे श्री. क्षीरसागर महाराज माझ्या स्वप्नात आले व म्हणाले, ''माझे भक्त येथे आलेले आहेत. तुम्ही त्यांना राहण्यास जागा द्या.'' मग मी चौकशी केली तेव्हा तहसीलदार कचेरीत तुम्ही नोकरीला असून तुम्हीच नगरहून आला आहात असे समजले. म्हणून मी तुम्हाला कचेरीत भेटलो.'' म्हणजे पाहा– श्रीगुरुदेव आपल्या भक्तांची किती काळजी घेतात! मला रडूच आले. मी श्रीगुरुदेवांच्या फोटोला नमस्कार केला. ''आर्त हाक ऐकण्यास देव सज्ज राहतो! श्रीरामकृष्ण सद्गुरूंसी दोन्ही हात जोडितो.'' श्रीगुरुदेवांनी माझी, त्या'' जागेतून खरोखरच सुटका केली. त्या घरमालकाने आमच्याकडून सहा दिवसांसाठी एका महिन्याचं रु. ६०० भाडे घेतले. मी मनात म्हटले, ''जाऊ दे आपल्या जीवापेक्षा ते जास्त नाही.''

स्त्रीशक्तीचा सन्मान व पावित्र्य रक्षण करणारे गुरुदेव स्त्रीभक्तांचे कनवाळू

कैवारी आहेत. असंख्य महिलांच्या अंतरंगात त्यांनी चैतन्याची ज्योत प्रज्वलित केली आहे; देवघरातील समईत शांतपणे जळणाऱ्या पण प्रकाश देणाऱ्या ज्योतीसारखी! अपेक्षा एवढीच की त्या प्रत्येकीने आपल्या परिसरातील सांस्कृतिक प्रदूषण व आध्यात्मिक अज्ञानाचा अंधार कमी करावा. त्यांना प्रेरणा व शक्ती देणारे गुरुदेव सदैव त्यांच्याजवळच असतात– सागरातील एखाद्या दीपस्तंभासारखे– दूरवर प्रकाशझोत टाकत राहणारे!

***

---

## हे अनुभव घेण्याचे ठिकाण आहे

**(प. पू. श्रीगुरुदेवांचे सत्यकथन)**

''आम्हाला कित्येक लोकांची पत्रे येतात व आम्हाला झालेल्या साक्षात्काराबाबत, आलेल्या अनुभवांबद्दल चौकशी करतात. आमचे म्हणणे असे आहे की, **श्रीदत्तात्रेय निवास आश्रम** हे अनुभव सांगण्याचे ठिकाण नसून, **अनुभव घेण्याचे ठिकाण आहे. जो मोकळ्या मनाने दर्शनाला येईल, येथे स्थिर होईल त्या प्रत्येकाला अनुभव येईल.**

आम्ही कोणत्याही पंथावर व धर्मावर टीका करीत नाही, तर आपल्या धर्मामध्ये ज्या श्रेष्ठ गोष्टी आहेत त्यांची माहिती देत असतो. **वैदिक हिंदू परंपरेमध्ये अनुभव येतात. जी विशेष माहिती आपल्याला अज्ञात असते ती कळते; अनुभवाला येते. ही माहिती गोष्टीरूप वा काल्पनिक, अवांतर माहिती नसते. तेथे फक्त सत्यच असते.** एकदा साक्षात्कार झाल्यानंतर विश्वाच्या मुळाशी असलेले शाश्वत सत्य लक्षात येते व तेच सांगितले जाते.

श्रीगोंदवलेकर महाराजांचे गुरू श्रीतुकामाई यांना विचारले गेले की, 'माणसांना समाधी लागते तशी जनावरांना लागते का? ' ते म्हणाले, 'त्यात विशेष काय आहे?' व त्यांनी बसल्या जागेवरून रस्त्याने जाणाऱ्या एका घोडेस्वाराला घोड्यासह समाधिस्त केले. श्रीतुकामाई हे भगवान विठ्ठलाचे उपासक होते. भगवान विठ्ठल काय किंवा भगवान रामचंद्र काय ही सर्व एकाच दिव्य शक्तीची वेगवेगळी रूपे आहेत. सूत्र एकच आहे, फक्त ओवलेले मणी वेगवेगळे आहेत. घोड्यासारख्या जनावराला देखील समाधी लागली, ह्यावरून महापुरुषाचा अधिकार किती मोठा असतो, हे लक्षात येते.

हे महापुरुष जी कृती करतात, जे कार्य करतात त्यात लोकांचे कल्याणच असते. ह्यामध्ये दूरदृष्टी व उदात्त हेतूच असतो.''



# १२.
# श्रीगुरुदेवांकडून भक्तांचे व्याधीनिवारण

**श्रीमती मंदाकिनी जोशी**

बीए., बीएड् (निवृत्त अध्यापिका, अहमदनगर)

भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधी समस्तही ।
नासती तुटती चिंता आनंदे भीमदर्शने ।।

संकटनिरसन मारुतीस्तोत्रातील हा श्लोक मारुतीरायांच्या दर्शनाने होणाऱ्या लाभांचे वर्णन करणारा असला तरी तो, सद्गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराजांच्या अंगभूत ईश्वरी शक्तीकडून भक्तांना झालेल्या लाभांचे वर्णन करण्यासाठीही उपयोगी ठरतो. श्रीगुरुदेवांच्या कार्याचा एक महत्त्वाचा भाग होता त्यांच्या भक्तांचे स्वास्थ्यरक्षण! ज्या ज्या कारणांमुळे भक्तांना चिंता, क्लेश, पीडा, अस्वस्थता यांच्यामुळे दुःख प्राप्ती होत असे, त्या कारणांना नाहीसे करून भक्तांना स्वस्थ, निरामय जीवन जगण्यासाठी सक्षम बनवणे व त्यांना परमार्थ मार्गावरील वाटचालीसाठी प्रवृत्त करणे, यासाठी ते सदैव प्रयत्नशील असत. मनुष्यदेह ही भगवंताची सर्वश्रेष्ठ कृती असून मनुष्याला या देहातून ईश्वरप्राप्ती होत असते. शरीराच्या माध्यमातूनच उपासनेद्वारे ईश्वर प्राप्त करावयाचा आहे. या देहातच त्याचे ज्ञान प्राप्त करावयाचे आहे. म्हणून भक्तांना मार्गदर्शन करताना श्रीगुरुदेव त्यांना मनाप्रमाणेच देहाच्या स्वास्थ्याची चांगली काळजी घेण्यास सुचवीत असत व स्वास्थ्यरक्षणासाठी सोपे उपायही सांगत असत. पण अनेकदा शारीरिक–मानसिक आधी–व्याधींनी त्रस्त झालेल्या भक्तांच्या स्वास्थ्य रक्षणासाठी त्यांना, स्वतःला होणारे कष्ट सोसून उपाय सुचवावे व उपचार करावे लागत. कधी पुढे होणाऱ्या व्याधींची भक्तांना स्वप्न दृष्टांताद्वारे ते सूचना देत, तर कधी स्वप्नांच्या माध्यमातूनही उपचार करीत.

भूतपिशाच्चाने पछाडलेल्या, भानामतीसारख्या तांत्रिकमांत्रिकांच्या करणीला बळी पडणाऱ्या भक्तांचे रक्षण करीत. डॉक्टर–वैद्य ह्यांनी असाध्य ठरविलेल्या भक्तांच्या आजारांना श्रीगुरुदेव सहज पळवून लावीत. मात्र त्यासाठी भक्ताची पूर्ण शरणागती व श्रद्धा ह्यांची अपेक्षा असे. कधीकधी तर भक्ताला होणाऱ्या व्यथा–वेदना–यातना कमी करण्यासाठी भक्तांच्या व्याधी ते स्वतःकडे घेऊनही भक्तांचे रक्षण करीत. ज्या भक्तांना श्रीगुरुकृपेने स्वास्थ्यलाभ झाला, अशा असंख्य कृतज्ञ भक्तांपैकी काहींच्या पुढे दिलेल्या मनोगतांवरून–निवेदनांवरून यासंबंधीच्या श्रीगुरूंच्या अलौकिक कार्याची कल्पना येते.

**प्रा. रवींद्र गणपतराव जाधव,** एम्.एस्सी. (ॲग्री) (महात्मा फुले कृषी विद्यापीठ, सांगली केंद्र, सांगली) लिहितात – मी येथे आलो त्यावेळी दोन घटना अशा घडल्या– माझी दोन्ही मुले सिझेरियनची आहेत. पहिला मुलगा आहे त्याला एपिलप्सी होती; फिट्सचा त्रास होता. त्याला औषधोपचार करून करून आम्ही बेजार झालो होतो. तेव्हा आम्हाला असेच कोणीतरी सांगितले की, ''नगरला कोणीतरी साक्षात्कारी व्यक्ती आहेत, त्यांच्याकडे जा. त्यांचे आशीर्वाद घ्या.'' आम्ही दोन वेळा दर्शनाला गेलो. दोन्ही वेळा मंदिर बंद झाले होते. तिसऱ्या वेळेला आम्ही गेलो, गुरुदेवांकडे गेलो. आम्हाला त्यांना खूप सांगायचे होते, पण काहीच सांगू शकलो नाही. फक्त दर्शन घेतले व बाहेर येऊन बसलो. मला खंत वाटली– आपण जे बोलण्यासाठी आलो ते बोलू शकलो नाही. आम्ही पुन्हा दर्शनाला जायचा विचार करीत असतांना महाराजांनी आम्हाला खिडकीतून पाहिले. सेवेकऱ्यांना महाराजांनी सांगितले, ''ते जे बसलेले आहेत त्यांना सांग की त्यांचे काम झालेले आहे.'' मी जेव्हा पाया पडलो तेव्हा मी, माझी पत्नी व मुलगा यांना दोन्ही हात वर करून 'गुरुदेवदत्त' असे तोंडाने म्हणून त्यांनी आशीर्वाद दिला होता. त्यावेळी आम्हाला कळले नव्हते की काय आहे पुढे? त्या क्षणापासून मुलाच्या फिट्स बंद झाल्या; पण तत्पूर्वीचा काळ दोन अडीच वर्षांचा होता. त्या काळामध्ये १५ ते २० दिवसांच्या दरम्यान त्याला फिट्स येत असत. त्याला आम्ही पुण्याचे डॉ. सुधीर कोठारी, वाडिया हॉस्पिटल, रूबी हॉस्पिटल इत्यादी ठिकाणी दाखवले होते. तेथे डॉक्टरांनी आम्हाला सांगितले होते की, ''तुम्हाला अद्ययावत् उपचार केले जात आहेत'' आणि तीन वर्षेपर्यंत घेण्यासाठी गोळ्या दिल्या होत्या. ''त्यानंतर डोस कमी केला जाईल. जेव्हा फिट येईल त्यावेळी मागचा कालखंड विसरायचा व पुढे चालायचे.'' सर्वात महत्त्वाचे म्हणजे काय तर डॉक्टर म्हणायचे, ''आम्ही प्रयत्न करू पण यश देणे परमेश्वराच्या हातात आहे.'' असे

स्पष्टपणे मला वाडिया हॉस्पिटलमध्ये सांगण्यात आले होते. त्याची मला प्रचीती आली. हॉस्पिटलमधून जी काही ट्रिटमेंट मिळत होती ती ट्रिटमेंट नव्हती तर खरी ट्रिटमेंट ही सद्‌गुरूंनीच दिली. त्यानंतर त्याचा हा प्रॉब्लेम गेलेला आहे. तो माझ्यासारखा धष्टपुष्ट झालेला आहे. गुरुदेवांनी आशीर्वाद दिल्यापासून त्याला कुठलाही प्रॉब्लेम आलेला नाही.

**श्री. राजाभाऊ भागवत** (पुणे) ह्यांनी श्री. बाबु सुकरे ह्या एका लॉजमध्ये काम करणाऱ्या सामान्य सेवकाच्या मुलीची व्यथा व कथा सांगितली ती अशी–

त्यांची लहान मुलगी बोलू शकत नव्हती. पुण्यातील अनेक तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारही अयशस्वी ठरले होते. ते जेव्हा त्या तीन वर्षांच्या मुलीसह श्रीगुरूंच्या दर्शनाला नगरला गेले तेव्हा श्रीगुरू म्हणाले, ''अरे ही बोलेल'' आणि तिला रोज तुळशीचे एक पान १५ दिवस खायला त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे त्या मुलीने तुळशीचे पान रोज खाल्ले आणि ती हळूहळू बोलू लागली. तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारही अयशस्वी ठरलेल्या त्या बालिकेला श्रीगुरूंच्या आशीर्वचनाच्या प्रभावामुळे वाणीची प्राप्ती झाली, ही गुरुवाणीची किमया!

अहमदनगर महानगरपालिकेतील (निवृत्त) अधिकारी **श्री. मारुतराव जाधव लिहितात –** ''मला बाराही महिने सर्दी असायची. मी महिना महिना डोक्यावरून अंघोळ करायचो नाही. महाराजांनी एकदा मला विचारले, ''का हो, तुमच्याकडे पाणी नाही का?'' मी त्यांना सांगितले, ''बाराही महिने सर्दी असते.'' ते म्हणाले, ''बरं.'' त्यानंतर माझी सर्दी गेली. आता मी दिवसातून दोनदा स्नान करतो. त्यांच्या पत्नी सौ. रत्नमाला जाधव म्हणाल्या, ''ह्यांना अर्धी भाकरीसुद्धा पचत नव्हती. घोटभर दूधही जात नसे. अगदी किडकिडित होते. डोक्यावरून पाणी टाकलं तर खाली येईपर्यंत पाणी गरम होईल एवढी उष्णता अंगात होती. फार त्रास व्हायचा. दर अमावस्या आणि पौर्णिमेला रात्री कॉटवर झोपले की २ फूट उंच उडायचे आणि सारखे रडायचे. काय होतंय हे कळायचं नाही. आम्ही डॉक्टरांना बोलवायचो. पण डॉक्टर म्हणाले, ''ह्यांना काही झालं नाही.'' पहाटे पहाटे डोळा लागायचा. असं बरेच दिवस चाललं. मग त्यांनी महाराजांना सांगितले की, मला असं असं होतं. समोरची व्यक्ती म्हणायची, ''तुमचे थोडेच दिवस राहिलेत.'' महाराज म्हणाले, ''बरोबर आहे. तुमचे थोडेच दिवस राहिलेत. या चरणांशी आला नसतात तर हेच झालं असतं. समोरच्या व्यक्तीने तुम्हाला जरी काही केले तरी तुम्ही काही करू नका. मी पाहून घेईन.'' ती व्यक्ती ह्यांना स्वप्नात दिसली, पण ती महाराजांपर्यंत

आली नाही. नंतर महाराजांनी सांगितलं, ''आता तुमची वाईट दिवसांची मुदत संपली आहे. तुम्ही घाबरला असता, म्हणून तुम्हाला मी काही सांगितलं नाही.'' त्यानंतर त्यांना आरोग्य मिळालं, महाराजांच्या कृपेने लग्नानंतर १५ वर्षांनंतर संतती मिळाली; आरोग्य आणि संपत्तीही मिळाली.

**सौ. अर्चना घाटगे,** बी.एस्सी. (मायक्रो), एल्.एल्.बी. पुणे लिहितात – अनेक जणांचे असाध्य रोग प. पू. महाराजांच्या कृपेने बरे झाले आहेत. ''सर्व रोग प्रशमनं। सर्व पीडा निवारणं ।'' या सद्‌गुरुकृपेचा मीसुद्धा अनुभव घेतला आहे. माझ्या उजव्या हाताच्या अंगठ्याला कॉर्न (कुरुपासारखा प्रकार) झाले होते. ते अनेक उपाय केले तरी जात नव्हते. ऑपरेशन करून मोठी गाठ काढली तरी ते परत आले. मला उजव्या हाताने कोणतीही वस्तू नीट धरता येत नसे व ते हातावर किळसवाणे दिसत होते. डॉक्टरांच्या मते त्यावर काही उपाय नव्हता. प. पू. महाराजांना जेव्हा मी हे सांगितले तेव्हा ते म्हणाले, ''शरीरात अशा आगंतुक वाढी होत असतात.'' त्यावर त्यांनी अत्यंत सोपा उपाय सांगितला. तो केल्यावर काही दिवसातच ते कुरूप कायमचे नाहीसे झाले.

१९९२ मध्ये मला मोठा आजार झाला. मी तर पूर्णपणे खचून गेले होते. प. पू. महाराजांना सर्व माहिती सांगितली. त्यावेळी ते माझ्याशी जे बोलले ते मी कधीही विसरणे शक्य नाही. त्यांनी सांगितले, ''तुम्ही औषधे चालू करा, मी ताबडतोब लक्ष घालतो.'' त्यावर माझे वडील म्हणाले, ''ती म्हणते मी औषधे वगैरे काही घेणार नाही.'' तेव्हा सद्‌गुरू म्हणाले, ''काही गोष्टी लौकिक व्यवहारासाठी कराव्या लागतात. मी सांगतो म्हणून तू औषधे घे; पण विश्वास मात्र माझ्यावर ठेव. तुझी प्रतिकारशक्ती कमी पडते. हा शारीरिक स्थितीचा भाग आहे. काही वेळा ग्रहमानाचा पण परिणाम असतो. मानवी जीवन म्हटल्यावर सुखदुःख आलेच. मी नाही का पडलो व हा पाय घेऊन बसलोय. (त्यावेळी सद्‌गुरूंच्या पायाला प्लॅस्टर होते.) तू औषधे सुरू कर मी ताबडतोब आशीर्वाद देतो.'' त्यांच्या बोलण्याने माझे अस्वस्थ मन शांत झाले. औषधांचा कोर्स संपवून मी कधी पूर्ववत झाले ते मला कळले पण नाही. नंतर त्या आजाराच्या इतर रुग्णांना होणारे त्रास जेव्हा मी पाहिले तेव्हा सद्‌गुरूंनी मला त्या संकटातून किती अलगद सुखरुपपणे बाहेर काढले, याची जाणीव झाली. माझी प्रकृती सुधारत आहे, हे ऐकल्यावर सद्‌गुरू म्हणाले, ''पहा, आम्ही नुसते लक्ष घालतो म्हटल्यावर लोकांना अनुभव येतात.'' एकदा ते म्हणाले होते, ''मी माझ्या भक्तांना शक्यतो दुःख लागू देत नाही. सतत काळजी घेतो आणि त्यातूनही त्यांना

दुःख लागले तर परिमार्जनाचा मार्ग दाखवतो. शक्यतो जेवढी शक्ती देता येईल तेवढी मी तुम्हाला देतो. भक्तांचा औषधोपचारावरील खर्च खूप कमी असतो.''

कल्याणच्या रेल्वे हॉस्पिटलमधील स्टेनोग्राफर **श्रीमती रुक्मिणी अय्यर** ह्यांनी लिहिले आहे की– ''सद्‌गुरूंचे प्रथम दर्शन मला १९९६ मध्ये झाले. २००१ मध्ये **(श्रीगुरूंनी देहत्याग केल्यानंतर)** मी तिरुपतीला माझ्या कुटुंबीयांसह गेले होते. तेथे रात्री सद्‌गुरू माझ्या स्वप्नात आले. त्यावेळी मी (स्वप्नात) नगरचे नवीन दत्तमंदिर पूर्ण झाल्याचे पाहिले. मी एका कोपऱ्यात दोन्ही खांद्यांवर पदर घेऊन उभी होते. तेवढ्यात श्रीगुरुदेव दत्तमंदिरातून बाहेर आले. ते माझ्याजवळ थांबले व मला म्हणाले, ''रुक्मिणी तुला बरं वाटत नाही का? तुला थंडी वाजते का? तू पदर असाच घेत जा आणि डाव्या स्तनाकडे खूण करून ते बोलले, ''येथे जरा लक्ष दे. अजिबात दुर्लक्ष करू नकोस.'' त्यानंतर त्यांचा आधी प्रसन्न असलेला चेहरा गंभीर झाला. ते बघून मी घाबरले. एकाएकी त्यांचा चेहरा का बदलला, गंभीर का झाला हे समजेना. नंतर काही दिवस मी दोन्ही खांद्यांवर पदर घेत होते. पण फार गरम व्हायचे म्हणून व आमच्या येथील लोक म्हणत की असा पदर घेतल्यानंतर तू आजारी वाटतेस, म्हणून मी पण तसा पदर घ्यायचे सोडून दिले. त्यानंतर माझ्या डाव्या स्तनातून कधी कधी रक्ताचा स्राव व्हायचा. गुरुदेवांनी मला आधीच सावध केले होते म्हणून मी डॉक्टरांकडे नियमितपणे दाखवत होते. त्यावेळी डॉक्टर म्हणाले, ''आपको मेनोपॉज हो रहा है, इसलिए ऐसा हो रहा है ।'' २००४ मध्ये पुन्हा माझ्या डाव्या स्तनांतून रक्तस्राव व्हायला लागला. डॉक्टरांना दाखवल्यावर त्यांनी मॅमोग्राफी करायला पाठवले. रिपोर्ट आला. तो पाहून डॉक्टर म्हणाले, ''चिंताकी कोई बात नही, **रिपोर्टमें कॅन्सर नही निकला है ।'' तरीही मी ब्रेस्ट कॅन्सर स्पेशालिस्ट** (डॉ. रेखा शहा) यांना दाखवले. तेव्हा त्याही म्हणाल्या, ''**आपको कॅन्सर नही हुआ है,** ६ महिने बाद आप दोबारा दिखाना ।'' ६ महिन्यांनंतर त्यांच्याकडे गेल्यावर त्यांना आढळले की माझ्या डाव्या स्तनात एक छोटी गाठ होती. ती तपासून त्या म्हणाल्या, **''यह कॅन्सरकी गाँठ नहीं है ।''** महिन्यानंतर मी त्यांच्याकडे गेले. तपासणीनंतर त्या म्हणाल्या, **''यह lump हो गया।'' गाठ फार मोठी झाली होती. म्हणून डाव्या स्तनातून रक्त काढून तपासणीसाठी पाठविण्यात आले. रिपोर्टस पाहत त्या म्हणाल्या की, ''आपके रिपोर्ट अच्छे नही है । आपको ब्रेस्ट कॅन्सर हो गया है ।''** त्यावेळी मला फार टेन्शन आले. मी डॉ. शहांना म्हणाले, ''मॅडम, इससे बचनेके लियेही मै आपके पास आयी थी । **मेरे**

**गुरुदेवने २००१ में ही बाये स्तन के बारे में सावधानता रखने के लिए कहा था ।**'' त्या म्हणाल्या, ''ऐसा कभी कभी हो जाता है ।'' दुसऱ्या दिवशी माझा डावा स्तन काढण्यात आला. ऑपरेशन थिएटरमध्ये न्यायच्या आधी मी गुरुदेवांच्या फोटोपुढे खूप रडले व म्हणाले की, ''मी तुमच्या चरणी लीन आहे, मग हे कसे घडले?'' नंतर मी त्यांना प्रार्थना केली की ''तुम्ही माझ्याबरोबर ऑपरेशन थिएटरमध्ये या. मला फार भीती वाटते.'' ऑपरेशन झाल्यानंतर मला तेथे जरा शुद्ध आली होती, तेवढ्यात गुरुदेवांचा आवाज मला ऐकू आला. ते म्हणाले, ''पाहिलंस का रुक्मिणी किती गाठी आहेत ते.'' **स्तनामध्ये एकूण १० गाठी होत्या.** त्यात २ गाठी Metastasis ला positive आहेत. नंतर गुरुदेव 'श्रीगुरुदेवदत्त' असे म्हणाले. त्यानंतर अनेक तपासण्या व उपचार सुरू होते. एके दिवशी रात्री मी शांतपणे झोपलेली असता **सकाळी सुमारे ६-४५ ला गुरुदेव माझ्यासमोर खुर्चीवर बसले.** माझा डावा हात त्यांनी वर केला व जोरात अंगठ्याने मला दाब दिला. त्यांनी असं का केलं हे मला समजलं नाही. म्हणून मी आमच्या डॉ. अनिता जयस्वालला घडलेली हकिकत सांगितली. त्यावर ती म्हणाली, ''गुरुदेवने आपके Heart में Pressure दिया है । जब मरीज का हृदय काम करना बंद करता है तो हम इसी तरहसे मरीज को Heart में Pressure देते है ।'' गुरुदेवांनी मला Heart मध्ये Pressure दिले **म्हणून मी आज जिवंत आहे;** नाहीतर त्याच दिवशी मी मरणार होते. सध्या गुरुदेवांचे आयुर्वेदिक औषध मी चालू ठेवलेले आहे. त्याशिवाय टाटा हॉस्पिटलचे औषधही चालू आहे. आज मी केवळ गुरुदेवांमुळे एकदम फिट आहे. ऑफिसलाही जाते. घरातील कामेही करते व सेवेची संधी मिळाली तर गुरुसेवाही करते.

अहमदनगरच्या **श्रीमती कमल दिगंबर निसळ** ह्यांनी सांगितले की- कै. डॉ. भिकुअण्णा खासनीसांनी १९५४ ला लिहिलेल्या 'श्रीरामरायमाहात्म्य' या छोट्या ग्रंथात श्रीगुरूंच्या तपश्चर्येच्या व अज्ञातवासाच्या काळात श्रीगुरूंकडून साहाय्याची याचना करणाऱ्या भक्तांना कशाप्रकारे साहाय्य झाले, याचा तपशील नोंदविला आहे. मात्र तो ग्रंथ त्या काळात 'प्रसिद्ध करू नये, तो योग्यवेळी प्रकाशित होईल' असे श्रीगुरूंनी भिकुअण्णांना सांगितले होते. त्याप्रमाणे तो ग्रंथ ४० वर्षांनंतर प्रकाशित झाला. त्यात अनेक आश्चर्यकारक घटनांचा उल्लेख आहे. त्यापैकी भानामतीचा प्रयोग ज्यांच्यावर करण्यात आला, अशा उमाकांत-मालू या दांपत्याला भोगाव्या लागलेल्या भयंकर त्रासाचा उल्लेख आहे. तो उमाकांत माझा मोठा भाऊ. त्याच्यावर मांग समाजातील एका स्त्रीने करणी केली होती. त्या अवस्थेत तो घरात खूप त्रास

द्यायचा. अंगावरचे नवे कपडे फाडून टाकायचा. आम्हा धाकट्या भावंडांना खूप मारायचाही! तो वेडापिसा झाला. भ्रमिष्ट झाला. कधी हसे, कधी रडत बसे. त्याचा संसार विस्कळित झाला. म्हणून मालू माहेरी (श्री. गोविंदराव मुळे यांच्याकडे) आली. पाठोपाठ पती उमाकांतही तेथे आला. गुरुदेव त्यावेळी श्री. मुळे यांच्या वाड्यात राहत होते. श्री. मुळे यांनी गुरुदेवांकडे साहाय्याची याचना केली. त्यावेळी गुरुदेव जेमतेम १७–१८ वर्षांचे असतील. त्यांनी उमाकांतला भस्माचे रिंगण घालून त्यात बसवले व त्याच्यावर मारली गेलेली मूठ स्वतः झेलली आणि निष्प्रभ केली. त्यावेळी मी अगदीच लहान होते. पण मला एवढे चांगले आठवते. 'रामरायमाहात्म्यात वर्णन केलेल्या घटना पूर्ण सत्य आहेत. पुढे त्याचा संसार श्रीगुरुकृपेने चांगला झाला.

माझे बाराव्या वर्षी लग्न झाले आणि लग्न झाल्यावर माझ्या अंगावर कोड आले. माझा भाऊ मला प. पू. सद्‌गुरूंकडे घेऊन गेला. त्यांनी मला श्रीदत्तात्रेयांची सेवा करायला सांगितले. सेवा काय करायची तर औंदुबराला रोज प्रदक्षिणा घालायला सांगितले. मी तीन महिने रोज एकशेआठ प्रदक्षिणा घालायची. त्यामुळे माझ्या अंगावरचे कोड पूर्णपणे गेले.

अहमदनगरच्याच **सौ. शोभा निसळ–कुकडे** यांचा अनुभवही असाच आहे– ' ''माझा भाऊ मळ्यात राहतो. त्याचे लग्न ठरले. तेव्हापासून त्याला अमावास्या, पौर्णिमा, शनिवार या दिवशी थोडा थोडा त्रास सुरू झाला. विचित्र स्वप्ने पडू लागली. त्याला भीती वाटू लागली. नंतर लग्न झाले. लग्नात 'शुभमंगल सावधान' म्हणताच तो बेशुद्ध झाला व खाली पडला. सगळ्यांचे पदर पेटले. ही काय विपरीत घटना घडली म्हणून दुसरा भाऊ (श्रीकृष्ण कुकडे) प. पू. गुरुदेवांकडे गेला. त्यांना त्याने सगळी हकीगत सांगितली. त्यांनी तीर्थ व अंगारा दिला व सर्वांना रामरक्षा म्हणण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही केले. दुपारी ४ वाजता तो शुद्धीवर आला. नंतर पुढील विधी केले. नंतर त्याला अमावास्या पौर्णिमेला फिट आल्यासारखे व्हायचे. उंच उडणे, लांब सरकणे, मुठी वळवणे, तोंडातून फेस येणे वगैरे प्रकार सुरू झाले. तो प. पू. गुरुदेवांकडे जाऊ शकत नव्हता. आश्रमापर्यंत सायकलवर जायचा व तिथून मागे फिरायचा. ताट वाढून समोर ठेवले की फेकून द्यायचा. असे तीनचार वर्षे चालले. त्याला दवाखान्यात दाखल केले; पण डॉक्टरांनी सांगितले– ''याच्या नखातसुद्धा रोग नाही. तुम्ही काहीतरी बाहेरचे बघा.'' पण आमचा विश्वास नव्हता.

एके दिवशी तो शेतातून कुकडे वाड्यात गेला. तेथे तंत्रमंत्र जाणणारा एक

देवऋषी आला होता. त्याची व याची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर हा तेथेच मुठी वळवून बेशुद्ध पडला. त्या देवऋषीने सांगितले, ''तुमच्या देवाचा प. पू. गुरुदेवांचा दरबार मोठा आहे. तिकडे ह्याला न्या. त्याला कोणीतरी जबरदस्त करणी केलेली आहे. माझ्या हातून हा जाईल. तुमचे देवच त्याला बरे करतील.'' मग २–३ जणांनी त्याला रिक्षात घालून गुरुदेवांकडे नेले. श्रीगुरू श्रीगुरुचरित्राची पोथी वाचत होते. त्यांनी त्याला जवळ बसवून घेतले. त्याची सगळी हकीकत ऐकून घेतली. त्याचे फोटो वगैरे सगळे काही, त्याच्या वस्तू सासुरवाडीहून आणण्यास सांगितले. ''त्याला आता सासुरवाडीला पाठवायचे नाही,'' असे सांगितले. त्याला एक महिना आश्रमातच ठेवून घेतले. श्रीगुरुदेव आयुष्यभर त्याच्या पाठीमागे उभे राहिले. त्यांनीच त्याला तारले आहे. त्यांच्यावरच त्याचे जीवन सर्वस्वी अवलंबून आहे.

**सौ. सुधा जोशी,** पुणे ह्यांनी सांगितले श्रीगुरुदेवांनी व्याधीमुक्त करून माझ्या नातीवरील गंडांतर टाळले. त्या लिहितात – १९६९ साली माझ्या सर्वात थोरल्या मुलाचे लग्न झाले. माझी थोरली सून नगरचे श्री. नानासाहेब निसळ यांची कन्या होती. तिचा भाऊ श्रीकांत निसळ हा लहानपणापासून आपल्या मित्रांबरोबर कुकडे वाड्यात प. पू. महाराजांच्या दर्शनास जात असे. त्याची प. पू. महाराजांच्यावर भक्ती आणि दृढ श्रद्धा होती. माझ्या थोरल्या सुनेला दोन मुली होत्या. पैकी दुसरी मुलगी एक वर्षाची झाली असताना माझी सून चार दिवस नगरला माहेरपणास गेली. तिच्या भावाने (श्रीकांतने) मुलींना आजीजवळ ठेवून बहिणीला प. पू. महाराजांकडे दर्शनास नेले असता प. पू. महाराज म्हणाले, ''मुलींना का आणले नाहीस?'' थोडे बोलणे झाल्यावर प. पू. महाराजांनी, ''तुझ्या दुसऱ्या मुलीवर वयाच्या दुसऱ्या वर्षी गंडांतर आहे'' असे हळुवारपणे सांगितले. 'मग त्यावर काही उपाय असेल तर तो कृपा करून सांगावा,' अशी माझ्या सुनेने विनंती केली असता प. पू. महाराज म्हणाले, ''ब्राह्मणांकडून रुद्राभिषेक करावा व त्या अभिषेक केलेल्या पवित्र उदकाने तिला स्नान घालावे, म्हणजे मग भीती उरणार नाही.'' असे सांगून तिला धीर दिला.

पुण्याला आल्यावर मला सुनेकडून ही धक्कादायक गोष्ट कळली. तेव्हा माझ्या नातीसाठी रुद्राभिषेक करण्याचे ठरविले. अकरा घनपाठी ब्राह्मण बोलावून रुद्राभिषेक केला आणि त्या पवित्र पाण्याने तिला स्नान घातले. ब्राह्मणांना भोजन, दक्षिणा देऊन संतुष्ट केले. पण आम्ही ज्या पद्धतीने रुद्राभिषेक केला तो प. पू. महाराजांना पसंत न पडल्यामुळे त्यांनी डॉ. श्री. भिकूअण्णा खासनीस, श्री. रेंघे व इतर दोघांकडून 'दत्तात्रेय निवास' या नव्या वास्तूत रुद्राभिषेक केला आणि त्या पवित्र उदकाने

माझ्या नातीला स्नान घातले.

त्यानंतर नातीला दुसरे वर्ष लागले आणि एके दिवशी अचानक तिला ताप भरला. उलट्या–जुलाब सुरू झाले. तिची प्रकृती एकदम नाजूक झाली. मग मी तिला चाकणहून पुण्यास घेऊन आले. **बालरोगतज्ज्ञ डॉ. कर्वेंना दाखवून त्यांचे औषध सुरु झाले, पण तब्येतीत सुधारणा दिसत नव्हती. सर्वांनी आशा सोडली.** काहीही न खाता–पिता ती पडून होती. अशा कठीण अवस्थेत मी नगरला श्रीकांत निसळला फोन करून ही गोष्ट प. पू. महाराजांना कळविण्यास सांगितले. प. पू. महाराजांची भेट घेतली असता, त्यांना सर्व आधीच कळले होते. ते वाटच पाहात होते. त्यांनी ताबडतोब श्रीकांतबरोबर तीर्थ पाठवले आणि ते थोडे–थोडे द्यावयास सांगितले. ती खायला मागेल तेव्हा थोडे दूध देण्यास सांगितले. तसेच झाले. एकदोनदा तीर्थ घेऊन झाल्यावर तिने डोळे उघडून दूध मागितले. त्यानंतर तिची तब्येत सुधारू लागून ती चांगली हिंडू–फिरू लागली. प. पू. महाराज म्हणाले, ''प्रसंग कठीण होता, पण आता काळजीचे कारण नाही. मी तिच्या पुढील आयुष्यातील तीस वर्षे आयुष्य परमेश्वराकडून मागून घेतले असल्याचे सांगून, ही मुलगी हुशार निघेल आणि पुढे हीसुद्धा डॉक्टर होईल,'' असे सांगून तिला आशीर्वाद दिला. आता मला सांगायला आनंद वाटतो की, ते प. पू. महाराजांचे आशीर्वाद अक्षरशः खरे झाले आहेत. आज ती माझी नात होमिओपॅथी डॉक्टर झाली आहे. प. पू. महाराजांच्या आध्यात्मिक सामर्थ्याचा आमच्या कुटुंबाला मिळालेला हा पहिला प्रत्यय होय.

**सौ. स्मिता प्रकाश पिले,** बी.ए., डी.एड. मुख्याध्यापिका, नूतन बालविकास मंदिर, पुणे लिहितात की– मला एक दिवस रात्री अतिशय अस्वस्थ वाटू लागले. गुदमरल्यासारखे होऊ लागले. श्वासही घेता येईना. डोळे मिटले की आपण खोल खोल अंधारात जात आहोत, असे वाटू लागले. माझा मुलगा तेव्हा १।।–२ वर्षांचा होता, तोही अचानक किंचाळून रडू लागला. त्याला काही कळले होते की काय कोण जाणे! हे 'नगरला फोन करू का' असे विचारत होते. पण रात्रीची १।।–२ ची वेळ होती. अशा अवेळी गुरुदेवांना त्रास देणे बरे वाटेना. म्हणून मी 'पहाटे फोन करा' असे सांगितले व मनातल्या मनात गुरुदेवांचा धावा सुरू केला. पहाटे गुरुदेवांना फोन केला, तेव्हा 'मी लक्ष घालतो' असे गुरुदेवांनी सांगितले. त्यानंतर माझ्या तब्येतीत फरक पडू लागला. मला बरे वाटू लागले. त्यावेळी गुरुदेवांच्या फोटोला जुईच्या फुलांचा हार घातला होता. एरवी जुईची फुले लगेच सुकतात, पण त्यावेळी तीन दिवस तो हार जसाच्या तसा होता. जणू माझे रक्षण करण्यासाठी गुरुदेव तेथे आहेत,

असे मला जाणवत होते. नंतर २-३ दिवसांनी मला गुरुदेवांकडून पत्र आले. त्यात माझ्यावर गंडांतर होते व त्याचे निवारण झाल्याचे कळले. हा अनुभव केवढा मोठा आहे! खरोखर मला तेव्हा मी संपल्याची जाणीव होत होती; पण मनात येत होते, 'गुरुदेव असताना घाबरायचे कारणच काय? योग्य असेल ते गुरुदेव करतीलच. तसा विश्वासही होता.

श्री. अनिल पाटणकर यांच्या पत्नी **सौ. प्रतिभा पाटणकर,** ठाणे लिहितात – माझ्या दुखण्यामुळे आम्ही सर्वजण बिकट परिस्थितीत सापडलो होतो. घरातील स्वास्थ्य पार बिघडले होते. परंतु अशा परिस्थितीत नेहमीप्रमाणे दयार्द्र होऊन गुरूमाऊली आमच्या साहाय्यासाठी धावून आली आणि आम्हाला सावरले, त्यातून बाहेर काढले.

''सद्गुरूंची कृपा झाली की ती कशी तत्क्षणी होते याचा अनुभव मी आज घेत आहे. माझ्या दुखण्याच्या काळात ज्यांनी मला पाहिलं होतं, त्यांना आज माझ्याकडे पाहून याची सत्यता पटते आहे.

''जून १९९३ पासून माझा डावा पाय कमरेपासून अगदी पायाच्या बोटांपर्यंत अचानक दुखू लागला. वास्तविक अशाप्रकारची कुठलीही व्याधी पूर्वी नव्हती; ती कुठलंच निमित्त नसतांना अचानक सुरू झाली. हळूहळू दुखण्याचं प्रमाण इतकं वाढलं की चालणं तर सोडाच, पण उठणं बसणंही अशक्य व्हायला लागलं. वेदना वाढतच होत्या. क्षणभरही त्या असह्य वेदनांपासून सुटका होत नव्हती. कुणीतरी पाय धरून जोरात पिरगळतोय अशी जाणीव सतत होत होती. डॉक्टरी उपायांनी दुखण्याला जराही उतार पडत नव्हता. अशा वेळी आपणा सर्व गुरुभक्तांना आधार एकच– तो म्हणजे श्रीगुरुचरणांचा. दुखणं सद्गुरूंच्या कानावर घातलं. त्यांचे आशीर्वाद घेतले. मनाला खूप धीर आला. आत्मविश्वास वाटू लागला. केवळ सद्गुरूंच्या कृपेने या दुखण्यातून नक्की उठणार याची खात्री झाली.

''डॉक्टरांनी पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. मोठी शस्त्रक्रिया करावी लागेल अशी चिन्हं दिसू लागली. सद्गुरूंच्या रौप्यतुला सोहळ्याचा दिवस जवळ येऊ लागला, तशी मी अस्वस्थ होऊ लागले. रौप्यतुलेपर्यंत मला अंथरुणातून उठणं आवश्यकच होतं. श्रीचरणांशी येऊनही 'न भूतो न भविष्यति' अशा ह्या सोहळ्यात सद्गुरूंचं दर्शन मी घेऊ शकले नाही तर माझ्यासारखी अभागी मीच असे वाटे. रोज सद्गुरूचरणांशी प्रार्थना करीत होते, करुणा भाकत होते. रौप्यतुलेचा सोहळा चार दिवसांवर आला तरी दुखण्याचं प्रमाण कमी होईना. डॉक्टरांची परवानगी नसतांनाही

मी केवळ सद्गुरूकृपेने नगरला येऊन पोहोचले. रौप्यतुलेचा भव्यदिव्य सोहळा पाहतांना देहभान हरपलं; पायाचं दुखणं क्षणभर विसरूनही गेले. सद्गुरूंनी प्रकृतीची चौकशी केली. कृपादृष्टीने बघितलं. खूप दिलासा मिळाला. घरी आल्यानंतर पुन्हा डॉक्टरांनी वैद्यकीय तपासणी केल्यानंतर पायांत सुधारणा आहे आणि शस्त्रक्रिया टळली आहे, असं सांगितलं. सद्गुरूंच्या कृपादृष्टीचा पुन्हा प्रत्यय आला.''

''नंतर पुढच्याच महिन्यात डिसेंबरमध्ये सद्गुरूंचं वास्तव्य मुंबईत होतं. त्यावेळेस दर्शनास गेले असताना त्यांनी पायाची चौकशी केली, तेव्हा सांगितलं की अजून खाली बसता येत नाही आणि ५ मिनिटंसुद्धा आधाराशिवाय उभं राहता येत नाही. आशीर्वाद आणि प्रसाद घेऊन प्रसन्न मनाने घरी आले आणि त्याच दिवशी माझ्या आयुष्यातला सुवर्ण क्षण अकल्पितपणे आला. रात्र होती कार्तिक अमावस्येची, वार सोमवार; पहाटे ३–३ ।। चा सुमार. अशा ब्राह्म मुहूर्तावर **स्वप्नात सद्गुरूंनी दर्शन दिलं. कार्तिक सोमवारी साक्षात् शिवस्वरूपाचं दर्शन झालं.** स्थळ गाणगापूरची चिदानंद धर्मशाळा असावी, कारण छोटीशी खोली आणि बाजूला गच्ची दिसत होती. मी ५–६ वर्षांची खणाचा परकर पोलका घातलेली. सद्गुरूंच दर्शन घेऊन आईबरोबर पुण्याला घरी आले. घरी आल्या आल्याच आईला सांगू लागले की मला पुन्हा दर्शनाला जायचंय. मी आत्ताच जाणार. मी निघाले. जाणवत होतं की आपण खूप लहान आहोत. आगगाडीनं जायचंय, जवळ पैसे नाहीत, तरीही निघालेच. महाराजांच्या समोर येऊन उभी राहिले. श्रीगुरू पाटावर बसले होते. त्यांनी मला समोर बसवलं. आपल्या उजव्या पायाने माझ्या दुखणाऱ्या डाव्या पायाच्या अंगठ्यावर जोरात दाब दिला. मला खाली वाकायला सांगून त्यांनी स्वतः हातांनी मला उठवलं. असे तीन वेळा उपचार केल्यावर मला समोरच्या स्टुलावर बसवलं. मी इतकी लहान होते की आपण गुरुदेवांसमोर बसलो आहोत, हे कळतच नव्हतं. उलट वडिलांशी बोलावं अशा निरागसपणे मी सद्गुरूंशी अखंड बोलत होते. अर्ध्या तासानंतर सद्गुरूंनी मला उठायला सांगितलं. अर्ध्या तासापूर्वी मी परकरी पोर स्टुलावर बसले होते गाणगापुरात. पण उठताना मात्र आजची 'मी' उभी होते, श्री. गोळेसाहेबांच्या घरी, जिथे मी सकाळीच दर्शन घेतलं. मी घरी आले आणि दृष्टांत संपला. मी जागी झाले. माझा आनंद अवर्णनीय होता. वेदनेचा मागमूसही नव्हता. दुसऱ्याच दिवशी सद्गुरू ठाण्यास आमच्या घरी यायचे होते, त्या तयारीला लागले. आदल्या दिवशी ५ मिनिटंही उभी राहू न शकणारी मी, दुसऱ्या दिवशी संपूर्ण तयारीसाठी उभी होते, अगदी पूर्वीच्याच उत्साहाने.''

''दुसऱ्या दिवशी सद्‌गुरूंचे चरण घराला लागले. सर्वजण अत्यानंदात होते. मी माझा दृष्टांत विनम्रपणे कथन केला. तो ऐकून सद्‌गुरू म्हणाले, ''हा खरोखरच स्वप्नदृष्टांत आहे. माझं वास्तव्य इथे आहे यात शंकाच नाही.''

''या माझ्या अनुभवावरून परमेश्वरी शक्ती सर्वश्रेष्ठ आहे, याचाच प्रत्यय येतो. **कुठल्याही आधुनिक वैद्यकशास्त्राला आजपर्यंत क्षणार्धात रोग्याला पूर्ववत् करता आलेलं नाही. इथे कुठेही मंत्र, तंत्र नाही. पण चमत्कार मात्र झालेला आहे. केवळ स्वप्नदर्शनात असा चमत्कार, ईश्वरअनुग्रहित साक्षात्कारी सत्पुरुषच घडवू शकतात.** पुन्हा अशा वेळी आपले दंडकही मोडत नाही. ज्ञात आहेच की सद्‌गुरू कधीही कुणाला स्पर्श करीत नाहीत. म्हणून माझ्याबाबतीत मला कुमारिका म्हणून त्यांनी स्पर्शदर्शन दिले आणि उपचार केले; कारण त्यांनी सांगितल्याप्रमाणे कुमारिका हे जगदंबेचेच स्वरूप असतं.''

**श्री. दशरथ मुरलीधर गुंजाळ,** सेवानिवृत्त अधिकारी, व्होल्टास कंपनी, ठाणे लिहितात की, – नगरला मंदिरातील सेवेसाठी गेलो होतो. त्यावेळी सद्‌गुरू आजारी होते. भक्तांना त्यांचे दर्शन बंद होते. त्यांचे वास्तव्य वेदान्त वास्तूत तिसऱ्या मजल्यावर होते. मनात विचार आला की, कामाला सुरुवात करण्याअगोदर सद्‌गुरुंचे दर्शन झाले तर बरे होईल; असा विचार मनात येताच मला सद्‌गुरुंनी वर बोलावून घेतले. मी वर त्यांच्या खोलीमध्ये गेलो; त्यावेळी ते कॉटवर पहुडलेले होते. त्यांनी मला पाहिले व ते उठून बसले व त्यांनी मला दर्शन दिले. त्यावेळी त्यांच्या सर्व देहामध्ये मला तेजस्वी प्रकाश दिसला. ते मला म्हणाले, ''मी महिनाभर कुणालाही दर्शन दिले नाही. आज फक्त तुम्हाला दिले.'' नंतर मला त्यांनी काम करण्याची परवानगी दिली. त्यावेळी त्यांचे ऑपरेशन झालेले होते, त्याच्या वेदना त्यांना असह्य होत होत्या; त्यांना थकवा आलेला होता; चालता येत नव्हते, उठता येत नव्हते. तरी त्यांनी मला तसे दाखविले नाही. माझे काम झाल्यानंतर मला पुन्हा सद्‌गुरुंनी ५ वाजता बोलावून घेतले. त्यावेळी मुंबईचे (गिरगावचे) भक्त आणि नगरचे एक भक्त हेही आले होते. महाराजांनी आम्हाला बसविले.

मी प्रथम महाराजांच्या तब्येतीची चौकशी केली. त्यावेळी मी महाराजांना म्हणालो, ''आपणाला जो आजार आहे, तो आम्हां भक्त लोकांचाच आहे. आपण भक्तांच्या पीडा आपल्या देहावर घेऊन त्यांना व्याधीमुक्त करता.'' त्यावर ते मला म्हणाले, ''गुंजाळ, तुम्ही जे बोलता ते अगदी योग्यच आहे.'' नंतर त्यांनी करुण कहाणी सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, ''हा मुंबईचा भक्त संपला होता; त्यानेच मला

मुंबई दाखविली, त्याची मला दया आली; मी देवाला प्रार्थना केली; त्या भक्ताला आपण उठविले नाही तर माझे मुंबईला जाण्याचे बंद होईल. तेव्हा देवाला दया आली; त्या क्षणीच मुंबईचा तो भक्त उठून बसला. नंतर तो म्हणाला, ''महाराज, मी संपलो होतो; आपणच मला पुनर्जन्म दिला.'' नंतर ते म्हणाले, **''भक्तांच्या व्याधी आज ह्या देहाला भोगाव्या लागत आहेत.''** नंतर म्हणाले, ''हा नगरचा भक्त. ह्याची पत्नी कॅन्सरच्या आजाराने नगरला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होती. तरीही हा भक्त आपल्या गाणगापूर यात्रेमध्ये (तिला सोडून) गाणगापूरला आला होता. त्यावेळी मी त्यांना विचारले, ''पत्नी कॅन्सरने आजारी आहे; तिला सोडून आपण कशाला आलात?'' त्यावर ते म्हणाले, ''तिला पाहणारे आपण आहात,'' असे ते मला बोलल्यानंतर मला जातीने लक्ष घालावे लागले व तिला कॅन्सरच्या आजारातून बरे केले. **ह्या सर्व व्याधी एकाच वेळेला ह्या देहाला भोगाव्या लागत आहेत.**'' व नंतर म्हणाले, ''मलासुद्धा काळाने सोडलेले नाही; तोसुद्धा आला होता; आजार सुरू होण्याच्या अगोदर पहिल्या दिवशी रात्री मंदिरातला कधीच न विझणारा दिवा विझला; त्यावेळीच मला येणाऱ्या संकटाची चाहूल लागली. नंतर तीन दिवस सतत रात्री माझ्या सोबतीला दरवाज्यावर ६ फूट उंचीचा काळा पुरुष दिसू लागला. मी त्याला पाहत होतो, तो काळ होता ! त्यावेळी मी देवाला प्रार्थना केली की ''ते काय आहे, ते बघा.'' नंतर पुढे तो पुरुष यायचा बंद झाला. नंतर मी अस्वस्थ होत गेलो. मी काळाच्या नियमाचे उल्लंघन केले म्हणून तो आला होता. काळावर कोणीही मात करू शकत नाही. तो आला म्हणजे जावेच लागते; परंतु माझा अवतार असल्यामुळे त्याला परत जावे लागले. काळावर मात करण्याची शक्ती फक्त अवतारी पुरूषाकडेच असते. मी आतापर्यंत कुणालाही हे सांगितले नाही, फक्त तुम्हालाच प्रथम सांगितले आहे.'' त्यावेळी महाराज आमच्याशी एक तास बोलत होते.

**श्री. श्रीकांत निसळ,** (निवृत्त बँक अधिकारी, अहमदनगर) – ह्यांनी श्रीगुरुदेवांची आयुष्याकडे बघण्याची वृत्ती कशी होती, हे दर्शवणारी एक घटना सांगितली–

एक बाई श्रीगुरुदर्शनासाठी यायची व सतत रडायची. ती का रडायची हे आम्हाला कळायचं नाही. पुढे एक दिवस असं झालं की ती यायची बंद झाली. त्याच दिवसापासून श्रीगुरुदेवांची तब्येत एकदम ढासळली. त्यांना प्रचंड त्रास होत होता. माझ्या मनात आलं– त्या बाईंचं येणं बंद होणं आणि श्रीगुरुंची तब्येत ढासळणं याचा एकमेकांशी काहीतरी संबंध असावा. मी त्यांना ३–४ वेळा खोदून विचारल्यावर,

विनवण्या केल्यावर ते म्हणाले, ''तू म्हणतोस ते बरोबर आहे.'' त्यांनी हे सांगितल्यावर मला खूप संताप आला. तिला रक्तीमूळव्याधीचा प्रचंड त्रास होत होता. श्रीगुरुदेवांनी ते दुखणं स्वतःवर ओढवून घेतलं आणि त्या बाईला बरं वाटल्यावर ती कधीही फिरकलीही नाही. लोकांची ही वृत्ती आणि श्रीगुरूंची ही कृती! ''बाई कृतघ्न आहे.'' असे मी म्हटल्यावर त्यांनी दिलेलं उत्तर त्यांची आयुष्याकडे बघण्याची वृत्ती सांगून जाते. ''आमचा जन्म यासाठीच आहे. लोकांकरिता! त्यापुढे शरीराची काय पर्वा करायची? ते काय आज आहे, उद्या नाही. कधीतरी हे शरीर पडणारच आहे. त्यात कोणाचंतरी काम होऊन गेलं म्हणजे झालं. त्यात काय बिघडलं?''

या सर्व अनुभव घेणाऱ्या गुरुभक्तांच्या निवेदनांवर, निरनिराळ्या आधीव्याधींनी पीडलेल्या गुरुभक्तांच्या देहरक्षणासाठी सद्‌गुरूंनी कसे व किती प्रयत्न व कष्ट केले याची जाणीव होते आणि त्यांच्या अलौकिक विभूतिमत्त्वाच्या महत्त्वाच्या पैलूचे दर्शन घडते.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।।

हे संतवचन सद्‌गुरूंच्या जीवितकार्याचे व देहस्थितीचे समर्पक वर्णन करणारे आहे. गुरुकृपेने ह्या खडतर तपश्चर्येने प्राप्त झालेल्या दैवी शक्तीसामर्थ्याचा उपयोग त्यांनी आर्ततेने धावा करणाऱ्या दुर्दैवी दुःखितांच्या दुःखनिवारणासाठी केला. चरणाशी येऊन पोहोचलेल्या पीडितांना आश्रय व आधार देण्यासाठी, भक्तरक्षणासाठी त्यांनी स्वतःची काया सतत झिजवली. मोठ्या आशेने आलेल्या असंख्य गांजलेल्या व्यक्तींच्या व्यथा–वेदना–व्याधींच्या करुण कहाण्या ऐकून त्यांना खूप क्लेश होत व त्यांच्या प्रकृतीवरही विपरीत परिणाम होत असे. काही भक्तांच्या वा त्यांच्या कुटुंबीयांच्या व्याधी तर त्यांनी स्वतःकडे घेऊन त्या पीडितांना व्याधीमुक्त केले होते. त्यांना मधुमेहाची व्याधी जडली. तिने त्यांचे शरीर पोखरून काढले. त्यांच्या किडनीवर व दृष्टीवर त्याचा वाईट परिणाम झाला. नियमितपणे इन्सुलिनची इंजेक्शने, डायलिसिस यांसारखे उपचार करून घ्यावे लागत. पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे व्हीलचेअरचा वापर करणेही भाग पडले होते.

तरीही त्याबाबतीत बोलतांना ते एकदा म्हणाले होते– **''(देवाकडे) मी माझ्यासाठी काहीच मागत नाही.** मी ''त्याला कधीही असं म्हणत नाही की मला प्रकृतीस्वास्थ्य दे. पडेल तो त्रास सहन करण्यासाठी औषध, इंजेक्शने घेतो. मधुमेहाच्या उपचारासाठी १०,००० पेक्षा जास्त सुया (इंजेक्शने) देहाला टोचून झाल्या; **पण स्वतःसाठी मागणे नाही.** रोज दोन–अडीच तास देवाजवळ बसून कर्म करतो व सर्व त्याला अर्पण करतो.''

शेवटच्या पाच वर्षांत त्यांची प्रकृती खूपच खालावली. त्यांना फारसे अन्न जात नसे. जे थोडेफार ते ग्रहण करीत, तेही त्यांना भरवावे लागे.

आर्ततेने धावा करणाऱ्या व्याधीग्रस्तांना व्याधीमुक्त करण्यासाठी स्वतः व्याधीग्रस्त होणाऱ्या गुरुदेवांचे, दधीची ऋषींशी असलेले साधर्म्य पाहता, त्यांच्या अलौकिकत्वाची पुन्हा प्रचीती येते.

* * *

---

## कोयना धरण वाचले

**श्रीमती मृणालिनी देशपांडे**

(निवृत्त अधिकारी, पोस्ट खाते) अहमदनगर

कोयना धरणासंबंधी त्यांच्या बोलण्यातून समजलेली हकीकत अशी– सद्गुरू म्हणाले होते की, ''परशुरामाने जी भूमी हटविली ती म्हणजे कोकण. कोयना धरण परिसर! कोयना धरण बांधले तेथे भूमीचे कवच पातळ आहे, पाहिजे तेवढे कठीण नाही. तेथे पाण्याचा धोका आहे. म्हणून परशुरामाने तेथून समुद्र हटविला होता. ह्या लोकांनी तेथेच धरण बांधले आहे. आता बांधले आहे आणि कोट्यवधी लोकांच्या पाण्याचा प्रश्न आहे म्हणून ते आता आम्हाला सांभाळणे भाग आहे. आता काय करणार? तेथे भूकंपाचा धोका आहे तो एवढा आहे की सर्व महाराष्ट्रावर त्याचा परिणाम होईल. बघून प्रयत्न करतो.'' त्यावेळी ते लीलावती हॉस्पिटलमधून आले आणि महाबळेश्वरला गेले होते. कोयना धरण वाचविण्याकरिता गेले होते. स्वतःच्या विश्रांतीसाठी ते गेले नव्हते. त्यांची तब्येत त्यावेळी इतकी नाजूक होती की उन्हाळा सुसह्य होण्यासाठी वाळ्याचे पडदे, ए.सी. वगैरेची अन्यत्र सोय होऊ शकत होती. त्यासाठी खास महाबळेश्वरला जायची आवश्यकता नव्हती. तरीसुद्धा स्वतःच्या जिवाची काळजी न घेता, डॉक्टरांचा सल्ला न मानता (डॉ. शहांनीसुद्धा त्यांना याबाबत प्रतिकूल सल्ला दिला होता.) ते तेथे गेले. तेथे जाऊन त्यांनी माहिती नाही कशी शक्ती लावली ! परत आल्यावर त्यांच्या म्हणण्यात कधीतरी आले की ''वाचले धरण.'' त्यावेळी तेथील अधिकाऱ्यात ती बुद्धी व शक्ती देऊन त्यांनी ते वाचविले. आता असा प्रश्न पडतो की हे सर्व प्रकट करायचे की नाही? सद्गुरू म्हणायचे, ''कोणा अश्रद्ध व्यक्तीला चमत्कार सांगू नका. आपण हे बाहेर लोकांना सांगितले तर आपल्यावर कोण विश्वास ठेवणार?''



# १३.
# श्रीसद्गुरूंच्या स्वप्नलीला

**सौ. दीपाली प्रमोद पवार**
एम. ए., पुणे

संतशिरोमणी श्रीतुकाराम महाराजांना त्यांच्या गुरूंनी जो उपदेश केला व उपासनेसाठी जो मंत्र दिला, तो त्यांच्या स्वप्नात जाऊन. तसेच त्यांच्या अभंगांची गाथा इंद्रायणी नदीत बुडवण्याचा आदेश देणाऱ्या रामेश्वर भट्टांच्या अंगाचा त्यानंतर जो दाह होऊ लागला व तो शमविण्याची ते जेव्हा केविलवाणी धडपड करू लागले, तेव्हा श्रीज्ञानेश्वर माऊलीने (दाह शमविण्यासाठी) 'तुकोबारायांना शरण जाऊन त्यांची क्षमा माग' असा त्यांना जो आदेश दिला, तोही स्वप्नातच! संतचरित्रांमध्ये अशा अनेक स्वप्नलीलांचा उल्लेख आढळतो. अलिकडच्या काळातदेखील अनेक सत्पुरुषांच्या स्वप्नदृष्टांतांचे दाखले दिसतात. सद्गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर महाराजांच्या जीवनकार्यात स्वप्नलीलांचे विशेष महत्त्व आहे. त्यांना तपश्चर्येच्या काळात अनेक देवतांची, संतसत्पुरुषांची दर्शने झाली. त्यानंतरच्या काळातही ही दर्शने होत राहिली– अगदी महंमद पैगंबरांच्या दर्शनापर्यंत! तरीही या ठिकाणी भक्तांच्या संदर्भात गुरुदेवांच्या स्वप्नलीलांचा विशेष विचार करावयाचा असल्याने श्रीगुरुदेवांना झालेल्या त्या स्वप्नदर्शनांचा अधिक तपशील न देता, श्रीगुरुदेवांना पडलेल्या विशेष स्वरुपाच्या फक्त दोनच स्वप्नांचा उल्लेख करते–

श्रीगुरुदेवांनी श्रीक्षेत्रत्र्यंबकेश्वरला जाऊन **वे.मू. किशोरशास्त्री त्र्यंबकशास्त्री पाटणकर** ह्यांच्या पौरोहित्यानुसार नारायण नागबळी हा विधी केला होता. त्यासाठी त्यांना तेथे स्मशानवासी असल्यासारखे राहण्याचे नियम पाळावे लागले होते. त्या संदर्भातल्या त्यांच्या आठवणींची माहिती मिळवण्यासाठी काही गुरुभक्त वे.मू.

पाटणकरशास्त्रीजींना भेटले असता ते म्हणाले–

''प्रथम माझी हिंमत चालेना, पण मी प. पू. महाराजांना विचारले. बरं विचारायचं कसं की तुम्ही हा (नारायण नागबळी) विधी का करत आहात? हा विधी करणारे बहुतांश लोक प्रापंचिक असतात. तुम्ही संन्यस्त जीवन जगत आहात तर तुम्ही हा विधी का करत आहात?

प. पू. महाराजांनी मला सांगितले की **''माझ्या स्वप्नात एक भंगी (अतिशूद्र) जातीचा माणूस येतो व तो माझ्याकडे मुक्ती मागतो; म्हणून त्याच्यासाठी मी हा विधी करतो.''** त्या अतिशूद्र जातीच्या माणसाला मुक्ती मिळावी ह्यासाठी प. पू. महाराजांनी हा विधी केला. त्या धार्मिक विधीनंतर त्या अतिशूद्राला गती मिळाली व तसे त्याने **प.पू. महाराजांना स्वप्नात येऊन सांगितलेही!**

गुरुभक्तांच्या संदर्भात श्रीगुरुदेवांच्या स्वप्नलीलांचा विचार करतांना जाणवते ते असे की, त्यांनी शेकडो भक्तांना असंख्य वेळा दृष्टांत देऊन संतुष्ट केले असले तरी त्यापैकी फारच मर्यादित संख्येच्या गुरुभक्तांकडील माहिती संकलित करणे शक्य झाले आहे. अर्थात ती माहितीही अत्यंत विस्मयकारक आणि श्रीगुरुदेवांच्या विभूतिमत्त्व, अलौकिकत्वावर प्रकाशझोत टाकणारी आहे. आणखी असेही जाणवते की श्रीगुरुदेवांच्या दृष्टीने स्वप्न हे भक्तांशी करावयाच्या संपर्काचे वा संदेशवहनाचे माध्यम होते. अनेक उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी त्यांनी स्वप्न हे माध्यम वापरलेले दिसते. त्याचा तपशील असा.–

✻ गुरुप्राप्ती न झालेल्या पण श्रीगुरुभेटीसाठी तळमळणाऱ्या भावी भक्ताला, सिमेन्स कंपनीत अधिकारी असलेल्या नाशिकचे **श्री. आ. बा. चौधरी** ह्यांना, दर्शनास येण्याचे निर्देश गुरुदेवांनी, त्यांना लागोपाठ पडलेल्या तीन स्वप्नात दिले तर आजारपणासारख्या अपरिहार्य अडचणींमुळे गुरुपौर्णिमेसारख्या महत्त्वाच्या सोहळ्यात उपस्थित राहू न शकल्याबद्दल एका भक्ताला वाटणारी खंत आणि विषण्णता त्याला स्वप्नदर्शन देऊन गुरुदेवांनी घालवली.

✻ सध्या पुण्याला स्थायिक असलेल्या **प्रा. डॉ. अ. आ. उपासनी** ह्यांच्या आर्जवी प्रार्थनेला प्रतिसाद देण्यासाठी, श्रीगुरुदेवांनी त्यांच्या स्वप्नात जाऊन त्यांना साष्टांग नमस्काराची प्रक्रिया शिकवली तर नाशिकच्या **सौ. स्नेहल चंद्रात्रे** तसेच नगरच्या **डॉ. सौ. सुचेता राठोड** यांना स्वप्नात उपासना दिली.

✻ ठाण्याच्या **श्री. दशरथ गुंजाळ** ह्या गुरुभक्ताची, श्रीगुरूंनी आपल्या घरी यावे अशी उत्कट इच्छा होती. श्रीगुरुदेवांच्या मुंबईतील मुक्कामात त्याप्रमाणे कार्यक्रम

ठरला, पण काही अडचणीमुळे होऊ शकला नाही. पण श्रीगुरुदेव घरी आल्याचे व कॉटवर बसल्याचे श्री. गुंजाळ ह्यांनी स्वप्नात पाहिले तर **अमेरिकेतील मुक्कामात स्वप्नदर्शन देऊन मुंबईच्या श्री. शरद रघुनाथ खांडेकर** ह्यांना दिलेले आश्वासन श्रीगुरुदेवांनी पाळले. त्यानंतर एका सप्ताहानंतर गुरुदेवांनी देह ठेवला.

❊ औरंगाबादच्या वास्तव्यात, श्रीदत्तक्षेत्र उभारणीसाठी निधीसंकलनाच्या कामामुळे व देवस्थानाच्याच कामासाठी काही प्रशासकीय अधिकाऱ्यांना भेटण्याचे काम असल्याने **श्री. रघुनाथ गुंजकर** ह्यांना, त्यावर्षीच्या श्रीगोकुळअष्टमी सोहळ्यास उपस्थित राहता आले नाही. ह्याची त्यांना खूप खंत वाटली पण सद्‌गुरूंनी त्यांना त्या रात्रीच स्वप्नदर्शन देऊन त्यांच्या सेवापरायणतेचे कौतुक केले.

❊ २८ वर्षांचे वय होऊन गेले तरी जातीत मनासारखे सुयोग्य स्थळ मिळत नव्हते म्हणून चिंताग्रस्त झालेल्या, मुंबईच्या **प्रा. सौ. प्रमिला सुनिल परदेशी** ह्यांना (लग्नापूर्वी) श्रीगुरुदेवांनी स्वप्नदर्शन देऊन ''तुझी व्यवस्था मी करून ठेवली आहे; तू काळजी कशाला करतेस?'' असे सांगितले. त्यानंतर थोड्याच दिवसात त्यांचे लग्न जमले; तर **सौ. मीना देव (पुणे)** ह्यांच्या सुविद्य उपवर कन्येचा वरपसंतीबाबत निश्चय होत नव्हता. तेव्हा श्रीगुरुदेव तिच्या स्वप्नात गेले व तिला खडसावून सांगितले की यापुढे येणाऱ्या विवाहप्रस्तावास संमती दे.'' त्याप्रमाणे तिने केले व तिचा विवाह झाला.

❊ ''कैलास परिक्रमेत मी तुझ्या आईसोबत तिच्या रक्षणासाठी होतो'' असे औरंगाबादच्या प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ व प्रसूतिशास्त्रज्ञ **डॉ. सौ. शैलजा वांगीकर** ह्यांच्या मुलास श्री. चैतन्य ह्यांना, त्यांच्या स्वप्नात जाऊन सांगितले; तर आपण कैलास मानससरोवर परिसरात आहोत, त्याचप्रमाणे श्रीदत्तक्षेत्रात अहमदनगरलाही आहोत, असे डॉ. सौ. वांगीकरांच्या भगिनी **सौ. रमा धर्माधिकारी** ह्यांना स्वप्नदर्शन देऊन सूचित केले.

❊ 'गुरुदेवांच्या आठवणी' संग्रहांसाठी आठवणींचे लेखन सुरू केले की नाही हे सुरतच्या **सौ. तृप्ती सफई** ह्यांच्या स्वप्नात जाऊन गुरुदेवांनी त्यांना विचारले व लेखनास प्रवृत्त करून कर्तव्यपरायण केले. तसेच खोपोलीच्या **सौ. विजु राऊत** ह्यांच्या स्वप्नात जाऊन गुरुदेवांनी त्यांच्या हातातील जपमाळेस स्पर्श करून तसेच त्यांच्या माहेरच्या देवघरातील श्रीदत्तात्रेयांच्या फोटोची पूजा करून व त्या दोन्ही वस्तू त्यांना देऊन, त्यांच्या साधना मार्गावरील वाटचालीस प्रोत्साहन दिले. या दोन्ही वस्तू राऊत कुटुंबीयांनी जपून ठेवल्या आहेत.

❋ **सौ. रुक्मिणी अय्यर** या कल्याणला राहणाऱ्या, रेल्वेत नोकरी करणाऱ्या स्त्रीभक्तास तिरुपतीयात्रेत गुरूदेवांनी दर्शन देऊन त्यांच्या डाव्या स्तनाकडे अंगुलीनिर्देश करून 'ह्याची काळजी घे' अशी सूचना केली. भविष्यकाळात त्यांना झालेल्या (व डॉक्टरांना नियमितपणे तपासणीसाठी दाखवूनही त्यांना निदान न झालेल्या) स्तनाच्या कर्करोगाची ती पूर्वसूचना होती. (याबाबतचा तपशील श्रीगुरुदेवांकडून झालेले व्याधीनिवारण या प्रकरणात वाचता येईल.)

❋ अनपेक्षितपणे उद्‌भवलेल्या व असह्य वेदना देणाऱ्या पायाच्या व्याधीमुळे हैराण झालेल्या ठाण्याच्या **सौ. प्रतिभा अनिल पाटणकरांच्या** स्वप्नात जाऊन श्रीगुरुदेवांनी जे उपचार केले ते थक्क करणारे आहेत. (त्याबाबतचा तपशीलही 'श्रीगुरुदेवांकडून व्याधीनिवारण' प्रकरणात वाचता येईल.)

❋ भक्तांच्या चुकीच्या वागण्यामुळे आलेला राग व्यक्त करण्यासाठीही सद्‌गुरू संबंधित व्यक्तींच्या स्वप्नात गेले होते. नगरचे श्री. श्रीकांत निसळ श्रीदत्तात्रेय निवासात 'चांदोबा' मासिक वाचत असलेले, परगावी असलेल्या श्रीगुरुदेवांना दिसले. त्या रात्री श्रीगुरुदेवांनी श्री. निसळांच्या स्वप्नात जाऊन त्यांची कानउघाडणी केली व राग व्यक्त केला.

❋ मुंबईच्या व्ही.जे.टी.आय्. या प्रसिद्ध इंजिनिअरिंग कॉलेजातील प्राध्यापिका **सौ. प्रमिला सुनिल परदेशी** ह्यांनी लिहिलेला पुढील स्वप्नदृष्टांत पुरेसा बोलका आहे–

माझी मुलगी भारती लहान (२ वर्षांची) असतांना अजिबात जेवत नसे. त्यामुळे प्रतिकारशक्तीची वाढ न झाल्यामुळे ती सतत आजारी असे. मला तिच्या जेवणाची चिंता लागून राहिली होती. त्यावेळी सद्‌गुरू माझ्या स्वप्नात आले. मी त्यांना भारतीच्या जेवणाची समस्या सांगितली. त्यांनी अतिशय प्रेमाने, भारतीला एका ताटातून मुगाच्या खिचडीसारख्या पदार्थाचा एक घास भरवला आणि मी धन्य झाले. त्याच स्वप्नात सद्‌गुरूंनी माझ्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवला आणि मला अशी अनुभूती दिली की, मी (आत्मा) ह्या शरीरातून बाहेर पडून ह्या चराचर सृष्टीत मुक्तपणे फिरत आहे. फिरून झाल्यानंतर मी पुन्हा माझ्या देहामध्ये प्रवेश केला आणि स्वप्न भंगले.

**सौ. आरती जोशी** (बी.एस्सी) असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट, बिटवाईज सोल्यूशन्स प्रा. लि. पुणे) ह्यांनी लिहिलेला त्यांना पडलेल्या स्वप्नाचा हा वृत्तांतही खूप विलक्षण आहे.

''बाबांनी (कै. जयंतराव फाटकांनी) घरी ऋग्वेदाच्या पद, क्रम, जटा, घन

अशा सर्व पाठांच्या पठणाचे अनेक कार्यक्रम, श्रीगुरुदेवांच्या मार्गदर्शनाने आयोजित केले होते. त्यापैकी १९९८ साली ऋग्वेदाच्या घनाच्या पठणाचा कार्यक्रम करण्याचे बाबांनी ठरविले. ७२ दिवस हा कार्यक्रम चालला होता. आर्थिक आणि शारीरिक श्रमांच्या स्तरावर हा कार्यक्रम आई आणि वडील या दोघांचीही परीक्षा पाहणारा होता. रोज सकाळी ३ ते ३ ।। तास वेदपठण, त्यानंतर प्रसादभोजन, संध्याकाळी दुसऱ्या दिवसाची तयारी असा दिनक्रम असे. ३–४ वेदमूर्ती गुरुजी व पठण ऐकायला येणारी ३–४ मंडळी (व घरचे सर्व) या साऱ्यांचा स्वयंपाक माझी आई, अन्य कोणाचीही मदत नसतांना एकटीच करीत असे. शिवाय रोजच्या पूजेची तयारी, बाहेरची कामे रोजच असत. हे सारे तिला कसे झेपले, ह्याचे रहस्य एक दिवस उलगडले. एके दिवशी पहाटे मी स्वप्नात असे पाहिले की एक उंचीपुरी धिप्पाड व्यक्ती स्वयंपाकघरात ओट्यापाशी पाठमोरी उभी होती. ती गौरवर्ण होती. व तिच्या साऱ्या अंगावर लव होती. तिने धोतर नेसलेले होते. ही व्यक्ती कोण असावी असा मी विचार करत होते. तेवढ्यात त्या व्यक्तीने मागे वळून बघितले. ते स्वतः **मारुतीराय** होते. मी त्यांना नमस्कार केला, त्यावेळेस ते मला म्हणाले की 'मी येथे आहे, हे कोणाला सांगू नकोस.' हा कार्यक्रम संपेपर्यंत घरात सद्गुरूंचे विशेष अस्तित्व जाणवत होते व प. पू. सद्गुरूंची शक्ती प्रत्यक्ष मारुतीरायाच्या रूपाने माझ्या आईच्या पाठीशी होती, ह्यात शंका नाही.''

**डॉ. सुहास पां. देशपांडे,** एम्.एस्.डी.ओ., एम्.एस्. नेत्रविकारतज्ज्ञ, संचालक श्रीरामकृष्ण नेत्रालय, ठाणे, संचालक साईधन हॉस्पिटल (मुलुंड) मुंबई ह्यांनी लिहिले आहे की, श्रीगुरुदेवांच्या दर्शनाचा व अनुग्रहाचा लाभ आम्हाला जाने. १९९७ मध्ये झाला. सायंकाळच्या सुमारास नगरला पोहोचलो. हॉटेलमध्ये मुक्काम केला. मला त्या रात्री प. पू. श्रीगुरुदेवांचे स्वप्नदर्शन झाले. त्यापूर्वी मी श्रीगुरुदेवांचा फक्त फोटो बघितला होता. स्वप्नात– ''आम्ही दोघे आश्रमात गेलो. श्रीगुरुदेव बाहेरच उभे होते. आम्ही दोघांनी त्यांना वाकून नमस्कार केला. त्यावेळेस एक मोठा काळा सर्प आमच्या व श्रीगुरुदेवांच्या मधून सळसळत निघून गेला. श्रीगुरुदेवांच्या दर्शनाने, संकटरूपी साप दूर निघून गेला.''

श्रीगुरुदेव अनंतात विलीन झाल्यावरही ३–४ वेळा त्यांनी मला स्वप्नदर्शन दिले आहे. एका स्वप्नात तर आमच्या नातवाला (चि ओजसला) त्यांनी मांडीवर घेऊन खेळवले व मला म्हणाले– ''माझे तुमच्यावर लक्ष आहे.''

श्रीगुरुदेवांच्या वागण्यातील खट्याळपणा–मिष्किलपणा कधीकधी त्यांच्या

स्वप्नलीलांतही आढळत असे. त्याबाबत पुण्याच्या **सौ. गौतमी देवस्थळी** ह्या गुरुभगिनीनी त्यांना पडलेल्या स्वप्नासंबंधी जे लिहिले आहे ते असे–

पहिला मुलगा गेल्यानंतर माझ्या आयुष्यात पुन्हा एकदा मातृत्वाची चाहूल मला लागली. या मातृत्वाचा आनंदसुद्धा मला महाराजांनी स्वप्नदृष्टांत देऊन प्रसादरूपात दिला आहे. तो दृष्टांत असा–

''मी यावेळी प. पू. महाराजांच्या दर्शनाला गेलेली आहे. कदाचित मागील अनुभवामुळे 'मुलगाच हवा' ही सुप्त इच्छा तशीच मनात घेऊन त्यांच्या दर्शनाला गेले होते. मी चिठ्ठीवरसुद्धा तसेच लिहिले होते– 'मुलगा हवा.' दर्शनानंतर महाराजांनी चिठ्ठी उघडून पाहिली आणि माझ्याकडे पाहून विचारले, ''मुलगी हवी?'' मी क्षणभर चपापले. आपल्याकडून अशी कशी काय चूक झाली? 'मुलगा हवा' अशी चिठ्ठी लिहिण्याऐवजी आपण 'मुलगी' असं कसं लिहिलं? अशी चुटपुट मनाला लागली. त्याच स्थितीत मी महाराजांसमोर उभी होते. पुन्हा एकदा महाराजांनी माझ्याकडे पाहिले आणि आशीर्वाद दिला की, ''तुझ्या मनासारखे होईल'' असा मिष्किलपणा! आणि तितकीच माया, प्रेम, वात्सल्य हे केवळ प. पू. गुरूदेव करू जाणे!

मुंबईच्या **सौ. उज्ज्वला जयंत आपटे** ह्यांना एका स्वप्नाद्वारे समजलेला संकेत मात्र वेगळाच होता. त्या सांगतात– नगरला उत्सवाला मला जायला मिळणार नसेल तर आधी मला स्वप्नदर्शन व्हायचे. प. पू. गुरूदेवांचे महानिर्वाण दि. ८ सप्टेंबर १९९८ ला झाले. त्याच्या बरोबर १५ दिवस आधी (नारळीपौर्णिमेच्या आदल्या दिवशी) मला रात्री स्वप्नदृष्टांत झाला– अतिशय सुंदर सरोवर आहे. त्यात अनेक पांढरे हंस डोलत आहेत. त्या प्रत्येक हंसाच्या पाठीवर पोथीसारखे सोनेरी कडा असलेले पुस्तक आहे. मी बघत होते. इतक्यात मला एक गंभीर आवाज ऐकू आला, ''तुला पादुकांचे दर्शन घ्यायचे आहे का?'' मी 'हो' म्हटले. पाण्यातून झपकन बोट यावी तशा वाडीच्या मनोहर पादुका माझ्याजवळ आल्या अन् अनवधनाने मी मधल्या दोन बोटांनी त्या पादुकांना स्पर्श केला. पादुकांच्या मागे मला भगवे वस्त्र दिसत होते. कोण आहे हे दिसत नव्हते. मी पादुकांना स्पर्श करताच मला पुन्हा धीरगंभीर आवाज ऐकू आला. ''अगं अगं हात का लावलास? आता नाही मी तुला दर्शन देणार.'' अन् पादुका पाण्यातून आल्या तशाच परत गेल्या. अंतर्धान पावल्या. पाणी उंच उडाले अन् मी खाडकन् जागी झाले. मला खूप रडू आलं. मी म्हटलं, ''महाराज, मी स्वप्नात होते नं म्हणून स्पर्श झाला. माझी चूक झाली, पण मला चरणांपासून दूर लोटू नका.'' मी त्या स्वप्नाचा अर्थ असा घेतला होता की, मला प. पू. गुरुदेवांपासून

दूर जावं लागणार! पण स्वप्नातला संकेत निराळाच होता. १५ दिवसांनी प. पू. गुरुदेवांनी देह ठेवला व नंतर पादुकांच्या रूपातच त्यांचे दर्शन होऊ लागले. स्वप्नदृष्टांताचा अर्थ उलगडण्याइतकी माझी पात्रता तर नाहीच नाही; पण पादुका व फोटोरूपात ती. प. पू. गुरूदेवांची ईश्वरी शक्ती तितकीच जागृत आहे, ह्याची मात्र आपण प्रत्येकजण अनुभूती घेतच असतो.

'गुरुदेवांचे देहत्यागानंतरही अस्तित्वदर्शन' या प्रकरणात याबाबतचा अधिक तपशील वाचता येईल. वडिलांच्या निधनाने अकाली पोरक्या झालेल्या भक्तावर श्रीगुरुदेवांनी (देहत्याग केल्यानंतरही) पितृतुल्य वत्सलतेचा स्वप्नातही कसा वर्षाव केला, हे वाचून त्यांच्या अलौकिकत्वाची साक्ष मिळते.

**सौ. अपर्णा घाटगे,** बी.एस्सी. (मायक्रो) एल्.एल्.बी., पुणे ठामपणे सांगतात की, संकटाची सूचना श्रीगुरूदेव स्वप्नाद्वारे देत असत. हे विधान त्यांनी घेतलेल्या अनेक अनुभवांवर आधारित आहे. पण त्यांनी लिहिलेला सर्वात हृदयस्पर्शी स्वप्नवृत्तांत त्यांच्याच शब्दात वाचणे योग्य होईल.–

''माझे वडील कै. मधुकरराव पवार ह्यांना १९ मे २०११ रोजी देवाज्ञा झाली. त्यांना स्वरयंत्राचा कर्करोग झाला होता. त्यांच्या आजारावर काहीच इलाज न करता स्वस्थ बसणे आमच्या मनाला पटेना. प. पू. गुरुदेवांना ह्यासंदर्भात सर्व सांगावे व त्यांचे मार्गदर्शन मिळवावे म्हणून माझ्या धाकट्या बहिणीने नगरला पाद्यपूजा करण्याचे ठरवले. पाद्यपूजा करण्याच्या आदल्या रात्री तिच्या यजमानांना एक स्वप्न पडले.

स्वप्न : माझ्या भावाचे (प्रमोद पवारचे) डोके प. पू. गुरुदेवांनी मांडीवर घेतले. ते त्याला थोपटत होते व त्याचे सांत्वन करत होते.

पाद्यपूजेचा संकल्प सोडतांना प. पू. गुरुदेवांना प्रार्थना केली की ''मार्गदर्शन करा आणि आमच्या वडिलांना ह्या आजारातून बाहेर काढा.'' पाद्यपूजा झाल्यानंतर माझा भाऊ श्रीगुरुदेवांच्या दर्शनाला गेला. तेथे त्याने पादुकांचे दर्शन घेऊन, श्रीगुरुदेवांना वडिलांचे सर्व रिपोर्ट वाचून दाखविले व तो तेथे डोळे मिटून शांत बसला. त्याला नक्की काय झाले ते नीट समजले नाही; पण डोळे मिटल्यावर त्याला प. पू. गुरुदेव दिसले, व तो त्यांना वडिलांच्या आजाराबद्दल सांगत आहे व काय करावे असे विचारत आहे, असे दिसले. त्यावर श्रीसद्‌गुरू म्हणाले, ''तुझ्या आईची काय इच्छा आहे?'' त्यावर प्रमोद म्हणाला, ''आई म्हणते, जे उपाय आहेत ते खरे उपाय नाहीतच, त्यामुळे ते करण्याची तिची इच्छा नाही; पण लौकिक भाग म्हणून काही आयुर्वेदिक औषधे द्यायची, पण विश्वास मात्र श्रीगुरुदेवांवर ठेवायचा. त्यांची

इच्छा असेल तसे घडेल.' श्रीसद्‌गुरूंना त्याने असे सांगितल्यावर महाराज थोडावेळ दूर पाहत शांत बसले व नंतर म्हणाले, ''प्रमोद, तू काही काळजी करू नकोस. मी लक्ष घालतो.'' त्या अनुभवातून बाहेर आल्यावर माझ्या भावाच्या मनाला खूप शांत वाटले.

हे सर्व ऐकल्यावर आम्हा कुटुंबियांचे मन शांत झाले व आम्ही त्यांना आयुर्वेदिक औषधे व प. पू. श्रीसद्‌गुरूंनी कॅन्सर विकारावर सांगितलेली औषधे (उदा. विड्याची पाने, तांब्याच्या भांड्यातले पाणी इ.) चालू केली.

माझ्या भावाने असे ठरविले की, आपल्या वडिलांच्या हातून आपण जास्तीत जास्त सत्कर्म करू या. त्याने पुण्यात भुकूम येथे नवीन बंगला बांधला आहे. १८ मे २०११ रोजी त्याची वास्तुशांत ठरली व तेथे २३ मे पासून भागवत सप्ताह करण्याचे ठरविले. आदरणीय श्रीकृष्णशास्त्री जोशी (सातारा) ह्यांना या सप्ताहासाठी आमंत्रित केले होते व त्यांना आम्ही आमच्या वडिलांच्या आजारपणाची कल्पनाही दिली होती.

ह्या भागवत सप्ताहाचे एक यजमान, माझे मामा श्री. रमेश गुंजाळ ह्यांना दि. १२ एप्रिल २०११ ला श्रीरामनवमी ह्या दिवशी एक स्वप्न पडले. ते त्यांच्याच शब्दांत लिहित आहे–

स्वप्न : प. पू. गुरुदेव व कै. श्री. गोळे साहेब, स्वप्नात माझ्या ठाणे येथील घरात आले. प. पू. गुरूदेव खूपच उंच दिसत होते. प. पू. गुरुदेव माझ्या घरामधील देवघराजवळ उभे राहिले व मला म्हणाले, ''हा चौरंग बाजूला ठेव. ती खुर्ची येथे ठेव.'' श्रीगुरूदेव त्या खुर्चीवर बसले. तेवढ्यात श्री. गोळेसाहेब खांद्यावरील पिशवीतून पादुका काढू लागले. परंतु श्रीगुरुदेवांनी हातानेच खूण करून सांगितले की 'पादुका राहू द्या' आणि मला म्हणाले, 'चरणांवर पाणी घाल, दूध घाल व परत पाणी घालून चरण कोरडे कर. आता अत्तर लाव व केशरलेपन कर आणि चरण स्पर्श करून दर्शन घे.' मी डोके चरणांवर ठेवून दर्शन घेऊन उभा राहिलो तेव्हा ते मला म्हणाले, 'पवार कुठे आहेत?' मी म्हणालो (भुकूमला) 'तिकडे आहेत.' मग ते म्हणाले, 'चल'. व ते मला घेऊन भुकूमच्या बंगल्यावर गेले. तेथे गेल्यावर प. पू. महाराज अण्णांना (म्हणजे माझ्या वडिलांना) म्हणाले– 'पवार, येथे माझ्या बाजूला बसा व मला म्हणाले, 'तू तिकडे उभा रहा.' राजू गुरुदेवांना काही प्रश्न विचारीत आहे व सद्‌गुरू त्याला काहीतरी सांगत आहेत असेही दिसले. परंतु ते संभाषण मला ऐकू येत नव्हते आणि नंतर मला जाग आली.

१८ मे या दिवशी नवीन बंगल्याची वास्तुशांती झाली. नवीन घरी लोकांची

गर्दी असेल म्हणून माझे वडील वास्तुशांतीसाठी आले नाहीत. गुरूवारी १९ मे ला ते माझ्या भावाला म्हणाले की, ''आज संध्याकाळी आपण तेथे राहायला जाऊ.'' त्याप्रमाणे आम्ही पुढची तयारी सुरू केली. त्या दिवशी सकाळी ११ वाजल्यापासून त्यांना श्वास घ्यायला त्रास होऊ लागला आणि धाप लागली. मी, माझा भाऊ, बहीण, आई आम्ही सर्वजण त्यांच्याजवळ होतो. त्यांची धाप काही केल्या कमी होईना. संध्याकाळी मी, माझी बहीण, भाऊ आम्ही सर्वांनी अवतरणिका वाचून श्रीगुरुदेवांना प्रार्थना केली की ''जे योग्य असेल ते घडू द्या; पण त्यांना आता जास्त त्रास होऊ देऊ नका.'' अशी प्रार्थना करून आम्ही वडिलांच्या जवळ येऊन बसलो. सर्वजण मोठ्याने नामस्मरण करीत होतो. अचानक त्यांनी सद्‌गुरूंच्या फोटोकडे पाहिले. आम्ही त्यांना तीर्थ दिले. मग त्यांनी श्रीदत्तात्रेयांचे नाम ऐकत अखेरचा श्वास घेतला. ही वेळ संध्याकाळी ७ वाजून ४७ मिनिटांची होती. त्याच वेळी भुकूमच्या बंगल्यावर (जेथे आमची सर्व मुले व आमची मामी होती तेथे) भागवत सप्ताहासाठी मंडपाचे काम चालू होते. दिव्यांच्या माळा लावल्या होत्या व त्यांना खूप प्रसन्न वाटत होते. त्या सर्वांना इकडे काय घडत होते याची जरासुद्धा कल्पना नव्हती. तेथे माझ्या मामी (सौ. गुंजाळ) ह्यांनी देवासमोर दिवा लावला. धूप केला. त्यांचा मुलगा तेथील देवघरात बसून अवतरणिका वाचत होता. साधारण ७.३०–७.४५ ची वेळ होती. दक्षिणामूर्ती स्तोत्र वाचून झाल्यावर त्याने अवतरणिका वाचायला सुरुवात केली. त्याला काय झाले हे कळले नाही. पण त्याला एक दृश्य दिसले– त्याला असे दिसले की प. पू. महाराज आसनस्थ आहेत. त्यांच्या शेजारी माझे वडील बसले आहेत. हा दर्शनाला गेला आणि श्रीसद्‌गुरू त्याला म्हणाले 'आलास' का दर्शनाला?' तर तो 'हो' म्हणाला. पुढे सद्‌गुरू त्याला म्हणाले, 'पवार' आता कायमस्वरूपी माझ्या सेवेसाठी माझ्याबरोबर असतील.'' एवढ्यात कोणीतरी देवघराचे दार उघडले आणि वाऱ्याने तेथे लावलेला दिवा शांत झाला. ते दृश्य पाहून तो उठून बाहेर आला. त्याच्या वडिलांना म्हणजेच श्री. रमेश गुंजाळ ह्यांनासुद्धा 'प.पू. गुरुदेवांनी माझ्या वडिलांना शेजारी बसवून घेतले' असेच स्वप्न पडले व त्यांच्या मुलालासुद्धा तसेच दिसले.

आता माझे स्वप्न सांगते. हे स्वप्न मला माझे वडील आजारी पडण्याच्या बरेच दिवस आधी पडले होते. तेव्हा त्यांची प्रकृती चांगली होती; फक्त त्यांना खूप उदास वाटत असे. प्रसन्न वाटत नसे.

स्वप्न : माझे वडील एका देवघराच्या जवळ बसले आहेत. त्या देवघरात प.

पू. महाराजांचा फोटो आहे. त्याची खूप सुंदर पूजा माझ्या वडिलांनी केलेली आहे. त्या पूजेत जी फुले वाहिली होती ती फुले मी या पृथ्वीतलावर कुठेच पाहिली नव्हती. ती अप्रतिम स्वर्गीय फुले होती व माझे वडील मला म्हणाले, 'मला आज खूप दिवसांनी फार चांगले वाटत आहे.' त्यावर मी त्यांना म्हणाले, ''पण तुम्ही हे देवघर दक्षिणेकडे तोंड करून का पूजिले आहे?'' आणि माझे स्वप्न संपले. माझ्या वडिलांना १९ मे २०११ या दिवशी देवाज्ञा झाल्यामुळे २३ मे २०११ पासून सुरू होणारा भागवत सप्ताह आम्ही आधी ठरविल्याप्रमाणे सुरू करू शकलो नाही. ह्याचीसुद्धा श्रीगुरुदेवांनी पूर्वसूचना दिली होती. भागवत सप्ताह (व दशमस्कन्धाचे हवन) करण्याचे ठरल्यावर मला ते स्वप्न पडले होते.

सद्‌गुरूंच्या अशा स्वप्नलीला सद्‌गुरूंना भक्तांविषयी वाटत असलेल्या प्रेम, वात्सल्य, उद्धाराविषयीची तळमळ अशा विविध भावभावना दर्शवतात आणि त्यांच्या अलौकिकत्वावरचा व त्यांच्यातील ईश्वरी शक्तीवरचा विश्वास दृढ करतात.

***

---

## नगरची भूमी शांत केली

**श्रीमती मृणालिनी देशपांडे** (निवृत्त अधिकारी, पोस्ट खाते) अहमदनगर

श्रीगुरुदेवांचा सगळा वेळ नगरची भूमी शांत करण्याकरिता गेला. त्यांनी सांगितले होते की ही भूमी रक्तलांछित आहे; शापित भूमी आहे. ह्या भूमीचा उद्धार करण्याकरिता मी आलेलो आहे. दुसरे कारण म्हणजे पंचमहाभूतांचा तोल ढळलेला आहे. कारण सामान्य माणसांनी घरात जो देवधर्म करायचा असतो तो करायचा सोडलेला आहे. आपण सूर्याला अर्घ्य देतो त्याने सृष्टीरचना चालू राहते. महाराज नेहमी उदाहरण द्यायचे की नदीला पाणी आले की विहिरींना, आडाला पाणी येते. आम्ही लहान असताना नगरला असे कोठेही धार्मिक वातावरण वगैरे नव्हतेच आणि हे केवळ आपल्याच नव्हे तर इतर सर्व धर्मांची तशीच स्थिती होती. श्रीगुरुदेवांच्या तपसाधनेमुळे नगरमध्ये आपापल्या धर्माचे लोक आता त्यांचे त्यांचे धर्म पाळू लागले. आता जैनांची पण धार्मिक स्थाने वाढली आहेत. चर्चेसमध्येसुद्धा आता गर्दी होऊ लागली आहे. देवाची भक्ती कशी करायची याचे त्यांनी उदाहरण घालून दिले. पूर्वी माणसांना भीती वाटायची की मी जर देवळात गेलो तर बाकीचे लोक मला काय म्हणतील? ही भीती त्यांनी मोडून काढली. लोक देवाचे थोडे फार करीत असतील पण पितरांसाठी श्राद्धकर्म कोणी करीत नसत. महाराज म्हणायचे, ''देवदेवतांची समजूत घालता येते, पण पितरांची समजूत घालता येत नाही. ते त्यांची अतृप्त इच्छा ठेवून गेलेले असतात व त्यांना तृप्त करावे लागते.'' महाराजांकडे कोणी मार्गदर्शनासाठी आले की त्या व्यक्तीला महाराज विचारीत, ''तू कुळधर्म, कुलाचार, श्राद्धपक्ष करणार का? तर मी तुला पुढे मार्गदर्शन करीन.''



# १४.
# श्रीगुरुदेवांशी गैरवर्तन करणाऱ्यांची देवाने घेतलेली दखल

**श्री. राजेंद्र थोरवे**

(अभियंता, पाटबंधारे विभाग अहमदनगर)

सद्‌गुरूंच्या अंगभूत सौजन्याचा चुकीचा अर्थ लावून, ती त्यांची दुर्बलता आहे, असा अज्ञानजन्य गैरसमज काही अहंकारी व्यक्तींनी, विशेषतः श्रीगुरुदेवांच्या आयुष्याच्या पूर्वार्धात अधिक प्रमाणात करून घेतला आणि त्यांची चेष्टा, कुचेष्टा, अवहेलना व कुत्सित शब्दांत टीका-निंदा करण्याचाही प्रयत्न केला. श्रीगुरूंच्या अंगच्या ईश्वरी शक्तीविषयी संशय घेणाऱ्यांची संख्याही कमी नव्हती. श्रीगुरूंविषयी असूया-द्वेष वाटणारे काही लोक होते. आर्तांविषयीच्या करुणेने द्रवणाऱ्या त्यांच्या कनवाळू वृत्तीचा व मनाच्या मोठेपणाचा गैरफायदा घेण्याचाही काहीजणांनी प्रयत्न केला. पण श्रीगुरूंनी हे कडू घोट शांतपणे केवळ गिळलेच नाही तर ते पचवलेही! याबाबत ते क्वचितच भाष्य करीत. ते म्हणायचे, ''आमचा जो द्वेष करेल त्याला शासन ईश्वर करेल. आम्हाला त्याचा त्रास होणार नाही; होतही नाही. तो त्रास द्वेष करणाऱ्याला होतो.'' श्रीगुरूंना त्रास देणारे त्यांच्याकडे शरणागत भावाने आले तर त्यांनी अशा लोकांना क्षमा केली. ते म्हणाले, ''आम्ही क्षमा करण्यासाठीच जन्माला आलो आहोत. शिक्षा करण्यासाठी नाही. अशा व्यक्तींना शासन परमेश्वर करतो. कोणाला शासन करणे आम्हाला मुळातच मान्य नाही. आपण त्याबाबत व्यर्थ चर्चा व चिंता करू नये.'' तरीही श्रीगुरूंशी गैरवर्तन करणाऱ्यांची देवाने कशी दखल घेतली हे पाहणेही उद्‌बोधक ठरते. त्याचे हे काही वृत्तान्त-

✻ सातत्याने बेशिस्त वर्तन वा आज्ञाभंग करणारे श्रीगुरुचरणांपासून दूर केले गेले आणि श्रीगुरुदर्शनाला, त्यांच्या शुभाशीर्वादजन्य लाभांना ते कायमचे मुकले.

✻ ''तू मोटारगाडी चालवू नकोस'' असा श्रीगुरूंचा आदेश न पाळणाऱ्या, एका भक्ताच्या मुलाचा, त्याच्या सहप्रवाशांसह अपघाती, अकाली मृत्यू झाला.

✻ श्रीगुरूंविषयी सातत्याने अनादर बाळगणाऱ्या एका व्यक्तीचा, तिच्या घरातच लागलेल्या आगीत होरपळून मृत्यू झाला.

✻ एका संस्थेचे काही पदाधिकारी एका कार्यक्रमाचे सद्‌गुरूंना निमंत्रण देण्यासाठी नगरला आले होते. परत जातांना त्यातील काहींनी गाडीत श्रीगुरूंविषयी विपर्यस्त विधाने केली. त्यांची गाडी वाटेत लुटारूंनी अडवली. गाडीतील लोकांना चोप दिला. त्यांच्याजवळच्या मौल्यवान वस्तूही लुबाडण्याचा प्रयत्न झाला.

✻ वैद्यकीय व्यवसाय करणारे एक डॉक्टर, भक्तांच्या असाध्य व्याधींवरील श्रीगुरूंनी दिलेल्या तीर्थाचा, व्याधीनिवारणासाठी होत असलेला प्रभाव पाहत होते. त्यांना लोभ सुटला व ते नगरला आश्रमात येऊन मोठी बाटली भरून तीर्थ आपल्या गावी नेऊ लागले व स्वतःचे औषध म्हणून त्यांच्या रुग्णांना देऊ लागले. पैसे मिळवू लागले. कालांतराने मनुष्यवधाच्या एका खटल्यात, मुख्य आरोपी म्हणून त्यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

✻ श्रीगुरुंचे निष्ठावंत भक्त असलेले ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी **श्री. रवींद्र उपासनी** (सुपरिंटेंडिंग इंजिनिअर) लिहितात– ''औरंगाबादहून जळगावला जातांना वाहन ताशी १०० कि.मी. पेक्षा जास्त वेगात होते. वाटेत कच्च्या रस्त्याच्या डायव्हर्शनवर वाहनचालकाचा ताबा गेला आणि आम्ही ओरडलो– ''गुरुदेवऽऽ वाचवा.'' वाहनाची अवस्था काय होती? चाके आकाशाकडे वर, काचा फुटलेल्या, इंजिनचा धूर पसरलेला, वाहन पलटलेल्या व दाबलेल्या अवस्थेत. कसेतरी दार उघडून बाहेर आलो. पण आम्हाला कोठेही खरचटले नव्हते की टेंगुळही आले नव्हते. बरोबरच्या फक्त एका व्यक्तीचा हात फ्रॅक्चर झाला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता श्रीगुरुदेवांसमोर आम्ही बसलो होतो आणि गुरुदेवांनी सांगितले, ''सहसा असे होत नाही परंतु तुम्ही ज्या व्यक्तीला आग्रहाने दर्शनाला घेऊन आलात, त्याने माझ्यावर संशय घेतला व फक्त त्याचाच हात फ्रॅक्चर झाला आहे. जेव्हा तुम्ही माझ्या दर्शनाला निघता, तेव्हापासून तुम्ही घरी पोहोचेपर्यंत माझी दृष्टी तुमच्यावर असते.''

**सौ. शोभा निसळ–कुकडे** या नगरच्या गुरुभक्त लिहितात– ''माझे यजमान

(गुरुदेवांची) फार कुचेष्टा करीत. मला ते अजिबात आवडत नसे. एकदा त्यांना असाध्य दुखणे झाले. प. पू. गुरुदेवांची चेष्टा केल्याचे हे फळ आहे, हे मी मनोमन जाणले. पण त्यांच्या मनाला तशी अपराधीपणाची काहीच भावना नव्हती. मी प. पू. गुरुदेवांची मनोमन क्षमा मागितली आणि त्यांना प्रार्थना केली की, ''गुरुदेवा, त्यांचा अपराध शिक्षा करण्यासारखाच आहे, पण त्यांना झालेले दुखणे हा त्यांना त्रास नसून मला त्रास होणार आहे; तरी माझ्यावर दया करा.'' प. पू. गुरुदेवांनी ही प्रार्थना ऐकली व ते या दुखण्यातून बरे झाले.

आम्ही पाच–सहा बहिणी श्रीगुरुदेवांचे जेव्हा काही काम करीत असू. तेव्हा माझे दोन चुलते आमची अतिशय चेष्टा करीत. आम्हाला ते काम करण्यास मनाई करून काहीबाही बोलत असत. तेव्हा एका काकांचे पोट दुखू लागले. खूप त्रास झाला. जेव्हा प. पू. गुरुदेवांची त्यांनी क्षमा मागितली तेव्हाच त्यांना बरे वाटले. दुसऱ्या काकांच्या अंगावर चट्टे उठत, बरे होत नसत. त्यांनाही अशीच शिक्षा होती. जेव्हा त्यांनी प. पू. गुरुदेवांची क्षमा मागितली, तेव्हाच ते चट्टे बरे झाले.''

यापेक्षाही एका दुर्दैवी व्यक्तीच्या हातून घडलेल्या चुकीची व तिच्या परिणामांची करुण कहाणी **सौ. शीतल डांगे** (अहमदनगर) ह्यांनी लिहिली आहे. ती अशी–

माझा मोठा भाऊ होता. तो अतिशय दुर्दैवी होता. हा अनुभव सांगण्यासारखा नाही; पण हा जगाला उद्‌बोधक ठरेल म्हणून मी मुद्दाम सांगते. तो कोल्हापूरला राहायचा; जेव्हा सद्‌गुरू कोल्हापूरला गेले, तेव्हा त्याला दर्शनाला जा म्हणून सांगितले होते. तो दर्शनाला गेल्यानंतर कोणीतरी बघितले, की हा डांग्यांचा मेव्हणा दिसतोय. त्याने आपले नुसते दर्शन घेतले, सद्‌गुरूंकडून प्रसाद घेतला. ह्यांच्या कुठल्यातरी मित्राने त्याला सांगितले की ''तू डांग्याचा मेव्हणा ना, म्हणून मी तुला सांगतो. मोकळ्या हाताने सत्पुरुषांचे दर्शन घेऊ नये.'' त्यांनी अतिशय आपुलकीने त्याला सांगितले होते. पण त्याला खूप राग आला. ''मला तेथे नारळ ठेवायला सांगितला, तेथे पैसे ठेवायला सांगितले,'' त्याने तसे केले; पण नंतर सद्‌गुरूंना पत्र लिहिले की ''तुम्ही स्वतः अतिशय निःस्वार्थी दिसता, तुम्ही भगवी वस्त्रे घातलेली आहेत आणि तरी तुमच्या हस्तकांकरवी तुम्ही लोकांना सांगता की नारळ आणि पैसे ठेवा; त्याप्रमाणे मी सेवा ठेवली; पण तुमचा हा साधूपणाचा उद्योग बरोबर नाही.'' हे जे पत्र सद्‌गुरूंना आले ते दिवाळीच्या दिवशी आले. त्या दिवशी सद्‌गुरू दिवसभर जेवले नाहीत. त्यांना या पत्राने अत्यंत दुःख झाले. मी देवस्थानात गेल्यावर, मला सद्‌गुरूंनी ते पत्र दाखविले. ते म्हणाले, ''अविनाश अभ्यंकर कोण आहेत?'' तर मी म्हणाले, ''माझा

भाऊ आहे.'' त्यांनी ते पत्र मला वाचायला दिले. मला आधी खूप बरे वाटले की आपल्या भावाने महाराजांना पत्र लिहिले. पण मग पत्र वाचल्यानंतर मला अत्यंत संताप आला. मी म्हणाले, ''सद्‌गुरू याला क्षमा करा. याला कोठून दुर्बुद्धी झाली, मला पण कळत नाही.'' त्यानंतर त्याला मी खूप रागारागाने पत्र लिहिले की, ''तुझा माझा संबंध संपला. सद्‌गुरू काय आहेत, हे तुला ठाऊक नाही. शास्त्रवचन असे आहे की एखाद्या संतांचा तुम्हाला अनुभव जरी आला नाही, तरी तो संत आहे म्हणून तरी दर्शन घ्या. पटलं नाही तर तुम्ही बाजूला राहा. पण टीका करू नका.'' (हे आपल्याला, भक्तांनाही सद्‌गुरूंनीसुद्धा शिकविलेले आहे.) पण त्याने ऐकले नाही. नंतर त्याने मला एक पत्र लिहिले. त्याची प्रत सद्‌गुरूंना पाठविली की, ''माझा असा उद्देश नव्हता म्हणण्याचा. वगैरे. वगैरे.'' त्याने क्षमायाचना केली. त्या पत्रात त्याने समर्थांचे एक वचनही घातले, ते वचन घालावयाची काही गरज नव्हती. ते पत्रसुद्धा माझ्याकडे अजून आहे. मी ते जपून ठेवले आहे.

त्यानंतर त्याच्या कुटुंबाची प्रचंड प्रमाणात वाताहत झाली. त्याच्या बायकोला कॅन्सर झाला. तिला मुलगा पाहिजे म्हणून, माझ्या आईने गुरुदेवांना प्रार्थना करून तो मागून घेतला. गुरुदेव म्हणाले, ''त्याला समजत नाही ना मी कोण आहे; तर तुम्ही कशाकरिता मागताय.'' आई म्हणाली, ''मला एक नातू हवा आहे म्हणून!'' माझी आई दत्तभक्त होती. तिच्या इच्छेखातर गुरुदेवांनी नातू पण दिला आणि त्यानंतर त्याच्या संसाराचे तीन-तेरा वाजले. त्याची बायको खूपच आजारी झाली. त्याला खूपच त्रास झाला आणि शेवटी शेवटी तो खूप आजारी झाला. तो म्हणे, ''मला जर कोणी सांभाळले नाही तर मी रस्त्यावर येईन.'' म्हणून माझ्या बहिणीने त्याला सांभाळले, पण तो घरामध्येही इतका विचित्र वागायला लागला की तिलाही त्याचा खूप त्रास झाला. त्यामुळे शेवटी त्याला बिबवेवाडीच्या एका वृद्धाश्रमात ठेवले. तेथूनही तो कोल्हापूरला निघून गेला. अक्षरशः त्याने नरकयातना भोगल्या. रोज अंघोळ करायची नाही, रोज दाढी करायची नाही, अंगाचा खूप घाण वास यायचा. हे मी का सांगते आहे? कोठल्याही सत्पुरुषाची तुम्ही चेष्टा केली तर काय परिणाम होतो, हे सर्वांना समजावे; म्हणून त्याचा मुलगाही विचारेनासा झाला. शेवटी तो एकटा राहिला व एकटाच गेला. त्या दिवशी मला खूप तळमळ लागली. जरी आपल्या सद्‌गुरूंशी त्याने प्रतारणा केली तरी तो माझा भाऊ होता; आई-वडील दोघेही दत्तभक्त होते आणि याने असे का करावे याबद्दल मनाला खूप खंत होती. मरता मरता जरी त्याने सद्‌गुरूंचे नाव घेतले असते तरी त्याच्या यातना कमी झाल्या असत्या. सगळ्यांनी

त्याच्या बाबतीत प्रयत्न केले, त्याला हात द्यायचा प्रयत्न केला पण त्याचे काही चीज झाले नाही. मी म्हणाले, ‘हे जनावर असे चुकले कसे?’ आम्ही सर्व भावंडे सद्‌गुरूचरणी आहोत; आमचे जावईसुद्धा येतात, मुलगा येतो पण हा कसा आला नाही? मला अतिशय वाईट वाटले व तो गेल्याचे कळल्यावर मी घरात बसून राहिले. मी सद्‌गुरूंच्या फोटोपुढे रडत होते. अशी शिक्षा कोणालाही होऊ नये असे वाटले; म्हणून मी विष्णुसहस्त्रनाम म्हणायला सुरुवात केली व मग मी शांत झाले. मला गाढ झोप लागली. म्हणजे सद्‌गुरूंनी त्याला क्षमा केली असेल. मी सतत लोकांना सांगते की तुम्ही सद्‌गुरूंची उपेक्षा, अवहेलना करू नका. तुमच्या आयुष्यात काही शिल्लक राहत नाही, जे काही असेल ते सगळे निघून जाते. त्याचे असेच झाले. शेवटी स्वच्छताही गेली. हा माझ्या सख्ख्या भावाचा अनुभव आहे आणि हा मी मुद्दाम सांगते, कारण की सर्वांनी यापासून धडा घ्यावा. गुरुस्वरूप आपल्याला समजले पाहिजे. ते काय आहे हे आपल्याला त्याक्षणी समजत नाही पण ज्यावेळी आपल्यावर खूप संकटे येतात तेव्हा आपल्याला गुरूंची आठवण होते.

* * *

## श्रीगुरुदेवांनी दिलेले दृष्टान्त

**प्रा. डॉ. शशिकला गांगल**

एम. एस्सी., पीएच. डी. पुणे

- *अग्नीजवळ जाताना ऊब लागेल एवढेच जवळ जावे; चटका बसेल इतकं जवळ जाऊ नये, तसंच गुरूंच्या किती जवळ जावे ह्याचे भान ठेवावे.*
- *विहीर खणतांना खड्डाही होतो व ढीगही होतो; तसेच मनुष्याला मिळालेल्या वाणीमुळे पाप व पुण्य दोन्हीही वाढते; म्हणून मिळालेल्या वाणीने समतोल राखा. कोणाला दुखवू नका. वाईट बोलू नका. लोकांच्या सुखदुःखात सहभागी व्हा.*



# १५.

# सद्‌गुरू श्री. रामकृष्ण परमहंस आणि सद्‌गुरू श्री. रामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज

**प्रा. डॉ. एस्. एम्. कुलकर्णी**
एम.ई., पीएच्. डी., निवृत्त प्राचार्य, इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे

**या दोघा अलौकिक सत्पुरुषांच्या जीवनकार्यात अनेक आश्चर्यकारक साम्यस्थळे दिसतात.**

* **दोघांचीही** नावे श्रीरामकृष्ण

* **दोघांचेही** जन्मदिनांक – **फेब्रुवारीत**

* परमहंसांचा जन्मदिनांक **१८ फेब्रुवारी,**
सद्‌गुरूंचा जन्मदिनांक **१६ फेब्रुवारी**

* **दोघांचीही जन्मतिथी – फाल्गुन महिन्यात** परमहंसांची शु. द्वितीया; सद्‌गुरूंची शु. तृतीया

* **दोघांचाही जन्म – लहान खेड्यात व दरिद्री ब्राह्मण कुटुंबात**

* **दोघांच्याही वडिलांचे, त्यांच्या बालपणी निधन**

* **दोघांचेही** चरितार्थासाठी जन्मगाव सोडून **मोठ्या गावी स्थलांतर–** परमहंस – कलकत्त्यास, सद्‌गुरू – अहमदनगरला

* **दोघांनाही** औपचारिक **शालेय शिक्षणात रस नव्हता.** त्यामुळे बालपणीच त्यांचे शालेय शिक्षण समाप्त.

* **दोघांनाही** काही काळ पुजारी म्हणून काम करावे लागले. –परमहंसांना दक्षिणेश्वरी कालीमाता मंदिरात , सद्‌गुरूंना – श्री. हरदास ह्यांच्या देवघरात

* **दोघेही** आपापल्या आराध्य दैवतांचे **एकनिष्ठ, समर्पित भक्त** – परमहंस – श्रीकालीमातेचे, सद्‌गुरू भगवान दत्तात्रेय व दत्तावतार श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे

* **दोघांनाही बालवयात साक्षात्कार** – अतींद्रिय अनुभव प्राप्त

* **दोघांचाही** आपापल्या आराध्य **दैवतांशी संवाद होई.**

* **दोघेही** आपापल्या भक्तांना **आध्यात्मिक अनुभव देण्यास सक्षम–समर्थ. दोघांनीही देहत्यागानंतर भक्तांना देहरूपात अनेकदा दर्शन दिले.**

* आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींना भगवत्‌भक्ती करण्यास **दोघेही** प्रवृत्त करीत. त्यासाठी त्यांना **ईश्वरी शक्तीचा विलक्षण अनुभव देत.**

* **दोघांच्याही** अंगी **प्रखर वैराग्य, कडकडीत ब्रह्मचर्य, प्रज्ञाजागृती** आणि **शुद्ध कैवल्यज्ञान** होते.

* **दोघांनाही सार्वजनिक सभा**, चर्चासत्रे, समारंभ, परिसंवाद इ.त मुळीच **रस नव्हता.**

* विनम्र वृत्तीने येणाऱ्या जिज्ञासूंचे समाधान करण्यासाठी, दोघांनीही आपल्या शब्दप्रवाहाला कधी बांध घातला नाही. मात्र एकतर्फी व औपचारिक शब्दांच्या व्याख्यान–प्रवचनरूपी धबधब्याऐवजी बोलणाऱ्या, ऐकणाऱ्यातील अनौपचारिक **संवादसाखळी दोघांनाही प्रिय** होती व त्यावेळी झालेल्या **प्रबोधनातूनच दोघांच्याही ग्रंथसंपदेचा** जन्म झाला.

* भगवत्प्रेमी **शिष्य घडविण्यासाठी दोघांनीही अतोनात कष्ट उपसले.**

* **दोघांनाही** उत्तरायुष्यात **दुर्धर व्याधींचा** त्रास सोसावा लागला. परमहंसांना कॅन्सर तर सद्‌गुरूंना तीव्र मधुमेह व तज्जन्य विकार होते. त्या व्याधी बऱ्या करण्यासाठी **आराध्यदैवतेला प्रार्थना करावी, अशी भक्तांनी केलेली विनवणी दोघांनीही अमान्य केली** व **शांतपणे** त्या व्याधींचा **त्रास सोसला.**

* **'जो राम, जो कृष्ण तोच हा रामकृष्ण'** असे परमहंस म्हणत, तर **'माझ्याकडे रामाची शक्ती व कृष्णाची युक्ती आहे.'** असे सद्‌गुरू म्हणत.

* **दोघांनीही** आपले अलौकिक विभूतिमत्व, दैवी गुणसंपदा, भक्तवत्सलता व कार्यकर्तृत्व यांच्यामुळे **भारताची आध्यात्मिक सांस्कृतिक परंपरा समृद्ध केली.**

* * *



# १६.

## ।। उच्च नीच भेदभाव मानसी न आणितो... ।।

**श्री. महेश कलबुर्गे**
निवृत्त मॅनेजर, कोहलद कं. औरंगाबाद

१९९६ साली मी मेल्टॉन कंपनी औरंगाबाद येथे नोकरीत असताना नेहमीप्रमाणे वरचेवर नगरला गुरुदर्शनासाठी जात असे व आल्यावर कंपनीतील सहकारी मित्रांना सद्‌गुरुंची व देवस्थानची माहिती सांगत असल्यामुळे, सर्वांना नगरला जाऊन गुरुदर्शन घ्यावे व देवस्थान पहावे, अशी खूप इच्छा झाली. त्यामुळे आम्ही कंपनीतील ८–१० जण, दुपारी ३ला नगरला देवस्थानात पोहोचलो. माझा एक मित्र मुस्लिम होता; पण त्याची दर्शनासाठी फारच तीव्र इच्छा होती म्हणून तोही बरोबर होता. मी सर्व मित्रांना दर्शनाची पद्धत व देवस्थानात कसे वर्तन असावे, हे अगदी घोटून सांगितले होतेच. मी आत गेल्यावर देवस्थानातील सेवेकऱ्यांना विचारले की, ''माझा एक मित्र मुस्लिम समाजातील आहे, तर त्याला वर सर्वांबरोबर श्रीगुरुंकडे नेऊ का? चालेल का?'' 'असे चालणार नाही' असे उत्तर मिळाल्याने मी फार नाराज झालो व 'काय उपाय आहे' असे विचारले. तर ते म्हणाले की, ''त्याला बाहेरच उभे राहू दे व ४ वाजता सद्‌गुरू फिरायला जातील तेव्हा रस्त्यावरच त्याला दर्शन होईल.''

आम्ही सगळे त्याला बाहेर उभे करून, वर जाऊन सद्‌गुरूंचे दर्शन घेतले व सांगितले की, ''हे माझे मित्र दर्शनासाठी औरंगाबादहून आले आहेत.'' त्यांनी आनंदाने आशीर्वाद दिला. माझे सगळे मित्र खाली गेले. ३.२५ ची वेळ झाली. मी एकटाच बसलो व उठत नाही म्हणून सद्‌गुरू म्हणाले की, ''काय काही बोलायचं आहे का?'' मला बोलता येईना व डोळ्यातून अश्रू यायला लागले. म्हणाले, ''बोला.'' मी माझ्या मुस्लिम मित्राची दर्शनाची ओढ व इच्छा बोललो. सद्‌गुरू म्हणाले, ''कुठे

आहेत? ते वर का आले नाही मग?'' असे म्हणून खाली दर्शनाच्या जागी जाण्यासाठी उठले. मी बोललो की ''खाली परवानगी मिळाली नाही, म्हणून तो बाहेरच गाडीजवळ थांबला आहे.'' त्याक्षणी ते पुन्हा आसनस्थ झाले व बाजूच्या सेवेकऱ्यास (माझ्या) मित्राला ''वर आणा'' असे सांगितले. एवढ्या मोठ्या हॉलमध्ये काही वेळ सद्गुरू व मी समोर बसल्याने मला काय करू, ते सुचेना व अश्रूंची धार लागली. २ मिनिटातच माझा मुस्लिम मित्र वर आला व मी आधीच सांगितल्यानुसार नारळ ठेवून त्याने श्रीगुरुदेवांना साष्टांग नमस्कार घातला व तो माझ्या बाजूला बसला. सद्गुरूंनी नाव व माहिती विचारल्यावर त्याने सय्यद अली मेहरवार असे सांगितले व माहिती दिली की, ''मी नोकरी व ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय करतो. मला आशीर्वाद द्या.'' सद्गुरूंच्या चेहऱ्यावर अतिप्रसन्न भाव होता व त्यांनी त्याला आशीर्वाद दिला. मला ते म्हणाले की, **''येथे कोणीही येऊ शकतो व त्यासाठी मध्यस्थाची व परवानगीची आवश्यकता नाही.''** आम्ही दोघे पुन्हा नमस्कार करून अतिशय आनंदात जिना उतरून खाली आलो. हा माझा मित्र तेव्हापासून दरवर्षी गुरुपौर्णिमेस सद्गुरूंचे स्मरण करून, माझ्या घरी अर्पण करण्यासाठी गुरुदक्षिणा आणून देतो.

* * *

## श्रीगुरुदेवांचे मार्गदर्शन

### गुरू

- गुरुमुखातून येणारे वाक्य भक्ताने तरी शास्त्रच समजावे.
- गुरू सुख–दुःखाच्या पलीकडे गेलेले असतात.
- जसे दानात अन्नदान श्रेष्ठ, मंत्रात गायत्रीमंत्र श्रेष्ठ तसे वाक्यात 'गुरुवाक्य' श्रेष्ठ असते.

### वेद

- विज्ञान हे वेदातून निर्माण झालेले आहे. वेदपठणातून अदृश्य शक्ती निर्माण होते व ह्या शक्तिमार्फत दिव्य कामे केली जातात. हे ओळखणे हे विज्ञानाचे कार्य होय.
- इतर वर्णाच्या लोकांना वेदपठण अवघड असल्यामुळे व्यवस्थित म्हणता येणार नाही. त्यांनी ब्राह्मणांना स्वतःच्या घरी बोलावून वेदोच्चार करवून घ्यावेत व सौख्य मिळते की नाही हे बघावे. स्वतःची खात्री करावी.



# १७.
# साक्षात्कार घडवणारे गुरुदेव

**प्रा. अरुण केसकर**

एम्. ए. पीएच्. डी.

प्राचार्य, विमेन्स एज्युकेशन कॉलेज, श्रीगोंदा

श्रीगुरुदेव मला अनेक वेळा म्हणत की, ''मी ज्या डब्यातली साखर खाल्ली आहे त्याच डब्यातली साखर तुम्हाला देणार आहे. **मी रोखठोक अनुभव देणारा आहे.''** परंतु ह्याचा अर्थ माझ्या फारसा लक्षात येत नसे.

सन १९७२ च्या गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी श्रीगुरुदेव मला म्हणाले की, ''उद्या श्रींच्या दर्शनाला ये.'' त्याप्रमाणे मी सकाळी लवकर गेलो. श्रीगुरुदेवांनी माझ्याकडे पाहिले व श्रींना नमस्कार करण्याची आज्ञा केली. मी साष्टांग नमस्कार घातला. त्यावेळी श्रीगुरुदेव म्हणाले की ''४४० व्होल्ट दिल्याशिवाय ह्याला जमणार नाही.'' असे म्हणताच **सर्वांग शरीर रोमांचमय झाले; ऊर भरून आले; गात्रे कंपित झाली. डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. कंठ सद्‌गदित झाला. स्थलकालाचे भान विसरले गेले. सर्व खोली तेजाने भरून गेली.** देहाचा विसर पडला. मी कितीतरी वेळ ह्याच स्थितीत होतो. थोड्या वेळाने मूळ पदावर आलो. सद्‌गुरू हसत होते. **ते श्रीरामकृष्ण परमहंसांच्या मुद्रेत होते.**

ती गुरुपौर्णिमा माझ्या जीवनाला उजाळा देणारी ठरली. त्या दिवशी श्रीगुरुदेवांच्या अधिकाराची जाणीव झाली. जीवनाची दिशा बदलली गेली. वाड्यात पुष्कळवेळा रात्री आरती झाल्यानंतर श्रीगुरुदेव बाहेर येत असत. भक्तांना उपदेश करीत असत. काही वेळा ते इतरांशी बोलत असतांना मी सद्‌गुरूंकडे एकाग्रतेने बघत असे. अशावेळी **महाराजांच्या ठिकाणी त्रिमूर्तीचे दर्शन** होत असे तर **काही वेळा पूर्ण विकसित झालेल्या कमळाचे दर्शन होई.** दुपारची आरती झाल्यानंतर अनेकवेळा ते 'प्रसाद घे' असे म्हणत. परंतु मला वाटे की आपल्यामुळे त्यांना त्रास नको. काही वेळा मी थांबत

नसे. एके दिवशी मला प्रसाद घेण्याची त्यांनी आज्ञा केली. वाड्यातील खालच्या खोलीत भोजनप्रसादाची व्यवस्था होती. श्रीगुरुदेवांच्या जवळ बसून प्रसाद घेण्याची संधी मिळाली. ताटात फारसे नव्हते. थोडा भात, वरण, पोळी, भाजी इ. साधे जेवण होते. वाढून झाल्यावर श्रीगुरुदेवांनी 'हा प्रसाद ग्रहण कर' अशी आज्ञा केली. **'प्रसाद घे' म्हणताच अन्नातून प्रासादिक सुगंध येऊ लागला. प्रत्येक पदार्थातून या सुगंधी लहरी निर्माण झाल्या. थोड्या प्रसादातून पोट भरले. तृप्ती झाली. २-३ दिवस तो सुगंध जाणवत होता**. ढेकरदेखील त्याच सुवासाचे होते. प्रसाद भोजनानंतर श्रीगुरुदेव म्हणाले, **''अरे, ह्या प्रसादग्रहणातून तुमचे दोष आम्ही नष्ट करतो. शरीराची शुद्धी करतो. ह्यापुढे प्रसाद कायम ग्रहण करीत चला.''** प्रसाद महात्म्याची वेगळी अनुभूती मिळाली.

मी शिर्डीत असतांना भक्तप्रेमापोटी श्रीगुरुदेव २-३ वेळा माझ्या खोलीवर आले व जातांना मला नगरला घेऊन गेले. एकदा सद्गुरूंचे विलक्षण दर्शन शिर्डीत झाले. संध्याकाळी मी माझ्या खोलीकडे निघालो होतो. वाटेत जिन्यातून कसला तरी स्पर्श झाल्याची जाणीव झाली. मी वळून पाहिले तर श्रीगुरुदेव **अनेक वायुगोलकांच्या रूपातून भराभर जिना उतरून जात होते. काही क्षणात ते अंतर्धान पावले. बैठकीच्या वेळी अनेक वेळा अशा अनेक वायुगोलकांच्या लहरी, श्रीगुरुदेवांच्या अंगातून बाहेर पडत असत व भक्तांना व्यापून टाकीत असत.**

परमेश्वराबद्दल कथन करणारे, चर्चा करणारे खूप असतात; पण त्याच्याशी **प्रत्यक्ष बोलणारे, साक्षात्कार घडवून आणणारे व ईश्वरस्वरूप श्रीगुरुदेवांसारखे युगायुगात दुर्मिळ असतात.** भक्तिभावाने प्रसन्न झाल्यावर श्रीगुरुदेव कृपाशीर्वाद देत असत. ''हाच आशीर्वाद जीवनात तारणारा'' असे ते म्हणत.

त्यांनी केलेली कृपा ही निरंतर व कुटुंबातील सर्वांवरच असते; ती अविनाशी असते. ह्याचा एक प्रत्यय असा आला की माझा थोरला भाऊ शशिकांत हा कराडला किर्लोस्कर कंपनीत मॅनेजर होता. जमेल तसे तो श्रीगुरुदेवांच्या दर्शनाला येत असे. एकदा तो महत्त्वाच्या कामासाठी महाराष्ट्र एक्स्प्रेसने रात्री १२.३० वाजता परगावी जाणार होता. गाडी लेट होती. रेल्वे प्लॅटफॉर्मवर फारशी गर्दी नव्हती. जवळ बरेच पैसे व महत्त्वाची कागदपत्रे होती. तो एका बाकावर बसला होता. थोड्यावेळात एक फकीर आला. त्याने मोराच्या पिसाचा कुंचा त्याच्या तोंडावरून फिरवला. त्याला काही कळले नाही. तो फकिरामागे जाऊ लागला. प्लॅटफॉर्म संपला व अंधार असलेल्या पाऊलवाटेने तो फकिराच्या मागे जाऊ लागला. काही पावले पुढे गेल्यावर 'शशी, तू मागे फिर' असा आवाज ऐकू आला. हा आवाज २-३ वेळा ऐकल्यावर तो भानावर आला. त्याने **हा आवाज श्रीगुरुदेवांचाच आहे** हे ओळखले व तो माघारी फिरला व तडक रेल्वेच्या

फर्स्टक्लासच्या वेटिंग रूममध्ये गेला. नगरला आल्यावर श्रीगुरुदेवांना त्याने साष्टांग नमस्कार केला. त्यावेळी श्रीगुरुदेव म्हणाले, ''**आम्ही असतो भक्तांच्या काजा ।**''

ह्या जन्मात आपली प. पू. **श्रीगुरुदेवांची भेट झाली; अनुभूती मिळाली व जीवनाचा खरा अर्थ कळला,** ह्यासारखी भाग्याची गोष्ट कोणती?

पायोजी मैने रामरतन धन पायो ।

वस्तु अमोलिक दी मेरे सद्‌गुरू, भवसागर तर पायो ।।

संत मीराबाईच्या या वचनाप्रमाणे **सद्‌गुरूंनी नामस्मरणाचे धन सर्वांना वाटले आहे.** ॐकार साधना सद्‌गुरूंसमवेत करण्याची परवानगी त्यांनी दिली. अनेक वर्षे ही साधना करतांना आलेले अनुभव शब्दातीत आहेत. **सद्‌गुरूंच्या ॐकार लहरी सर्वत्र पसरत असत.** प्रत्येक बाहेरचा आवाज त्याच आवाजात मिसळला जाई. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांचा आवाज ॐकारमय होई. अनेकवेळा त्या लहरी स्वयंपाकघरातील भांड्यांपर्यंत जात व त्यातून भांड्यांची कंपने ऐकू येत असत. ही साधना होत असतांना अनेक वेळा ॐकार नाद थांबल्यासारखा वाटे; पण तो प्रत्यक्ष चालू असे. कंबरेपासून तर मस्तकापर्यंत ह्या लहरींचे स्पंदन चांगल्या प्रकारे जाणवत असे; बाह्यनादाची जाणीव सर्वांनाच होते; पण अंतर्नादाची अनुभूती, जाणीव व दर्शन हे अत्यंत दुर्मिळ होय. **ह्या साधनेमध्ये रोज अनेक दिव्य दर्शने होत. श्रीगुरूंच्या विश्वरुपी स्वरूपाचे विविध अंगांनी दर्शन होत असे व तेच सर्वकाही ॐकार स्वरूप आहेत, ह्याची खात्री झाली.** ॐकार हा ईश्वरवाचक ध्वनी आहे व तोच सर्वांचा मूलाधार आहे, हे श्रीगुरूकृपेने कळले. कुकडेवाड्यात श्रीगुरुदेवांनी अनेकांकडून ही साधना करवून घेतली. कितीही आटापिटा केला व **खूप शास्त्रवाचन केल्यानंतरही जे ज्ञान होणार नाही, ते ज्ञान क्षणार्धात भक्ताला मुक्तहस्ते व निरपेक्षपणे देणारे श्रीसद्‌गुरू** हे सर्वांचेच **कल्पवृक्ष** आहेत.

**श्रीगुरुदेवांची शिकविण्याची पद्धत फारच वैशिष्ट्यपूर्ण असे.– अगोदर अनुभूती व नंतर तात्विकता हे ते वैशिष्ट्य! पीएच. डी. चा प्रबंध लिहिण्यापूर्वी ज्या दासोपंतांवर मला लेखन करावयाचे होते, त्यांचे त्यांनी दर्शन घडविले.** (दासोपंतांचा काल सुमारे **साडेचारशे वर्षांपूर्वीचा**) **नंतर मी लेखन केले.** त्यांची शिकवण ही **रोखठोक व अनुभूती देणारी व जगावेगळीच होती.**

श्रींच्या चरणांमुळे माझ्या जीवनाची पौर्णिमा झाली व अरुणोदय झाला हेच जन्मोजन्मीचे परमभाग्य!

***



# १८.
# आगळेवेगळे सद्गुरू

**डॉ. विकास मांडके**
एम्. बी.बी.एस्. पोस्ट ग्रॅज्युएट इन् व्हायरॉलॉजी
(निवृत्त डेप्युटी डायरेक्टर, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च, मुंबई)

मी जेव्हा आपल्या गुरुदेवांनी केलेल्या मार्गदर्शनावर विचार करतो तेव्हा मला असे वाटते की, हे गुरू काहीतरी वेगळेपण घेऊन आले होते. गुरुदेवांच्या मुखातून जी सरस्वती बाहेर पडते ते ज्ञान किती सोपे वाटते! (आचरण अर्थात परीक्षा पाहणारे असते.) अध्यात्म क्लिष्ट असते ही समजूत दूर होते.

श्रीगुरुदेव अध्यात्म सांगतांना व्यवहारातील अगदी सोपी, परिचयाची उदाहरणे देत. उदा. 'मनुष्याचा लोभ त्याला सावलीसारखा चिकटला आहे.' दुसरे बघा– 'क्षमायाचनेने द्वेष कमी होतो, जसे ढेकळावर पाणी टाकले की तो ठिसूळ होतो.'

**त्यांचे बोलणे म्हणजे शुष्क पांडित्य नव्हते, तर अनुभूतीतून आलेले ज्ञान होते. ते आगळेवेगळे होते. सोपे वाटले तरीही त्या विषयाची व्याप्ती, खोली खूपच होती.** त्यांनी सांगितलेले काही आगळेवेगळे निवडक विचार पाहूया–

**१. 'माझ्या नशिबात नव्हते, हा कुचकामी विचार आहे.'**

**– प. पू. श्रीगुरुदेव**

श्रीगुरुदेव येथे पुरुषार्थ करायला सांगतात. गुरुदेवांनी दिलेल्या आशीर्वादाचा परिणाम व्हायचा असेल तर प्रयत्नांची जोड असायला पाहिजे. संत समाजाला निष्क्रिय करतात अशी जी समजूत आहे, तिला गुरुदेवांनी खोटे ठरवले आहे. प्रयत्न+आशीर्वाद = यश, असे गुरुदेवांना सांगायचे आहे ना!

**२. व्यवहारात वागतांना आपापले नोकरीव्यवसाय सांभाळतांना प्रसंगी खोटे बोलायला लागले तरी खुर्चीची जी कर्तव्ये असतील ती प्रामाणिकपणे पूर्ण करावीत – प. पू. श्रीगुरुदेव**

आपल्या खुर्चीची जी कर्तव्ये असतील त्यांच्यावर निष्ठा ठेवावी, असे श्रीगुरुदेव सुचवतात. त्याप्रसंगी खोटे चालू शकते असे गुरुदेव म्हणतात; ही कृष्णनीती आहे. गुरुदेव म्हणायचे, **'माझ्याकडे रामाची शक्ती व कृष्णाची युक्ती आहे.'**

श्रीकृष्णाने धर्मराजाला खोटे (अर्धसत्य) बोलायला लावले. रथाचे चाक रुतले असतांना नीती वगैरे सोडून, अर्जुनाला कर्णावर हल्ला करायचा सल्ला दिला. सुदर्शनचक्र सोडून सूर्यास्त झाला असे भासवले. दुर्योधनाला 'तू विवस्त्र होऊन आपल्या आईसमोर कसा उभा राहणार?' असे बोलून मुत्सद्देगिरी केली. हे सर्व कशासाठी? स्वतःच्या स्वार्थासाठी? छे हो, हे सर्व सुष्ट शक्तीच्या विजयासाठी. दुष्ट शक्तीच्या निःपातासाठी. ठकासी ठक व्हायला पाहिजे, असे श्रीकृष्णाचे चरित्र सांगते. त्याच धर्तीवर श्रीगुरुदेव वरील भाष्य करीत आहेत. ते कृष्णनीती सांगत आहेत.

**३. नियतीचे नियम मोडणे जरी पाप असले तरी अहिंसा तत्त्व किती पाळावे ह्याला नियम आहेत. आपला जीव धोक्यात येत नाही तोपर्यंत अहिंसा पाळावी. – प. पू. श्रीगुरुदेव**

किती व्यावहारिक सल्ला आहे हा! ह्यात अहिंसेबद्दल टोकाची भूमिका नाही, कट्टरपणा नाही, कडवेपणा नाही, हेकेखोरपणा नाही. मांजराचे प्राण वाचवतांना स्वतःचा जीव धोक्यात घालू नका, असे गुरुदेव सांगतात. कारण परमेश्वरप्राप्ती मनुष्यजन्मातच होते; तो जन्म दुर्लभ असतो. गुरुदेव कधीही परमेश्वराला विसरत नाहीत. जसे वर्तुळाचा व्यास परिघावरून सर्व बिंदूंतून फिरतो, पण मध्यबिंदू सोडत नाही, तसे गुरुदेव परमेश्वराला विसरत नाही. तेव्हा त्यांच्या मनात मानवजन्मातील परमेश्वरप्राप्ती विसरली जात नाही.

**४. मी ईश्वराशिवाय आणि अधिकारी सत्पुरुषांशिवाय कोणाच्याही आहारी जाणार नाही. हे नियम मी काटेकोरपणे पाळत आहे. – प. पू. श्रीगुरुदेव**

गुरुदेवांच्या मागे कार्य होते. सर्व लोकांना बरोबर घेऊन ते जात होते. सर्व लोकांना सांभाळून घ्यावे लागते. वेगवेगळ्या वृत्तींचे आणि सर्व प्रकारांचे लोक असतात. याकरिता नेतृत्वगुण लागतात. ते त्यांच्यात निश्चित होते. हे कार्य करतांना काही गौण गोष्टी कराव्या लागतात. त्या गोष्टी गौणच राहतील याची काळजी घ्यावी लागते, ती त्यांनी जरूर घेतली.

हे सर्व चालू असतांना दुसऱ्याच्या आहारी जाण्याचे प्रसंग अनेकवेळा येतात.

ह्यात भक्त येतात, राज्यकर्ते येतात, श्रीमंत देणगीदार पण आले. त्यांना कुठपर्यंत येऊ द्यायचे ह्याचे भान ठेवावे लागते. जर तसे झाले नाही तर कार्याचे स्वरूप बदलण्याची शक्यता असते.

**५. कोणी कोणत्या देवाला मानावे हे ज्याचे त्याने ठरवावे; परंतु परमेश्वर एकच आहे हे लक्षात ठेवावे –प. पू. श्रीगुरुदेव**

श्रीगुरुदेव स्वामी नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांचे शिष्य होते. स्वामी नृसिंह सरस्वती श्रीदत्तात्रेयांचे अवतार होते. म्हणजे तांत्रिकदृष्ट्या श्रीगुरुदेवांचा दत्तसंप्रदाय होता.

परंतु गुरुदेवांचे विचार कधीही सांप्रदायिक वाटले नाहीत. याचे कारण **त्यांनी परमेश्वर अनुभवला होता. परमेश्वर हा निर्गुण निराकार, तेजाच्या स्वरूपात त्यांनी अनुभवला होता.** त्यांनी भक्तांना बहुतांशी 'श्रीगुरुदेवदत्त' असे नाम दिले. पण रामाची, शिवाची, कृष्णाची भक्तीही दिली. त्यांनी असे सांगितले की, कुलदेवतांचे व कुलदेवाचे प्रति आपले पहिले कर्तव्य आहे. त्यात कुठेही सांप्रदायिकपणा आढळत नाही. गुरुदेव म्हणतात, ''**बुद्धीने जो आचरला जातो त्याला धर्म म्हणावे. श्रद्धेने जो आपण जाणतो त्याला पंथ म्हणावे.'' गुरुदेव धर्म आचरत होते.**

**६. कर्मकांडाचे अवडंबर माजवू नका, पण त्याचा पूर्णपणे अव्हेरही करू नका. –प. पू. श्रीगुरुदेव**

कर्मकांड हे साधन आहे. ते जेव्हा साध्य होते तेव्हा साधकाची गाडी भलत्याच दिशेने जायला लागते. श्रीगुरुदेव परखडपणे त्यावर बोलतात. साधे उपवासाचे, व्रतवैकल्याचे उदाहरण घ्या. गुरुदेव म्हणतात, ''उपवासाने शरीरशुद्धी होते, उपवासाने परमेश्वरप्राप्ती होत नाही.'' त्यांनी भक्तांना वर्षातून फक्त सात उपवास करायला सांगितले आहेत. जेव्हा कर्मकांडाचे अवडंबर माजते, तेव्हा कर्मकांड साधन न राहता साध्य होते. कर्मकांडासाठी कर्मकांड! कर्मकांड पूर्णपणे अव्हेरू नका असे जेव्हा श्रीगुरुदेव सांगतात तेव्हा ते म्हणतात, 'धर्म तत्त्वज्ञानाचा आहे तसाच तो कर्मकांडाचाही आहे.'

कुठलीही गोष्ट– मग ती व्यवहारातील असो की अध्यात्मातील; त्याकरिता काही नियम असतात. आपण जर सर्जनला विचारले की, 'मला ऑपरेशन करताना जवळून बघायचे आहे.' तर तो सर्जन म्हणेल, ''प्रथम पायातल्या चपला काढ. हात धू. मास्क चढव. ॲप्रन घाल. केस झाक.'' म्हणजे नुस्ते ऑपरेशन बघायचे म्हटले तर किती क्रिया कराव्या लागतात. तसेच धर्माचे आहे. कर्मकांड पूर्णपणे अव्हेरून चालत नाही. वारांचे उपवास हे ग्रहांचे उपवास आहेत असे श्रीगुरुदेवच ठामपणे सांगू शकतात.

**७. आचरण जमले नाही तर निदान भाव ठेवता येईल. आचार जर सांभाळता येत नसतील तर निदान विचार सांभाळावे**

**–प. पू. श्रीगुरुदेव**

श्रीगुरुदेव खूप प्रॅक्टिकल आहेत. आपल्याभोवती जे जग आहे ते धकाधकीचे, मोहमय, भुरळ पाडणारे आणि मायावी आहे. त्याची श्रीगुरुदेवांना पूर्णपणे कल्पना होती. ते कळकळीने सांगत आहेत की तुमचे भाव, विचार तरी चांगले ठेवा. चांगले विचार ठेवले म्हणजे हळूहळू आचरण सुधारू लागते. मुळात चांगले विचार, भाव नसतील तर काय करणार? असे श्रीगुरुदेवांना सुचवायचे आहे. आध्यात्मिक प्रगती ही हळूहळू होत जाते. श्रीगुरुदेव म्हणतात की तुम्ही पहिले पाऊल तरी टाका. मोक्ष मिळणे, परमेश्वर भेटणे ही एका जन्माची कहाणी नाही. अनेक जन्मांच्या प्रयत्नांचे ते फलित आहे. ''पाणी वाहता वाहता शुद्ध होते.'' ''थांबला तो संपला!''

**८. अनुग्रह कानात मंत्र सांगून दिला जात नाही. गुरू उपदेश देतात तोच अनुग्रह व तोच आचरणात आणावा लागतो. –प. पू. श्रीगुरुदेव**

श्रीगुरुदेवांचे अनुग्रहासंबंधी विचार वेगळे आहेत. श्रीगुरुदेव म्हणतात, ''अनुग्रहात हार, पेढे, प्रसाद वगैरे काहीही लागत नाही. अनुग्रह स्पर्शाने, नजरेने, परगावीसुद्धा देता येतो. तुम्हाला आम्ही मार्गदर्शन करतो तोदेखील अनुग्रह समजावा.''

असे होते आगळेवेगळे श्रीगुरुदेव!

✻ ✻ ✻

## चंद्रावर पाणी आहे;.. पण ते मचूळ आहे.

एकेन विज्ञानेन सर्वं विज्ञानं भवति– छांदोग्य उपनिषद

(अर्थ – एक (पूर्ण सत्य) जाणले असता सर्व जाणल्यासारखे होते.)

एखाद्या सत्पुरुषाला साक्षात्कार झाला की तो जणू ईश्वराशी एकरूप झालेला मानवदेहधारी ईश्वरच होतो. ईश्वराचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. त्या व्यापक ईश्वराशी एकरूप झालेले संत ज्ञानी असतात. हे ज्ञान समग्र असते. ते बोलता बोलता एखादा सिद्धांत किंवा तत्त्व सांगून जातात. उच्चारलेले वाक्य सुभाषित बनून जाते. असे संत पारमार्थिक विषयावर बोलतात, यात नवल नाही; पण लौकिक व्यावहारिक ज्ञानामध्ये व विज्ञानातसुद्धा ते गती दाखवितात. ते जरी त्या विषयांचे तांत्रिक शब्द न उच्चारता बोलले, तरी त्यांच्या विधानाचा आशय नेमका तोच असतो. त्यामुळे आत्मज्ञानाने त्यांची बुद्धीसुद्धा सतेज व मर्मग्राही होते; ह्याची वाचकांना कल्पना येईल. संत तुकाराम महाराज कुठे पाठशाळेत शिकले होते? तरीसुद्धा ते म्हणायचे, ''वेदाचा तो अर्थ आम्हासीच

ठावा.'' त्याचप्रमाणे आपले श्रीगुरुदेव एकदा म्हणाले, ''सध्या मी उपनिषदांचे ग्रंथ जमा करत आहे. कारण मी जे सांगतो ते त्यात (उपनिषदांत) आहे की नाही हे पाहावे लागते. पुस्तके वाचून माहिती सांगणारा शाळामास्तर मी नाही.'' दक्षिणेतील एक महान संत श्री. रमण महर्षींना एक भक्त म्हणाला, ''भगवान, आपण बोलताना शांकर वेदांतच सांगता'', ह्यावर रमण महर्षींचे उत्तर मासलेवाईक आहे. ते म्हणाले, ''मी शंकराचार्य वाचले नाही की वेदांत वाचला नाही. मी माझा अनुभव सांगतो. तो वेदांताशी जुळत असेल तर बरेच आहे; पण जरी तो जुळत नसेल तरीही माझा अनुभव खराच आहे. परंतु तो जुळतो असे लोक म्हणतात.'' तर साक्षात्कारी संतपुरुषांना जे विश्वज्ञान प्राप्त होते त्याची झलक आपल्या श्रीगुरुदेवांच्या चरित्रातील एक किस्सा सांगून देत आहे.

**आत्मज्ञानाने त्यांची बुद्धी कशी सतेज व मर्मग्राही होती,** ह्याची वाचकांना त्यावरून कल्पना येईल.

दिनांक २५ सप्टेंबर २००९ च्या सर्व वर्तमानपत्रात एकाच घटनेवर हेडलाईन होती, ती अशी–

**''चंद्रावर पाणी सापडले... भारतीय चांद्रयानाचे यश!**

–लोकसत्ता २५ सप्टेंबर २००९

किंवा

"India detects water on moon"

-Indian Express 25th Sep. 2009

त्यापूर्वी चंद्रावर पाणी असू शकेल हा शास्त्रज्ञांचा नुसता कयास होता. पाण्याचे नक्की अस्तित्व कोणीही दाखविले नव्हते. ते भारताच्या चांद्रयानाने दर्शविले होते. ते वृत्त वाचल्यावर मला भारतीय म्हणून अभिमान व आनंद वाटला. तथापि...

तथापि माझे मन तब्बल **११ वर्षे मागे** गेले. नेमके सांगायचे म्हणजे **२२ मार्च १९९८** या दिवसावर गेले. त्या दिवशी सकाळी ९च्या श्रीगुरुदेवांच्या बैठकीत 'चंद्र' या विषयावर चर्चा चालली होती. सहज सांगता सांगता श्रीगुरुदेव विलंब न लावता सांगून गेले की, **''चंद्रावर पाणी आहे, पण ते मचूळ आहे.''**

चंद्रावरील पाण्याचा शोध ही कल्पना म्हणून सांगितली नाही, तर सरळसरळ विधान केले. म्हणजे शोध लागायच्या ११ वर्षे आधी सद्‌गुरूंनी सांगितले की, ''चंद्रावर पाणी आहे.'' एवढेच नाही तर ह्या पाण्याची चवसुद्धा सांगितली.

**१९९७ च्या सप्टेंबरमध्ये** श्रीगुरुदेव पुण्याजवळील पिरंगुटला विश्रांती घ्यायला काही दिवस गेले होते. तेथे भक्तांबरोबर दर्शन, बैठका, चर्चा चालायच्या. अशाच एका बैठकीत चंद्राचा विषय आला. तेव्हा श्रीगुरुदेव म्हणाले, ''फार वर्षांपूर्वी पृथ्वीचा एक

तुकडा तुटून पडला आणि अवकाशात फेकला गेला; तो पृथ्वीभोवती फिरायला लागला; तो आजचा चंद्र आहे. पृथ्वीवर जो हा खड्डा पडला तेथे आज पॅसिफिक महासागर आहे.'' ही सप्टेंबर १९९७ साली चंद्राच्या जन्माची कथा विज्ञानाला अर्थात लोकांनासुद्धा माहिती नव्हती. ह्यानंतर **जुलै १९९९ मध्ये, २२ महिन्यांनी** नासाच्या शास्त्रज्ञाने बरीच वर्षे संशोधन करून जे निष्कर्ष काढले ते निष्कर्ष श्रीगुरुदेवांनी २२ महिन्यांपूर्वी व्यक्त केलेल्या निष्कर्षांशी तंतोतंत जुळत होते. जेम्स विल्यम ह्या शास्त्रज्ञानी ३० वर्षे संशोधन करून ते निष्कर्ष काढले होते.

ह्यानंतर दुसरा प्रश्न ऐरणीवर घेतला गेला; तो म्हणजे चंद्रावर पाणी आहे का? असल्यास चंद्रावर वस्ती होईल का? शास्त्रज्ञांचे म्हणणे असे आहे की, 'चंद्रावर वस्ती होऊ शकेल' ह्यावर श्रीगुरुदेव म्हणाले, ''चंद्रावर वस्ती होणार नाही, ही नुसती कल्पनाच राहील. प्रत्यक्षात तसे काही होणार नाही.''

हे सर्व काय आहे? श्रीगुरुदेव कधी नासाच्या शास्त्रज्ञांना भेटले नाहीत किंवा त्यांनी कधी ॲस्ट्रॉफिजिक्सचा अभ्यास केला नाही. श्रीगुरुदेवांनी हे सर्व पांडित्य दाखविण्याकरिता केले नसून, पिरंगुटला सहज बसल्या बसल्या सांगितले. हे सर्व अद्‌भुत आहे.

हे सर्व काय सांगते? 'श्रीगुरुदेव विज्ञान सांगत होते.' श्रीगुरुदेव म्हणतात, **''विज्ञान आणि अध्यात्म ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.'' सत्य एकच आहे,** त्याला सामोरे जायला दोन मार्ग आहेत, पहिला विज्ञान, दुसरा अध्यात्म!

श्रीगुरुदेवांना झालेल्या अमृतअनुभवाने (साक्षात्काराने) इतके ज्ञान निर्मित झाले की ज्याचं नाव ते! अशा अनुभवाने त्यांना एवढे ज्ञान होते की कुठलाही प्रश्न शिल्लक राहत नसे. साक्षात्कार हा एकदाच होतो, पण सर्व काम करून जातो. ब्रह्मज्ञान होणे म्हणजे त्या व्यक्तीस पूर्णत्व येणे. पूर्णत्व असे ह्याचे वर्णन आहे. श्रीगुरुदेव म्हणतात, **''तुम्ही जेव्हा प्रश्न विचारता तेव्हा तो संपायच्या आतच माझे उत्तर तयार असते.''** ह्या ज्ञानाची हीच खूण. ह्याला **प्रज्ञाजागृती** असे पण संबोधतात.

अशा झालेल्या ज्ञानामुळे भविष्यातील घटना दिसतात असे मानले तर, व्यासांनी महाभारत लिहिले व नंतर ते घडले असे जे म्हटले जाते, त्याबद्दल शंका घेण्याचे काय कारण?

***



# १९. श्रीगुरूंची विदेही शिक्षणपद्धती

**श्री. सुभाष अवसरे**
बी. टेक्. (आय. आय. टी., बॉम्बे)
गृहप्रकल्प विकासक, दहिसर, मुंबई

विदेही शिक्षणपद्धतीत, सर्व इंद्रियांच्यायोगे इंद्रियापरते जे तत्त्व आहे त्याची तोंडओळख करून दिली जाते. दूरवरून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देत, गुरुतत्त्व स्वतःच्या विश्वव्यापकतेवर भक्ताचा विश्वास दृढ करते. सुगंधाचे अनुभव देऊन श्रीगुरुदेवांनी आमच्या जीवनात असाच सुगंध भरभरून ओतला. चंदनाचा व टमरेलाचा दृष्टांत त्याच काळातला.

एका एकादशीनंतर पुण्याच्या काही गुरुबंधू–भगिनी, तबलजी श्री. नंदकिशोर तिवारी व मी टॅक्सीने नगरहून पुण्याला जायला निघालो. वाटेत सतत विषय होता श्रीगुरुदेवांचाच. त्यात पुण्याच्या भगिनीने एक गोष्ट सांगितली. श्रीगुरुदेव ज्या काळात स्वतः देवाची पूजा करीत तेव्हाची गोष्ट. नगरच्या एक भाविक बाई सणासुदीला देवांसाठी पुरणपोळीचा नैवेद्य बनवीत. एकदा श्रीगुरुदेवांनी सात पुरणपोळ्या बनवायला सांगितल्या होत्या व त्याप्रमाणे सात पोळ्या त्या बाईंनी बनवून दिल्या. पूजा करून श्रीगुरुदेव बाहेर आले तेच रुद्रावतार धारण करून. ''मी सात पोळ्या सांगितल्या असता सहाच का बनविल्या?'' परत परत त्या बाई सांगत राहिल्या की सातच पोळ्या बनविल्या होत्या; पण श्रीगुरुदेव ऐकूनच घेईनात. त्या बाईंना सहन झाले नाही. त्या रडू लागल्या. ते पाहून आश्रमातील बाकी लोकही जमले. तेव्हा अचानक श्रीगुरुदेव खळखळून हसले व एखाद्या लहान मुलासारखे बोलले. ''अहो, सातवी पोळी देवाला आवडली. त्याने खाल्ली.'' हे ऐकतांना कमल परागाचा सुगंध आला. आम्ही आजूबाजूला पाहत होतो. पण दुसरे कुठलेही वाहन जवळपास नव्हते. मी नाक वर करून सुगंधाचा वेध घेत होतो. तो कमल परागाचाच आहे, याची खात्री करून घेत होतो. तोच तबलजी श्री. तिवारी विचारते झाले, ''कमल परागाचा सुगंध

आला का?'' सर्वांनी होकार दिला. पण आश्चर्य हे की तबलजींना हा सुगंध कसा जाणवला? कारण सायनसच्या शल्यक्रियेच्या वेळी त्यांचे गंधज्ञानाचे मज्ञातंतू निकामी झाले होते, हे मला माहीत होते. **ज्यांना गंधेंद्रियच नाही त्यांनाही गंध अनुभवता आला होता.**

मजा म्हणजे श्रीगुरुदेवांना दर एकादशीला मुंबईहून सुगंधी फुले आणण्याचे व्रत अनेक वर्षे तबलजी पार पाडत होते. ते फुलांकडे लांबून पाहून त्या फुलाचा गंध कसा आहे ते जोखतात, हे मी अनेकदा दादर व माटुंगा, अर्नाळाला फुले विकत घेतांना स्वतः पाहिले होते. गुरुकृपा हे विचित्र रसायन आहे. त्यामुळेच देवांना कोणीही वास न घेतलेली फुले पूजेला मिळत.

गुरुपौर्णिमेसाठी नगरला येतांना, खोपोलीला बसमध्ये एक ३५ वर्षीय बाई चढल्या व माझ्यासमोर ड्रायव्हरच्या पाठच्या सीटवर बसल्या. त्यांचे रेवदंड्याचे गुरू श्री. धर्माधिकारी महाराज ह्यांचे दर्शन घेऊन त्या पुण्याला परतत होत्या. त्यांनी त्यांच्या गुरूंच्या गोष्टी सांगितल्या. मग मी श्रीगुरुदेवांच्या गोष्टी सांगण्यात तल्लीन झालो; तोच मोगऱ्याचा सुगंध सर्वत्र पसरला. मी प्रथम त्या बाईंना, मग ड्रायव्हरला व आजूबाजूच्या लोकांना विचारले, ''कोणी मोगरा आणला आहे का?'' पण त्यांच्यापैकी कोणाकडेही मोगरा नव्हता व चालत्या बसमध्ये वारा वाहत असतांनाही, मोगऱ्याचा सुगंध बसभर अर्धा तास भरला होता. रात्रीचे ८.३० वाजले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुदर्शनाला गेलो तेव्हा दररोज सकाळ-संध्याकाळ दर्शन घेणाऱ्या नगरच्या गुरुबंधूंना विचारले- ''काल संध्याकाळी श्रीगुरुदेवांसमोर कसली फुले होती?'' ते म्हणाले ''फक्त मोगऱ्याचा एक मोठा गजरा होता. श्रीगुरुदेवांनी फक्त एकदा सुगंध घेऊन तो परत तबकात ठेवला. शेवटपर्यंत परत सुगंध घेतला नाही.'' ते ऐकून मी चाटच पडलो.

चंदनाचा दृष्टांत याहून फारच वेगळा, काही शिकविणारा होता. नगरहून चंदनाची दोन खोडे घेतली रोजच्या पूजेसाठी. एक सफेत पिवळसर तर दुसरे करड्या रंगाची झाक असलेले. प्रत्येक सत्संग मंडळात भजनी मंडळ बनवावे. गावोगावी भजनाची जोड द्यावी, लोकांनी गावे, नाचावे असे विचार मनात येत होते. श्रीगुरुदेवांना प्रत्यक्ष विचारले असता त्यांनी ह्या सर्वाला संमती व आशीर्वाद दिले; पण इतर गुरुबंधू भगिनीना पटवून देऊ शकलो नाही, ह्याबद्दल वाईट वाटते. श्रीगुरुदेवांनी मात्र गाण्यांना चाली देण्याचा सपाटा लावला होता. एकांतात ते सांगत, '' हे प्रसादाचे ताट तुझ्या हातात देतोय; एकटा ओरपू नकोस. सर्वांना दे. घरोघरी ही गाणी जाऊ दे.'' म्हणजे एकतर टेप करून सर्वांना द्यावी किंवा ती शिकविण्यासाठी गावोगावी जावे. पण या

कार्यात प्रगती होईना. मन विषण्ण झाले होते. अशावेळी पांढऱ्या चंदनाचे खोड संपत आले म्हणून करडे खोड वापरायला काढले. पण ते फारच टणक होते. चंदन उगाळायला अधिक वेळ लागणार, असा विचार मनात येतो न येतो तोच चंदनाच्या सुगंधाचा लोट आला. असे यापूर्वी कधीच झाले नव्हते. चंदन उगाळतांना चंदनाचा सुगंध कधीच आला नव्हता. मग आजच हे कसे? हा प्रश्न मनात उमटतो न उमटतो तोच कानावर शब्द गुंजले– ''शेतकरी आहेस ना? लाकडात काळे काय असते?'' 'डांबर' मी उत्तर दिले. ''त्या डांबरात काळे तेल असते. जितके लाकूड काळे तितके तेल अधिक व तेवढे ते अधिक सुवासिक. याचा अर्थ चंदन काळे असल्यास ते उगाळायला कठीण पण सुगंध अधिक. **जेवढी सेवा कठीण, तेवढा भक्तीचा आनंद अधिक.**'' मी कौतुकाने पाहतच राहिलो. विदेही **शिकवण आजवर माणसांच्या माध्यमातून मिळत होती. येथे तर निर्जीव वस्तूही शिकवू लागल्या होत्या.** विदेही शिकवणीचे हे दालन अगाध होते, तेवढेच सतत सतर्क राहायला लावणारे.

आजवर पूजा झाल्यावर सहाण, चंदन मी धुवून टाकायचो; पण यानंतर सहाणेला लागलेले गंधाचे कण सांगू लागले– याकरिता का आम्ही देह समर्पण केला? देवासाठी झिजविला? आम्हालाही देवाची सेवा घडू दे. मग सहाण धुतलेल्या पाण्याने प्रथम देवांना स्नान घालू लागलो. श्रीगुरुदेवांबाबत अनुभव आल्यानंतर, आपण ते जे म्हणतात त्याचा आपल्या कुवतीनुसार अर्थ लावून त्यावर विश्वास ठेवतो. पण मनात खूप 'किंतू' 'परंतु' डोकावत असतात. श्रीगुरुदेव रागावतील, श्रीगुरुदेवांना वाईट वाटेल, इतर लोक काय म्हणतील या व अशा अनेक कारणांमुळे आपण ते किंतू उघड बोलत नाही. किंबहुना स्वतःकडेसुद्धा कबूल करीत नाही. पण विदेही शिकवणीत आपले मन काचेच्या बरणीत घालून श्रीगुरुदेवांना सुपूर्त केलेले असते. त्यामुळे त्यांच्यापासून लपविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. **आपण स्वतःशी प्रत्येक गोष्ट प्रामाणिकपणे कबूल करतो ती जशीच्या तशी श्रीगुरुदेवांना कळते** व ते **त्यावर करायचा तो जालीम उपाय करतात.** टमरेलाचा दृष्टांत हा तसाच. दृष्टांत म्हणजे दृष्टी व इतर ज्ञानेंद्रिये जेथे तोकडी पडतात, अंत पावतात त्या प्रांतातील अनुभव.

श्रीगुरुदेव नेहमी एक गोष्ट ठामपणे सांगत आले– इतर रीतिरिवाज, कर्मकांड ह्यात आपले प्रश्न अडकून बसले; पाप, पुण्य या भीतियुक्त भावनांनी सत्य झाकळले. त्यामुळे आपण ज्या महत्त्वाच्या तत्त्वाकडे योग्य ते लक्ष दिले नाही, ते तत्त्व म्हणजे, **''परमेश्वराच्या अस्तित्वावर नितांत श्रद्धा ठेवा. परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे.''** श्रीगुरुदेवांच्या तोंडी हे अनेकदा ऐकूनही त्यावर पूर्ण विश्वास आपण ठेवू शकत नाही.

बुद्धीप्रामाण्याच्या अनेक कसोट्यांवर घासूनही, आपण ते पूर्णपणे कबूल करीत नाही. हे किंवा असे त्रिकालाबाधित सत्य पूर्णपणे मानण्याची मनाची व बुद्धीची अविचल अवस्था; हिला जाणीव असे म्हणतात. जाणीव म्हणजे १०० टक्के श्रद्धा. त्यात ०.०००१ टक्केही शंकेला वाव नाही. परंतु जाणीव अवस्थेला जाण्यासाठी फक्त गुरुकृपा होणे हा एकमेव मार्ग आहे. या अवस्थेचा अनुभव श्रीगुरुदेवांनी एकदा फक्त पंधरा मिनिटे दिला. तो एवढा असह्य झाला की वेड लागेल असे वाटू लागले. तोच हा टमरेलाचा दृष्टांत.

नगरला हॉटेलमधील टॉयलेटमध्ये आंघोळीला गेलो होतो. संडास व बाथरूम एकत्र व त्यात एकच टमरेल! संडास करून झाल्यावर त्याच टमरेलाने आंघोळ करायची, नंतर पूजा करायची व श्रीगुरुदेवांच्या दर्शनालाही जायचे; घाण वाटू लागले. आता काय करावे असा विचार करीत होतो. एवढ्यात कानावर शब्द पडले– ''निर्जीवाची पूजा नाही करता येत, मग निराकाराची कशी करणार?'' कोण बरे बोलले? चाहूल घेतली. बाहेर कुणीही नव्हते. तेव्हा सद्‌गुरूच बोलले असावे, असा विचार करून मी त्या शब्दांचा विचार करू लागतो. त्याचा अर्थ हळूहळू लक्षात येऊ लागला, तसे मी टमरेल हातात घेऊन अंगाचा साबण लावून ते धुवून घेतले व बादलीवर ठेवून त्याला नमस्कार केला. तेव्हा बादलीतले पाणी हलू लागले. म्हणाले, ''आंघोळ घालणार मी, आणि नमस्कार टमरेलाला?'' पाण्याला नमस्कार केला तर बादली म्हणाली, ''मी पाण्याला धरले नसते तर ते एव्हाना गटारात वाहून गेले असते.'' होता होता नळ, पाईप, बाथरूम, संडास, दार, भिंती, कडी सर्वांना नमस्कार घालत आंघोळ आटोपली. मनात धागधुग ही की कुणी राहिले तर नाही? बाथरूमच्या बाहेर पाऊल टाकले तर जमिनीला नमस्कार! टॉवेलला नमस्कार नाही केला तर नागवे वाटायला लागले. त्यांना नमस्कार करीत व धावतच खोलीवर पोहोचलो. दार लावून घेतले. धापा टाकत श्रीगुरुदेवांना साकडे घातले, ''हे परत घ्या माऊली, हे कळण्याची माझी लायकी नाही. वेड लागायची भीती वाटतेय.'' आणि तात्काळ सर्व आसमंत पूर्णपणे निवळले. **परंतु त्या पंधरा मिनिटांच्या काळात परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे, हे एकमेव सत्य वाटत होते,** किंतु–परंतु विरहित! किंतुशिवाय **हे सत्य पचवणे किती कठीण असते ते श्रीगुरुदेवांनी अनुभवायला दिले,** विदेही पद्धतीने! ही केवळ गुरुकृपा!

* * *



# २०.
# श्रीसद्गुरूंचे शब्दसामर्थ्य

**प्रा. श्री. भा. द. राव**
पुणे

श्रीगुरूंच्या अलौकिक विभूतिमत्त्वाचे जे अनेक पैलू अंतरावरून पाहणाऱ्यांच्या मर्यादित दृष्टीलाही दिसत, त्यापैकी भक्तांना प्रसन्न, प्रभावित व प्रशिक्षित करणारी त्यांची वाणी, हा एक विशेष उल्लेखनीय व महत्त्वाचा पैलू होता. भक्तांना श्रीगुरुचरणांशी कायमचा जोडणारा असा तो एक अदृष्य पण बळकट धागा होता. त्या वाणीतून व्यक्त होणारे श्रीगुरूंचे शब्दवैभव आणि जाणवणारे त्यांचे शब्दसामर्थ्य असंख्य भक्तांनी प्रत्यक्ष अनुभवलेले आहे. ''असे होते तरी काय त्या गुरुवाणीत?'' असे जर त्या वाणीचा लाभ न झालेल्या कोणी विचारले, तर उत्तरादाखल एवढेच म्हणता येईल की ''तिच्यात असे बरेच काही होते की जे शब्दात सांगणे कठीण आहे.'' अशावेळी, आपला शब्दसाठा किती सीमित आहे आणि अशा त्या सीमित शब्दसाठ्याच्या अभिव्यक्तीलाही किती मर्यादा आहेत, हे जाणवते.

तसं पाहिलं तर 'शब्द' ही संकल्पना आपणा सर्वांच्या चांगल्या माहितीची व सततच्या वापरातली आहे. शब्दांच्या वापराशिवाय कोणताही सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक व्यवहार करणे जवळपास अशक्य आहे. साहित्यनिर्मिती व साहित्याचा रसास्वाद, नाट्यप्रयोग, चित्रपट, कीर्तन, प्रवचन, लोककला इ. तून होणारे लोकरंजन व लोकशिक्षण ह्या व अशा सर्व गोष्टी केवळ शब्दांच्या वापरामुळे सहजसोप्या होतात. त्यामुळे सर्वत्र, ऐकणाऱ्यांवर शब्दांचा भडिमार होत असलेला दिसतो.

असे असले तरी सर्वसामान्य व्यक्तींचे शब्द असतात कसे? कवी त्याचे वर्णन करतात ''शब्द बापुडे केवळ वारा', आणि त्यामुळे 'नळी फुंकली सोनारे, इकडून

तिकडे गेले वारे', अशी त्या शब्दांची स्थिती व गती होते. ते ऐकणाऱ्यांच्या एका कानातून आत जातात व दुसऱ्या कानातून बाहेर पडतात. त्यांचा फारसा परिणाम झालेला व प्रभाव पडलेला जाणवत नाही. पण सत्पुरुषांच्या शब्दांचे असे नसते. त्यांचे शब्द म्हणजे पोकळ वारा नसतो, तर ऐकणाऱ्यांच्या मनात विचारांचे वादळ उठवण्याची, किंवा मनात विकारांचे वादळ पूर्वीच उठलेले असेल तर ते शमविण्याची शक्ती वाहून नेणारी, ती वाहने असतात; म्हणून त्यांचा फार मोठा प्रभाव ऐकणाऱ्यांवर पडतो. ऐकणारा अविचारी असेल तर विचार करायला प्रवृत्त होतो; विचार करणारा असेल तर त्याच्या विचारांना चांगले हितकारक वळण लागते; विचारांना चांगले वळण लागले की त्याचे आचार व उच्चारही सुधारतात, म्हणून **ऐकणारा त्याच्या स्वतःच्या नकळत बदलू लागतो** व त्याच्यातील हे परिवर्तन पाहतांना इतर लोक आश्चर्यचकित होऊन जातात.

असा कोणता बदल सत्पुरुषांचे शब्द ऐकणाऱ्यात झालेला इतरांना दिसतो? तर 'वाल्या'चा 'वाल्मिकी' होतांना दिसतो; व्यसनी माणूस निर्व्यसनी होतांना दिसतो; विकारी माणूस विचारी होतांना दिसतो; नास्तिकाचा आस्तिक होतांना, आस्तिकाचा साधक होतांना व साधक सिद्धावस्थेकडे जात असलेला दिसतो. त्याच्या साधनेच्या प्रगतीची गती वाढतांना दिसते; अणुरेणुएवढा तुका आकाशाएवढा होतांना दिसतो; त्याच्या अंतःकरणातील आनंदाचा डोह नुसता तुडुंब भरत नाही तर तो ओसंडून वाहतांना दिसतो व त्याच्या सान्निध्यात दैवयोगाने येणाऱ्यावर त्यातील काही तुषार पडले तर, अलौकिक आनंदाचे आपणही अधिकारी होऊ शकतो हे त्याला जाणवते. हे सर्व काही सत्पुरुषांच्या शब्दसामर्थ्यामुळे घडते. सत्पुरुष खरे तर बोलतातच; पण खरं सांगायचं तर ते जे काही बोलतात ते खरे होते; हेही खरे आहे! त्या शब्दसामर्थ्याची जाणीव, ऐकणाऱ्यांप्रमाणेच ते शब्द उच्चारणाऱ्यांनाही असते. ''बोली अरूपाचे रूप दावीन'' किंवा ''अतींद्रिय भोगवीन इंद्रियांकरवी'' असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात ते केवळ वस्तुस्थितीचे वास्तव दर्शन घडविण्यासाठीच! त्याच धर्तीवर ''मी तुम्हाला कधीही चुकीचे मार्गदर्शन करणार नाही व तुम्हाला चुकीच्या मार्गाने जाऊही देणार नाही.'' ''आम्ही खडकावर उभे राहिलो तरी तेथे क्षेत्र निर्माण करू, असा आमचा दर्जा आहे.'' किंवा ''माझा सहवास म्हणजे भगवंताचाच सहवास आहे.'' असे सद्गुरू म्हणत.

सद्गुरू श्रीरामकृष्ण महाराजांच्या अशा शब्दसामर्थ्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या शेकडो भक्तांनी घेतलेला आहे, व त्यांच्या शब्दलहरींचा लाभ पुन्हापुन्हा व्हावा

यासाठी ते सतत धडपडत असत. नगरला दर्शनप्रसंगी किंवा भक्तांच्या छोट्या-मोठ्या मेळाव्यात किंवा श्रीगुरुपौर्णिमेच्या व वर्धापनदिनाच्या सोहळ्यात ऐकायला मिळणाऱ्या गुरुवाणीसाठी ते उत्सुक असत; खरं म्हणजे आतूर असत, आसुसलेले असत. असं काय होतं सद्गुरूंच्या शब्दात? बरंच काही होतं- त्यांच्या शब्दाशब्दात जाणवत असे ती ऐकणाऱ्यांविषयीची त्यांच्या मनातील **आस्था, आपुलकी, सहानुभूती, करुणा, माया, ऐकणाऱ्यांच्या** ईश्वरभक्तीसारख्या, धर्माभिमानासारख्या **सद्भावनांना आवाहन** असे; त्यांच्या **विवेकबुद्धीचे व कर्तृत्वशक्तीचे जागरण** असे; विचारल्या जाणाऱ्या **शंकांचे निराकरण** असे; धर्माचरण कसे करावे याविषयीचे **मार्गदर्शन** असे; अध्यात्ममार्गातील सूक्ष्म बारकाव्यांचे **स्पष्टीकरण** असे व त्यासाठी आवश्यक वाटल्यास, एखाद्या अलौकिक सत्पुरुषाच्या जीवनचरित्रातील भावोत्कट प्रसंगांचे **रसाळ शब्दात केलेले वर्णनही** असे; कर्तव्यतत्पर **भक्तांचे** मनापासून केलेले **कौतुक जसे असे,** तसेच कर्तव्यपालनात **चुका करणाऱ्या** किंवा **चुकारपणा करणाऱ्यांचे** अत्यंत **स्पष्ट व परखड शब्दांत केलेले दोषदिग्दर्शनही असे;** भक्तांपैकी कोणाचीही अगदी स्वतःचीदेखील **दिलखुलासपणे,** गंमतीने केलेली **चेष्टा असे, थट्टा असे व हास्यरसाचे कारंजे अत्यंत अनपेक्षितपणे उंच उसळवणारा अवखळ विनोदही असे;** त्यामुळे क्वचित एखाद्या श्रोत्याच्या मनात पूर्वी काही कारणाने **खिन्नता आलेली असली** तरी क्षणार्धात त्या खिन्नतेची जागा **प्रसन्नता** घेत असे. ऐकणाऱ्याच्या मनातील मोगऱ्याच्या प्रत्येक कळीची पाकळी अन् पाकळी पूर्णपणे उमलत असे, फुलत असे. **'कळी खुलणे' या मराठी भाषेतील वाक्प्रयोगाचा खरा अर्थ समजत असे** व त्याचा जिवंत अनुभव घेत प्रत्येकजण बैठक संपल्यावर श्रीगुरूंच्या दालनातून बाहेर पडत असे. ''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे येत्न करू'' असे संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज म्हणाले, ते अनेक सत्पुरुषांबाबत जसे खरे आहे; तसेच ते श्रीगुरुदेवांबाबतही! त्यांच्या अखेरच्या काही वर्षात मात्र या वैशिष्ट्यांचा लाभ, सद्गुरूंच्या प्रकृतीतील अस्वास्थ्यामुळे दुर्लभ झाला होता.

श्रीसद्गुरू जेव्हा बोलू लागत, तेव्हा शब्दांच्या सरीवर सरी येऊ लागत व त्या शब्दसरींवर स्वार होऊन येणारा प्रसन्नतेचा पाऊस पडू लागला की त्यात आपले अंग अन् अंग ओलेचिंब व्हावे, असे श्रोत्यांना वाटत असे; कारण त्यामुळे तरी आपल्या शुष्क अंतःकरणाला, **भगवत्भक्तीसाठी आवश्यक तो ओलावा** लाभेल, अशी त्यांना आशा वाटत असे. अंतःकरणाच्या ओलाव्याचे महत्त्व सांगताना सद्गुरूंनी एकदा सहजपणे एक सुंदर, समर्पक व समजायला सोपा दृष्टान्त दिला होता. असे

सोपे दृष्टान्त–दाखले–उदाहरणे देत, आपला विषय सर्वांना समजेल इतका सोपा करून सांगण्याची श्रीगुरूंची एक **वैशिष्ट्यपूर्ण शैली** होती, एक खास अशी **हातोटी** होती. त्यावेळी ते म्हणाले, ''शाईचे पॅड ओले असले तर कागदावर रबरी शिक्क्याचा ठसा ठळकपणे उमटविणे सोपे जाते.'' चित्त शुद्ध झालेल्या साधकाचे अंतरंगही खुले, ओले म्हणजेच मृदुमुलायम, कोमल भावभावनांना संवेदनशील झाले तर, त्याच्यावर भगवत्‌भक्तीचा शिक्का उमटविणे सोपे जाते, असे त्यांना सुचवायचे होते. म्हणून अंतरंगातील त्या ओलाव्यासाठी सर्व साधकभक्त, सद्‌गुरूंच्याच शब्दसरींवर स्वार होऊन येणाऱ्या प्रसन्नतेच्या पावसाची प्रतीक्षा करीत असत; मोठ्या उत्सुकतेने, अत्यंत आतुरतेने!

खरं म्हणजे सभासंमेलने, चर्चासत्रे, परिसंवाद ह्यासारख्या शब्दांची वारेमाप उधळण करणाऱ्या कार्यक्रमांची, सद्‌गुरूंना विशेष ओढ नव्हती; आवड नव्हती. व्याख्याने, कीर्तने, प्रवचने या माध्यमांचे महत्त्व माहीत असले तरी त्यांचा वापर त्यांनी स्वतः कधी केला नाही. (सांगलीच्या सत्संग मंडळाची स्थापना करतांना तेथील महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर जमलेल्या विशाल जनसमुदायासमोर त्यांनी दिलेले व्याख्यान, हा एकमेव अपवाद!) मात्र 'तद् विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया' अशा विनम्र वृत्तीने येणाऱ्या जिज्ञासूंचे समाधान करतांना त्यांनी आपल्या शब्दप्रवाहाला कधी बांधही घातला नाही. एकतर्फी व औपचारिक शब्दांच्या धबधब्याऐवजी, बोलणाऱ्या–ऐकणाऱ्यातील अनौपचारिक संवादसाखळी त्यांना विशेष प्रिय होती. त्यासाठी पडतील ते शारीरिक कष्ट सोसण्याची त्यांची सदैव सिद्धता असे. श्रीक्षेत्र गाणगापूरला, कार्तिक महिन्यात, परमगुरू श्रीनृसिंह सरस्वती स्वामीमहाराजांच्या पूजनासाठी अनेक वर्षे ते आपल्या भक्तांसह जात असत. गुरुभक्ती, गुरुसेवा कशी करावी यासाठीचा मोठा आदर्श ते आपल्या विचार, उच्चार, आचार या तिन्ही माध्यमांद्वारे आपल्या भक्तांसमोर उभा करीत असत. ती यात्रा भक्तांच्या दृष्टीने आनंदयात्राच असे; कारण सद्‌गुरूंचा निकट सहवास व गुरुवाणीचा प्रसन्न करणारा प्रसाद त्यांना निदान सप्ताहभर तरी लाभत असे. त्यासाठी सद्‌गुरूंच्या लहानशा दालनात प्रवेश मिळविण्यासाठी भक्तांची अक्षरशः रीघ लागत असे. सर्वांना तो लाभ व्हावा ह्यासाठी शेवटी सद्‌गुरूंना प्रत्येकी एक तासाच्या सकाळी तीन व दुपारी तीन बैठकांतून रोज सहा तास वेगवेगळ्या भक्तांशी संवाद साधावा लागे; एका बैठकीत बोलले गेलेले दुसऱ्या बैठकीत बोलले जात नसे व असा कार्यक्रम निदान आठवडाभर तरी चालत असे. मोलाच्या मार्गदर्शनपर विचारधनाबरोबरच तृप्तीची, आनंदाची शिदोरी

घेऊन भक्तजन घरोघरी परत जात, ते पुढच्या कार्तिकात परत येण्याचे मनसुबे रचीतच. ''ही खाण खोलवर तुडुंब भरलेली आहे, ती उकरून तिच्यातील मिळतील तेवढी रत्ने तुम्ही हस्तगत करा.'' असे त्यांचे भक्तांना नेहमी सांगणे असे.

आपल्या भक्तांनी बहुश्रुत असावे, भगवत्‌भक्तीइतकेच अभ्यासाला आणि विचारांच्या अभिव्यक्तीला त्यांनी महत्त्व द्यावे, असे त्यांना वाटत असे. त्यासाठी एखादे विधान करून ते श्रोत्यांची जिज्ञासाही जागृत करीत व मग होणारा प्रश्नोत्तरांचा सोहळा जसा रंजक–रोचक होई तसा तो पाचक–पौष्टिकही होत असे. ''मी तुम्हाला दयेपोटी जवळ केले आहे, पण तुम्ही तुमची पात्रता वाढवा व जवळ या, त्यात मला जास्त आनंद होईल; दर्शनाला येतांना तुम्ही तुमचे पद–पदव्यांचे ओझे दाराशी ठेवून आत या; विनयशील विद्यार्थी व्हा; पाहिजे तर जातांना आपापले ओझे परत घेऊन जा' असेही ते म्हणत.

त्यांनी आपली वाणी सदैव शिणवली ती **आर्तांना आधार, अभय** व **आनंद** देण्यासाठी; जनसामान्यांतील भगवंताविषयीची **श्रद्धा–भक्ती जागवण्यासाठी व वाढविण्यासाठी** आणि भगवंताने सोपविलेले कार्य करण्यासाठी लागणारे **कार्यकर्ते तयार करण्यासाठी,** त्यांना **शिकविण्यासाठी, संस्कारित करण्यासाठी!** हे प्रशिक्षण, दर्शनप्रसंगी साष्टांग नमस्कार कसा करावा येथपासून, आपले मनोगत व विचार सुसंगत रीतीने कसे व्यक्त करावे, ह्यासारख्या कोणत्याही विषयासंबंधी असे. सद्‌गुरूंच्या 'अमृतकलश', 'गुरुवाणी', 'धर्मदर्शन' या व इतर ग्रंथांचे जन्म भक्तांशी व जिज्ञासूंशी झालेल्या अशा संवादसाखळीतून झाले आहेत.

श्रीसद्‌गुरूंचे **शब्द तसे साधेसुधेच** असत, पण विद्वान वादपटूंनाही ते निरुत्तर करू शकत. अशावेळी अचानक, अनपेक्षितपणे उच्चारली गेलेली सुवचने किंवा दिले जाणारे **दृष्टान्त, दाखले** जिज्ञासूंना त्यांचे म्हणणे पटवीत, प्रभावित करीत असत. एकदा ते म्हणाले ''जेलर आणि गुन्हेगार हे दोघेही जेलमध्येच असतात; पण असे असूनही जेलरला आपण गुन्हेगार म्हणत नाही; तो अधिकारी असतो. तसंच मानवी देह धारण केल्यामुळे ह्या जगात तुम्ही व मी दोघेही आहोत; पण तुम्ही आरोपी म्हणून व मी अधिकारी म्हणून! तुम्ही जसजसे चांगले वागत जाल तसतशी तुमची शिक्षा कमी होत जाईल. ह्यासाठी सावधतेने वागा, मी जे शिकवतो ते ग्रहण करा व आपली शिक्षा कमी करवून घ्या.'' ज्ञानाच्या संक्रमणक्रियेविषयी बोलतांना एकदा ते सहज म्हणाले, ''एका पात्रातून दुसऱ्या पात्रात काही ओतायचे असले तर, घेणारे पात्रही योग्य त्या पात्रतेचेच असले पाहिजे.'' भारतीय तत्त्वज्ञान अत्यंत सुलभ करून

सांगतांना ते म्हणायचे– ''ज्यात काही नाही (असे तुम्हाला वाटते) त्यातच सर्व काही आहे व ज्यात सर्व काही आहे (असे तुम्हाला वाटते) त्यात काहीच नाही, ही तत्त्वे लक्षात ठेवा. तुम्ही बी फोडून पाहिली तर तिच्यात काहीही दिसणार नाही, पण मोठा वृक्ष निर्माण करण्याची शक्ती तिच्यात असते. पद, पदवी, पैसा, परिवार ह्यांनाच सर्वस्व मानणाऱ्यांनी त्यांचे खरे स्वरूप जाणून घेणे आवश्यक आहे.'' असे ते म्हणत.

**निर्भिडपणे, स्पष्टपणे, अत्यंत परखड रीतीने** ते आपले मत व्यक्त करीत. श्रीक्षेत्र गाणगापूरला एक संन्यासी त्यांच्या दर्शनाला आले होते. त्यांच्या गळ्यात रुद्राक्षांच्या अनेक माळा होत्या. श्रीगुरू त्यांना म्हणाले, ''अहो हे काय? हा गळा आहे का खुंटी? अशा वागण्याने लोकात निंदा होते. आपण योग्य तो आचार पाळला पाहिजे.'' कधी कधी मिष्किलपणे ते भक्तांना म्हणत, ''माझ्यासारखा सांगणारा भेटणाार नाही आणि तुमच्यासारखे न ऐकणारेही भेटणार नाहीत.''

अनपेक्षितपणे हास्यरसाचे कारंजे उसळवणारा **अवखळ विनोद** किंवा त्यांनी केलेली **चेष्टा–थट्टा** बैठकीतील वातावरण अत्यंत प्रसन्न करीत असे. एकदा एक तरूण भक्त गुरुदर्शनास आला व अत्यंत विनयाने तो त्यांना म्हणाला– ''दोन आठवड्यांपूर्वी माझे लग्न झाले. आपले आशीर्वाद असावेत.'' त्यावर श्रीगुरू मिष्किलपणे म्हणाले– ''लग्न केलंस. छान! मला जे जमलं नाही ते तू करून दाखवलंस!'' हे वाक्य ऐकून श्रोत्यांत झालेल्या हास्याच्या स्फोटाची कल्पनाच केलेली बरी.

श्रीगुरुदेवांसारख्या सत्पुरुषांचे साधेच शब्द विशेष प्रभावी का ठरतात? कारण त्यांच्यामागे **पाठबळ** असते, सत्पुरुषांच्या मनाच्या **निःस्वार्थी निर्मलतेचे,** वृत्तीच्या **प्रांजळ सात्त्विकतेचे** आणि केवळ लोककल्याणाच्या उद्देशाने केलेल्या **तपस्येच्या सामर्थ्याचे**; म्हणून त्यांनी उच्चारलेला शब्द मंत्रस्वरूप होई आणि त्यांनी भक्तांना दिलेला **शब्द न् शब्द खरा ठरे**; तसा सद्‌गुरुंनी भक्तांना दिलेला, भक्तांना आश्वासक आधार वाटणारा शब्द शेकडो भक्तांच्या बाबतीत खरा ठरलेला आहे. मग तो व्याधीमुक्तीसाठी आर्तपणे केलेल्या प्रार्थनेला दिलेला अनुकूल प्रतिसाद असो, परीक्षेतील यशासंबंधी भीतिग्रस्त उमेदवाराला आत्मविश्वासाने दिलेली यशासंबंधीची ग्वाही असो, लक्षावधी रुपयांचा तोटा झालेला असतांना व इतर सर्व भागीदारांनी धंद्यातून अंग काढून घेतले असताही, निःस्सीम भक्ताला व्यावसायिक यशासंबंधी दिलेले आश्वासन असो किंवा जेथे विहिरींना पाणी लागण्याची शक्यता (तज्ज्ञांना)

वाटत नव्हती. तेथे राहणाऱ्या भक्तांच्या अडचणींचे निवारण करून त्यांना कायमस्वरुपी भरपूर पाणीपुरवठा करण्यासाठी असो!

ह्या झाल्या जनसामान्यांच्या व्यवहारांच्या गोष्टी! पण कुशाग्र बुद्धीलाही ज्याचे स्पष्टीकरण देता येणार नाही अशा अनुभवसिद्ध गुरुवाक्यांच्या सत्यप्रचीतीचे स्पष्टीकरण कसे देणार? श्री. बाबु सुकरे हे एका लॉजमध्ये काम करणारे सामान्य सेवक. त्यांची लहान मुलगी बोलू शकत नव्हती. पुण्यातील अनेक तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारही अयशस्वी ठरले होते. ते जेव्हा त्या ३ वर्षांच्या मुलीसह श्रीगुरूंच्या दर्शनाला नगरला गेले, तेव्हा श्रीगुरू म्हणाले, ''अरे, ही बोलेल.'' तिला रोज तुळशीचे एक पान १५ दिवस खायला त्यांनी सांगितले आणि त्याप्रमाणे मुलीने तुळशीचे पान रोज खाल्ले आणि ती हळूहळू बोलू लागली. तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचारही अयशस्वी ठरलेल्या त्या बालिकेला, श्रीगुरूंच्या आशीर्वचनाच्या प्रभावामुळे, वाणीची प्राप्ती झाली; ही गुरूवाणीची किमया!

ऐकणाऱ्यांच्या अंतरंगाला हलवून त्याला भावविभोर करणारी, प्रसन्नपणे खळखळून हसवणारी, विचारप्रवण करणारी ही कुसुमकोमल गुरुवाणी क्वचितप्रसंगी जेव्हा **रौद्ररूप** धारण करीत असे, तेव्हा घनगंभीर ढगांचा गडगडाट, लखलखणाऱ्या विजांचा कडकडाट आणि हादरवून टाकणाऱ्या वादळवाऱ्याचा झंझावात, ह्या सर्वांचा एकाचवेळी अनुभव येत असे. त्यावेळी श्रीगुरूंसमोर जाण्याचे धाडस सहसा कोणाला होत नसे. पण हे वादळ लवकरच शांत होत असे आणि नंतर त्याचा मागमूसही शिल्लक राहत नसे; नेहमीसारखे प्रसन्नतेच्या पौर्णिमेचे शीतल चांदणे पसरत असे.

प्रवासाची दगदग सोसणे शक्य होते तोपावेतो, श्रीक्षेत्र गाणगापूर यात्रेप्रमाणेच श्रीक्षेत्र नृसिंहवाडी–पंढरपूर यात्रेसही सद्‌गुरू प्रतिवर्षी जात असत. त्या यात्राकाळात पंढरपूर मुक्कामी श्रीपांडुरंगाची, काकड आरतीनंतरची पहिली महापूजा आपण करावी, अशी त्यांची इच्छा असे; पण अनेकदा तो योग जुळून येण्यात अनेक अडचणी येत; त्यामुळे सद्‌गुरूंना खूप वाईट वाटे. एकदा अशाच प्रसंगी ते अत्यंत नाराज झाले व त्यांनी एका भक्ताला, विठ्ठल मंदिरात जाऊन श्रीपांडुरंगास एक निरोप सांगण्याची आज्ञा केली; त्याचा आशय असा होता– ''देवा, आम्ही केवळ तुझी भक्ती करणे, हाच आमच्या जीविताचा हेतू मानतो व त्यासाठीच आतापर्यंतचे आयुष्य जगत आलो आहोत. कायावाचामने तुझीच अखंड सेवा करीत असतो; खडतर प्रवास करीत दरवर्षी येथे येत असतो– तो केवळ तुझी प्रत्यक्ष भेट व्हावी व हातून तुझी सेवा

घडावी यासाठीच! सकाळी प्रथम तुझी दर्शनभेट व सेवा घडावी यासाठी आम्ही अत्यंत आतुर असतो; पण ती भेट जर मनासारखी होणार नसेल तर यापुढे आम्ही पंढरपूरला येणार नाही.'' सद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणे त्यांचा निरोप श्रीपांडुरंगाला रात्री सांगण्यात आला; आणि आश्चर्य असे की थोड्याच अवधीत, पहाटेची पहिली महापूजा करण्यासाठी यावे, असा देवस्थान-व्यवस्थापनातर्फे निरोप आला. ह्या यात्रेच्या वेळी एकदा भीमा नदीला मोठा पूर आला होता. सद्गुरू ज्या धर्मशाळेत उतरले होते, ती नदीकाठी होती; पण पुराचे पाणी त्या भागात शिरले ते सद्गुरूंनी भक्तांसह पंढरपूर सोडल्यावरच! त्या संदर्भात नंतर सद्गुरू भक्तांना म्हणाले, ''तुम्ही जेव्हा यात्रेत आमच्याबरोबर असता, तेव्हा तुमची जबाबदारी आमच्यावर असते.''

श्रीगुरूंचे आणखी एक वैशिष्ट्य असे की त्यांनी भक्तांना दिलेला शब्द पाळला; देहावस्थेत असतांना तर तो पाळलाच, पण देहत्याग केल्यानंतरही! सौ. ललिता घाटगे ह्यांनी, त्यांच्या नव्या घरी येण्याचे श्रीगुरूंना निमंत्रण दिले व तशी प्रार्थनाही केली. प्रकृती खूप अस्वस्थ असलेले रुग्णशय्येवरील श्रीगुरू त्यांना म्हणाले, ''जाता जाता येऊन जाईन.'' देहत्याग करण्याआधी सौ. घाटगे ह्यांना त्यांनी जी विलक्षण प्रचीती दिली, ती त्यांच्या अदृष्य रूपातील आगमनाची, म्हणजेच दिलेल्या शब्दाचे पालन करण्याची! त्यावेळी ते सौ. घाटगे ह्यांना म्हणाले, ''मी आलो बरं का जाता जाता.'' आणि त्याच दिवशी काही वेळाने नगरहून फोन आला, श्रीगुरूंच्या देहत्यागाची बातमी सांगणारा! श्री. सतीश निसळ ह्यांच्या मातोश्रींनाही श्रीसद्गुरूंनी शब्द दिला होता की तुमच्या अंतकाळी मी उपस्थित असेन व स्वतः देहत्याग केल्यावरही त्यांनी तो शब्द पाळला.

श्रीसद्गुरूंनी आयुष्यभर पहाटे ॐकाराचा जप करून उपासना केली व (ती काही भक्तांनाही दिली.) पहाटेच्या पहिल्या प्रहरी त्यांनी विशिष्ट पद्धतीने उच्चारलेल्या ॐकार जपाला नादब्रह्म म्हणावे का शब्दब्रह्म, असा प्रश्न पडणारा श्रोता, त्या परब्रह्म-प्रतीकाने निर्माण केलेल्या लहरींनी भरलेल्या व भारलेल्या वातावरणात तो प्रश्न तर विसरेच, पण स्वतःचे भानही हरपून बसे. ज्यांना तो सुयोग लाभला, ते भाग्यवंत भक्त तो अनुभव कधीच विसरू शकणार नाहीत. त्याबद्दल सद्गुरूंविषयीची कृतज्ञता व्यक्त करतांना त्यांना कवी विंदा करंदीकरांच्या शब्दांची आठवण होते-

*अमृताच्या डोही बुडविले तुम्ही । बुडतांना आम्ही, धन्य झालो ।।*

*मीपण संपले, झालो विश्वाकार । स्वरात ॐकार भेटला गा ।।*

श्रीगुरुवाणीतील शब्दसंपत्तीच्या व शब्दसामर्थ्याच्या अशा किती किती आठवणी सांगाव्यात! आता उरल्या आहेत फक्त आठवणी– काही हरवून टाकणाऱ्या, काही हेलावून टाकणाऱ्या!

श्रीसद्गुरूंच्या तपस्येमुळे व जन्मसिद्ध दैवी संपत्तीच्या लाभामुळे, त्यांची शब्दकळा सोन्याचे तेज व मोल मिळवलेली शब्दकळा असल्याचे अनेकदा जाणवते, म्हणूनच सत्पुरुषांच्या शब्दसंपत्तीच्या महत्त्वाविषयी व वाणीच्या वैभवाविषयी, संत तुकाराम महाराजांच्या तोंडून बाहेर पडलेला अभंग आठवतो व पटतोही. ते म्हणतात–

*आम्हा घरी धन शब्दांची रत्ने । शब्दांचीच शस्त्रे येत्न करू ।।*

*शब्दचि आमुच्या जीवींचे जीवन । शब्देंचि वाटू धन जनलोकां ।।*

*तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरवपूजा करू ।।*

सद्गुरूंच्या शब्दरूपी देवाची आपणही आपल्या शब्दफुलांनी गौरवपूजा करू या!

* * *

**◆ श्रीगुरुदेवांनी दिलेले वैशिष्ट्यपूर्ण दृष्टान्त ◆**

आपल्याला ईश्वराने वाणी दिली आहे. ज्याअर्थी आपणास बोलता येते त्याअर्थी तो ऐकत आहे हे नक्की. ऐकणारा कुणीतरी आहे तो ऐकत आहे म्हणूनच त्याने वाचा दिली आहे. **धूर निघत असला म्हणजे तेथे अग्नी आहे हे नक्की.**

ईश्वराला तुम्ही सगुण माना. एकदम निर्गुणाकडे जाऊ नका. त्या ईश्वराला भावना आहे. वाणी आहे असेच माना. आपण जे बोलतो ते त्याला ऐकू जाते अशी भावना ठेवा. तुम्हाला त्याची प्रचीती येईल. खऱ्या अंतःकरणाने केलेली प्रार्थना त्याचेकडे पोहोचते.



# २१. श्रीगुरुदेवांचे मार्गदर्शन

**संकलक : प्रा. डॉ. सतीश कुलकर्णी**
एम्. ई., पीएच्.डी.
(निवृत्त प्राचार्य इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे)

## धर्म म्हणजे काय?

- धर्म म्हणजे चांगले विचार धारण करणे व ते प्रत्यक्ष आचरणात आणणे.
- धर्मामध्ये पाच महान तत्त्वे सांगितलेली आहेत– १) प्रेम २) सहिष्णुता, ३) परोपकार, ४) अहिंसा, ५) सत्य.
- धर्म ही मुख्य बाब आहे. विज्ञान ही साहाय्यभूत बाब आहे. केवळ विज्ञानाचा उपयोग नाही. धर्माशिवाय विज्ञान म्हणजे काय ते समजणार नाही. धर्म आचरल्याने मनुष्यामधील पशुभाव कमी होतो.
- या धर्मात जन्म घेणाऱ्या व्यक्तीने कधीही धर्म सोडून वागू नये. प्रत्येकाने या धर्मात सांगितल्याप्रमाणे पवित्र राहून उत्तम धर्माचरण करावे. स्वतःचे कुळधर्म, कुळाचार सांभाळलेच पाहिजेत. कुळाचार सांभाळताना प्रत्येकाने आपल्या कुलदैवत व कुलस्वामीनीची सेवा नित्याने जरूर करावी. हे करताना प्रथम मान कुलस्वामिनीला द्यावा, कारण ती शक्तीरूपाने असते.
- अद्वैत सिद्धांत हा वैदिक हिंदू धर्मातील उच्च व महत्त्वाचा सिद्धांत आहे.
- हिंदू धर्मात ज्यांना धर्म पाळता येत नाही, ज्यांना उत्तम धर्माचरण करता येत नाही, त्यांनी केवळ धर्माचा अभिमान बाळगला व धर्म सांभाळणाऱ्यांना साहाय्य केले तरी ते पुरेसे आहे.

- बुद्धीने जो आचरला जातो त्याला धर्म म्हणावे, तर श्रद्धेने जो आचरला जातो त्याला पंथ म्हणावे.
- धर्म ही परमेश्वराकडे जाणारी पायवाटच आहे.
- अंधश्रद्धांच्या आहारी जाऊ नये. अशाने खरा धर्म समजत नाही. धर्माची हानी होते.
- धर्म हा तत्त्वज्ञानावर आधारित असतो. तो रूढीवर आधारित नसतो.
- लक्षात ठेवा की, धर्म हा तत्त्वज्ञानाचा जरी असला तरी धर्म हा कर्मकांडाचासुद्धा आहे.
- कर्मकांड म्हणजे धर्म का? तर नाही. खूप अज्ञानी माणसे कर्मकांडालाच धर्म समजतात. पण ते योग्य नाही.
- पैसा हे कर्तृत्वाचे लक्षण आहे. धर्माचे नव्हे.
- धर्मामध्ये आचरणासाठी काही तत्त्वे सांगितली आहेत. त्यापैकी अहिंसा हे एक तत्त्व आहे.
- जोपर्यंत आपल्या जीवाला धोका उत्पन्न होत नाही, तोपर्यंत अहिंसा पाळावी.
- आपली परंपरा व्यक्तीला श्रेष्ठ मानीत नाहीत, तर ती ईश्वराला श्रेष्ठ मानते.
- हिंदू धर्म हा त्यागावर आधारलेला आहे.
- हिंदू धर्मात प्रपंच करावयास सांगितला आहे. तो कालांतराने वैराग्यप्राप्तीसाठी व वैराग्य प्राप्त झाल्यावर मोक्षप्राप्तीसाठी आहे.
- धर्म सांभाळणे म्हणजे ईश्वरावर निष्ठा ठेवणे, गुरूंची सेवा करणे.
- चमत्कारातून माणसाला खरा धर्म समजत नाही.
- शुद्ध धर्माचरण हेही श्रेष्ठ प्रकारचे सामाजिक कार्यच असते.
- ईश्वरी शक्ती जाणण्यासाठी आपण आपली पात्रता, क्षमता वाढविली पाहिजे.
- जो माझ्यात आहे, तोच सर्वांत आहे, असा महत्त्वाचा सिद्धांत या (हिंदू) धर्मात आहे.

## गुरू

- गुरू सत्यप्रिय, निःस्वार्थी, परोपकारी, भक्तांचे कल्याण चिंतणारे, धर्मनिष्ठ, धर्मपरायण, गुरुपरंपरा पाळणारे, शिस्तप्रिय व शास्त्रसंमत नियमांचे कडक आचरण करणारे व पावित्र्य सांभाळणारे असावेत.
- सत्पुरुष याचा अर्थ सत्प्रवृत्त व्यक्ती, सत्य जाणणारी व्यक्ती, सत्य अनुभवाला आलेली व्यक्ती.
- गुरुंच्या मार्गदर्शनाने ईश्वरप्राप्ती लवकर होते.
- स्टेजवर उभे राहून कीर्तन करत आहेत, लोकांना ज्ञान शिकवताहेत, पण हे गुरु नाहीत.
- प्रत्येक माणसात असणाऱ्या शक्तीप्रमाणे त्याच्याभोवती वलय निर्माण होते. ज्यांना साक्षात्कार झाला आहे तेच हे तेजोवलय पाहू शकतात.
- स्वधर्माचरण करणारा, भक्ती करणारा असा मनुष्य स्वतःच्या प्रयत्नाने जरी ते करीत असला तरी त्याला परंपरेतील गुरू लाभणं आवश्यक असतं. तरच त्याला उत्तम गतीला जाता येते.

* * *

### श्रीगुरू म्हणाले होते...

- आमच्या ऐश्वर्याची काही लोक निंदा करतात; पण आम्हाला प्राप्त झालेले ऐश्वर्य भगवंताला मान्य आहे व त्यामुळे ते दिवसेंदिवस वाढत आहे. देहाचे हाल करण्यात कोणतं श्रेष्ठत्व आहे हे मला कळत नाही. साधन म्हणून ऐश्वर्याचा उपयोग अवश्य करावा; विलास म्हणून नाही. मी गाडीतून बाहेर जातो, पायी अनवाणी फिरण्यातून काय साधतं हे मला समजत नाही. कारण शेवटी ह्या देहातच अध्यात्म आहे. 'त्या'ला साध्य करायचं ते ह्याच्याच माध्यमातून. मग त्याचे हाल कशासाठी? **देहाची चोचले पुरवू नयेत हे खरे; पण त्याचे हालही करायचे नाही, हेही खरे!** त्यासाठी ऐश्वर्याला साधन समजा; साध्य नाही.



# २२. इच्छापूर्ती करणारे श्रीगुरू

**श्रीमती अनुराधा श्रीपाद कुलकर्णी**

निवृत्त शिक्षिका, सोलापूर

मी, श्रीमती अनुराधा श्रीपाद कुलकर्णी, १९९८ पासून सोलापूर सत्संग मंडळाची सदस्या आहे. मी या सत्संग मंडळात कशी आले, याचा अगदी पहिला अनुभव कथन करते. मी प्राथमिक शाळेत शिक्षिका होते. १९९८ मध्ये १२ जानेवारी ते २० जानेवारी अशी शाळेला संक्रांतसुट्टी होती. त्यामुळे मी पुण्याला मोठ्या मुलाकडे गेले होते. तेथे मला (गुरूवाणीची) ३ पुस्तके वाचायला मिळाली. ती वाचल्यावर मी झपाटल्यासारखी झाले आणि हे महाराज कोण? आपण यांचे दर्शन घेतले पाहिजे, अशी ओढ लागली. माझी सुट्टी २० तारखेला संपत होती. १८ तारखेस पुस्तके वाचली; एकच दिवस मध्ये होता. इतर पुस्तके वाचावी तर कुणाची ओळख नाही, माहिती नाही. सुनेलाही काही माहिती नव्हते. ती अचानक शेजाऱ्याबरोबर नगरला गेली होती. तेव्हा तिने गुरुदेवांचे प्रत्यक्ष दर्शन घेतले होते आणि प्रसाद म्हणून माझ्यासाठी ३ पुस्तके आणली होती. ती पुस्तके वाचून झाल्यावर प. पू. क्षीरसागर महाराजांची माहिती काढण्याचा मी प्रयत्न केला. तेव्हा सोलापूर येथे सत्संग भरतो पण कधी असतो, कुठे असतो काही माहिती नव्हते.

आपण सोलापूरला गेल्यावर पाहू, असे ठरवून मी रविवारी सोलापूरला आले. सोमवारी मला सकाळी शाळा होती. पहाटे मला स्वप्न पडले. त्या स्वप्नात प. पू. क्षीरसागर महाराजांचा फोटो व स्वामी समर्थांचा फोटो असे दोन फोटो सरकत जवळ आले आणि क्षीरसागर महाराजांचा फोटो वर, त्याखाली स्वामींचा फोटो असे दिसले आणि मी जागी झाले. दिवस उजाडला. नित्याची कामे करून शाळेत गेले. माझ्या डोक्यात सारखा विचार येत होता– आपल्याला जे दिसले त्याचा अर्थ काय असावा? मी माझ्या बुद्धीला पटेल असा अर्थ घेतला की, स्वामींना देहरूपात पाहण्याची, त्यांचे दर्शन मिळण्याची आपली ताकद नाही, आपली सेवाही नाही. तेव्हा क्षीरसागर महाराज

म्हणजेच स्वामी आहेत आणि ते आता देहरूपात आहेत तेव्हा आपण त्यांचा पत्ता काढून त्यांचे दर्शन घ्यावे, असा ध्यास लागला.

शाळेत गेल्यावर साडेनऊ वाजता मुलांची मधली सुट्टी झाली. मुले डबा खाऊन वर्गात परत आली. त्याबरोबर एक ६ ते ७ वर्षांची मुलगी माझ्यासमोर आली. तिने एक चिट्ठी दिली व मला म्हणाली, ''माझ्या आईने तुम्हाला ही द्यायला सांगितली.'' मी चिट्ठी घेतली आणि टेबलावरच्या हजेरीपटात ठेवू लागले. तशी ती मुलगी म्हणाली, ''आईने तुम्हाला चिट्ठी वाचायला सांगितली आहे. ती वाचा की बाई!'' मी म्हटलं, ''तू कोण? तुझी आई कोण? मी नंतर वाचते.'' तशी ती हट्टाला पेटली. ''नाही बाई आधी ती वाचा.'' मग मात्र ती चिट्ठी वाचायला घेतली. कागदाची घडी उघडली. कागदावरून नजर फिरवली. मी म्हटलं माझ्या मनातला प्रश्न यांना कसा समजला? ती मुलगी कोण? तिची आई कोण? काही कळेना. मान वर करून मी त्या मुलीचा शोध घेतला पण ती केव्हाच तिथून गेली होती. चारही जिन्यांवर उभे राहून तिचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला; पण ती कोण होती याचा सुगावा लागला नाही.

सर्वात महत्त्वाचे पुढचे आहे–

त्या चिट्ठीत चक्क असे लिहिले होते– ''बाई, तुम्हाला क्षीरसागर महाराजांच्या सत्संगाविषयी माहिती हवी आहे. ती या चिट्ठीत लिहिली आहे. ती वाचा. क्षीरसागर महाराजांचा सत्संग दर महिन्याच्या चौथ्या रविवारी ४॥ ते ५॥ या वेळात स्वामी विवेकानंद हॉलमध्ये भरतो. श्री. कालिदास जोशी त्याचे अध्यक्ष आहे आणि सौ. मंदा जोशी या उपाध्यक्ष आहेत.

चिट्ठी वाचून मी खूप हमसाहमशी रडले. लवकर शांत होता येईना. वर्गातली मुले माझा अवतार पाहून घाबरली. त्यांनी शेजारच्या वर्गात जाऊन तेथील बाईंना बोलावून आणले. मग मी त्यांना चिट्ठी दाखवली आणि नंतर त्यांना सांगितले की, ''एक आठवडा झाला, मी सत्संगाबद्दल कशी कुठे चौकशी करावी याचा विचार करीत होते. पण मनातला हा प्रश्न मी कुणालाही बोलले नव्हते. पण अघटित घडले आणि मला माझ्या प्रश्नाचे अशा स्वरूपात प्रत्यक्ष महाराजांनी मुलीच्या रूपात येऊन मला मार्गदर्शन केले असावे, असे मला वाटते.''

त्यानंतर मी झपाटल्यासारखी शेवटच्या रविवारी खूप अडचणीतून सत्संग मंडळाच्या बैठकीला पोहोचले. श्रीगुरुदेवांचा फोटो पाहून खूप, जवळजवळ अर्धा तास रडत होते. हा सगळा अनुभव त्या दिवशी सत्संग मंडळाच्या बैठकीत सांगितला. सगळे घरी गेले. श्रीगुरुदेवांची मला प्रत्यक्ष दर्शन घेण्याची ओढ लागल्यामुळे मी दर दोन दिवसांनी अध्यक्ष, उपाध्यक्षांना फोन करून मला नगरला घेऊन जाण्याची विनंती

करीत राहिले. अखेर ''गुरुदेवांची तब्येत बरी नाही, त्यांना विश्रांतीसाठी महाबळेश्वरला नेले आहे, तिथे कुणालाही दर्शनाची परवानगी मिळत नाही असे समजते, तरी पण आपण चौकशी करू. तुमचा योग असेल तर आपण महाबळेश्वरला स्वतंत्र गाडी करून जाऊ.'' असे अध्यक्षांनी सांगितले. अखेर मे १९९८ मध्ये परवानगी मिळाली. आम्ही महाबळेश्वरला स्वतंत्र गाडी करून निघालो.

श्रीगुरूदेव 'आयोना' बंगल्यात होते. चारही बाजूने घनदाट झाडी. आत जाण्याचा रस्ता माहिती नव्हता. पण तेथे पोहोचल्यावर दोन माणसे गाडीसमोर आली. त्यांनी ''आम्ही रस्ता दाखवतो'' असे सांगितले. त्यांना गाडीत घेतले व आम्ही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ५ वाजायला ५ मिनिटे कमी असतांना 'आयोना' बंगल्याच्या पायरीजवळ पोहोचलो. वरून गुरुदेवांचा निरोप आला– ''लोकांना दर्शनाला पाठवा. ५ वाजता मला फिरायला निघायचे आहे.'' आम्ही तो निरोप ऐकून पाय धुवून अक्षरशः दोन दोन पायऱ्या सोडून पळत सुटलो. महाराजांच्या समोर दर्शनाला उभी राहिल्यावर अध्यक्षांनी माझी ओळख करून दिली. ''ह्यांना गुरूदर्शनाची खूप ओढ होती म्हणून इथे आलो'' असे सांगितले. महाराजांनी मला डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळले. त्यावेळी महाराजांनी **चक्क स्वामी समर्थांच्या रूपात दर्शन दिले** आणि नजरेने विचारले– '' दिसले का तुला तुझे स्वामी समर्थ?'' ते ऐकल्यावर मनाचा बांध फुटला. खूप समाधान वाटले. तिथून हलू नये असे वाटले. दर्शन करून खाली येईपर्यंत गुरुदेव पाठोपाठ व्हीलचेअरवरून फिरायला खाली निघाले. ते खाली येऊन गाडीत बसेपर्यंत पुन्हा दर्शन मिळाले. आम्ही सोलापूरला परत निघालो तर नेमकी गुरुदेवांची फिरायला निघालेली गाडी आमच्या गाडीसमोरच होती. आम्ही हळूहळू जवळजवळ १ किमी. त्या गाडीमागे होतो. पुन्हा सतत दर्शन मिळत होते. मला तर कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. दर्शन मिळाले पण वाणी ऐकायचा बोलायचा प्रसंग आला नाही. ती रुखरुख होती की आपल्याला गुरुदेवांचा आवाज ऐकायचा आहे. ती इच्छा पण गुरुदेवांनी पूर्ण केली. गुरूपौर्णिमेच्या दर्शनासाठी नगरला गेल्यावर मंदिरात कॅसेट लावली होती. तेव्हा गुरुदेवांचा आवाज ऐकला. कान आणि मन तृप्त झाले.

पुढे 'गुरूवाणी'ची पुस्तके वाचतांना मी स्वतः मला ऐकू येईल अशा आवाजात वाचायची. **पुस्तक मी वाचत होते पण आवाज गुरूदेवांचा येत होता.** अशा प्रकारे माझी गुरुदेवांचा आवाज ऐकण्याची इच्छाही श्रीगुरूकृपेने पूर्ण झाली आहे.

* * *

ॐ

## श्रीगुरुस्वरूप



श्रीगुरुदेवांचे विभूतिमत्त्व खूप भव्य, व्यापक आणि अनेक पैलू असलेले बहुआयामी स्वरूपाचे आहे. त्यांच्यातील असंख्य पैलूंपैकी कशाकशाचे वर्णन करावे असा त्यांच्या संबंधी बोलणाऱ्या/लिहिणाऱ्याला प्रश्नच पडतो.

* त्यांच्यातील शुद्ध विमल ज्ञानसंपदेविषयी लिहावे का पीठाधीश जगद्गुरु श्रीशंकराचार्यांसारख्या श्रेष्ठ संन्यासी यतिवरांनाही त्यांच्याविषयी ममत्व वाटले व महत्त्व पटले अशा तेजस्वी ब्रह्मवेत्त्याच्या निष्कलंक जीवनाविषयी लिहावे ?
* त्यांच्या समर्पित शिष्यत्वाविषयी व अलोट गुरुभक्तिविषयी लिहावे का, गुरुपदावर आरूढ झाल्यानंतरच्या त्यांच्या अधिकारसंपन्न मार्गदर्शनाविषयी लिहावे ?
* त्यांच्या अफाट सहनशक्तीविषयी लिहावे का त्यांच्या आश्चर्यकारक स्मरणशक्तीविषयी लिहावे ?
* त्यांच्या प्रचंड लोकसंग्रहाविषयी लिहावे का त्यांच्या त्यागी-विरागी अपरिग्रहाविषयी लिहावे ?
* त्यांच्या वक्तशीरपणाविषयी लिहावे का त्यांच्या एकूण शिस्तप्रियतेविषयी लिहावे ?
* त्यांच्यातील संवेदनशीलतेविषयी लिहावे का त्यांच्यातील औदार्याविषयी, मोठ्या मनाविषयी बोलावे ?
* स्वधर्माविषयी-गुरुपरंपरेविषयी त्यांना वाटणाऱ्या जाज्ज्वल्य अभिमानाविषयी लिहावे का सत्ताधीशांपुढे वा धनसंग्रह करण्यातच धन्यता मानणाऱ्या धनिकांपुढे न झुकणाऱ्या त्यांच्या स्वाभिमानाविषयी लिहावे ?
* त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराविषयी लिहावे का तो अधिकार ज्या असंख्य भक्तांनी प्रत्यक्ष अनुभवला त्या चमत्कारसदृश गुरुकृपेच्या अनुभवांविषयी लिहावे ?
* त्यांच्यातील कोणत्या गुणविशेषांविषयी बोलावे ? - त्यांच्यातील नेतृत्वाविषयी का त्यांच्या एकूणच कार्यकर्तृत्वाविषयी ? त्यांच्या दातृत्वाविषयी का त्यांच्या वक्तृत्वाविषयी ? का या सर्वांवर मात करणाऱ्या त्यांच्यातील भक्तवत्सल मातृत्वाविषयी ? असे अनेक प्रश्न त्यांच्याविषयी बोलणाऱ्या किंवा लिहिण्याचा प्रयत्न करणाऱ्याला पडतात. अशा वेळी श्री शिवमहिम्नस्तोत्रकर्त्या पुष्पदंतांचे शब्द उसने घेऊन त्याला म्हणावेसे वाटते -

**तव तत्त्वं न जानामि, कीदृशोऽसि महेश्वर**
**यादृशोऽसि गुरुदेव, तादृशाय नमोनमः ॥**

ॐ ॐ ॐ

# सद्गुरू श्रीरामकृष्ण क्षीरसागर स्वामी महाराज सेवा प्रतिष्ठान, पुणे

(न्यास नोंदणी क्रमांक : ई-६९०९ (पुणे) दि. ९/७/२०१४)

द्वारा - श्री. प्रकाश पिले, फ्लॅट नं. ४०२, सुमीत को. हौ. सोसायटी,
स्वानंद सोसायटी लेन नं. १, सहकारनगर नं. २, पुणे ४११००९.

---

## प्रतिष्ठानची काही उद्दिष्टे

१) श्रीसद्गुरुमहिमा प्रसारासाठी विविध उपक्रम करणे.
२) त्यासाठी मराठी व अन्य भाषांमध्ये साहित्य प्रकाशन करणे.
३) वेदविद्या अध्ययन व अध्यापन कार्यासाठी साहाय्य करणे.
४) अध्यात्मविद्या व वेदविद्या यांविषयी जनसामान्यांत उत्सुकता व आवड निर्माण करणे.
५) समाजहितवर्धक सामाजिक सांस्कृतिक उपक्रम करणे.

---

## सत्संग प्रकाशन

- मार्च १८ अखेर प्रकाशित संग्रह: ३०
- श्री गुरुदेवांच्या आठवणी
- Memoirs of Shri Gurudeo Vol. I & II
- Divine Master
- अलौकिक गुरुदेव - मराठी, हिंदी, गुजराती भाषांमध्ये उपलब्ध
- श्री गुरुकृपेच्या आठवणी व त्यांच्या शिकवणीतील सूत्रे - श्री.वसंतराव मार्डीकर
- भावपुष्पांजली (काव्यसंग्रह)- सौ. श्यामला सुरू
- कथारूप रामराय माहात्म्य - प्रा. दि. ए. पाठक, प्रा. डॉ. शशिकला गांगल

---

## ग्रंथप्राप्ती स्थळ

- संकलन -संपादक - प्रकाशक यांच्याकडे
- श्री. चंद्रकांत नरहरपंत देशपांडे

  श्रीरामकृष्ण निवास, सी.४, महिम्न को. हौ. सोसायटी, गिरिजाशंकर विहार, शारदा निकेतन, लेडिज होस्टेलजवळ, ११९२, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२.

  फोन : (०२०) २५४६८४५१

---

## प्रतिष्ठानला स्वेच्छेने देणगी देणाऱ्यांना विनंती

कृपया

- चेक SSR Kshirsagar Swami Maharaj Seva Pratishthan, Pune या नावाने लिहावा.
- बँकमार्फत रक्कम पाठविणार असल्यास:

  Canara Bank, Sadashiv Peth Branch, Pune 30. : S B A/c No. 0260101020439

  प्रतिष्ठानच्या खात्यात रक्कम पाठवता येईल. रक्कम भरल्यावर तपशील कळवावा, म्हणजे पावती पाठवता येईल.

---

**Website**

www.shriramkrishnakshirsagarmaharaj.com | www.sadguruswani.com